सभापतीस्थानी माननीय उपाध्यक्ष

पृ.शी.: राज्यात कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांचे वाढत असलेले प्रमाण.

मु.शी.: राज्यात कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांचे वाढत असलेले प्रमाण या विषयावर सन्माननीय सदस्य सर्वश्री यशवंतराव गडाख, उल्हास पवार, रमेश निकोसे, मधुकर सरपोतदार, गुरुनाथ कुलकर्णी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, जयंत पाटील, श्रीमती सुधा जोशी, सर्वश्री संजय दत्त, दिलीपराव देशमुख, सुरेशदादा देशमुख, सदाशिवराव पोळ, वसंतराव पवार, रणजितसिंह मोहिते-पाटील, जगन्नाथ शेवाळे, डॉ. एन.पी.हिराणी वि.प.स. यांनी नियम 97 अन्वये उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

श्री यशवंतराव गडाख (अहमदनगर स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी नियम 97 अन्वये पुढीलप्रमाणे अल्पकालीन चर्चा उपस्थित करीत आहे :--

"राज्यात वाढत असलेले कर्ज-बाजारी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण, खाजगी सावकार, सोसायटया, जिल्हा बँका, राष्ट्रीयकृत बँका यांच्या विळख्यात अडकलेला सामान्य शेतकरी, बँकांचे डोक्यावर असलेले थकित कर्ज या सर्व पार्श्वभूमीवर शेतकऱ्याला शेतीसाठी द्यावयाच्या कर्जाचे व्याजदर कमी करुन त्याला 6 टक्के दराने उपरोक्त वित्तीय संस्थांकडून कर्ज पुरवठा करण्याची निकड, शेतीमालाला आधारभूत व रास्त किंमत ठरवून देणे, कर्जबाजारी शेतकऱ्यांची या जोखडातून मुक्तता करण्यासाठी केंद्र शासनाने व राज्यशासनाने त्यांचे कर्ज भरुन घेण्याची निकडीची गरज, नाबार्डकडून होणाऱ्या पतपुरवठयावर नियंत्रित व्याजदर आकारणी करण्याची व प्रत्येक स्तरावर त्यावर शासनाचे नियंत्रण ठेवण्याची गरज, या सर्व पार्श्वभूमीवर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय,...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, एका महत्वाच्या प्रश्नावर या ठिकाणी चर्चा सुरु आहे. ज्या विषयाची चर्चा सुरु आहे त्या खात्याचे दोन्हीही मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत त्यामुळे सभागृहाचे कामकाज माननीय मंत्रीमहोदय येईपर्यंत स्थगित करण्यात यावे.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, मी या विषयाच्या संदर्भात नोंद घेत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : महाराष्ट्रातील शेतक-यांच्या जिव्हाळयाच्या विषयावर या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख साहेब आपले विचार व्यक्त करीत आहेत असे असतांना संबंधित सहकार मंत्री व सहकार राज्यमंत्रीही उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज माननीय मंत्रीमहोदय येईपर्यंत स्थगित करण्यात यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

उपसभापती : ठीक आहे सभागृहाची बैठक 10.30 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 10 वाजून 17 मिनिटांपासून 10 वाजून 30 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी मा.उपसभापती)

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, चर्चेच्या सुरूवातीला मी आघाडी सरकारचे अभिनदंन करतो. विशेषत: सहकार व मुख्यमंत्र्यांचे अभिनदंन करतो. त्यांनी एक हजार कोटीचे पॅकेज शेतकऱ्याच्या आत्महत्या होत असल्यामुळे शेतकऱ्यांसाठी जाहीर केले आहे. त्याच बरोबर सामुदायिक विवाह योजनेसाठी 1 कोटी रूपये ठेवले आहेत. वेगवेगळया पध्दतीने शेतकऱ्यांना मदत करण्याचे धोरण स्वीकारल्याबद्दल मी शासनाने अभिनंदन करतो. या प्रश्नाचा आवाका फार मोठा आहे. या विषयावर माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, नितीन गडकरी यांच्यासह अन्य काही सदस्य बोलणार आहेत. त्यामुळे मी जास्त काही बोलणार नाही. पक्षीय अभिनिवेष बाजूला ठेवून शासनाला सूचना केल्या पाहिजेत व त्यासंबंधी शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. खोलात जाऊन विचार केला तर या देशामधील शेती व्यवस्था ही पावसावर अवलंबून आहे हे सहज लक्षात येते. पाऊस चांगला झाला तर चांगले पीक येते. पाऊस चांगला पडला तर धरणामध्ये पाणी अडविता येते. पावसावर अवलंबून असणाऱ्या शेती व्यवस्थेमध्ये मूळ घटक हा शेतकरी असतो. तो जर अडचणीत आला तर त्याला कर्ज देणारी बँकसुध्दा अडचणीत येते. याचा फटका अल्पभूधारक शेतकऱ्याला जास्त बसतो. आजही आत्महत्यचे जास्त प्रमाण अल्पभूधारक जिराईत शेतकऱ्यांमध्ये आहे, हे स्पष्ट दिसत आहे. महाराष्ट्रामध्ये कितीही जमीन पाटबंधाऱ्या खाली आणली तरी 30 टक्क्याच्या वर आपण जाऊ शकत नाही. त्यामुळे राहिलेले 70 टक्के शेतकरी हे जिराईत आहेत. त्यावर विचार करणे गरजेचे आहे. भावाभावामध्ये भांडण होत असल्यामुळे शेतीचे लहान लहान तुकडे पडत आहेत. लोकसंख्या वाढल्यामुळे शेती हा भार सहन करू शकत नाही, अशी अवस्था शेतीची झाली आहे. त्यादृष्टीने विचार केला पाहिजे. आज जगामध्ये मुक्त अर्थव्यवस्थेचा नारा सुरू झालेला आहे. त्याचे गोडवे गायले जात आहेत. या सगळया वातावरणात, मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये सगळयात पहिला बळी गरीब शेतकऱ्याचा जात आहे, याचासुध्दा विचार निश्चितपणे करणे आवश्यक आहे. आज शेतीमधील पायाभूत सुविधांचा मोठया प्रमाणावर विकास केला पाहिजे. शेतकऱ्यांना सिंचन, बियाणे, खत, आधुनिक संदेश यंत्रणेसह वेगवेगळया पायाभूत सुविधा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख.....

पुरविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. गेल्या 40-50 वर्षाच्या काळात देशामध्ये पुष्कळ काम झाले. रस्ते, वीज, पाणी हे उपलब्ध झाले. तरी सुध्दा यामध्ये फार मूलभूत सुविधा निर्माण करण्याची गरज आहे. आज त्याचा विचार केला तर थायलंड सारख्या देशाने शेती मालावर प्रकिया करण्याचे प्रमाण 10 टक्क्यावर आणले आहे.

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख..

भारतासारख्या खंडप्राय देशात शेतीमालावर फक्त दोन टक्के प्रक्रिया केली जाते. जर शेतीमालावर फक्त दोन टक्के प्रक्रिया होत असेल तर शेतीमलाला भाव कसा मिळणार ? आजही आपल्या देशामध्ये 220 दशलक्ष टन धान्य पिकते आणि फक्त 30 टक्के धान्य साठवणूक करण्याची सुविधा उपलब्ध आहे. आज आपण शेतीमध्ये फक्त 1.44 टक्के इतकी गुंतवणूक करतो. ही गुंतवणूक 16 टक्केपर्यंत वाढविण्याची गरज आहे. या गुंतवणुकीमुळे शेती विकासाचा दर चार टक्केपर्यंत जाईल. माननीय पंतप्रधान आणि केंद्रीय कृषी माननीय श्री.शरद पवार यांनी शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्याच्या संदर्भात मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरु केले आहेत. याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. या क्षेत्रामध्ये ज्या बेसिक गोष्टी आहेत त्यामध्ये सेवा सोसायट्यांना सुध्दा महत्व आहे. मी एका गावातील गेली 40 वर्षे सेवा सोसायटीचा संचालक आहे. शेतकऱ्यांना शेतीसाठी अल्प कालावधीत, ताबडतोब कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी सेवा सोसायट्या गावांमध्ये आहेत. या सेवा सोसायट्या कशा बळकट करता येतील याचा शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. सेवा सोसायट्यावर महाराष्ट्र सरकारने एक कमिटी नेमली होती. त्या समितीने काही सूचना दिल्या होत्या. सर्वसामान्य शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करणाऱ्या सेवा सोसायट्या मजबूत केल्या पाहिजेत, त्यांचे प्रश्न सोडविले पाहिजेत. सेवा सोसायट्यांचे काम करणारे सेक्रेटरी आहेत ते अत्यंत अल्प वेतनावर काम करीत आहेत, त्यांच्या वेतनाबाबत सरकारने विचार केला पाहिजे. सेवा सोसायटीची ऑडीट फी, सोसायटीची निवडणूक यावरील खर्च शासनाने केला पाहिजे. त्याच्यांवरील हा वित्तीय भार कमी केल्यास शेतकऱ्यांना कमी व्याजाने कर्ज पुरवठा होऊ शकेल. यासंबंधी आपण कोणता निर्णय घेणार आहात याची माहिती मंत्रिमहोदयांनी सभागृहाला द्यावी अशी विनंती आहे.

मी आणखी एका महत्वाच्या मुद्याकडे सरकारचे लक्ष वेधतो. आता वैद्यनाथन समितीचा अहवाल आलेला आहे. केंद्र सरकारने ऑगस्ट 2004 मध्ये ही समिती नेमली होती. या समितीने देशातील महत्वाच्या बँकींग क्षेत्रातील, सहकारी क्षेत्रातील लोकांच्या मुलाखती घेऊन, त्यांची मते जाणून हा अहवाल दिलेला आहे. या अहवालामध्ये महत्वाची टिप्पणी केलेली आहे की, रिझर्व्ह बँकेने राष्ट्रीयकृत बँकांना शेतीसाठी 18 टक्के कर्ज पुरवठा करावा असे बंधन घातलेले आहे. आज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख....

आपण खेडेगावातील चित्र पाहिले तर कोणतीही राष्ट्रीयकृत बँक शेतकऱ्यांना कर्ज देण्यास तयार नसते. फार थोड्या बँका फक्त सहा-सात टक्केपर्यंत शेतीसाठी कर्ज देते. या बँकांनी 18 टक्केपर्यंत उद्दिष्ट गाठलेले नाही. याबाबत राष्ट्रीयकृत बँकासंबंधी कडक धोरण अवलंबिण्याची गरज आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राष्ट्रीयकृत बँका म्हणतात की, दुष्काळ पडल्यानंतर आमचे कर्ज परत आले नाही तर आम्ही कर्ज कसे देऊ ? परंतु गावच्या सेवा सोसायटया किंवा सहकारी बँका मात्र याबाबतचा विचार करीत नाही आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून त्या शेतकऱ्यांना कर्ज देतात. पाऊस पडो अथवा न पडो, पीक येवो अथवा न येवो, परंतु शेतकऱ्यांना कर्ज दिले गेलेच पाहिजे अशी भूमिका त्या घेतात. त्यामुळे अशा परिस्थितीत सरकारने त्या सेवा सोसायटया आणि सहकारी बँकांना मदत करण्याचा निश्चितपणाने प्रयत्न केला पाहिजे. वैद्यनाथन समितीने जो अहवाल दिला आहे त्यामध्ये त्यांनी सहकार क्षेत्राची परिस्थिती नमूद केली आहे. त्यांनी अहवालामध्ये नमूद केले आहे की, सेवा सोसायटयांचा प्राथमिक तोटा 4595 कोटी, जिल्हा बँकेचा 4401 कोटी आणि राज्य बँकांचा संचित तोटा 281 कोटीपर्यंत गेला आहे. म्हणून त्यांनी महत्वपूर्ण शिफारस केली आहे की, केंद्र सरकारने केवळ शेती कर्जातून निर्माण झालेला तोटा सहन करणे संयुक्तिक ठरेल. त्या समितीने 14839 कोटी रुपयांचे पॅकेज सादर केले आहे. सहकारी सोसायटया, सहकारी बँका, राज्य सहकारी बँकांचा तोटा भरुन काढण्यासाठी हे केलेले आहे. यामध्ये केंद्राचा 53 टक्के, राज्याचा 31 आणि सहकारी यंत्रणांचा 16 टक्के वाटा असेल. वैद्यनाथन समितीने केलेल्या शिफारशीनुसार पॅकेजसाठी करावयाच्या 31 टक्के तरतुदीबाबत राज्य सरकारने निर्णय घेतला आहे काय ? घेतला नसेल तर तो निर्णय कधी घेणार आहे ? याबाबतचा खुलासा झाला पाहिजे.

शेतकऱ्यांना पाईपलाईन टाकण्यासाठी, विहीर खोदण्यासाठी, ट्रॅक्टर खरेदी करण्यासाठी जे मध्यम मुदतीचे कर्ज लागते ते 10-12 वर्षाच्या मुदतीत व अल्प दरामध्ये मिळाले पाहिजे. कारण भांडवली खर्च करुन, शेती पिकली नाहीतर शेतकरी कर्ज फेडू शकत नाही. म्हणून अशा अनेक गोष्टींच्यासंदर्भातील निर्णय राज्य सरकारने घेतले पाहिजेत. यासाठी सहकारी कायद्यामध्ये खऱ्या अर्थाने बदल करण्याची गरज आहे. सेवा सोसायटयातून शेतीसाठी कर्ज मिळते, परंतु ग्रामीण भागातील शेतकऱ्याच्या मुलाला बी.एड., डी.एड. किंवा अन्य अभ्यासक्रमासाठी प्रवेश पाहिजे असेल तर त्याला सेवा सोसायटयांकडून कर्ज मिळू शकत नाही. म्हणून सहकार क्षेत्राचा अभ्यास करुन, त्या कायद्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे. आपण जर त्या कायद्यामध्ये बदल केला नाही तर, मुलाच्या शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी शेतकऱ्यांना खाजगी सावकाराकडे जाण्याशिवाय पर्याय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिल्लक राहणार नाही. शेतकऱ्यांना शेतीबरोबरच इतर खर्चासाठी सुध्दा कर्ज देण्याबाबतची व्यवस्था सहकार कायद्यामध्ये निश्चितपणाने केली पाहिजे अशी माझी सरकारला विनंती आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, यासंदर्भात काही महत्वांच्या गोष्टींबाबतचे निर्णय सरकारने घेतले पाहिजेत. पीक विमा योजनेची पध्दत अतिशय किचकट आहे. पिक विमा योजनेंतर्ग शेतकऱ्यांना लाभ द्यावयाचा झाल्यास शेती खाते, तहसिलदार, तलाठी, ग्रामसेवक या सर्वांचे एकमत झाल्याशिवाय या योजनेचा लाभ दिला जात नाही. म्हणून पाऊस न पडल्यामुळे पीक गेले तर शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याच्या दृष्टिकोनातून सरकारने सुलभ व्यवस्था केली पाहिजे.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख ..

त्याचबरोबर ठिबक सिंचनाच्या बाबतीत सुध्दा शासनाने अधिक लक्ष दिले पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.सध्या आपल्याकडे जे काही पाणी उपलब्ध आहे त्यातील कमीत कमी पाण्याचा उपयोग करुन जास्तीत जास्त शेती पाण्याखाली कशी आणता येईल या दृष्टीने अधिक प्रयत्न होण्याची गरज आहे.यासाठी ठिबक सिंचनासाठी जास्तीत जास्त अनुदान देण्यात दिले पाहिजे.वन टाईम सेटलमेन्टच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी जास्त बोलतील.सध्या शासनाने जे पॅकेज जाहीर केलेले आहे ती तात्पुरती उपाययोजना आहे त्या पॅकेजमधून शेतक-यांचे प्रश्न सुटू शकणार नाहीत.या चर्चेच्या निमित्ताने मी माननीय मत्रिमहोदयांना जाहीरपणे विचारु इच्छितो की ,1972 साली महाराष्ट्रात दुष्काळ पडता होता परंतु त्यावेळी शेतक-यांच्या आत्महत्या का झाल्या नाहीत ? आज शेतकरी आत्महत्या करीत आहेत परंतु त्याची दुसरी बाजू देखील आपण पाहिली पाहिजे. 1971-72 च्या दरम्यान राज्यात दुष्काळ पडला होता त्यावेळी राज्यात पायाभूत सुविधा मोठया प्रमाणावर उपलब्ध नव्हत्या. त्या वेळी रस्ते,वीज,पाटबंधारे इत्यादी सुविधा फारशा नव्हत्या.त्या काळात जी सामाजिक परिस्थिती होती ती मी जवळून पाहिलेली आहे.त्यावेळी जी सामाजिक स्थिती होती त्यामध्ये आता पुष्कळ सुधारणा झालेली आहे.गेल्या 30 -40 वर्षा पूर्वी जी सामाजिक स्थिती होती त्यामुळे शेतक-यांच्या आत्महत्या झाल्या नाहीत परंतु आता सामाजिक स्थितीत बरीच सुधारणा झाली आहे व त्यामुळे शेतक-यांचे बळी जात आहेत. 1972 साली जेव्हा दुष्काळ पडला होता तेव्हा रस्ते, एस.टी., वीज, पाणी इत्यादी सुविधा नव्हत्या एका एका जिल्हयात रोजगार हमी योजनेच्या कामावर पाच पाच लाख मजूर काम करीत होते. तरी सुध्दा त्यावेळी शेतक-यांनी आत्महत्या केल्या नव्हत्या.याचे कारण असे की त्यावेळी कै.वसंतराव नाईक हे मुख्यमंत्री होते आणि त्यांनी जाहीरपणे असे स्टेटमेन्ट केले होते की, दुष्काळामुळे कोणत्याही शेतक-याने वा मजुराने आत्महत्या केली तर त्या गावातील पोलीस पाटलाला त्यासाठी जबाबदार धरण्यात येईल. - आज दुष्काळाच्या बाबतीत जबाबदारी निश्चित करीत असतांना जिल्हाधिका-यांना वा मुख्य कार्यकारी अधिका-यांना जबाबदार धरण्यात येते परंतु पोलीस पाटलांना मात्र जबाबदार धरण्यात येत नाहीत.पूर्वी पोलीस पाटलाला जबाबदार धरले जात होते आणि त्यावेळी त्याच्या घरात धान्य जरी नसले तरी संपूर्ण गावातील लोकांकडे त्याचे पूर्ण लक्ष असावयाचे. पंरतु ही संस्कृती आता शासनाने नष्ट करुन टाकली आहे.एखादा निर्णय घेत असतांना त्याचे काही तोटे असतात तर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गडाख.....

काही फायदे असतात. शासनाने जो निर्णय घेतलेला आहे त्यातील दुसरी बाजू अशी आहे की त्या गावातील गावपण आता हरवून गेलेले आहे.अशा प्रकारे पूर्वीच्या सामाजिक स्थितीमध्ये बदल झाला आहे.दुसरी गोष्ट अशी की पूर्वी एकत्र कुटुंब पध्दती होती परतु आता ती पध्दती राहिलेली नाही.वाटण्या झाल्यामुळे विभक्त कुटुंब पध्दती निर्माण झाली आहे.तेव्हा याही बाबतीत सरकारने अधिक विचार करण्याची गरज आहे असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.एखाद्या शेतकरी कुटुंबात जर दोन तीन मुले असतील तर त्यातील एका मुलाला चागले शिक्षण दिले जाते त्यामुळे त्याला शहरात सरकारी नोकरी मिळते व त्यामुळे तो शहरात राहतो. नोकरी मिळाल्यामुळे त्याला पाचव्या वेतन आयोगाचा सुध्दा फायदा मिळत असतो. दुस-या मुलाला शेती करण्यासाठी तेथेच ठेवले जाते त्यामुळे तो गावात राहून शेती व्यवसाय सांभाळत असतो या संदर्भात मी माझ्या कुटुंबातील उदाहरण देतो. माझ्या कुटुंबात आम्ही दोधे भाऊ आहोत माझ्या वडिलांनी मला असे सागितले की तू शिक्षण पूर्ण कर आणि धाकटया मुलाला असे सांगितले की तू शेतीकडे लक्ष दे त्यानुसार माझ्या भावाने शेती व्यवसायाकडे लक्ष दिले होते म्हणूनच माझे शिक्षण मी पूर्ण करु शकलो.एखाद्या भावाने चांगले शिक्षण घेतले तर त्याला शहरामध्ये चांगली नोकरी मिळते त्यामुळे त्याला चांगली शिकलेली बायको मिळते तो शहरामध्ये फ्लॅट घेऊन राहू शकतो. नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर त्याला पेन्शनसुध्दा मिळते. तरीसुध्दा तो शेतीमध्ये वाटा मागत असतो. ज्या भावाने त्याला शिकवलेले असते तो भाऊ मात्र शेती करतो आणि लहानशा झोपडीत राहतो जो भाऊ शिकतो तो चांगली नोकरी मिळवतो शहरात राहतो आणि शेतीत वाटा मागतो तेव्हा यामध्ये काही तरी संशोधन करुन निर्णय घेण्यात आला पाहिजे.

नतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. गडाख ....

जो शेती करतो आणि जो नोकरी करतो, त्यामध्ये नोकरीला असणाऱ्याला शेतीतील वाटा द्यायचा की नाही याचा देखील विचार येथून पुढे करण्याची निश्चितपणे गरज आहे. सभापती महोदय, आता या ठिकाणी सामुदायिक विवाहासाठी आपण 1 कोटी रूपये ठेवलेले आहेत. मला या निमित्ताने आठवण करून द्यायची आहे की, 30-40 वर्षापूर्वी श्री.शंकरराव मोहिते-पाटील यांनी मुलाच्या लग्नानिमित्त लक्षभोजन घातले होते. श्री.मोहन धारिया यांनी त्यावर मोठा आक्षेप घेतला होता, कारण काय तर त्यांनी लक्षभोजन घातले होते म्हणून. त्यानंतर मध्ये आता किती तरी काळ निघून गेला आहे आणि आज आपण परिस्थिती पाहिली तर लग्न समारंभ हे मोठ्या थाटाने साजरे करण्याची पद्धत सर्व थरांमध्ये रूढ झालेली आहे आणि त्याला पाठिंबा देणारे आपण आहोत हे देखील चित्र आज महाराष्ट्रात दिसते आहे. आपल्या सहकाऱ्याचे, मंत्र्यांच्या लग्नाला जाता यावे म्हणून मग त्या भागामध्ये कॅबिनेट बैठक घेतली जाते व तुम्ही आम्ही सगळे त्या लग्नाला जातो. त्यासाठी हेलिकॉप्टरची सोय केली जाते, हेलिपॅड तयार केले जाते. एकूणच संपत्तीचे हिडीस प्रदर्शन केले जाऊन असे लग्न समारंभ साजरे केले जाताहेत. खेडेगावामध्ये लग्नासाठी आपण गेलो तर तेथे फेटे बांधले जातात, आपणही मोठ्या हौसेने ते बांधून घेतो. त्यासाठी मोठ्या प्रमाणात पैसा खर्च केला जातो. सभापती महोदय, मी माझ्या तिन्ही मुलांची लग्न सामुदायिक पद्धतीने केली आहेत. त्यामध्ये हरिजन, गिरीजन, दलित, ख्रिश्चन, मुसलमान आदी सर्व समाजातील लोकांचा समावेश होता. तेव्हा मला या निमित्ताने असे सांगावयाचे आहे की, समाजातील जी नेते मंडळी आहेत त्यांनीच आपण कसे वागावे हे ठरविले पाहिजे. कारण समाजापुढे तेच एक आदर्श म्हणून असतात, लोक त्यांच्याकडे त्या नजरेतून पहात असतात. नेते मंडळी जसे वागतात त्याचा परिणाम गावातील सर्वसामान्य घटकावर देखील होत असतो आणि मग गावातील सामान्य माणूस देखील आपल्या घरातील लग्नकार्य ऐपत नसताना देखील मोठ्या थाटात करू पाहतो. कारण असे होत असताना त्याने इतरत्र पाहिलेले असते. प्रसंगी कर्ज काढून तो ही कार्ये करीत असतो वा त्याला करावी लागतात. म्हणजेच त्याला आपण, तुम्ही आम्ही देखील तितकेच जबाबदार आहोत हे आपण लक्षात घेतले पाहिजे, आणि या गोष्टीचा देखील विचार करण्याची गरज आहे की आपण या बाबतीत नेमके काय केले पाहिजे. म्हणून माझी आपल्याला या दृष्टीने विनंती आहे की, आज घरातील प्रमुख व्यक्ती आत्महत्या करते आहे. त्याची कारणे काय

..... एफ 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत हे आपण जाणून घ्यावे. आज इलेक्ट्रॉनिक मिडिया आलेला आहे, घरोघरी टी.व्ही. आलेला आहे आणि त्यातील सिरिअल्स आणि एकूणच झगमगाट हा त्या घरातील प्रत्येक माणसाला, मग तो लहान असो वा मोठा, स्त्री असो वा पुरूष. घरातील सगळी माणसे, मुले-मुली देखील ते सारे पहात असतात आणि मग आपल्यालाही तसे रहावयास पाहिजे असे त्यांना वाटू लागते. मग घरातील प्रमुख माणूस आपल्याला या सोयी का उपलब्ध करून देत नाही म्हणून त्यांनाही प्रश्न पडतो आणि कुटुंब प्रमुखाला देखील वाटू लागते की, आपणही आपल्या मुला-बाळांना हे उपलब्ध करून दिले पाहिजे. हे म्हणजेच सारे सुख असे त्याला वाटू लागते. मग त्यातून त्याची एक मानसिक अवस्था तयार होऊ लागते. घरातील मुलां-मुलींचे शिक्षण, नंतर त्यांची लग्ने इत्यादी कार्ये त्याला पार पाडावयाची असतात. त्यासाठी तो मोठ मोठी स्वप्ने पाहू लागतो आणि त्यातून मग त्याला कर्ज काढण्याकडे वळावे लागते आणि शेवटी तो मार्ग आत्महत्येपर्यंत जातो, आत्महत्येशिवाय त्याला पर्याय रहात नाही. एकीकडे आपण प्रगतीच्या गप्पा मारतो पण तरीही आत्महत्या होत आहेत, कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या होत आहेत. या सगळ्याचा खोलामध्ये जाऊन विचार करण्याची आज निश्चितपणे गरज निर्माण झालेली आहे आणि आपण तो करावा अशी माझी अत्यंत आग्रहाची विनंती आहे.

सभापती महोदय, या संदर्भात आपण काही निर्णय घेतले. परंतु माझी या बाबतीत एक सूचना आहे. आपण या संदर्भात एक छोटासा अभ्यासगट निर्माण केला पाहिजे. या क्षेत्रात काम करणारी जी मंडळी आहेत त्यांचा एक अत्यंत छोटा अभ्यासगट तयार करावा. सहकार मंत्री असतील वा अन्य मंडळी असतील. त्यांनी यामध्ये पुढाकार घ्यावा. यामध्ये तातडीने काय करता येईल, याबाबत कोणते निर्णय घेता येतील हे त्यातून सुचवावे, ठरवावे. सेवा सोसायट्या असतील, बँका आहेत, त्यातील कर्मचारी आहेत. पण सरकार एवढेसुद्धा करू शकत नाही की, ज्या सहकारी बँका असतील, जिल्हा बँका असतील त्यांचा भांडवली खर्च वारेमाप होत असतो. त्यावर सरकारने बंधन आणले पाहिजे. एकीकडे आपण शेतकऱ्यांना कोणतीही सवलत देत नाही आणि दुसरीकडे या बँकांचे अभ्यास दौऱ्यासाठी 50 लाख काय, एक कोटी रूपयांपर्यंत खर्च केला जातो आणि त्यासाठी शासन परवानगी देते. याचाही विचार आपण केला पाहिजे. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... जी 1 ..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख...

सहकार क्षेत्रामध्ये, बँकामध्ये चाललेल्या नोकर भरतीचा विचार केला पाहिजे. यासंबंधी शेतकऱ्याला व्याजामध्ये सूट न देता अनेक उद्योग आज सहकारी बँकींग क्षेत्रामध्ये चालले आहेत ते कडकपणे थांबविण्याची गरज आहे. या सर्व गोष्टींचा आपण विचार करावा . शेवटची एक महत्वाची सूचना करतो की, ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत त्यांना आपण 1 लाख रुपयांची मदत देणार आहात त्याबद्दल सरकारचे अभिनंदन करतो. त्याचबरोबर सरकारकडे आग्रहाची व कळकळीची विनंती करतो की, ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत त्यांच्या कुटुंबातील मुलगा किंवा मुलगी असेल तिला तातडीने नोकरी दिली पाहिजे. परवाच्या लोकसत्ता वर्तमानपत्रामध्ये एका आत्महत्या केलेल्या अल्प भूधारक शेतकऱ्याच्या कुटुंबाचे फोटो छापून आले. त्यामध्ये त्या शेतकऱ्याची आई बसलेली आहे. तिच्या चेहऱ्यावरील भाव पाहिल्यानंतर आपला कुटुंब प्रमुख निघून गेला आहे. आणि घरामध्ये कच्चीबच्ची मुले असल्यामुळे ती स्त्री ही एकटी पडली आहे. संपूर्ण कुटुंब व्यवस्था खिळखिळी झाली आहे. तिच्या घरामध्ये आणखी आत्महत्या होऊ नयेत म्हणून त्या घरातील मुलगा किंवा मुलगी कुणीही असेल त्यांच्यासाठी सरकारने तातडीने निर्णय घेतला पाहिजे. त्या शेतकऱ्याच्या कुटुंबाला दिलेली 1 लाख रुपयांची मदत ही पुरेशी नाही, ती तात्पुरती आहे. म्हणून हे कुटुंब पुढे जगायचे असेल, टिकायचे असेल तर त्यासाठी महत्वाचा निर्णय घेण्याचा शासनाने विचार करावा अशी मी आग्रहाची विनंती करतो. या प्रश्नाकडे पहाण्याचे वेगवेगळे पैलू आहेत, दृष्टीकोन आहेत. शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यानंतर आपण पॅकेज जाहीर करता. त्याचबरोबर खोलामध्ये जाऊन सर्व बाजूने आपण विचार करुन या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 50 वर्षांनी सुध्दा ग्रामीण भागातील शेतकऱ्यावर ही परिस्थिती ओढवत असेल तर ती गोष्ट आपणाला भूषणावह नाही. त्यादृष्टीने शासनाने गांभीर्याने विचार करावा. याकरिता आपण एक छोटासा अभ्यास गट निर्माण करावा व त्यांचेकडून सूचना मागवून त्याप्रमाणे निर्णय करण्याचा विचार करावा असे बोलून माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, एका अतिशय महत्वाच्या विषयावर प्रस्ताव मांडून सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी सभागृहामध्ये चर्चेला सुरुवात केली आहे. अतिशय महत्वाच्या विषयावर सरकारचे लक्ष वेधण्याचा त्यांनी प्रयत्न केल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. आज महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील स्थिती अत्यंत दुर्दैवी व वाईट आहे. त्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. गडाख यांनी उल्लेख केला आहे. जवळपास 750 शेतकऱ्यांच्या परिवारातील विधवा महिला व त्यांच्या वारसदारांचा कार्यक्रम झाला. त्या ठिकाणी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याची साडे तीन वर्षाची मुलगी आपल्या मांडीवर येऊन बसली होती. तिला विचारले की, तुझ्या घरी काय आहे? तेव्हा ती जे सांगत होती ते ऐकतांना आपल्या डोळयातून अश्रू आले अशी परिस्थिती आहे. ही परिस्थिती केवळ मागील चार-पाच वर्षामध्ये तयार झाली आहे म्हणून मी सरकारवर दोषारोपण करणे हा माझा उद्देश नाही. ही परिस्थिती निर्माण झाली आहे त्यासंबंधी सर्वच पक्षांच्या सारख्या विचारांच्या प्रमुखांनी आत्मचिंतन केले पाहिजे. काही पक्ष असे आहेत की, त्या पक्षाच्या नावामध्ये "शेतकरी" हे नाव जोडलेले आहे. आणि म्हणून त्यांच्या पक्षातील विचार प्रामाणिक आहेत. परंतु या एकूण परिस्थितीबद्दल चिंता आणि चिंतन करतांना पक्षीय अभिनिवेष सोडून देऊन विचार करण्याची आवश्यकता आहे. ही परिस्थिती एवढी गंभीर आहे की, परवा माननीय मुख्यमंत्र्यांनी एक बैठक बोलाविली होती. त्या बैठकीमध्ये ग्रामीण भागातील मतदार संधांची संख्या कमी झाली व शहरी भागातील मतदारसंघ वाढले याबाबत चर्चा होती. आणि म्हणून ग्रामीण भागावर अन्याय होत आहे, त्यासाठी कोणती उपाययोजना करावी याकरिता ही बैठक बोलाविली होती.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

ग्रामीण भागातील मतदार संघ का कमी झाले ? ग्रामीण भागातील लोकसंख्येचे शहराकडे स्थलांतर का झाले ? शहरातील झोपडपट्टी का वाढली ? शहरामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचे प्रश्न का निर्माण झाले ? गुन्हेगारीकरण का वाढत गेले ? या विविध प्रश्नावर विचार करताना आपल्याला एक गोष्ट लक्षात येते की, ग्रामीण अर्थव्यवस्था जसजशी कोलमडू लागली तसतसे त्याचे दुष्परिणाम शहरी भागात देखील पहावयास मिळू लागले. महात्मा गांधी असे म्हणावयाचे की, आमच्या देशातील 85 टक्के जनता ग्रामीण भागात आहे आणि 15 टक्के जनता शहरी भागात आहे. पण 2006 मध्ये अशी स्थिती रहाणार आहे की, 50 टक्के जनता शहरी भागात आणि 50 टक्के जनता ग्रामीण भागात रहाणार आहे आणि जर असेच धोरण राहीले तर 2020 मध्ये अशी परिस्थिती निर्माण होईल की, 15 टक्के जनता ग्रामीण भागामध्ये आणि 85 टक्के जनता शहरी भागामध्ये असेल. माननीय पंतप्रधानांनी शहरी भागाच्या विकासासाठी 1 लाख हजार कोटी रुपयांची योजना जाहीर केली आहे. याचा अर्थ आपल्या देशामध्ये अर्थशास्त्र व ग्रामीण भागातील परिस्थितीत कशा प्रकारे स्थित्यंतर होत आहे, याचा अतिशय गंभीरपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. काही लोक आपल्या समाजव्यवस्थेबद्दल, जातीव्यवस्थेबद्दल व सामाजिक विषमतेबद्दल बोलतात. त्याचे म्हणणे योग्य आहे. या समाजामध्ये जातीच्या आधारावर, धर्माच्या आधारावर, सेक्सच्या आधारावर, भाषेच्या आधारावर अन्याय होता कामा नये. माणूस जातीने श्रेष्ठ नसतो तर तो गुणांनी श्रेष्ठ असतो. म्हणून समाजामध्ये जातीव्यवस्था असेल, विषमता असेल तर ती उध्वस्त केली पाहिजे, मोडून काढली पाहिजे. पण आज ज्याप्रमाणात सामाजिक विषमतेबद्दल बोलतो, त्या प्रमाणात आर्थिक विषमतेचा विचार होत नाही. आत्महत्या करणारे शेतकरी कोण आहेत ? त्यांची जात कोणती आहे ? याच्या खोलात जाण्याची गरज नाही. तर तो एक शेतकरी आहे यादृष्टीने पाहिले पाहिजे. पण मी आपल्या सांगू इच्छितो की, आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये 30 टक्के शेतकरी दलित आहेत, 12 ते 14 टक्के शेतकरी आदिवासी समाजातील आहेत. म्हणजे या शेतकऱ्यांवर सामाजिक विषमतेमुळे अन्याय होतो आणि आर्थिक विषमतेमुळेही अन्याय होतो आणि त्यामुळे त्यांना आत्महत्या करावी लागते. म्हणून शोषित, दलित,पिडित माणसाची परिस्थिती दोन्ही बाजूने कशी झाली आहे, याचे मूर्तीमंत उदाहरण हे या शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या रुपाने पहावयास मिळते. एका गोष्टीचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. आपल्या गरीबीचा, बेकारीचा, भुकमारीचा,

. . . .एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

व आर्थिक विषमतेचा संबंध कशाशी आहे ? तर याचा संबंध कोणत्याही व्यक्तीच्या जातीशी, धर्माशी, भाषेशी नाही, तर या बेकारीचा, भुकमारीचा संबंध शासनाच्या आर्थिक धोरणाशी आहे आणि याबाबतीत तुम्ही-आम्ही सर्वांनी एकप्रकारे आपली अडचण करुन घेतलेली आहे की, आम्ही आमचे प्रत्येकाचे विचार ठरवून टाकलेले आहेत. कोणी समाजवादी आहे, कोणी पुंजीवादी आहे, कोणी साम्यवादी आहे. 100 वर्षापूर्वी ज्या थोर विचारवंतांनी, क्रांतीकारकांनी, समाज सुधारकांनी जे आर्थिक विचार लिहून ठेवले असतील ते योग्य आहेत. त्या विचारांच्या मागचे जे स्पिरिट आहे, जो भावार्थ आहे, There is a difference between letter and spirit. लेटर्सपेक्षा स्पिरिट महत्वाचे आहे. पण आता 100 वर्षानंतर काळ बदलला आहे. कार्ल मार्क्स, लेनिन, महात्मा गांधी, डॉ.लोहिया, दिनदयाल उपाध्याय यांनी जो विचार मांडला, त्या विचारधारेला त्यावेळची समाजाची परिस्थिती कारणीभूत होती. त्यानुसार त्यांनी आपले विचार मांडले. पण भविष्यात पुढे कसे स्थित्यंतर होणार आहे, ग्लोबलायझेशनमध्ये कसे स्थित्यंतर होणार आहे, आर्थिक परिवर्तन कशाप्रकारे होणार आहे, वर्गव्यवस्था कशी बदलणार आहे इ.बाबींचे भविष्य त्यावेळी त्यांच्याकडे नव्हते. त्यांचा उद्देश हाच होता की, "सर्वेपि सुखीन: संतु, सर्वे संतु निरामया:" सगळयांना न्याय मिळाला पाहिजे. समता आणि समरसतेच्या आधारावर समाजाची निर्मिती झाली पाहिजे. समाजामध्ये कोणी भुकेकंगाल राहू नये, कोणावर आत्महत्या करण्याची वेळ येऊ नये, असे त्या सर्वांच्या विचारामागचे स्पिरिट होते.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / परिशुद्धीपूर्वी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे चालू....

पण आम्हाला पक्षाचा अभिनिवेश होता. पंडित जवाहरलाल नेहरु हे देशाचे पंतप्रधान झाले.त्यावेळी त्यांच्यावर रशियाचा प्रभाव जास्त होता. पंडित जवाहरलाल नेहरु हे थोर नेते होते, त्यांच्याबद्दल मला अतिशय आदर आहे. त्यावेळेला तीन विचारांची चलती होती. एक साम्यवाद, पुंजीवाद आणि तिसरा समाजवाद. काही लोक स्वत:ला "समाजवादी" म्हणून घेण्यामध्ये अग्रेसर होते. ते आजही देशामध्ये आहेत. काही लोक स्वत:ला "साम्यवादी" म्हणवून घेण्यामध्ये अग्रेसर आहेत, काही लोक स्वत:ला "फ्री इकॉनॉमी", "कॅपिटॅलिस्ट" किंवा "पुंजीवादा"चे समर्थक समजतात. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे डाव्या विचाराचे आहेत. पक्ष म्हणून ते त्या विचाराचे आहेत, पण व्यक्ती म्हणून ते त्या विचाराचे नाहीत...

श्री.जयंत प्र.पाटील : तुम्हाला कोणी सांगितले ?

श्री.नितीन गडकरी : मला कोणी सांगण्याची आवश्यकता नाही, मी तुम्हाला ओळखतो. तुम्ही फ्री इकॉनॉमी पोर्ट टाकले... सन्माननीय सदस्यांना ते शब्द आवडत नसतील तर मी ते मागे घेतो.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेबांच्या मताशी मी सहमत आहे.

श्री.नितीन गडकरी : त्यांना व्यवहार समजला. आपल्या भागातील लोकांना रोजगार कसा देता येईल, उद्योग कसे वाढतील, बॅंक कशी व्यवस्थित चालेल, आपल्याकडून गरीब माणसाला न्याय कसा देता येईल, म्हणून त्यांनी उपक्रम उभे केले. त्यातील काही गोष्टी त्यांच्या विचारात बसत होत्या आणि काही गोष्टी बसत नव्हत्या. पण त्यांनी उद्दिष्ट ठेवलेले होते, स्पीरिट होते त्याच्याशी त्यांनी एकवाक्यता ठेवली, हे स्वागतार्ह आहे. मीही एका पक्षाचा कार्यकर्ता आहे. माझ्याही पक्षामध्ये आर्थिक चिंतन सुरु आहे. मी मंत्री असतांना टोलवर रस्ते बांधले. मला आठवते, पहिल्यांदा बॉन्डस् उभे करण्याची कल्पना मी आणली. तेव्हा मला खूप विरोध झाला. मी जेव्हा प्रायव्हेट पब्लिक इन्व्हेस्टमेंट म्हणून रस्ते बांधण्यास सुरुवात केली, तेव्हा मला विरोध झाला. या सभागृहामध्ये त्यावेळेस सन्माननीय श्री.आर.आर.पाटील आणि श्री.जयंत पाटील यांनी सांगितले की, सगळेच बी.ओ.टीवर देत आहात,तर मग राज्य बी.ओ.टीवर चालवायला का देत नाही ? मी त्यांची टीका ऐकली पण मी ठरविले होते की, समाजाचे हित ज्यामध्ये आहे, त्याची अंमलबजावणी करायची, जे काही व्हायचे असेल ते पुढे पाहू. तुम्ही मला पैसे दिले, म्हणूनच मी तुम्ही वेगळे आहात म्हणून सांगतो. त्यावेळेला एम.एस.आर.डी.सी.ला, मला काम करण्याकरिता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु....

मदतीसाठी श्री.जयंत पाटील यांची जिल्हा बँक पुढे आली. त्यांनी ताबडतोब 40 कोटी रुपये एम.एस.आर.डी.सी.ला दिले. त्यांनी हा विचार केला नाही. पण त्याच ठिकाणी श्री.एन.डी.पाटील असते तर त्यांनी या गोष्टीकरिता तुला मी रुपयाही देऊ शकत नाही,असे सांगितले असते. हा फरक आहे. तुम्ही आणि ते एकाच पक्षातील आहात. मला एवढेच म्हणायचे आहे की, पंडित नेहरुंनी रशियाचे मॉडेल स्वीकारले,त्याचा परिणाम असा झाला की, सुईच्या कारखान्यापासून ते पेपर फॅक्टरीपासून, पावर प्रोजेक्टपासून, टेक्स्टाईल मिलपासून सगळे सरकारने काढले. काल आपण हाफकीन इन्स्टीटयुटच्या संबंधाने चर्चा करत होतो. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना सांगायचे होते की, विरोधी पक्ष म्हणून काही विषयावर थोडासा वेगळा विचार करायला पाहिजे. सरकारने 1947 पासून ते 2005 सालापर्यन्त 5 लाख 60 हजार कोटी रुपयाची गुंतवणूक शेतकऱ्यांसाठी केलेली आहे. पण सगळे घाट्यात गेलेले आहे. याचे व्याज आणि रिटर्न काढून तुलना केली तर 40 लाख हजार कोटी रुपये ड्रिनेजमध्ये वाया गेले असतील त्याचा हिशोब नाही. जर या पैशाचा उपयोग प्रत्येक गावामध्ये प्राधान्याने रस्त्या करण्यासाठी केला असता, साडे सहा लाख गावापैकी फक्त 1 लाख 20 हजार गावात 55 वर्षामध्ये रस्ते झाले असते. आपण रस्ते बांधले असते, प्यायला शुध्द पाणी दिले असते, चांगल्या शाळा केल्या असत्या, चांगले दवाखाने बांधले असते, गोडाऊन्स बांधली असती, प्री कुलींग प्लँट बांधले असते, कोल्ड स्टोरेज बांधले असते, शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाकरिता पैसे दिले असते, व्हॅल्यु ॲडीशन केले असते तर आज ग्रामीण भागातील लोकांचे स्थलांतर झाले नसते. आपल्या प्लॅनिंगमध्ये आपली प्रायोरिटी चुकली. चुकली तर चुकली. पण सगळ्याच पक्षाने यावर आत्मपरिक्षण करायला पाहिजे होते. जर तुमचे उद्दिष्ट एक असेल तर आम्ही काही पुंजीवादाचा समर्थक नाही. मी स्वदेशी विचाराचा समर्थक आहे. बी इंडियन, बाय इंडियन. इंडियन ऑप्शन प्रत्येक गोष्टीकरिता केला पाहिजे या मताचा आहे. पण त्याचबरोबर जगातील स्थित्यंतर आपण ओळखणार आहोत की नाही ? चायनामध्ये नॉन रेसिडेन्स चायनीजनी शांघायमध्ये इन्व्हेस्टमेंट आणली, चायनामध्ये इन्व्हेस्टमेंट आणली. चायनामध्ये ज्या ठिकाणी माओचा जन्म झाला, ज्या ठिकाणी कम्युनिस्ट विचार होते...

यानंतर कु.थोरात.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीकार नोंद

श्री.नितीन गडकरी...

त्या चायनाने आपल्या कम्युनिस्ट विचारांबद्दल कुठेही जाहीरपणे प्रतारणा न करता साम्राज्यवादी देशांनी ज्या रीतीने विकासाचे आर्थिक धोरण स्वीारले ते धोरण खुल्या रीतीने स्वीकारले आहे. आज सगळयात जास्त इन्व्हेस्टमेंट चायनामध्ये येत आहे. मी युरोप आणि अमेरिकेत गेलो होतो तेव्हा तेथील इकॉनॉमिस्टबरोबर मला चर्चा करण्याची संधी मिळाली. त्या वेळी ते असे म्हणाले की,"पुढील 50 वर्षात जो काही संघर्ष होणार आहे तो चायना आणि इंडियामध्ये होणार आहे. त्यावेळी अमेरिका असेल किंव्हा अन्य जे प्रभावशाली देश आहेत त्यांचा रिलीव्हन्स इकॉनॉमिशी राहणार नाही." याचे कारण येथील लोकसंख्या आणि उत्पादनमूल्य कमी आहे. याचा अर्थ आपण लक्षात घ्यावा. भविष्यकाळामध्ये निश्चितपणे या दोन्ही देशांना प्रगतीची आणि विकासाची फार मोठी संधी आहे. आज आपल्या देशाजवळ फॉरेन एक्सचेंजचा फार मोठया प्रमाणात स्टॉक आहे. एक वेळ अशी होती की, आपल्याला आपले सोने लंडनच्या बँकेत गहाण ठेवावे लागले होते. या सगळया परिस्थितीचा कुठे तरी आपण विचार केला पाहिजे.(अडथळा) हीही गोष्ट खरी आहे की, काही प्रमाणात श्री. नरसिंहरावजींनी या धोरणाला सुरुवात केली. त्यांच्यावर टीका झाली. पण जे सत्य आहे ते सत्य स्वीकारले पाहिजे. त्यावेळी श्री. मनमोहनसिंगजी अर्थ मंत्री होते.त्यांनी त्याला बळकटी दिली. कारण ते धोरण प्राथमिक स्वरुपाचे होते. श्री. अटलबिहारी वाजपेयींचे सरकार आल्यानतर त्यांनीही त्याला पूर्ण सपोर्ट केला. त्यानंतर आजही ते धोरण चालू आहे.फक्त अडचण एवढीच आहे की, दिल्लीतील सरकार कम्युनिस्ट पक्षाच्या समर्थनावर चालत असल्यामुळे ते रोज केंद्र शासनाला ब्रेक लावतात, त्यामुळे त्यांना सरकार नीट चालविता येत नाही. श्री. बुध्ददेव भट्टाचार्य जेव्हा इंडोनेशिया आणि मलेशियामध्ये जातात तेव्हा तेथील उद्योगपतींसमोर ते भाषण देतात. मी स्वत: श्री. बुध्ददेव भट्टाचार्यांना एम.एस.आर.डी.सी. च्या नोट दिल्या होत्या.त्यांनाही वाटते की, प्रायव्हेट पब्लिक सेक्टरमध्ये आपल्याकडे डेव्हलपमेंट झाली पाहिजे.सभापती महोदय, माझी शासनाला एकच विनंती आहे की, ही जी काही परिस्थिती निर्माण झाली आहे, याला शेत-

क-याची गरिबी, बेकारी, भूकमारी, जात, पंथ आणि धर्म कारणीभूत नाही, तर याला राज्य सरकारचे आणि केंद्र सरकारचे आर्थिक धोरण कारणीभूत आहे.सहकारी चळवळ ही चांगली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

चळवळ आहे. ती यशस्वी झाली पाहिजे. पण या सहकारी चळवळीला बाहेरच्या उद्योजकांबरोबर आज स्पर्धा करावीच लागणार आहे. काल शासनाने कृषि उत्पन्न बाजार समितीचा मॉडेल ॲक्ट मंजूर केला. त्यातील सगळे दलाल मला भेटले. ते अस्वस्थ होते. त्यांचे म्हणणे असे होते की, यामुळे आमचे काय होईल? मी म्हटले तुमचे काहीही होणार नाही. तुम्ही पण टीकाल. तेव्हा ते असे म्हणाले की, आमच्याकरिता एक कायदा आणि बाहेर होणा-या बाजार समितीचा दुसरा कायदा हे कसे? यातील विषमता दूर झाली पाहिजे. कारण Competition between the equals हे समजू शकतो पण Competition between unequals हे होऊ शकत नाही. सहकार चळवळ जर आजच्या स्पर्धेच्या युगात न्यावयाची असेल तर प्रत्येक गोष्ट जॉईंट रजिस्ट्रारकडे पाठविण्याची काय आवश्यकता आहे ? कार्बन विकत घ्यायचे असतील तर ते जॉईंट रजिस्ट्रारकडे पाठवा. प्रत्येक केस कमिशनरकडे पाठवा. कमिशनरपर्यंत ती केस पोहंचेपर्यंत तो कितीही चांगला असला तरी अनेक नंदीची पूजा करीत जावे लागते. हे नंदी निव्वळ नवस केल्याने ऐकत नाहीत. त्यांना लिफाफा दिल्या शिवाय काहीच पुढे जात नाही. मग त्याठिकाणी सहकारी कायदा नाही आणि काही नाही. जेवढे रिस्ट्रिक्शन त्यांच्यावर टाकण्यात येतील तेवढे करप्शन वाढेल आणि तेवढा लोकांना त्रास होईल.मी शासनाला सांगू इच्छितो की, या छोटया छोटया गोष्टी आहेत. मी पक्षाचा अध्यक्ष झाल्या नंतर पहिल्यांदा संगितले की, जिल्हयातील लोकांनी माझ्याकडें यायचे नाही. तिकडच्या तिकडे निर्णय झ ाले पाहिजेत. सगळया गोष्टी बदलवून टाकल्या. त्यमुळे मला आराम मिळतो आणि पक्षातील लोकांनाही वाटते की, आम्हीही कोणी तरी आहोत. प्रत्येक कार्पोरेट सेक्टरमध्ये हे पहिले काम आहे की, मोठया माणसांनी फक्त पॉलिसी कंट्रोल करावी. हे सरकार तर असे झाले आहे की, शिपायाची बदली करावयाची असली तरी राज्यमंत्री सांगतात की, माझ्याकडे फाईल पाठवा. माझ्याकडे लोक कामासाठी आले पाहिजेत असे प्रत्येकाला वाटते. या ठिकाणी खूप गोष्टी बोलल्या जातात पण अधिकाराच्या विकेंद्रीकरणाची जेव्हा गोष्ट येते तेव्हा मंत्री, राज्य मंत्र्यांना अधिकार द्यायला तयार नाहीत आणि राज्यमंत्री सेक्रेटरीला अधिकार द्यायला तयार नाहीत. सेक्रेटरी जॉईंट सेक्रेटरीला किंवा कमिशनरला अधिकार द्यायला तयार नाही. कमिशनर जॉईंट रजिस्ट्रारला अधिकार द्यायला तयार नाही. जॉइंट रजिस्ट्रार डी.डी.आर.ला अधिकार द्यायला तयार नाहीत.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

बोलतांना सगळे बोलतात. पण एखादे काम करायचे असते तेव्हा माझ्याकडे येऊ द्या असे सांगतात. याचे कारण ज्यावेळी स्वत:ची वेळ येते त्यावेळी विचार वेगळा होतो. आणि म्हणून प्रशासनामध्ये आपले धोरण आणि आर्थिक बाबतीतील आपले धोरण याबाबतीत डोळे उघडे ठेवून शांतपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. डॉ. पतंगराव यांना मी विनंती करतो की, तुम्ही याचा जास्त गंभीरपणे विचार करावा. आज श्री. गडाख साहेबांनी सूचना केली, त्याबाबतीत अभ्यास गट नेमावा. आम्हाला कुठलेही अधिकार नकोत.महाराष्ट्रामध्ये तुमच्या हातून चांगले व्हावे अशी आमची सदइच्छा आहे. श्री. गडाख साहेब असोत, आम्ही असोत आमचे म्हणणे शांतपणे ऐकून घ्यावे. आम्हाला शांतपणे वेळ द्यावा. आणि आमचे म्हणणे तुमच्या अधिकारात तपासून घ्यावे. मग धोरण जाहीर करावे. मला असे वाटते की, त्यातून निश्चितपणे या राज्याचे भले होईल.

यानंतर श्री. खर्चे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

सभापती महोदय, केंद्रशासन आणि राज्यशासनाच्या धोरणामुळे आज राज्यात शेतकऱ्यांच्या बाबतीत ही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. या सावकारांचा विचार करीत असतांना गृहमंत्री माननीय श्री. आर.आर.पाटील यांनी त्यांच्याविरुध्द जी कारवाई केली तो निर्णय एकदम चांगला आहे. ज्या शेतकऱ्यांना सावकारांनी कर्ज दिले आहे, त्यांच्यापैकी ज्यांच्याजवळ लायसेन्स नाहीत, ज्यांचे रजिस्ट्रेशन झालेले नाही अशा सावकारांवर कायदयाचा आधार घेऊन कारवाई करावी आणि गरिबांच्या बाजूने उभे राहणे आवश्यक आहे. महात्मा गांधींनी सांगितले होते की, ज्यावेळी तुमच्या मनात संभ्रम निर्माण होईल अशा वेळी सामान्य व गरीब माणसांच्या हिताचे निर्णय घ्यावेत, त्यामुळे संभ्रम नाहीसा होईल. आपल्या राज्यात जेवढया सावकारांकडे लायसेन्स नाहीत त्यांच्या केवळ वस्तूच जप्त करुन चालणार नाही तर त्यांचे व्याजाने पैसे देण्याचे धंदे बंद करण्यास सांगावेत. दुसरे म्हणजे सावकारांना असे परवाने सहकार विभागामार्फतच देण्यात येतात परंतु यासंबंधीचे निकष काय आहेत ? किती व्याजाने त्यांना कर्ज देता येते ? हे तपासण्यासाठी मात्र आपल्या डी.डी.आर. आणि जॉइंट रजिस्ट्रारकडे कुठलीही यंत्रणा नाही. मी सहकार विभागाला दोष देत नाही कारण त्यांच्या मागे 100 कामे असतात, वरुन साहेबांनी सांगितले की, अमुक संस्थेवर स्टे आणा तर तेही त्यांना करावे लागते. ज्यावेळी भारतीय जनता पक्षाचे सरकार असेल त्यावेळी काँग्रेस पक्षाच्या सर्व संस्था बरखास्त करणार आणि ज्यावेळी काँग्रेसचे राज्य असते त्यावेळी युतीच्या संस्था बरखास्त करणार अशा प्रकारे इंटरफिअरन्स चालू असतो. अशा प्रकारे हे सहकार विभागाचे अधिकारी पुढे गेले तरी त्यांना शिव्या खाव्या लागतात आणि मागे गेले तरी शिव्याच खाव्या लागतात, म्हणून काम न करणे हाच एकमेव त्यांचा शिरस्ता असतो. मग साहेब सांगतील तेच बरोबर आहे, अशा विचाराने ते चालतात. या सावकारांबद्दल विचार केला तर त्यांनी कोणाला किती व कोणत्या व्याजदराने कर्जाचे वाटप केले यासंबंधीचे रेकॉर्ड ठेवण्याची आपल्याकडे कोणती व्यवस्था आहे ? आजच्या संगणकाच्या युगात तसेच इंटरनेटच्या युगात हे काम अगदी सोपे झाले आहे. फक्त 10-20 लाख रुपये खर्च केले आणि सर्व रजिस्टर्ड सावकारांना इंटरनेटच्या माध्यमातून जोडले तर त्यांनी कोणत्या शेतकऱ्याला व किती लोकांना कोणता व्याजदर लावला आहे यासंबंधीची डिटेल माहिती आपल्याला मिळू शकेल व त्या आधारे आपल्याला ते कंट्रोल करता

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

येऊ शकते, पण अशा गोष्टी करण्यासाठी माननीय मंत्री महोदयांकडे वेळच नाही, असे मला दिसते. सावकार दामदुप्पटीने व्याजाची आकारणी करतात याकडे कोणाचेच लक्ष नाही, म्हणून या सर्व सावकारांना इंटरनेटच्या जाळयात आणले तर हे काम जास्त सोपे होऊ शकेल. मला माहिती नाही पण माननीय सहकार मंत्री डॉ. पतंगराव कदमांसारख्या मंत्र्यांनी धाडसाने अशा प्रकारचा निर्णय घेऊन आपल्या राज्यात बँकांचे व्याजाचे दर 12 टक्क्याचे आहेत मग सावकाराला जास्तीत जास्त 14 टक्क्याचीच मर्यादा घालून द्यावी, त्यापेक्षा जास्त व्याजदराने कर्जपुरवठा करता येणार नाही, अशा प्रकारचे बंधन त्यांच्यावर टाकावे. आज या सावकारांचा व्याजाचा दर 60 ते 70 टक्के एवढा आहे, त्याचे कुठलेही रेकॉर्ड नसते. अनेक सरकारी कार्यालयांच्या बाहेर आजही पठाण उभे असतात ते दर महिन्याला 5 ते 7 टक्के दराने पैसे देतात, हे सर्व आपल्या राज्यात, आपल्या खात्यात काय चालू आहे, याचा मंत्री महोदय विचार करणार की नाही ? म्हणून माझी सूचना अशी आहे की, गांवा-गावांत, जिल्हया-जिल्हयात जाऊन मंत्री महोदयांनी लोकांना सांगितले पाहिजे. शासनाने या सावकारांच्या संदर्भात अशा प्रकारची उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती, त्याची जाणीव लोकांना करुन दिली तर लोक देखील जागरुक होतील. पण हे सर्व न करता माननीय मंत्री महोदय कदाचित आम्हाला यासंबंधीचा जी.आर.काढून त्याची प्रत दाखवून देतील परंतु तेवढयाने या सावकारांबाबत कुठलेच बंधन येणार नाही, हे लक्षात घ्यावे. हा जी.आर. काढतांना त्यात काय काय समाविष्ट असावे यासंबंधी आमच्या सूचना घेतल्यास त्या आम्ही जरुर करु. परंतु मंत्री महोदयांना हे अधिकारी "सर, सर" म्हणून "सर" मात्र सर्रकन सरकतात आणि ठरवितात की, साहेब आले की, थोडे अंगावर घ्या, अतिशय हुशार अधिकारी या खात्यात आहेत. ते साहेबांना सांगतात की, Sir the matter is subjudice. It is very difficult. It is not possible. It will be a problem, त्यामुळे कोर्टात आपण अडचणीत याल, मग साहेब म्हणतात की, नको आपल्या अंगावर कशाला घ्यावे. परंतु तेच अधिकारी तुम्हाला समोर ठेवून जे करायचे ते बरोबर करतात. डॉ. पतंगराव कदम, नितीन गडकरी यांनाही सांभाळून घ्या, कारण कोणी कसा इंटरेस्टेड आहे याची जाणीव या लोकांना चांगली असते. त्यांची चार कामे करा आणि आपली 10 कामे करायला मोकळे, असे चालू असते. मग ज्यांच्यावर केसेस नसतील त्यांच्यावर केस टाकून त्याला त्रास देतात. एकदा रेकॉर्ड त्यांनी काळे केले की मग तुम्ही सुध्दा

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

ते दुरुस्त करु शकत नाही, अशी परिस्थिती आहे. म्हणून माझी विनंती आहे की, या प्रायव्हेट सावकारांच्या बाबतीत ठोस असे धोरण शासनाने घ्यावे. दुसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, सुप्रिम कोर्टाने याबाबत नुकताच एक निर्णय दिल्याचे मी इंटरनेटवर पाहिले, पण त्याची प्रत आणायला मी विसरलो. तो निर्णय शेतकऱ्यांच्या बाबतीत असून त्यामध्ये असे म्हटले आहे की, जर 10 हजाराचे कर्ज घेतले तर जास्तीत जास्त 10 हजारच व्याज घेता येते अशा प्रकारे सुप्रिम कोर्टाचे जज्मेंट आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

सभापती महोदय, आज भू-विकास बँक कशा पध्दतीने पैसे वसूल करते याची आपल्याला कल्पना आहे. आता आपल्याकडे संगणक आलेले आहेत त्यामुळे भू-विकास बँकेने किती शेतक-यांना किती टक्के व्याजाने कर्ज दिले आणि शेवटी किती रुपये वसूल केले, त्यांच्या कर्जाचे एनालिसिस करा व याची सर्व माहिती संगणकीकृत करा. त्यामुळे लोकांना इन्टरनेटवर सर्व माहिती मिळू शकेल. असे जर केले तर आज भू-विकास बँकेत काय चालले आहे, हे कळून येईल. त्यामुळे पहिल्यांदा कर्जाचे ॲनालिसेस करा. आपल्या कळून येईल की, 10 हजार कर्जाचे या भू-विकास बँकेने लाख-लाख, दीड-दीड लाख रुपये वसूल केलेले आहेत. अशा पध्दतीने भू-विकास बँक कर्ज वसूल करीत असल्यामुळे आज शेतकरी आत्महत्या करीत आहेत. परवा दारव्हा या गावातील एका शेतक-याने आत्महत्या केली. भू-विकास बँकेचे अधिकारी त्याच्या कडील कर्ज वसूल करण्यासाठी घरी गेले असता बँकेने त्याच्या घरासमोर बँड वाजविला. या झालेल्या अपमानामुळे या शेतक-याने आत्महत्या केली हे सुध्दा आपल्याला माहिती असेल. त्यामुळे व्याजाच्या संदर्भात आपण रिलीफ दिला पाहिजे. या बँका किती कर्ज देतात आणि त्यातून किती व्याज घेतात, यावर नियंत्रण आणणे आवश्यक आहे. मी परवाच सांगितले आहे की, एका व्यापा-याने 700 कोटी रुपये कर्ज घेतले होते नंतर या 700 कोटी रुपये कर्जाचे 1700 कोटी रुपये झाले परंतु जेव्हा वनटाईम सेटलमेंट झाली त्यावेळी या व्यापा-याचे 1000 कोटी रुपये माफ करण्यात आले. There are two types of defaulter one is bonafide and other malafide. जो बँकाना फसवितो त्याच्या आम्ही विरोधी आहोत यामध्ये त्याचा जात,धर्म काहीही असला तरी त्याला आपण संरक्षण देऊ नका. मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी मागील वर्षी माझ्या शेतामध्ये बीटी कॉटन लावला होता. मागील वर्षी मला एकरी 7 क्विंटल कापूस झाला परंतु या वर्षी मला एकरी 1.5 क्विंटल कापूस झाला. आता 1.5 क्विंटल कापसाला 2600 रुपये भाव आला परंतु उत्पादन खर्च 3500 रुपये झाला. याचा अर्थ असा आहे की मला जवळ जवळ 1 हजार रुपये तोटा झाला. सभापती महोदय जर शेतक-याने 3 एकरात कापूस लावला असेल आणि त्याला जर नेट 1000 रुपये लॉस येत असेल तर हा शेतकरी काय करेल? कारण एकरी साडेंतीन हजार रुपये उत्पादन खर्च कापसाला येत असतो आणि त्याला जर एकरी 1000 रुपये लॉस झाला तर तो आत्महत्या करणार नाही तर शेवटी काय करेल? मागच्या

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

वर्षी सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले होते की, "ज्या ठिकाणी 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असेल त्या ठिकाणी कर्ज वसूलीला स्थगिती दिली जाईल." यासंदर्भात ऑर्डरही निघाली होती परंतु शेवटी काहीही झाले नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, आपण पहिल्यांदा व्याज आणि मुद्दलाच्या संदर्भातील निर्णय घ्या. तसेच सहकारी बँका, भू-विकास बँका, अर्बन बँका, क्रेडिट सोसायटया यांच्यावर रिझर्व्ह बॅकेची, नाबार्डची गाईडलाईन लावा आणि त्याप्रमाणे धोरण जाहिर करा. किती टक्क्याने व्याज आकारावयाचे, किती वर्षात किती व्याज आकारले जाईल, यासंदर्भात आपण प्रथम गाईड लाईन तयार करा, निकष ठरवा. ओटीएस व रिसेटलमेंटच्या बाबतीत धोरण जाहीर करा. असे जर केले नाही तर शेतक-यांसाठी व्याजाचे दर वाढतच जाईल आणि शेवटी शेतकरी त्यात होरपळून जाईल. आपण जर यासंदर्भात नियम तयार केले, रिसेटलमेंटचे नियम तयार केले तर याचा जनतेला फायदा होऊ शकेल. यातील जे निकष आहेत ते पारदर्शक असले पाहिजे तसेच यासंदर्भातील निकष ठरवून त्या प्रमाणे अंमलबजावणी करा. तसेच या धोरणा प्रमाणे पैसे वसूल करण्याचे अधिकार डीडीआर किंवा त्याच्या समकक्ष अधिका-याला द्या. दुसरे असे की. विदर्भामध्ये लिफ्ट् इरिगेशन आहे. परंतु आज जवळ जवळ 1.5 लाख हेक्टरवरील लिफ्ट् इरिगेशन योजना बंद पडलेली आहे. त्यामुळे लिफ्टचा खर्च आणि त्याचे व्याज, हा आता नवीन प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे कोरडवाहू शेतक-याला लिफ्ट करावयाची असेल तर त्यासाठी आपण सेटलमेंट करा. कर्ज माफ करणे ही काही योग्य पध्दत नाही तसेच कर्जाची माफी मागणे ही सुध्दा योग्य मागणी नाही. परंतु समोरच्या माणसाचे आपण किती रक्त घेणार आहेत हा महत्वाचा प्रश्न आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विलास अवचट)

श्री.नितीन गडकरी..

रक्त नसेल तर त्याची हाडे बारीक करणार आहात का ? कर्ज माफ करणे बरोबर नाही असे आम्हाला ज्ञान शिकविण्याचे काम केले जाते. केंद्रीय कृषि मंत्री श्री.पवार साहेब आणि देशाचे पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग म्हणाले की, शेतकऱ्यांना मोफत वीज देणे योग्य होणार नाही. दिल्लीत सर्व खासदार आणि मंत्र्यांच्या बंगल्यांना मोफत वीज पुरवठा होतो. आमदार-खासदार हे वीज बिल भरतात का ? मी विरोधी पक्ष नेता होतो. मी वीज बिल भरत होतो का ? नाही. आय.ए.एस.अधिकारी कधी विजेचे बिल भरतो का ? त्यांना बंगला, पाणी, वीज, फर्निचर हे सगळे सरकारकडून मिळत असते. पंतप्रधानांपासून मंत्री ते खासदारापर्यंत सर्वांना मोफत वीज दिली जाते. मात्र, पैसे नसल्यामुळे मरायला टेकलेल्या शेतकऱ्यांना मोफत वीज देणे व्यवहार्य नाही, असे बोलणे बरोबर नाही. फुकट मागणे हे बरोबर नाही हे योग्य आहे. पण ज्याची ताकद नाही, क्षमता नाही, त्याला काही तरी मदत केली पाहिजे. आज शेतकऱ्यांना बियाणे स्वस्तात मिळाली पाहिजेत. सेंद्रीय खतांचा,गांडूळ खतांचा वापर करण्यासाठी त्याला प्रवृत्त केले पाहिजे. विजेच्या दरामध्ये सवलत दिली पाहिजे. हा विषय तुमच्या आमच्याशी संबंधित नसला तरी त्यावर विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, पीक विमा योजनेसंबंधी देखील मी बोलणार आहे. पीक विम्याचे काम हे कोणत्याही एका कंपनीला देऊ नये. आजचे युग हे स्पर्धेचे आहे. ते लक्षात घेऊन विमा कंपन्यांमध्ये स्पर्धा निर्माण केली पाहिजे. हे काम एकाच कंपनीला देता कामा नये. इन्श्योरन्स केल्यानंतर शेतकऱ्यांना आपण एक महिन्यामध्ये त्याचा पीकासंबंधीचा क्लेम द्यावा. सगळया तालुक्यांमध्ये 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असेल तरच पीक विम्याचा फायदा मिळू शकेल ही अट योग्य नाही. समजा आपण सगळयाच सन्माननीय सदस्यांचा विमा उतरविला आणि एखादा सदस्य गचकला तर ती कंपनी म्हणेल एकच सदस्य गेला आणि संपूर्ण विधान परिषद गेली का ? सगळे गेले असतील तर इन्श्युरन्स देतो, एकटा गेला असेल तर तरे मिळणार नाही. असे होता कामा नये. असा जो नियम आहे, तो कशाला आपण मान्य करता ? पीक विमा प्रत्येकाकरता करा. एक महिन्यामध्ये शेतकऱ्यांना त्याचा क्लेम मिळाला पाहिजे. आत्महत्येच्या विषयावर 5 वेळा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..

सभात्याग केला व 3 वेळा कामकाज स्थगित झाले.1042 शेतकऱ्यांच्या नापिकीमुळे आत्महत्या झाल्याचे शासनाने आता मान्य केले आहे. ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे, त्यांच्या परिवाराला रुपये एक लाखाची मदत शासनाने जाहीर केली आहे. ती देतसुध्दा नाहीत. ज्या शेतकऱ्यांने आत्महत्या केली आहे, त्याच्या परिवाराला किमान 2 लाख रूपयांची मदत केली पाहिजे. शासन दहा लाख रुपये फक्त मंत्र्यांच्या नूतनीकरणासाठी खर्च करते. त्यामुळे जे उध्वस्त झाले आहेत, त्यांना दोन लाख रुपयांची मदत देण्यात गैर असे काय आहे ? त्यामुळे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याच्या परिवाराला किमान 2 लाख रुपये द्यावेत अशी मी मागणी करतो. कोणत्या आर्थिक धोरणांमुळे शेतकरी आत्महत्या करीत आहे यासंबंधीचे कारण शोधून काढले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.गडाख साहेबांनी सूचना केलेली आहे. त्याचा जरूर विचार करावा. या विषयासाठी शासनाने एक समिती नेमली पाहिजे. यामध्ये यामध्ये श्री.गडाख साहेबांसह अन्य जे तज्ज्ञ असतील त्यांचा देखील समावेश करावा. या तज्ज्ञांकडून काही पॉलिसी ठरवावी व सभागृहासमोर ठेवावी. पारदर्शी सर्वंकश धोरण स्वीकारून शेतकऱ्यांचे विशेषत: विदर्भ, मराठवाडयातील शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण कमी होणे आवश्यक आहे नवीन काही तरी मार्ग निघेल असे काही तरी आपण करावे. शासनाचे पॅकेज थुक-पॉलिश आहे. त्यात फार ॲक्सेप्टॅबिलीटी नाही. शासनाच्या पॅकेजसंबंधी मला यवतमाळ येथून जिल्हा क्रॅंगेसच्या अध्यक्षाचा फोन आला हो. तेव्हा या चर्चेचा फायदा घेऊन शेतकऱ्यांसाठी आपण चांगले धोरण करावे आणि शेतकऱ्यांना दिलासा देऊन त्यांच्यात आमूलाग्र बदल घडवून अडविण्यासंबंधी परिवर्तन घडूवन आणण्यासाठी धोरण जाहीर करावे. त्याकरिता अभ्यासगट तयार करावा व त्यातून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा एवढे बोलनू मी माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय,मागील तीन अधिवेशनात "वन टाईम सेटलमेंट"वर सभागृहात चर्चा घ्यावी अशी मागणी करीत होतो. आज याठिक्राणी ही चर्चा होत आहे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल प्रथम मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, या सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी याठिकाणी ही चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यांनी भाषणात विविध कार्यकारी संस्थांची खरी मांडणी करावयास पाहिजे होती. जोपर्यंत विविध कार्यकारी संस्था व्हायबल होत नाही तोपर्यंत शेतीला चांगला पतपुरवठा होणार नाही. त्यासाठी विविध कार्यकारी संस्था व्हायबल करण्यासाठी त्यावरील प्रशासकीय खर्च कमी केला पाहिजे. तसेच त्यांचेवरील दडपण दूर केले पाहिजे. असे काम मी माझ या रायगड जिल्ह्यात केले आहे. त्यावेळी मला सहकार विभागाकडून विरोध करण्यात आला होता. नाबार्डने विरोध केला होता, परंतु नंतर मला पाठिंबा दिला. आम्ही रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत विविध कार्यकारी संस्था व्हायबल करण्याचा प्रयत्न करीत आहोत हे आमच्या यशाचे गमक आहे. आम्ही एकत्रिकरण करुन विविध कार्यकारी संस्थेतील प्रशासकीय खर्च रद्द केला. हा सर्व प्रशासकीय खर्च बँक करीत आहे. तेथील स्टेशनरीवरील खर्च, ऑफीसवरील खर्च बँक करीत आहे. अशाप्रकारे आम्ही विविध कार्यकारी संस्था व्हायबल करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या बि-बियाणांचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख उपस्थित केला नाही. सहकारी संस्थांमध्ये जवळपास 1 हजार 65 कोटी रुपयांचा असमतोल आहे. जोपर्यंत हा असमतोल दूर होत नाही तोपर्यंत या संस्था व्हायबल होऊ शकत नाही. आमच्या रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये 6.5 कोटीचा असमतोल होता. आम्ही 5.5 कोटीची तरतूद करुन हा असमतोल दूर केलेला आहे. असा विचार जर माझ्यासारखा डीग्री नसलेला माणूस विचार करु शकतो तर सरकार असा विचार का करीत नाही ? जो व्यवहार मला कळतो तो अधिकाऱ्यांना का कळत नाही ? आम्ही शेतकऱ्यांना चार टक्के दराने कर्ज देतो. याचे श्रेय सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीनाथ मुंडे, नितीन गडकरी आणि मला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

कारण त्यांना बँकेने कर्ज दिले आणि त्यांनी ते रिपेमेंट केल्यामुळे आम्ही प्रशासकीय खर्च कमी करु शकलो. म्हणून तुमची माझ्यावर मेहरबानी आहे. तुम्ही माझ्यावर मेहरबानी केली त्याचा नफा मी शेतकऱ्यांना दिला. जेव्हा आम्ही शेंतकऱ्यांना चार टक्के दराने कर्ज देण्याचे धोरण जाहीर केले तेव्हा नाबार्डचे अधिकारी घाबरले होते. ते आमच्या समारंभाला उपस्थित राहिले नाहीत. त्यांनी आम्हाला सांगितले की, आम्ही तुमच्यावर ॲक्शन घेऊ. त्यावेळी मी असे म्हटले की, बँक आणि माझे संचालक पद रद्द झाले तरी मी शेंतकऱ्यांना चार टक्के दराने कर्ज देण्यास मागे हटणार नाही. शेतकऱ्यांसाठी काही काम करताना माझे संचालक पद रद्द झाले तर त्याचा मला अभिमान वाटेल. आम्ही गेली 15 वर्षे शेतकऱ्यांना चार टक्के दराने कर्ज देत आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

परंतु महाराष्ट्र शासन का देत नाही ? आपण जरी देऊ शकत असला तरी देत नाहीत. मी चार-पाच राज्य सहकारी संस्थांवर काम करतो. प्रशासकीय खर्च त्या ठिकाणी कमी केला पाहिजे असे धोरण जोपर्यंत सहकार खात्याकडून राबविले जात नाही तोपर्यंत आपण हे करु शकणार नाही. आज जिल्हा बँकांची काय परिस्थिती आहे ? विदर्भातील केवळ गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्हयातील सहकारी बँक चांगल्या स्थितीत आहे. मराठवाडयात केवळ दोन बँका सुस्थितीत आहेत. त्यातील एक सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव देशमुख आणि दुसरी सन्माननीय सदस्य श्री.गोपनीथ मुंडे यांची आहे. मग इतर बँकांची स्थिती वाईट का आहे ? याबाबत खऱ्या अर्थाने आत्मपरिक्षण करण्याची आवश्यकता आहे. जोपर्यंत प्रशासनात सुधारणा होत नाही तोपर्यंत आपण शेतकऱ्यांना कमी व्याज दराने कर्ज देऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव देशमुख यांचे दोन कारखाने आहे असे मी समजत होतो. परंतु आताच मिळालेल्या माहितीनुसार त्यांच्याकडे चार कारखाने आहेत. मला ज्या दोन कारखान्याबाबत माहिती आहे त्याचा प्रशासकीय खर्च पहा. दुष्काळ पडला तरी त्यांनी शेतकऱ्यांचे पैसे ठेवले नाही. मराठवाडयातील 10 कारखान्यांना मग तो नॅशनल कारखाना असो, शंभुराज असो, छत्रपती असो, संभाजी असो किंवा जोगेश्वरी कारखाना असो या सर्व कारखान्यांना आम्ही पैसे दिले आहेत. आपण जर त्या कारखान्यांची बॅलन्सशीट पाहिली तर असे दिसून येईल की, मुदतीपूर्वी त्या कारखान्यांनी हप्त्याचे रिपेमेंट केलेले आहे. उदा.मार्च महिन्यामध्ये हप्ता द्यावयाचा असेल तर त्या कारखान्यांनी जानेवारी महिन्यामध्येच रिपेमेंट केलेले आहे. माढा मतदारसंघातील सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.बबनराव शिंदे यांना आम्ही 5 कोटी रुपये दिले, त्यांनी सुध्दा दिलेल्या कर्जाचे रिपेमेंट मुदतीपूर्वी केलेले आहे. सन्माननीय शिंदेसाहेब अर्ध्या टक्क्यांसाठी 50 वेळा रायगडला मला भेटण्यासाठी आले. सन्माननीय गोपीनाथ मुंडे यांना प्रथम 16 टक्के, त्यानंतर 14, नंतर 12 टक्क्यांनी व्याज दिले होते आणि आता तो दर 10 टक्क्यांवर येत आहे. नाबार्डच्या सांगण्यानुसार आणि आपल्याला जे अभिप्रेत आहे त्यानुसारच आम्ही हे करीत आहोत.

महोदय, सहकारामध्ये राजकारण आणावयाचे नाही अशी आमची भूमिका आहे. ज्या संस्था कमकुवत आहेत, आर्थिक अडचणीत आहेत अशा संस्थांना मदत करण्याच्या वेळी आम्ही राजकारण बाजूला ठेऊन मदत करीत असतो. त्यामुळेच अडचणीत असलेल्या अर्बन बँकेला आम्ही 90 कोटी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रुपये दिलेले आहेत. बँकेचा चेअरमन या नात्याने शिखर बँकेत जाऊन चर्चा करतो व बँक उभी राहण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करतो. एका ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव देशमुख यांचा कारखाना 28 कोटी रुपयांतून उभा राहतो आणि दुसऱ्या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांचा कारखाना 48 कोटी रुपयांतून उभा राहतो. कारखाना उभारण्यामध्ये एवढी मोठी तफावत कशी राहते हे मला समजत नाही. माननीय कदमसाहेब नक्कीच यामध्ये काहीतरी गौडबंगाल आहे आणि तेच आपल्या खात्याने पाहावयाचे आहे. या दृष्टिकोनातून तुमचे ऑडिट काय होत आहे ? सन्माननीय सदस्य श्री.नितीनजी गडकरी यांनी "वन टाईम सेटलमेंट" यासंदर्भात जास्त बोलावे असे मला वाटत होते.

नंतर श्री.गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.

ते जास्त बोलले नाहीत. नेहमीच्या पध्दतीने ते काहीही बोलले नाहीत.सभापती महोदय,या चर्चेच्या निमित्ताने मला माननीय मंत्रिमहोदयांना कळकळीची विनंती करावयाची आहे की हा सगळा इम्बॅलन्स कोठे तरी माफ करण्यात यावा..त्यासाठी सॉफट लोन देऊन मदत करण्यात येणार आहे परंतु त्याकरता 4 टक्के दराने पैसे देण्याची काय गरज आहे ? तुम्हाला त्याची गरज नाही परंतु आमच्याकडे 5 टक्के दराने ठेवी ठेवण्यासाठी लोकांनी रांग लावली आहे.आणि आम्ही त्यांच्या ठेवी नाकारत आहोत अशी आजची परिस्थिती आहे. सर्व अर्बन बॅन्का आज अडचणीत आलेल्या आहेत.आम्ही अनेक डिपॉझिट नाकारत आहोत. आमच्याकडे जे लोक डिपॉझिटस घेऊन येतात त्याचे काय करावयाचे ? असा प्रश्न आमच्या समोर आहे.योग्य कर्जदार मिळत नाहीत अशी सुध्दा काही बॅकाची स्थिती आहे.वन टाईम सेटलमेन्टसाठी आग्रहपूर्वक मी माझे विचार येथे मांडणार आहे. वन टाईम सेटलमेन्ट हे कोणाला देण्यात येणार आहे ?या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सागितले की वन टाईम सेटलमेन्ट हे नॅशनलाईज बॅन्काप्रमाणे करण्यात यावे.वन टाईम सेटलमेन्ट करीत असतांना आपण अशी अट घातली पाहिजे की,ज्यांच्या बॅलन्सशीटमध्ये प्रोव्हिजन आहे त्यांना प्राधान्य देण्यात येईल. तसे करण्यास आपण आता सुरुवात करु या आणि नंतर टप्याटप्याने ती राबवू या.अशा प्रकारची अपेक्षा जर मी या निमित्ताने शासनाकडून व्यक्त केली तर ते चुकीचे आहे काय ? बाकीच्यांना देऊ नका असे आम्ही आपल्याला सांगत नाही.त्यांना पण द्या परंतु ज्यांची आर्थिक कुवत आहे आणि ज्यांच्या बॅलन्सशीटमध्ये क्षमता आहे त्यांना तरी वन टाईम सेटलमेन्ट आपण देणार आहात काय ? त्यांना ही वन टाईम सेटलमेन्ट द्यावे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे. ..

तालिका सभापती (श्री.विलास अवचट):सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात भाषण संपवावे. अजूनही 5 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे व त्यानतर माननीय मंत्रिमहोदयांना उत्तर द्यावयाचे आहे.

श्री.जयंत प्र.पाटील :सभापती महोदय, आपण मला थोडा वेळ द्यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.नाबार्ड आणि री फायनान्सच्या बाबतीत आपल्या खात्याने अभ्यास केलेला नाही असे मला मंत्रिमहोदयांना सांगावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना मी सांगू

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ...

इच्छितो की, मी आपल्याला रात्री फोन केला होता आणि आजच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी दहा मिनिटे जास्त पाहिजेत असे आपल्याला सांगितले होते. आज सकाळी मी नाबार्डच्या अधिका-यां बरोबर बोललो.होतो.त्यांनी मला सांगितले की नाबार्डचे पॅकेज आता जाहीर होणार आहे. परंतु आपल्या अधिका-यांना त्या बाबतीत काहीही माहिती नाही. मी सकाळी त्या अधिका-यांबरोबर बोललो होतो. तेव्हा मला असे कळले की नाबार्ड आता 4 टक्यानी कर्ज देणार आहे. येत्या चार पाच दिवसात ते धोरण जाहीर होणार आहे.नाबार्ड 4 टक्के व्याजाने एम.एस.सी.बॅन्केला कर्ज देणार आहे.20 पैसे एम.एस.सी. बॅन्केने घ्यावयाचे आहेत. माझ्या सारखा अशिक्षित माणूस ही बातमी घेऊन येऊ शकतो सबंधित अधिका-याबरोबर या संबंधी चर्चा करु शकतो असे असतांना आपले खाते काय काम करीत आहे?. नाबार्ड 4 टक्के दराने हे पैसे एम.एस.सी. बॅन्केला देणार आहेत आणि ती बॅन्क 20 पैसे घेणार आहे .त्यानंतर जिल्हा बॅन्केने फक्त 2 टक्के घ्यावयाचे आहेत. अशा प्रकारे केन्द्र सरकारचे धोरण जाहीर होणार आहेत. त्यानंतर विविध कार्यकारी सोसायटयानी 3 टक्के घ्यावयाचे आहेत.अशा प्रकारे एकूण 8.20 टक्के दराने शेतक-यांना कर्ज मिळणार आहे.अशा प्रकारे केन्द्र सरकारचे धोरण पुढच्या आठवडयात जाहीर होण्याची शक्यता असून तशा प्रकारची चर्चा सुरु आहे...जिल्हा बॅन्केने दोन टक्या ऐवजी एक टक्का घेतला पाहिजे अशी माझी मागणी आहे.तशा प्रकारचे धोरण आपण ठरवावयास पाहिजे.पुढे काय होणार आहे याबाबतीत मी आपल्याला सांगत आहे.शासनाकडून माझी अशी अपेक्षा आहे की, जर नाबार्डने 4 टक्के व्याजाने कर्ज दिले तर शेतक-यांना सहा वा साडेसहा टक्याने कर्ज मिळाले पाहिजे अशा प्रकारचे बंधन घालण्यात आले पाहिजे अशी माझी मागणी आहे.अशा प्रकारे जर सरकारने धोरण जाहीर केले तर वेगळया प्रकारचे चित्र दिसून येईल. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी आणि मी असे दोघे मिळून गेल्या दीड दोन वर्षा पासून वन टाईम सेटलमेन्टच्या बाबतीत या सभागृहात चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहोत.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

आणि सातत्याने आम्ही मागणी करतो आहोत पण आपण ती गांभीर्याने घेत नाही. सभापती महोदय, मी या संदर्भात नाबार्डकडे स्वत: गेलो आणि मला एक पत्र दिले. एक रकमी परतफेडीची योजना संबंधात हे पत्र आहे. आपण आता फक्त एक पत्र त्यांना यासाठी द्यायचे आहे, बाकी काहीही करायचे नाही. (वेळ संपल्याची घंटी वाजविली जाते.) सभापती महोदय, हे सगळ्यात महत्त्वाचे पत्र आहे. मला नाबार्डने जे पत्र पाठविले आहे की, ही तुमची योजना योग्य आहे. माझ्याकडे त्यांचे लेखी पत्र आहे. मी हे पत्र सभागृहाच्या पटलावर देखील ठेवण्यास तयार आहे. केवळ यासाठी तुम्ही तुमच्या स्वत:च्या फंडातून थोडी तरतूद करून, सन्माननीय सदस्य श्री.गडकरी या सभागृहात अनेक वेळा बोलतात आणि मघाशी मी देखील बोललो की, तुम्ही केवळ यासाठी खात्याची परवानगी द्या. आता ही परवानगी देण्यात आपल्याला काय अडचण आहे हेच मला कळत नाही. एक रकमी परतफेडीचे जे धोरण आहे, राष्ट्रीयीकृत बँका आता मुदलामध्ये देखील सवलत, सूट देत आहेत, असे ते सांगतात. आणि मग आमची आर्थिक कुवत असेल, आमची बॅलन्सशीट आहे, नाबार्ड सांगते की, तुम्ही यासाठी शासनाची परवानगी घ्या, तर मग त्याला तुमची अडचण काय आहे हे मंत्री महोदयांनी येथे सांगावे. म्हणून माझी विनंती आहे, मी या ठिकाणी सहकार खात्यासंबंधीची अशी अनेक उदाहरणे देऊ शकतो., आपण मला बोलण्यासाठी वेळ कमी देता आहात. विविध कार्यकारी संस्था ज्या आहेत त्यातील सेक्रेटरी सगळे मी कमी केले. बँकेचे कर्मचारी नेमले. जवळपास 700 संस्था होत्या आणि त्या 165 केल्या. दर महिन्याला आपले ए.आर. ऑफिस आमच्या विविध कार्यकारी संस्थांकडून 100 रूपये घ्यायचे. कशासाठी ? तर मिटींग बोलवावयाचे. महिन्याला एक मिटींग त्यांची ठरलेली असायची, चहा-पाण्यासाठी म्हणून. मग आपले सेक्रेटरी त्यासाठी प्रवास भत्ता आणि स्टेशनरी म्हणून खर्ची दाखवायचे. महिन्याला हे पैसे किती व्हायचे ? 700 गुणिले 100 म्हणजे एकूण 70 हजार रूपये होतात आणि वर्षाला 25 लाख रूपये हा खर्च व्हायचा. मी तो थांबविला. त्यासाठी सगळ्या मिटींग्ज थांबविल्या. वाटल्यास, बँकेमध्ये मिटींग घ्या, बँकेमध्ये चहा घ्या म्हणून सांगितले. आज त्याच्यामुळे इम्बॅलन्स वाढला. खरे तर हा इम्बॅलन्स कोठे वाढला ? तर सहकार खात्याने खाल्ला म्हणून तो वाढला. तुम्ही प्रत्येक सोसायटीकडून 100 रूपये घ्यायचे , 100 रूपये ही अगदी किरकोळ, लहान रक्कम आपल्याला दिसते पण शेवटी तो पैसा कोणावर आहे तर शेवटी बँकेच्या खिशातून तो पैसा जात होता. तो जो 1165 कोटी रूपये इम्बॅलन्स आहे

..... क्यू 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ....

तो कोणाचा आहे ? तर तुमच्या खात्याने जो 50 टक्के खाल्ला तो आहे. मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, याचे सारे रेकॉर्ड माझ्याकडे आहे, सगळी कॅशबुके माझ्याकडे आहेत ती मी आपल्याला दाखवू शकतो. सभापती महोदय, माझी विनंती आहे की, ज्याप्रमाणे आम्ही निवडून दिलेले संचालक आहोत त्याप्रमाणे सरकारचा देखील एक संचालक त्या बोर्डावर आहे ना ? आपला डीडीआर त्या बोर्डावर आहे की नाही ? आपला डीडीआर सुद्धा त्या बोर्डावर आहे पण त्याने या संदर्भात केव्हाही आक्षेप घेतलेला नाही. एमओयूची मिटींग होते, (वेळ संपल्याची घंटी वाजविली जाते) सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा येथे मांडतो आहे, कृपया तेवढा वेळ आपण मला द्यावा., दर तीन महिन्यांनी एमओयू ची मिटींग होते पण या तीन महिन्यांमध्ये कोठल्याही कारखान्याचा वा संस्थेचा फरक काढलेला नाही. एकदम कोणी तरी तक्रार केली की मग त्याबाबत चौकशी सुरू होते. हे सगळे थांबले पाहिजे. सभापती महोदय, या ठिकाणी श्री. राणा जगजितसिंह पाटील आहेत, त्यांच्या कारखान्याबद्दल देखील मी अनेकदा आमच्या एमएससी बँकेमध्ये चर्चा केली. आता या लोकांना तुम्ही संधी देणार आहात की नाही ? या सगळ्यांना आता आपण संधी देण्याची गरज आहे. सन्माननीय श्री.दिलीप देशमुख, श्री.गोपीनाथजी मुंडे यांनी जे चांगले कारखाने वा संस्था चालविल्या आहेत त्याचे मॉडेल तुम्ही लोकांपुढे ठेवले पाहिजे. लोकांना तुम्ही हा फरक दाखविला पाहिजे की यांनी यांनी अमुक अमुक ठिकाणी कमी पैशामध्ये कारखाना, संस्था उभी केली आणि चालविली आहे आणि बाकी ठिकाणी तुम्ही जास्त रकमेमध्ये उभे केले. त्यांचा प्रशासकीय खर्च कमी आहे आणि तुमचा तो खर्च जास्त आहे. त्यामुळे तुम्हाला तोटे झाले आहेत. हे सगळे फरक आपल्याला दाखवावे लागतील. तरच यामध्ये खऱ्या अर्थाने सुधारणा होईल असे मला वाटते. म्हणून आज तुमच्याकडून आमच्या जास्त काही अपेक्षा नाहीत. केवळ आपण गंभीर होऊन या सर्व बाबींचा विचार करावा एवढेच आमची आपल्याकडून अपेक्षा आहे. ....

अशुधीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

(यानंतर श्री. सरफरे .....आर 1 ..

श्री. जयंत प्र. पाटील...

तेव्हा याठिकाणी वन टाईम सेटलमेंट राष्ट्रीयीकृत बँकांप्रमाणे झाले पाहिजे. राष्ट्रीयीकृत बँकांच्या गाईडलाईन्स आहेत की, आमच्याशी लिकिंग करतांना ज्यांच्या बॅलन्स शीटमध्ये एमपीएची तरतूद आहे त्यांनाच सुरुवातीला तरी सवलत द्या. बाकीच्यांचा विचार मागाहून करा. नाहीतर तुमचे सचिव म्हणतील सर्वांची सवलत काढून घ्यावी. तसे करु नका. त्याबाबत एक खंबीर धोरण राबविण्याबाबत आम्ही आपल्याकडे आशेने पहात आहोत. आम्हाला तुम्ही निराश करु नका एवढी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

तालिका सभापती : सर्व माननीय सदस्यांना विनंती आहे की, ही चर्चा 12.45 पर्यंत पूर्ण करावयाची आहे. चर्चेची सुरुवात 10.15 वाजता झाली, त्यावेळी गणसंख्या नसल्यामुळे 10 मिनिटे कामकाज तहकूब करावे लागले. त्यावेळी सभागृहात सदस्य उपस्थित राहिले असते तर सर्वांना संधी मिळाली असती. मंत्रिमहोदयांना बोलण्यासाठी वेळ द्यावयाचा आहे. त्यामुळे माननीय सदस्यांनी कमीत कमी वेळामध्ये आपले भाषण करावे अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, विदर्भातील शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या आणि त्या संदर्भात राज्य शासनाने नुकतेच 1075 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. त्याबद्दल मी राज्य शासनाने स्वागत व अभिनंदन करतो. सभापती महोदय, मी याठिकाणी सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, यशवंतराव गडाख यांचे भाषण ऐकले आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. 1942 साली दुसरे महायुध्द झाले त्यावेळी बंगालमध्ये तीन ते साडे तीन लाख माणसे भूकबळीमध्ये मेली. मघाशी माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी म्हणाल्याप्रमाणे या देशाचे पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु होते त्यावेळी रशियामध्ये नियोजनबध्द अर्थव्यवस्था होती. त्यावेळी राजकीय विचाराने भारलेली कित्येक नेते मंडळी या देशामध्ये होती. त्यावेळी मिक्स इकॉनॉमी या देशामध्ये आणली. त्याचा संदर्भ असा की, त्यावेळी प्रायव्हेट पार्टीसिपेशनमध्ये या देशामध्ये काम करावयास कुणीही तयार नव्हते. त्यावेळी टाटानी भिलाई येथे कारखाना काढला, परंतु अन्य ठिकाणी गुंतवणूक करावयास कुणीही तयार नव्हते. म्हणून ही संकल्पना आली. त्याचा मूळ हेतू व उद्देश आज रिलेवंट वाटत असेल परंतु त्यावेळी प्रायव्हेट पार्टीसिपेशनचा कुणीही प्रयत्न केला नाही. पहिली पंचवार्षिक योजना झाली त्यामध्ये महत्वाचा मुद्दा म्हणजे जे काम या देशामध्ये पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी केले. त्यामध्ये प्रामुख्याने भांकरा-नानगल धरण बांधण्यासाठी पहिल्या पंचवार्षिक योजनेचा निधी उपलब्ध केला. त्याचबरोबर चर्च, मंदीर ही अन्य धर्मियांची प्रार्थना स्थळे आपण बांधत असला तरी भाकरा-नानगल म्हणजे This is a temple of modern India ही संकल्पना पंडित नेहरुंनी या देशामध्ये रुजविली. त्या वेळी या देशामध्ये टांचणी देखील निर्माण होत नव्हती. आपणास माहीत आहे की, 1957-58 या काळातील काही माननीय सदस्य याठिकाणी आहेत. त्यावेळी देशाची लोकसंख्या जवळ जवळ 40 कोटी होती. त्यावेळी इतकी कमी लोकसंख्या असतांना सुध्दा सर्व लोकांना देण्याएवढे धान्य उत्पादन या देशामध्ये तयार होत नव्हते. मला आठवते की, त्यावेळी अमेरिकेमध्ये जो गुरांना, घोडयांना खायला दिला जाणारा मिलो या देशामध्ये आयात करण्यात आला. व त्या मिलोची भाकरी खाल्लेली आम्ही माणसे आज याठिकाणी आहोत. आणि म्हणून या देशातील शेतकऱ्यांचे करावे तेवढे कौतुक, अभिनंदन कमी आहे. आपल्याला माहीत आहे की, 1973 मध्ये या देशाच्या पंतप्रधान कै. इंदिराजी गांधी होत्या. त्यावेळी सी. सुब्रमणियम हे कृषि मंत्री होते. त्यावेळी शेतामध्ये ग्रीन रिव्होल्युशनची संकल्पना अस्तित्वात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

आली. त्यावेळी कै. इंदिराजी गांधींच्या नेतृत्वाखाली फर्टिलायझरचा पहिला कारखाना उभा राहिल्याचे आपण पहातो.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणून आज फर्टीलायझरचे कारखाने उभे राहिल्याचे तुम्ही-आम्ही पहात आहोत. या गोष्टी त्यावेळी निर्माण झाल्या आणि त्या शेती पूरक अशा होत्या. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे ग्रीन रिव्होल्युशनमधून त्यांना जो इम्प्युट द्यावयाचा होता. फर्टीलायझर उपलब्ध करुन द्यावयाचे होते. त्यानंतर आज देशातील परिस्थिती काय आहे ? आज माननीय श्री.शरद पवार हे केंद्र सरकारमध्ये कृषी मंत्री आहेत. केंद्रामध्ये एन.डी.ए.सरकार असताना शेती व्यवसायासाठी 84 हजार कोटी रुपयांचा अर्थपुरवठा करण्यात येत होता, त्याबद्दल मी माजी पंतप्रधान श्री.अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारचे अभिनंदन करतो. तोपर्यंत या शेती व्यवसायाला कोणी विचारावयाचे नाही. तोपर्यंत एकूण बजेटमधून शेतीसाठी 1/2 परसेंट रक्कम मिळत होती. या देशात इंफरमेशन टेक्नॉलॉजी यावयास पाहिजे त्याबद्दल प्रश्न नाही. पण त्यासाठी या देशाच्या अर्थव्यवस्थेतून 16 ते 17 टक्के रक्कम दिली जाते आणि ज्या शेती व्यवसायावर 75 टक्के शेतकरी आणि शेतमजूर अवलंबून आहेत, त्या व्यवसायासाठी 1.50 परसेंट तरतूद केली जाते आणि त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. मला आनंद आहे की, आता केंद्र सरकारमध्ये माननीय श्री.शरद पवार हे कृषी मंत्री आहेत आणि त्यांनी अत्यंत जबाबदारीने या खात्याचा कार्यभार घेतलेला आहे आणि या खात्याचा कारभार घेतल्यानंतर टोटल आऊट लेट 84 कोटीचे होते, ते आता 1 लाख 10 हजार कोटीचे झालेले आहे **आणि त्यांना ठाम विश्वास आहे की, पुढच्या अर्थसंकल्पामध्ये ही रक्कम वाढेल आणि शेतकऱ्यांना चार टक्केप्रमाणे पतपुरवठा करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल** .सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी उल्लेख केला की, 1972 मध्ये कधीही पाहिला नव्हता एवढा राज्यात भयानक दुष्काळ झाला. त्यावेळी जवळजवळ 13 ते 14 जिल्हयामध्ये दुष्काळी परिस्थिती होती. त्यावेळी कै.वसंतराव नाईक यांनी पुणे येथील शनिवारवाडया वरुन भाषण केले होते. त्यांनी असे सांगितले होते की, मी संपूर्ण राज्याची जबाबदारी घेत आहे. राज्यात दुष्काळी कामे काढली आहेत आणि त्याठिकाणी हजारो,लक्षावधी लोक कामे करीत आहेत. या राज्यातील शेतकरी मोठया प्रमाणात धान्य पिकवेल आणि आणि तसे झाले नाही तर तुम्ही मला फासावर चढवा. त्यावेळेस देशात 50 ते 55 कोटी लोकसंख्या होती आणि आज जवळजवळ 1 लाख 10 हजार कोटी लोकसंख्या आहे आणि या लोकसंख्येसाठी शेतकऱ्यांनी धान्य उत्पादन केलेले आहे. ठीक आहे. या राज्यात सहकार चळवळही मोठया प्रमाणात आहे मग वैकुंठ मेहता असतील, ----

. . . .एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी . . . .

माननीय श्री.बाळासाहेब विखेपाटील असतील यांच्या प्रेरणेने या राज्यात सहकार चळवळ मोठया प्रमाणात फोफावली. पण त्यामध्ये सुध्दा काही वाईट प्रवृत्ती आहेत. बँकेच्या बाबतीत सांगावयाचे तर साऊथ इंडियन को-ऑपरेटीव्ह बँक, ही 99 वर्षापूर्वीची आहे. पण ही बँक कोणी बुडविली ? आज ज्या बँकेच्या संदर्भात लक्षवेधी सूचना देण्यात आलेली आहे, ती 57 वर्षापूर्वीची मराठा मंदिर को-ऑप.बँक आहे. त्यांच्याकडे 300 कोटी रुपयांच्या ठेवी असून त्यांनी 350 कोटीचा कर्जव्यवहार केला आहे. ही बँक कोणी बुडविली ? याबाबतीत जबाबदारी कोणाची आहे ? तसेच मुंबई बँकेने मध्य प्रदेशमधील एका महामंडळाला 100 कोटी रुपये दिले. त्याला तुम्ही परवानगी कशी दिली ? म्हणजे मुंबई बँकेकडील एक्सेस पैसा त्यांनी मध्य प्रदेशातील एका महामंडळाला दिला आणि त्यावर तुमचे काही नियंत्रण नाही. त्यामुळे आज बँक व्यवस्थेमध्ये दुष्प्रवृत्ती निर्माण होत आहेत. त्याला आळा घालण्याचे काम सहकार मंत्री म्हणून तुम्हाला करावे लागणार आहे एवढेच मला यानिमित्ताने सांगावयाचे आहे. धन्यवाद.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडीराम राठोड (नामनियुक्त) : सभापती महोदय, अत्यंत जिव्हाळयाच्या प्रश्नावर आजची चर्चा घडवून आणलेली आहे, त्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री.गडाख साहेब आणि अन्य सदस्यांचे मी अभिनंदन करतो. यापूर्वी शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भाने चर्चा झालेली आहे. या संदर्भात असे लक्षात आले की, यामध्ये आत्महत्या करण्याचे प्रमाण कोरडवाहू शेतकऱ्यांचे जास्त आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, असे वाटते असेल तर महाराष्ट्रातील सिंचनाचा जो अनुशेष आहे, तो तातडीने भरुन काढला पाहिजे, असे मला वाटते. सन 2004 च्या अहवालामध्ये असे म्हटलेले आहे की, मराठवाडयातील सिंचनाचा अनुशेष 30 टक्क्यापेक्षा जास्त आहे. आज मराठवाड्यामध्ये 30 टक्क्यापेक्षा जास्त अनुशेष असेल तर असे म्हणावेसे वाटते की, मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे कोणी कैवारी नाही, कोणी काळजी घेणारे नाही. शेतकरी हे कोरडवाहू शेतकरी म्हणून राहू नयेत, असे वाटत नाही काय ? मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष तात्काळ भरुन काढण्याच्यादृष्टीने प्रयत्न केला पाहिजे. सिंचनाचा अनुशेष हा एकूण 10 जिल्ह्यांमध्ये आहे. या जिल्ह्यांपैकी तीन जिल्ह्ये हे मराठवाडयातील आहेत. या अनुशेषाचा विचार केव्हा करणार आहात ? अनुशेषाच्या संबंधात आमच्या औरंगाबाद जिल्ह्याचा चौथा क्रमांक आहे. त्या ठिकाणी सिंचनाचा अनुशेष 1955 कोटी रुपयाचा आहे. त्यानंतर जालना जिल्ह्याचा 6 वा क्रमांक लागतो त्या ठिकाणच्या सिंचनाचा अनुशेष 1529 कोटी रुपयाचा आहे, त्यानंतर लातूर जिल्ह्याचा 9 वा क्रमांक लागतो. त्या ठिकाणच्या सिंचनाचा अनुशेष 717 कोटीचा आहे, असे असतांना मराठवाडयातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी शासनाने प्रभावी अशाप्रकारच्या योजना आखल्या पाहिजेत आणि मराठवाडयातील कोरडवाहू शेतकऱ्याला थोडाफार दिलासा दिला पाहजे. फक्त विदर्भातील शेतकऱ्यांनीच आत्महत्या केल्या असे नाही तर मराठवाडयातही 100 पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. विदर्भामध्ये कापूस पिकतो, त्याचप्रमाणे मराठवाड्यामध्येही विदर्भा इतकाच कापूस पिकतो. मग जेव्हा विदर्भाचा विचार होतो तेव्हा मराठवाडयाचाही विचार करायला नको काय ? शासनाला मला विचारावयाचे आहे की, प्रामुख्याने विदर्भाचा जसा विचार करता, तसाच मराठवाडयाचाही विचार केला पाहिजे. महाराष्ट्रातील इतर विभागांमध्ये एक सूत्रता आली पाहिजे. आपण येथे विभागनिहाय का बोलतो, ते मला कळत नाही. तसे करणे चुकीचे आहे. यामुळे महाराष्ट्राचे तुकडे पाडण्याचा विचार आहे की काय ? अशी शंका येते. कोणी विदर्भाच्या संबंधात बोलायचे, कोणी मराठवाडयाविषयी बोलायचे, कोणी पश्चिम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडीराम राठोड (पुढे चालू....

महाराष्ट्राबाबत बोलायचे, अशाप्रकारे फरक करुन बोलणे चांगले नाही. म्हणून मराठवाडा आणि विदर्भातील सगळयाच शेतकऱ्यांचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, शेती मालावर आधारित शेतकऱ्याला किंमत मिळाली पाहिजे असे नेहमी येथे सांगत असतो. शासनही ते मान्य करते, परंतु अद्याप शेतकऱ्यांना शेतमालावर आधारित भाव मिळत नाही. त्यासाठी कोणती उपाययोजना करणार आहात ? शेतकऱ्यांना लागणारे कर्ज पाहिजे तेवढे आणि वेळेवर मिळाले पाहिजे, याची देखील शासनाने गंभीर दखल घेतली पाहिजे. मला एखाद्या योजनेसाठी 10 हजार रुपये लागतात आणि जर मला 5 हजार रुपये दिले परंतु तेही वेळेवर दिले नाहीत तर माझी योजना पूर्ण होत नाही. म्हणून शेतकऱ्याला लागणारे कर्ज वेळेवर आणि भरपूर मिळाले पाहिजे. कर्जवसुली होत नाही, म्हणून ओरड केली जाते. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, कर्ज वसुली करण्याचे काम हे सेवा सहकारी सोसायट्या करतात. त्या सोसायटीमध्ये काम करणारे सचिव आहेत, त्यांना 12 महिने पगार मिळत नाही. त्यांनी कर्ज वसूल करुन दिली तरच त्यांना पगार मिळतो. परंतु कर्ज वसुली होत नाही म्हणून त्यांना पगार मिळत नाही. यासाठी त्या सहकारी सेवा सोसायट्यांनी भ्रष्टाचार करायचा यामुळे पर्यायाने शेतकऱ्यांचे नुकसान होते. सेवा सहकारी सोसायटीमध्ये फ्रॉड झाला तर शेतकरी अडचणीत येतो, तो नाडला जातो. भरमसाठ व्याज आकारणीमुळे कर्ज वसुली होत नाही, याबाबत सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेबांनीही आणि अन्य सन्माननीय सदस्यांनीही असेच सांगितलेले आहे. म्हणूनच आपल्यावर वन टाईम सेटलमेंट करण्याची वेळ आलेली आहे. यासंबंधीचे धोरण आखणे गरजेचे आहे. वन टाईम सेटलमेंटची घोषणा करणे गरजेचे आहे. कर्जाचे दर कमी करुन त्यामध्ये एकसूत्रता आणवी, असे मला वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात....

श्री. धोंडीराम राठोड..

विदर्भ आणि मराठवाडयाच्या बाबतीत जेव्हा येथे चर्चा चालू होती तेव्हा वर्तमानपत्रात एक मथळा असा आला हाता की, "वऱ्हाड जात्यात तर मराठवाडा सुपात" म्हणजे आता तुमच्या नंतर आमचाच नंबर आहे. गडकरी साहेब तुम्ही सध्या जात्यात आहात आणि आम्ही सुपात आहेत. सुपातून आम्ही सुध्दा ज्यात्यात जाणार आहोत म्हणून ही परिस्थिती निर्माण होण्यापूर्वीच आपण हे सगळे केले पाहिजे.विदर्भा खालोखाल कापूस पिकविणा-या मराठवाडा विभागावर देखील शासनाने लक्ष दिले पाहिजे. मघाशी बोलातनां श्री. नितीन गडकरी साहेब म्हणाले की, गावामध्ये गावपण राहिलेले नाही.ग्रामीण भागाची आज परिस्थिती पाहिली तर खेडी ओस पडतांना दिसत आहेत. शेतकरी मजूर होतांना दिसत आहेत. त्या शेतक-याच्या बाबतीत शासनाने विचार केला पाहिजे. गावाचे गावपण गेले तर गावामध्ये राहणारी सगळी माणसे त्यांचा उदरनिर्वाह होत नाही म्हणून ते शहराकडे वळले आहेत. आमचा सुतार गेला, कुंभार गेला, लोहार गेला, चांभार गेला,नाव्ही गेला. म्हणून दाढी, कटिंग करावयाची असेल तर शेजारच्या मोठया गावात जावे लागते अशी खेडयाची परिस्थिती इ ालेली आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गडाख साहेबांनी श्री. नितीन गडकरी साहेबांनी पीक विम्याच्या बाबतीत सांगितले. मला सहकार मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे की,पीक विम्याच्या बाबतीत जरुर शेतक-यांना एक झुकते माप दिले पाहिजे आणि ज्यांचे नुकसान झाले त्या प्रत्येक माणसाला इनडिव्हिज्वल पीक विमा योजनेचा लाभ मिळाला पाहिजे. गाव हा त्या ठिकाणी क्षेत्र माणू नये. 50 टक्क्याच्या अटीचा जो नियम आहे तो शिथिल केला पाहिजे. एकेकाळी महाराष्ट्राला गौरव वाटावा अशा प्रकारच्या योजना श्री. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक आणि वसंतदादा पाटलांनी जाहीर केल्या.कापूस एकाधिकार योजना असेल, रोजगार हमी योजना असेल दुष्काळाच्या संदर्भात श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, श्री. वसंतराव नाईक साहेबांनी त्यावेळी सांगितले होते की, "दुष्काळामध्ये मी एकही माणूस मरु देणार नाही. माझा प्रत्येक माणूस जगेल. मागेल त्याला काम आणि त्याचे वेळेवर दाम" अशा प्रकारचे धोरण त्यांनी अवलंबिले. अन्नधान्याच्या बाबतीत महाराष्ट्राला स्वंयपूर्ण केल्या शिवाय राहणार नाही. नाही तर मला फासावर लटकवा अशी घोषणा करणारे महाराष्ट्रचे नेते होते. त्यांची आज या ठिकाणी आठवण झाल्या शिवाय राहणार नाही. सहकार मंत्री महोदय, महाराष्ट्रातील शेतक-यांना सन्मानाने जगण्यासाठी त्यांच्या व्याजाचा दर कमी केला पाहिजे. आणि सगळयांना समान वागणूक दिली पाहिजे अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो. --- ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, वेळ कमी असल्यामुळे मी फक्त सूचना करणार आहे. सहकार मंत्र्यांनी माझ्या सूचनांची नोंद करावी. महाराष्ट्रातील पाच बँका वगळता सगळयाच डी.सी.सी बँका तोटयात आहेत. त्याचे कारण म्हणजे या बँका राजकारणाचे अड्डे झाले आहेत. त्याच्यामध्ये शेतकरी आणि शेती हा घटक कुठेच राहिलेला नाही. सभापती महोदय, आमचा संभाजीनगर औरंगाबाद जिल्हा घ्या. रामकृष्णबाबा लिफ्ट इरिगेशन असेल, नोकरीभरतीमध्ये झालेला दहा कोटीचा घोटाळा असेल, याच्या बाबतीत शासन काही कडक कारवाई करणार आहे की नाही ? हा महत्वाचा प्रश्न आहे. जालन्याची तीच अवस्था आहे.परभणीमध्ये अशाच पध्दतीने भ्रष्टाचार सहकार शिरोमणी पदाचे बरेच दावेदार आहेत.नांदेडचा 200 कोटी रुपयाचा तोटा आहे. हे 200 कोटी रुपये शासन आज भरणार आहे. पण हे 200 कोटी रुपये कुठे गेले? हे बघण्याचे काम शासनाचे नाही काय? असेच उदाहरण उस्मानाबादचे आहे. उस्मानाबादची बँक कशी लुटली गेली हे आपल्याला माहीत आहे. याच्यामध्ये काही चांगलेही उदाहरणे आहेत. पण मला असे वाटते की, सहकार क्षेत्रामधून जाणीवपूर्वक स्वत:ची घरे भरणा-यांवर शासन कारवाई करणार आहे की नाही? यासंबंधात जे चांगले मॉर्डल्स आहेत ते सगळयांसमोर आणावेत अशी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी सांगितलेली सूचना मी स्वीकारतो. माझ्या दृष्टीकोनातून फायनान्स टू द फॉर्मिंग म्हणजे शेतीला पतपुरवठा. शेती उद्योगाला पत पुरवठा याच्या बाबतीत पुढच्या काळात जाणीवपूर्वक दोन वेगवेगळया इन्स्टिटयुट करुन वेगळया पध्दतीने फायनान्स करणार आहात की नाही? याचे कारण असे की, साखर कारखान्यात झालेला घोटाळा, सूत गिरण्यात झालेला घोटाळा, त्याचप्रमाणे लिफ्ट इरिगेशनमध्ये झालेला घोटाळा असेल किंवा कर्माळच्या पोयट्रीमध्ये झालेला घोटाळा असेल. या घोटाळयामध्ये एखाद्या व्यक्तिच्या चुकिच्या फायनान्सिंगमुळे शेतकरी अडचणीत येतो. त्यामुळे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, डी.सीसी. बँकेचे दोन वेगवेगळे फायनान्सेस केले तर ते कर्ज डायरेक्ट शेतक-याला मिळेल. मोठया धनदांडग्यांना जो कर्ज पुरवठा करण्यात येतो त्याच्यामध्ये रेट ऑफ इंट्रेस्ट वेगळा ठेवता येऊ शकेल. मी माननीय दिलीपराव देशमुख आणि श्री. गोपीनाथ मुंडे यांचे अभिनंदन करतो की, त्यांनी वैद्यनाथसारखा,रेना सारखा,(अडथळा) श्री. अशोक चव्हाणांचा कारखाना चांगला चालू आहे. श्री. टोपेंचा कारखाना सध्या चांगला चालू आहे....

यानंतर श्री. खर्चे..

अशुद्धीत प्रत / शुद्धीपत्र नाही

डॉ. श्रीकांत जोशी .....

हरिभाऊंची दूध संस्था सुध्दा अत्यंत चांगल्या प्रकारे चालू आहे. पण त्यांच्याच शेजारी बसून एखादा कार्यकर्ता जर लातूरचे 20 कोटी रुपये लूटणार असेल, बीडमध्ये 10 कोटी रुपये लूटणार असेल तर त्यांच्यावर काही कारवाई करावयाचीच नाही काय ? असा माझा प्रश्न आहे. या निमित्ताने मी दोन सूचना करु इच्छितो की, मराठवाडयाची परिस्थिती आणि विदर्भाची परिस्थिती वेगवेगळी आहे. विदर्भातील शेतकरी आत्महत्या करतात तर मराठवाडयातील शेतकरी स्थलांतर करतात आणि आजपर्यन्त जवळजवळ 10 लाख शेतकऱ्यांनी स्थलांतर केलेले आहे. या मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या कर्जाच्या बाबतीत मला सांगावयाचे आहे की, शासनाने लॉंग टर्मच्या कर्जात रुपांतर करण्याच्या दृष्टीने एखादी योजना करणे आवश्यक आहे. आज मराठवाडयातील शेतकऱ्यांचे पर कॅपिटा इन्कम अत्यंत कमी आहे. या शेतकऱ्यासाठी शासनाने नाबार्डकडून एक वेगळया प्रकारचे 2000 कोटीचे कर्ज घेऊन त्यावर फक्त 6 ते 7 टक्के व्याजच शासनाला द्यावे लागेल व हे कर्ज डायरेक्ट शेतकऱ्यांना दोन ते तीन वर्षेपर्यंत मिळाले तर मराठवाडयाचे दरडोई उत्पन्न वाढू शकते, यासाठी शासन कोणती यंत्रणा उभी करणार आहे ? याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

(**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**)

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन.पी.हिराणी (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या प्रश्नाला अल्पकालीन चर्चेच्या माध्यमातून सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी वाचा फोडली त्याबद्दल त्यांचे मी अभिनंदन करतो.

सभापती महोदय, एखादा पेशंट डॉक्टरकडे आल्यानंतर प्रामुख्याने डॉक्टर दोन प्रकारे विचार करतात. एक म्हणजे त्या पेशंटला काय त्रास होतो म्हणून तात्पुरती ट्रिटमेंट देण्यासाठी त्याची लक्षणे काय आहेत त्यानुसार ट्रिटमेंट करण्यात येते आणि त्यामुळे तात्पुरता रिलिफ त्या पेशंटला मिळतो आणि दुसरा उपाय म्हणजे त्याच्या रोगाचे निदान होण्यासाठी त्याची क्युरेटिव्ह ट्रिटमेंट, कायमचा उपचार करण्यासाठी डॉक्टर त्याच्या सर्व इव्हेस्टीगेशन्स करुन घेऊन नेमके निदानावर बोट ठेवून ट्रिटमेंट करतात. या ठिकाणी महाराष्ट्र सरकारने 1075 कोटीचे पॅकेज विदर्भासाठी दिले त्याबद्दल खरोखरच शासनाचे आभार मानले पाहिजेत. पण जोपर्यंत क्युरेटिव्ह ट्रिटमेंट होत नाही, त्याच्या मुळाशी जाऊन काय काय करणे आवश्यक आहे हे पाहत नाही, कोणत्या कारणांमुळे आत्महत्या होतात हे पाहत नाही, त्यांची कारणे शोधली जात नाही, जोपर्यंत त्याचा बंदोबस्त होत नाही तोपर्यंत आत्महत्यांचे सत्र थांबण्याचे लक्षण दिसत नाही. सर्वात महत्वाचे कारण पाहिले तर हे शेतकरी आत्महत्या का करतात तर ढोबळमानाने त्यांचा कर्जबाजारीपणा असेच उत्तर मिळेल. परंतु त्या शेतकऱ्याची शेती पिकली नाही, नापिकी झाली आणि शेती न पिकण्याचे कारण काय तर पावसाचे प्रमाण जास्त झाले अथवा अत्यंत कमी प्रमाणात पाऊस पडला आणि ज्यावेळी जाऊस जास्त पडतो त्यावेळी शेतकरी कमी हैरान होतो पण पावसाचे प्रमाण अत्यंत कमी असते त्यावेळी मात्र या शेतकऱ्याची हलाखीची परिस्थिती होते. ज्यावेळी कमी पाऊस पडला त्याबाबत विचार केला की असे का झाले तर निसर्गाने साथ दिली नाही, असे उत्तर मिळते. मग यावर उपाय म्हणून जोपर्यंत विदर्भात सिंचनाची व्यवस्था प्रभावीपणे करीत नाही तोपर्यंत हे प्रश्न सुटू शकणार नाहीत. आमच्या विदर्भात आज 93 टक्के कोरडवाहू शेती आहे. राज्याचा विचार केला तर 83 टक्के कोरडवाहू शेती असून 17 टक्केच सिंचन संपूर्ण राज्यात आहे. यामध्ये कितीही प्रयत्न केला तरी 20 ते 25 टक्केच्या वर सिंचन होऊ शकणार नाही. यामध्ये प्रवाही सिंचनाचे प्रमाण राज्यासाठी 5 ते 7 टक्के आहे व त्यातही विदर्भात हे प्रवाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन.पी.हिराणी .....

सिंचनाचे प्रमाण कमी असून विहीरींवरील सिंचनाचे प्रमाण त्यात जास्त आहे आणि प्रवाही सिंचनाचा वाटा अत्यंत कमी आहे. म्हणून विदर्भातील शेतकऱ्यांचे आत्महत्यांचे प्रश्न सोडवावयाचे असतील तर या ठिकाणी सिंचनावर जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

उपसभापती : आता दुपारचे 12 वाजून 14 मिनिट झालेले आहेत. माननीय मंत्री महोदयांना उत्तरासाठी अर्धा तास वेळ लागणार आहे. म्हणून कृपया सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण एक मिनिटांत आटोपते घ्यावे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन.पी. हिराणी :त्यादृष्टीने सिंचनाची व्यवस्था लवकरात लवकर व जास्तीत जास्त करणे आवश्यक आहे. विदर्भात प्रभावी सिंचनाची व्यवस्था कमी असल्यामुळे जलसंधारणाची कामे विदर्भात अत्यंत प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. त्या मध्यमातून विहिरींच्या पाण्याची पातळी वाढून शेतक-यांना सिंचनाच्या बाबतीत दिलासा मिळू शकेल. शेतक-यांना कमी व्याजाने कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे शासनाने घेतलेला निर्णय लवकरात लवकर अंमलात आणून शेतक-यांना दिलासा देण्याची आवश्यकता आहे. दुसरे म्हणजे विदर्भातील इन्फ्रास्ट्रक्चर जोपर्यंत वाढणार नाही तोपर्यंत विदर्भातील शेतक-यांचा विकास होणार नाही. आज खेडयामध्ये 12-12 तास वीज नसते. तसेच त्यामध्ये झीरो लोडशेडींग सुध्दा असते. लोडशेडींग करुन वीज आली तर दोन तास वीज राहते आणि चार तास वीज राहत नाही अशी खेडयातील विजेची कथा आहे. त्यामुळे शेतक-यांची मागणी आहे की, आपण संपूर्ण दोन तीन दिवस वीज दिली नाही तर चालेल परंतु जी काही वीज द्याल ती सलग द्या अशी शेतक-यांची मागणी आहे त्यामुळे शेतक-यांना जास्तीत जास्त व सलग वीज उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न शासनाने केला पाहिजे. तसेच एक महत्वाची बाब म्हणजे उत्पादकता. जोपर्यंत शेतक-यांची उत्पादकता वाढत नाही तोपर्यंत शेतक-यांची सधनता वाढणार नाही. त्यामुळे शेतक-यांची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. आज मार्केटमध्ये नकली बियाणे मोठया प्रमाणात उपलब्ध आहे. नकली बियाणांच्या संदर्भात ब-याच वेळा या सभागृहात चर्चा होते तसेच वर्तमान पत्रातून सुध्दा रोज बातम्या छापून येत असतात. मार्केटमध्ये आज कापसाचे हजोरो बियाणे उपलब्ध आहेत. नकली बियाण्यांमुळे शेतक-यांचे फार मोठया प्रमाणात नुकसान होत असते. त्यामुळे शासनाने नकली बियाण्यांच्या संदर्भात कडक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. तसेच शासनाने जमिनींची प्रतवारी ठरविणे आवश्यक आहे. ज्या जमिनीमध्ये ज्या प्रकारचे माती असेल त्या जमिनीत तसल्याच प्रकारची पिके घेण्याच्या संदर्भात शासनाने शेतक-यांना मार्गदर्शन आणि प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे. शेतकरी जोपर्यंत जैविक शेती करीत नाही तोपर्यंत शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारणार नाही. त्यामुळे यासंदर्भातही शासनाने शेतक-यांना मार्गदर्शन आणि प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे. शेवटी जाता मी एक शेर आपल्याला सांगू इच्छितो की,..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी .....

जो लोग अपने वक्त के साथ चल नहीं सकते,
जो लोग वक्त के सांचे में ढाल नहीं सकते,
वे लोग अपने गम को खुशी में बदल नहीं सकते,
वक्त अपने बदलते खून को खौला कर तो देख,
कौन कहता है कि पत्थर पिघल नहीं सकते.

माननीय सभापती महोदय,एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

-0-

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप देशमुख (उस्मानाबाद-बीड-लातूर स्थानिक प्राधिकारी संस्था) :या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री. गडाख साहेब तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी शेतक-यांच्या जिव्हाळयाच्या प्रश्नासंबंधी जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्याच्या संदर्भात मी माझे विचार या ठिकाणी व्यक्त करणार आहे. आज महाराष्ट्रातील शेतकरी, विशेषत: विदर्भातील शेतकरी मोठया प्रमाणात आत्महत्या करीत आहे. या आत्महत्या कर्जबाजारीपणामुळे होत याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. त्यामुळे शेतक-यांना कमी व्याजाने कर्ज उपलब्ध करुन देण्यात यावे अशी सर्व सन्मानीय सदस्यांची भावना होती व त्या भावने प्रमाणे शासनाने शेतक-यांना कमी व्याजाने कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात निर्णय देखील घेतलेला आहे. सभापती महोदय, हे काही एकटया सहकार खात्याच्या माध्यमातून होणार नाही. ख-या अर्थाने शेतक-याला सक्षम करावयाचे असेल तर सहकार, अर्थ, कृषी, पशुसंवर्धन इत्यादी खात्याने एकत्र येऊन हा कार्यक्रम राबविला तरच शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारु शकेल. सभापती महोदय, जगामध्ये ज्या ज्या देशाची अर्थव्यवस्था शेतीवर अवंबून आहे ते सर्व देश गरीब असतात. विशेषत: आशिया खंड हा कृषी प्रधान आहे त्यामुळे येथे मोठया प्रमाणात गरिबी आहे. याउलट पाश्चिमात्य देशात उद्योगावर आधारित अर्थव्यवस्था असल्यामुळे ते देश श्रीमंत आहेत.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप देशमुख...

सहकार, कृषि या खात्यांना एकत्र यावे लागेल. कर्ज तर आम्हाला कमी व्याज दराने द्यावेच लागेल. आमची कर्ज वितरणाची पध्दती ही तीन टप्प्यांमध्ये आहे. राज्य सहकरी बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक आणि विविध कार्यकारी सेवा सोसायटी. आज नाबार्डकडून आम्हाला 6 टक्क्याने कर्ज उपलब्ध होते. त्यावर मग राज्य सहकारी बँकेचे दोन टक्के, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे 2 टक्के, विविध कार्यकारी सोसायटीचे 3 टक्के अशापध्दतीने व्याज आकारून शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याजाचे दर वाढत जातात. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी एक कुठला तरी टप्पा कमी करणे गरजेचे आहे किंवा नाबार्डकडून डायरेक्ट पीक कर्जाकरिता विशेष बाब म्हणून कर्ज उपलब्ध करून दिले पाहिजे. हे सूत गिरणी किंवा साखर कारखान्यांसंबंधी बोलत नाही. अशाप्रकारे कर्ज आम्हाला उपलब्ध करून देता येईल का ? याचा देखील विचार करणे गरजेचे आहे. आम्ही आमच्या जिल्हा बँकेपुरता निर्णय घेतला आहे की, आम्ही फक्त 11 टक्क्याने कर्ज उपलब्ध करून देऊ. 1 टक्काच फक्त व्यवस्थापनावरील खर्चासाठी घ्यायचा असे ठरविले आहे. मध्यवर्ती बँका आणि सोसायटयांना सुध्दा असेच सांगितले आहे. सोसायटयांना स्वत:चा खर्च करता येत नसेल तर जिल्हा मध्यवर्ती बँक त्यांना कॉम्पेनसेट करणार आहे. या बरोबरच पीक पध्दती आपल्याला चांगली घ्यावी लागेल. नुसता कापूस लावून आणि मध्ये तुरीचे पट्टे लावून चालणार नाही. अशाने विदर्भातील शेती सुधारेल अशी स्थिती नाही म्हणून पर्यायी अधिक भाव देणारी पीक पध्दती घ्यावी लागेल. मराठवाडा आणि विदर्भातील सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासंबंधीची मागणी आहे. पण असलेल्या पाण्याचा वापर आपण तुषार आणि ठिबक पध्दतीने करणार आहात का ? हा देखील प्रश्न महत्त्वाचा आहे. ज्या माझ्या कारखान्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी केला आहे, त्यासंबंधी असे सांगू इच्छितो की, आमच्या कारखान्याने असा निर्णय घेतला आहे की, 5 वर्षामध्ये आमच्या कार्यक्षेत्रामध्ये जो ऊस भिजवला जाईल तो सगळाच्या सगळा एक तर तो ठिबक पध्दती भिजवला जाईल किंवा तुषार पध्दतीने भिजवला जाईल. येणाऱ्या पाच वर्षामध्ये पाटाने पाणी देऊन ऊस भिजवला जाणार नाही. म्हणजे पाण्याची 50 टक्के बचत करणार आहोत. याचा अर्थ 50 टक्के नवे प्रकल्प उभे करण असा होतो. अशा प्रकारचे काम आम्ही करीत आहोत. असे मार्गदर्शन नीटपणाने होऊ शकले तर, सहकार खाते, कृषि खाते आणि पशुसंवर्धन खाते, एकत्र आले तर हे सगळे प्रश्न बऱ्याच प्रमाणत सोडवू शकू. धन्यवाद.

---------- ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे (विधानसभाद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी अतिशय महत्त्वाच्या विषयावर फक्त सूचना करणार आहे. त्या सरकारने जरूर विचारात घ्याव्यात. ओ.टी.एस.विषयी येथे बरीच चर्चा झाली. वन टाईम सेटलमेंटसंबंधी रिझर्व्ह बँकेचे धोरण आहे. मी फक्त आपल्याला इंडस्ट्रीसाठी जे धोरण आहे ते सांगणार आहे. जे उद्योगधंद नैसर्गिक आपत्तीमुळे आणि सरकारच्या धोरणामुळे बंद पडले आहेत किंवा डबघाईस आले आहेत, त्यांच्यासाठी रिझर्व्ह बँकेने ओ.टी.एस.खाली मुद्दलापेक्षा कमी दराने सेटलेमेंट करून दिलेले आहे. नैसर्गिक आपत्ती म्हणून मुद्दलापेक्षा कमी दराने सेटल करून द्यावे व जो काही हप्ता आहे तो सरकारने भरावा आणि नवीन कर्ज हे 6 टक्के व्याजाने डायरेक्ट नाबार्डकडून द्यावे अशी मी अपेक्षा व्यक्त करीत आहे. दोन लाख रूपये देण्यासाठी सरकारडे पैसे नाही असे समजते. वरळी येथील सेतूसाठी 1300 रूपये देण्यासाठी सरकारकडे पैसा आहे. मात्र, मृत शेतकऱ्याच्या परिवाराला 20 कोटी देण्यासाठी सरकारकडे पैसे नाहीत. हे दुर्दैवी म्हणावे लागेल. मी शासनाला विनंती करतो की आपण मृत शेतकऱ्याच्या परिवाराला दोन लाख रूपयाची मदत करावी. तसेच,सिंचनाचा देखील अनुशेष भरून काढावा. अशी सूचना करून मी माझे भाषण पूर्ण करतो.

...

यानंतर श्री.अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम (सहकार मंत्री) : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी अतिशय महत्वाच्या अशा विषयावर चर्चा उपस्थित केलेली आहे. या चर्चेवर भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष व माझे मित्र ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य सर्वश्री.जयंत पाटील, धोंडीराम राठोड, श्रीकांत जोशी, दिलीपराव देशमुख आणि गुरुनाथ कुलकर्णी यांनी विचार मांडले. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी सांगितले की, महाराष्ट्रामध्ये सहकार चळवळीने चांगले काम केले आहे. सभापती महोदय, शेतकरी आत्महत्या का करतात ? त्या मागची कारणे काय आहेत ? शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागे अनेक कारणे आहेत. त्यापैकी मुख्य कारण कर्जावरील व्याज, इरिगेशनची अपुरी व्यवस्था अशी अनेक कारणे आहेत. यामध्ये एकट्या सहकार विभागाची जबाबदारी नाही. शेतकऱ्यांना योग्य दराने व्याज उपलब्ध करुन देणे ही सहकार विभागाची जबाबदारी आहे आणि ती टाळून चालणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी म्हणाले की, सहकार क्षेत्रामध्ये राजकारण खूप आहे. मी आपल्याला अभिवचन देऊ इच्छितो की, सहकारी चळवळीमध्ये परिवर्तन होण्यासाठी ती शुध्द पायावर उभी राहिली पाहिजे. जे चांगले कार्यकर्ते आहेत, ज्या चांगल्या संस्था आहेत त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे, त्यांना पाठिंबा दिला पाहिजे. त्यांना संधी दिली पाहिजे. जी अपप्रवृत्ती सहकार क्षेत्रामध्ये घुसली आहे त्याबाबत खंबीरपणे ॲक्शन घेतली जाईल असे सहकार विभागाचे धोरण आहे. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी उस्मानाबाद बँकेचे काय झाले ? नांदेड बँकेचे काय झाले ? नागपूर बँकेचे काय झाले ? असा प्रश्न उपस्थित केला. अशा ज्या अनेक बँका आहेत त्याबाबत सहकार विभागाने ॲक्शन घेतलेली आहे. त्याठिकाणी प्रशासक नेमलेला आहे. कोर्टामध्ये काही केसेस सुरु आहेत. याठिकाणी कोणालाही वाचविण्याचा प्रयत्न निश्चितपणे होणार नाही. जे उत्तम बॅलन्सशीट ठेवू शकतात त्यांचेबाबतीत निश्चितपणे वन टाईम सेटलमेंट होईल. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी कर्जासंबंधी माहिती दिली. त्यांना सांगू इच्छितो की, दिनांक 9 डिसेंबर रोजी मी देशाचे अर्थमंत्री यांचेबरोबर चर्चा केली. गुरुवार रोजी होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत वैद्यनाथन समितीचा प्रस्ताव ठेवणार आहोत. वैद्यनाथन समितीच्या अहवालास काही अटींवर महाराष्ट्र सरकारने मान्यता दिलेली आहे. आम्हाला स्वतंत्र कायदा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पंतगराव कदम.....

करण्याची आवश्यकता नाही. सहकार चळवळीचे हे शताब्दी वर्ष आहे. आम्ही आता असा निर्णय घेतलेला आहे की, साखर कारखान्यांचे परस्पेक्टीव्ह कसे आहेत ? कारखान्यातील खर्च कसे होतात ? यासंबंधी गेल्या पाच वर्षाची माहिती अहवालात छापणे आवश्यक आहे. मग लोकांना समजेल की, एकाला 48 कोटी तर दुसऱ्याला 28 कोटी खर्च असे का ? अशा पध्दतीचे आदेश काढलेले आहेत. सहकार चळवळ बुडाल्यास इतिहास आम्हाला माफ करणार नाही. ज्याठिकाणी बरोबर काम होणार नाही त्याठिकाणी कडक धोरण अवलंबिले जाईल.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु जे बरोबर असतील मग ते कोणाचेही असोत त्यांना मदत करु. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.फुंडकरसाहेब यांची सस्था चांगली असेल तर निश्चितपणाने मदत करु, परंतु जवळच्या व्यक्तीची संस्था चांगली नसेल तर त्या ठिकाणी मदत केली जाणार नाही.

मी सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाखसाहेबांच्या मुलाच्या लग्नाला उपस्थित होतो. अतिशय साध्या स्वरुपात त्यांनी आपल्या मुलाचे लग्न केले. परंतु आज बाहेरची परिस्थिती पाहिली तर लग्नावर अधिकाधिक खर्च करणे हा प्रतिष्ठेचा विषय झाला आहे. आज एकप्रकारे समाजामध्ये चुकीची कल्पना रुढ होत आहे. म्हणून शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या पॅकेजमध्ये सामुदायिक विवाह योजनेसाठी प्रत्येक जिल्हयासाठी दरवर्षी 1 कोटी रुपयांची घोषणा करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी संचालक मंडळाचे परदेशात होत असलेल्या दौऱ्याबाबत मुद्दा मांडला. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, ज्या संस्थेचे बॅलंन्सशीट उत्तम नाही, फायद्यात नाही अशा कोणत्याही संस्थेतील संचालक मंडळाला परदेशात जाण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही. संपूर्ण राज्यामध्ये अशाप्रकारची बंदी घातली जाईल. परंतु ज्या संस्थेची बॅलन्सशीट उत्तम असेल, संस्था फायद्यात असेल, परदेश दौऱ्याचा खर्च करु शकत असेल तर त्या संचालक मंडळाला परदेश दौरे करण्याबाबत परवानगी दिली जाईल.

सभापती महोदय, राज्य बँक, जिल्हा बँक, सोसायटी यांचा सुध्दा आम्ही विचार करीत आहोत. कमीतकमी खर्चातून जास्तीतजास्त पीक कसे मिळेल यासंदर्भात सुध्दा निर्णय घेतला जाईल. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी अभ्यास गट स्थापन करण्याबाबत सूचना केली. मी त्यांना सांगू इच्छितो की, 8 दिवसांच्या आत अभ्यास गटांची निर्मिती केली जाईल. त्यामध्ये या क्षेत्रातील व्यक्तींसह विरोधी पक्षातील नेत्यांचा त्यामध्ये समावेश केला जाईल. सहकार चळवळीचे हे शताब्दी वर्ष आहे. गेल्या 100 वर्षामध्ये सहकार चळवळीने जे काम केले आहे, त्या कामाचे आत्मचिंतन केले गेले नाही, त्या चळवळीने कोणती नवीन दिशा घेतली याचा विचार केला गेला नाही. त्यामुळे आता या सर्व गोष्टींचा अनुभव आणि विचार करण्यामध्ये सरकारला कसलाही कमीपणा नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम....

आपल्या सर्वांना माहीत आहे की, आपल्या देशामध्ये पूर्वी साध्या सुईची सुध्दा निर्मिती होत नव्हती. परंतु स्व.पंडित नेहरुंनी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे आपण निरनिराळया वस्तूंचे उत्पादन सुरु करु शकलो. खऱ्या अर्थाने स्व.पंडित नेहरु औद्योगिक, कृषि आणि सहकार चळवळीचे प्रणेते आहेत. त्यानंतर स्वर्गीय इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी असेच धोरणात्मक निर्णय घेतले. स्व.राजीव गांधी यांनी तर आधुनिक भारताचा विचार मांडला. त्यांनी कॉम्प्युटर अँड टेक्नॉलॉजी संदर्भात भूमिका मांडली. ही भूमिका मांडल्यामुळे त्यांच्यावर फार मोठया प्रमाणावर टिका झाली. त्यावेळी बोलले गेले की, आज बैलगाडीमध्ये लोक जात असताना, चंद्रावर जाण्याची भूमिका घेतली जात आहे. ज्यावेळी औद्योगिक क्रांती झाली त्यावेळी आपला देश बाजूला राहिला आणि आपल्याला दीडशे वर्षे पारतंत्र्यात जावे लागले. म्हणून या दृष्टिकोनातून सर्व प्रश्नांचा विचार करीत असताना, शेतकऱ्यांना कमी व्याज दराने कर्ज कसे देता येईल याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. गेल्या वर्षी 353 कोटी रुपये शेतकऱ्यांच्या पीक कर्ज व्याजापोटी माफ केलेले आहेत. आम्ही केवळ निर्णय घेऊन थांबलो नाही तर ती रक्कम सर्वांपर्यंत पोहचवून, त्या निर्णयाची अंमलबजावणी केली आहे.

सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी सावकारांच्या संदर्भात मुद्दा मांडला. सावकारांबाबतचा कायदा 1946 सालातील आहे. आतापर्यंत या संपूर्ण कालावधीत या कायद्याच्या संदर्भात कधी विचार केला गेला नाही. म्हणून आम्ही जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि डेप्युटी रजिस्ट्रार यांची समिती नियुक्त केली आणि यामध्ये नेमके काय घडले आहे यासंबंधीचा निर्णय घेण्याचे ठरविले. या ठिकाणी प्रश्न विचारण्यात आला की, सावकारांकडून किती टक्के व्याज दराने कर्ज पुरवठा होतो ? महोदय, 18 ते 20 टक्के दराने सावकारांनी कर्ज पुरवठा करावा असा नियम आहे. तसेच सावकाराने याबाबतची अप-टु-डेट माहिती ठेवण्याची गरज आहे. परंतु आज जादा दराने कर्ज पुरवठा केला जात आहे. जादा दराने जी रक्कम सावकारांनी वसूल केली आहे ती मूळ व्यक्तीला परत कशी करता येईल याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. जे बेकायदेशीररित्या वाटप करतात त्यांची पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर संबंधितांवर कारवाई करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पंतगराव कदम ..

सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे यापुढेसुध्दा या बाबतीत दर तीन महिन्यांनी आढावा घेतला जाईल.एखादा सावकार चुकीच्या पध्दतीने जर व्यवहार करीत असेल तर त्यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्याच्या बाबतीत निर्णय घेतला जाईल. सावकारीला पर्याय देण्याच्या दृष्टीकोनातून राज्य बॅन्क, जिल्हा बॅन्क,भूविकास बॅन्क वा पत संस्था यांचे जाळे राज्यात कसे वाढवता येईल तसेच यासबंधी जे नियम करण्यात आलेले आहेत ते कसे शिथिल करता येतील यासबंधीसुध्दा निर्णय घेण्यात येईल. वन टाईम सेटलमेन्टच्या बाबतीत केवळ नाबार्डच्या पातळीवर योजना राबवावयाची नाही तर ती पत संस्थेच्या पातळीवर राबवावली जाईल . कमीत कमी व्याजाने शेतक-यांना कर्ज कसे मिळेल या दृष्टीने सर्वकष चळवळ महाराष्ट्रात शुध्द पायावर कशी उभी राहील याचादेखील विचार केला जाईल.पीक विमा कर्जाच्या बाबतीत बोलत असतांना सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी म्हणाले की, स्पर्धेमुळे अनेक कंपन्या आज पुढे आलेल्या आहेत.तेव्हा त्याही बाबतीत प्रयत्न करण्यात येईल आणि एका पिकाला ही योजना न लावता सर्वकष पिकासाठी कशी लावता येईल याचा देखील विचार करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड यांनी सागितले की, मराठवाडयाकडे अधिक लक्ष देण्यात यावे. त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की,विदर्भ मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र हा एकच आहे असे मी समजतो त्यामुळे शेतकरी हा विदर्भातील असो, मराठवाडयातील असो वा पश्चिम महाराष्ट्रातील असो त्या शेतक-यांनी केलेली आत्महत्या ही सरकारला आणि आपणा सर्वाना ती लाच्छंनास्पद आहे.

शेतक-यांना आत्महत्या कराव्या लागू नयेत या दृष्टीने विचार केला जाईल आणि त्यावरील उपाय शोधण्याच्या बाबतीत निर्णय घेण्यात येईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री नितीन गडकरी :सभापती महोदय, माननीय मत्रिमहोदयांनी एका मुद्याच्या बाबतीत खुलासा केलेला नाही.सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी एक मुद्दा मांडला होता ज्यांच्या बॅलन्सशीटमध्ये एन.पी.ए.ची प्रोव्हीजन केलेली आहे त्या बॅन्का ओ.टी.एस. करतील परंतु संस्था,जिल्हा सहकारी बॅन्का,भू विकास बॅन्का, सेवा सहकारी संस्था आता बुडीत निघालेल्या आहेत.नाबार्डकडून कर्ज घेऊन भू विकास बॅन्केने कर्ज वाटलेले आहे त्या संबंधी आता शासनाने गॅरन्टी घेतली आहे. त्या ठिकाणी जर बॅलन्सशीटमधील एन.पी.ए.चा निकष लावला तर भू विकास बॅन्क, जिल्हा सहकारी बॅन्क,सेवा सहकारी बॅक यांचे जे कर्ज आहे ते ओ.टी.एस. करण्यामध्ये अडचण येऊ शकेल म्हणून माझी आपल्याला अशी विनंती आहे की ,सरसकट जे काही कर्ज आहे त्याबाबतीत राष्ट्रीयकृत बॅन्कांना जे धोरण लागू आहे ते लक्षात घेऊन तसेच नाबार्डच्या गाईडलाईन्स लक्षात घेऊन हे कर्ज अर्बन को ऑपरेटिव्ह बॅन्केचे असो,जिल्हा सहकारी बॅन्केचे असो, भूविकास बॅन्केचे असो वा सेवा सहकारी सोसायटयाचे असो त्यांनासुध्दा तेच निकष लागू होतील असे निसंदिग्धपणे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे अशी माझी त्यांना विनंती आहे त्यानंतर मला त्यांना दुसरा एक प्रश्न असा विचारावयाचा आहे की,ज्याप्रमाणे शासनाने शेतक-याचा विचार करण्याचे ठरविलेले आहे त्याप्रमाणे सहकारामध्ये अनेक संस्था आहेत त्यांचा विचार करणार आहात काय?. काल सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले होते की जलंब येथे एक सहकारी सूत गिरणी पूर्वी उभी राहिली होती आणि आता त्या गिरणीवर 28 कोटी रुपयांचे कर्ज झालेले आहे.आय.डी.बी.आय.ने 28 कोटी रुपयांचे सेटलमेन्ट हे 6 कोटी रुपयामध्ये केले आणि त्या गिरणीला पुनरुज्जीवन मिळाले. एखाद्या गिरणीच्या बाबतीत कारवाई करा असे म्हणणे सोपे आहे.कारण जास्तीत जास्त संस्था तुमच्याच आहे. असे असले तरी सुध्दा मी तशा पध्दतीने विचार करीत नाही.मला असे सांगावयाचे आहे की, बोनाफाईड आणि मालाफाईड असे दोन भाग करण्यात यावेत. ज्या सहकारी संस्थेमध्ये भ्रष्टाचार असेल गैरव्यवहार असेल, बेकायदेशीर व्यवहार असतील तर त्यांच्याविरुध्द जरुर कारवाई करण्यात आली पाहिजे परंतु ज्या सहकारी संस्था केवळ परिस्थितीमुळे अडचणीत आल्या असतील तर त्यां सहकारी प्रक्रिया संस्था असोत, कृषी मालावर प्रक्रिया करणा-या संस्था असोत, प्रक्रिया उद्योग असो वा इन्डस्ट्रीअल को ऑपरेटिव्ह सोसायटी असो त्यांच्या बाबतीत योग्य निर्णय घ्यावयास पाहिजे .मी आपल्याला एक

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री नितीन गडकरी ...

उदाहरण देतो.आम्ही आमच्या भागात एक पी.व्ही.सी. पाईप्स बनविणारी फॅक्टरी काढली होती व 70 लाखापर्यत त्यांची वर्कीग लिमिट होती त्या रकमेवर दोन अडीच कोटी रुपयांचे व्याज भरले होते. आता पी.व्ही.सी. पाईप्स सरकार खरेदी करीत नाही आणि सरकार पैसे देत नाही.त्यामुळे आता आम्ही दुसरा उद्योग सुरु केला आहे.बॅन्केला आम्ही असे सागितले की, ओ.टी.एस. करण्यात यावे ते म्हणतात की," आम्हाला तसे करण्याचा काहीही अधिकार नाही" त्यामुळे सध्या 18 टक्के व्याज वसूल करण्यात येत आहे.अशा प्रकारे जर झाले तर ती संस्था सुध्दा टिकणार नाही. तेव्हा त्या संस्थेच्या बाबतीतही विचार करण्यात आला पाहिजे. जी ग्लोबलाईज एकोनॉमी आपल्याकडे येत आहे त्याचा विचार करता याबाबतीत सर्वकष धोरण स्वीकारण्यात आले पाहिजे.संस्था टिकल्या तर शेतकरी टिकणार आहेत आणि शेतकरी टिकला तर संस्था टिकणार आहेत . म्हणून संस्था आणि शेतकरी या दोघांना टिकवावयाचे असेल तर केन्द्र सरकारचे ,नाबार्डचे आणि रिझर्व्ह बॅन्केचे जे प्रचलित धोरण आहे त्याप्रमाणे आपण कार्यवाही करणार आहात काय ?

नतर श्री.सुबरे

..

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, भू विकास बँकांच्या बाबतीत कायद्यामध्ये तरतूद नाही म्हणून तो कायदा आपण दुरूस्त केला आणि मूळ 1 लाखापर्यात वन टाईम सेटलमेंट करण्याचा निर्णय आपण घेतला. आता सन्माननीय सदस्य श्री. गडकरी म्हणतात तसे रिझर्व बँक, नाबार्ड आणि आम्ही काहीही निर्णय घेतला तरी शवेटी त्या बँकेची, संस्थेची वा कारखान्याची कुवतच नसेल तर मग ते अवघडच होणार आहे. म्हणून याबाबतीत रिझर्व बँक, नाबार्ड आणि संबंधित संस्था यांची ताकद, कुवत वगैरे सगळे पाहूनच निर्णय घेतला जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ही चर्चा संपण्यापूर्वी माननीय मंत्री महोदयांकडून आम्हाला एक आश्वासन पाहिजे. नागपूर सोडण्यापूर्वी ज्या संस्थांचे आर्थिक बॅलन्सशीट चांगले आहे, ज्यांची कुवत आहे अशांच्या बाबतीत ओटीएस साठी आदेश काढले जातील काय ? आणि हे आदेश काढताना विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री.यशवंतरावजी गडाख, श्री. कुलकर्णी यांच्याबरोबर आपण चर्चा करावी. तर तसे आपण करणार का ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, चर्चा जरूर करू. पण येत्या नागपूरच्या दोन दिवसामध्ये निर्णय यावर होणार नाही तर 15 दिवसात याबाबत निर्णय होईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आजची कामकाज सल्लागार समितीची बैठक अजून झालेली नाही आणि सभागृहाचा सत्र कालावधीही निश्चित झालेला नाही असे असताना दोन दिवसात हे अधिवेशन संपणार आहे असे मंत्री महोदय कसे काय म्हणतात ?

उपसभापती : मंत्री महोदयांनी तसे म्हटलेले नाही तर दोन दिवसात उत्तर देता येणार नाही असे ते म्हणाले.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, मी असे सांगितले की, वरच्या आणि खालच्या सभागृहाच्या कामामध्ये व्यस्त असल्याने दोन दिवसात याबाबत निर्णय घेता येणार नाही, तो 15 दिवसात घेऊ.

श्री. सुरेश जेथलिया : सभापती महोदय, माननीय सहकार मंत्र्यांना मी विनंती करू इच्छितो. सध्या विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये शेतकरी जे आत्महत्या करीत आहेत, या दोन्ही विभागात आत्महत्यांचे प्रमाण हे जवळपास सारखेच आहे., तेव्हा आत्महत्यांचे हे प्रकार कमी करण्यासाठी म्हणूनच आजची ही चर्चा येथे उपस्थित केलेली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रकार कमी आपल्याला करावयाचे असतील तर त्या मागील कारणे आपण प्रथम शोधली पाहिजेत.

..... बीबी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जेथलिया ....

माझ्या मते याचे मुख्य कारण हेच आहे की, या दोन्ही विभागातील सहकारी संस्था, विशेषत: साखर कारखाने, सहकारी बँका या डबघाईला आल्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध होत नाही आणि नवीन कायद्यानुसार आपण आता सावकारी देखील बंद केली आहे त्यामुळे देखील शेतकऱ्याला दुसरीकडे कोठे जायला मार्ग राहिलेला नाही. तेव्हा या सहकारी साखर कारखाने आणि बँकां यांचेवर आपण काही चांगली कारवाई केली पाहिजे, जेणे करून त्यांना यपरत परत कर्ज देऊन उभे करण्यापेक्षा त्या संस्था, कारखाने वा बँका दुसऱ्याला चालविण्यास दिल्यास त्यातून शेतकऱ्यांचे निश्चितपणे भले होईल. आज शेतकरी जो अडचणीमध्ये आलेला आहे तो मुख्यत्वे बँकांकडून त्याला जास्त दराने कर्ज घ्यावे लागते शिवाय लोडशेडींग मुळे देखील तो अडचणीत आलेला आहे. ... सभापती महोदय, शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून मला या विषयी खूप काही बोलावयाचे होते, परंतु वेळेअभावी मला संधी मिळाली नाही. ...

डॉ. पतंगराव कदम : आपण आपले मुद्दे मला लेखी कळविले तरी चालतील.

श्री. सुरेश जेथलिया : ठीक आहे. मी आपल्याला लेखी स्वरूपात माझे मुद्दे कळवितो.

उपसभापती : अल्पकालीन चर्चा आता संपलेली आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होईल आणि सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.44 वाजता स्थगित झाली.)

अशुद्धीत मत / शुद्धीसाठी नाही

14-12-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही)CC 1

DGS/ D/ RJW/ 13.00

सभापतीस्थानी मा. सभापती

प्रश्नोत्तरे

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

मुंबई शहरातील पाणीपुरवठा प्रकल्पासाठी १८०० कोटी रुपयांचा निधी

(१) * ९३६२ श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील पाणीपुरवठा प्रकल्पासाठी मुंबई महानगरपालिकेच्या खजिन्यातील सुमारे अठराशे कोटी रुपये बँकांमध्ये गुंतवून ठेवले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासन व महानगरपालिका यांच्या उदासीनतेमुळे भातसा तीन अ व मध्य वैतरणा प्रकल्प प्रत्यक्षात येऊ शकला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, भातसा तीन अ व मध्य वैतरणा प्रकल्पांना सर्व प्रकारची परवानगी मिळाली असून भातसा तीन अ ६४० कोटी रुपये व मध्य वैतरणा प्रकल्पावर सुमारे १२०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मध्य वैतरणा प्रकल्पासाठी आता सल्लागार समिती नेमण्यात आली असून भातसा प्रकल्पाचे काम वेळेवर सुरु झाले असते तर २००५ रोजी मुंबईकरांना ४५५ दशलक्ष जादा पाणी मिळाले असते, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, मध्य वैतरणा प्रकल्प आणखी तीन वर्षे रखडण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, या संबंधी दिरंगाईची कारणे कोणती व दिरंगाईची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर शासन कोणती कठोर कारवाई करणार आहे ?

श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*** ९३६२ ...**

(३) ६६७ कोटी इतका अपेक्षित आहे. ४ मुंबई मध्य वैतरणा प्रकल्पासाठी सन २००२ च्या दरसूचीनुसार अंदाजे १२५० कोटी रु. इतका खर्च अपेक्षित आहे.

(४), (५) व (६) मध्य वैतरणा प्रकल्पासाठी सल्लागार समिती नेमण्यात आली आहे. प्रकल्पास केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाकडून परवानगी मागण्यात आली असून सदर परवानगी लवकर मिळाल्यास सन २००७ मध्ये सदर प्रकल्पाची कामे सुरु होऊन सन २०१०-२०११ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांना छापील उत्तरामध्ये काही दुरुस्ती करावयाची आहे काय?

श्री. राजेश टोपे : नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी "मुंबई शहरातील पाणीपुरवठा प्रकल्पासाठी मुंबई महानगरपालिकेच्या खजिन्यातील सुमारे अठराशे कोटी रुपये बँकांमध्ये गुंतवून ठेवले आहेत, हे खरे आहे काय?" असा प्रश्न विचारण्यात आला होता त्याला "हे खरे नाही" असे उत्तर दिले आहे. तसेच, दुसरा प्रश्न "भातसा तीन अ व मध्य वैतरणा प्रकल्पांना सर्व प्रकारची परवानगी मिळाली असून भातसा तीन अ ६४० कोटी रुपये व मध्य वैतरणा प्रकल्पावर सुमारे १२०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे हे खरे आहे काय?" या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर दिले आहे. मुंबई शहराला सुमारे एक दशलक्ष लीटर इतका कमी पाणीपुरवठा होत आहे. गेल्या दहा वर्षामध्ये मुंबईच्या पाणी साठयामध्ये एक थेंबाची देखील भर पडली नाही. परंतु शहराची लोकसंख्या २० लाखांनी वाढली. ६०० दशलक्ष लीटर पाण्याची चोरी होत आहे ती थांबविण्यासाठी महानगरपालिकेने कन्सल्टंट नेंमला आहे. प्रश्न असा आहे की, १८०० कोटी रुपये बॅकेत ठेवले नाही तर भातसा ३ अ व मध्य वैतरणा या दोन्ही प्रकल्पांना उशीर कां होत आहे?

तिसऱ्या उत्तरामध्ये शेवटी म्हटले आहे की, "मध्य वैतरणा प्रकल्पासाठी सल्लागार समिती नेमण्यात आली आहे. प्रकल्पास केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाकडून परवानगी मागण्यात आली असून सदर परवानगी लवकर मिळाल्यास सन २००७ मध्ये सदर प्रकल्पाची कामे सुरु होऊन सन २०१०-२०११ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे." याचा अर्थ या प्रश्नासाठी केंद्र सरकारकडे केव्हां परवानगी मागितली व ती न मिळण्याची कारणे कोणती?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*** ९३६२ ....**

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, प्रश्न असा विचारण्यात आला आहे की,"भातसा तीन अ प्रकल्पासाठी पैसे गुंतवून ठेवण्यात आले आहेत काय?" त्याबाबत उत्तरामध्ये स्पष्ट म्हटले आहे. हे १८०० कोटी रुपये घसारा निधी किंवा ॲसेट रिप्लेनिशमेंट या दृष्टीकोनातून ठेवण्यात आले आहेत. त्यामध्ये अपघात विमा निधी किंवा आकस्मिकता निधी या गोष्टी आहेत. यामध्ये सेव्हेज ट्रीटमेंट आणि वॉटर पाईपलाईन्सचा समावेश असून त्यासाठी घसारा निधी ठेवण्यात आला आहे. महानगरपालिकेच्या नियमात अशी तरतूद आहे की, हे पैसे नवीन प्रकल्पासाठी वापरता येत नाहीत. त्यामुळे ३ अ भातसा प्रकल्पासाठी पैसे वापरता येणे शक्य नाही. म्हणून स्वनिधीतून हे पैसे उभे करीत आहोत. ३ अ भातसा प्रकल्पासाठी महानगरपालिकेचा जो प्लॅन आहे तो २००९ पर्यंत पूर्ण करावयाचा आहे. तो दोन टप्प्यामध्ये असून पहिला टप्पा पूर्ण झाला आहे व टप्पा २ हा डिसेंबर २००६ पर्यंत पूर्ण करीत आहोत. त्यामुळे या ३ अ भातसा प्रकल्पामुळे ३५५ दशलक्ष लीटर एवढी पाण्याची वाढ निश्चितपणे होईल. दुसरा प्रश्न मध्य वैतरणा प्रकल्पाबाबत विचारण्यात आला आहे. मध्य वैतरणा प्रकल्पाला कंडिशनल ॲप्रुव्हल २७.४.२००४ पर्यंत असून त्यामध्ये बऱ्याच अटी आहेत. त्याठिकाणी काही पर्यायी वनक्षेत्र घ्यायचे आहे. त्यासाठी बीड जिल्हयातील ६५७ हेक्टर जमीन ताब्यात घेतली आहे. त्यासाठी १ कोटी ६६ लाख एवढे पेमेंट केले आहे. तसेच, इतर तत्सम अटी आपण पूर्ण करीत आहोत. त्यामुळे या प्रकल्पाला २००७ पर्यंत मंजूरी मिळेल व २००७ मध्ये हे काम सुरु होईल व २०१० पर्यंत तो प्रकल्प पूर्ण होईल. त्यामुळे मुंबईत निश्चितपणे १५० दशलक्ष लीटर इतके गरजेपेक्षा जास्त पाणी उपलब्ध होईल. एवढे चांगले नियोजन याठिकाणी करण्यात आले आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेचा शिलकी अर्थसंकल्प फक्त 26 लाख रुपयांचा आहे. याठिकाणी या प्रकल्पासाठी जवळजवळ 1300 कोटीचा खर्च येणे अपेक्षित आहे. याबाबतीत मुंबई महानगरपालिकेने निश्चित नियोजन करणे आवश्यक आहे. ही महानगरपालिका 1300 कोटी रुपयांचे एवढे मोठया प्रमाणातील भांडवल कशा प्रकारे उपलब्ध करणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मध्य वैतरणा प्रकल्पाच्या संदर्भात क्रिसील संस्थे कडून माहिती घेतलेली आहे. एम.डी.आर.ए.च्या माध्यमातून 35 टक्के रक्कम मिळणार असून 15 टक्के स्वनिधी आणि 50 टक्के कर्जाच्या माध्यतातून उभे करावयाचे आहेत. आपल्याकडे जो 1800 कोटी रुपयांचा फंड आहे, त्यावर कर्ज घेण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई महानगरपालिकेने परवानगी मागितलेली आहे. शासनाने तशी परवानगी दिल्यानंतर त्यांना या रकमेवर कर्ज घेता येईल आणि अशा प्रकारे 1500 कोटी रुपयांचा उर्वरित निधी जमा करणे शक्य आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, वनजमिनीच्या प्रश्नाबाबत मला याठिकाणी सांगावयाचे आहे की, नुकतीच दिल्लीमध्ये वन विभागाच्या अतिरिक्त सचिव यांच्याशी भेट झाली. माननीय मुख्यमंत्री देखील सदनामध्ये उपस्थित आहेत. कर्नाटकमध्ये अशी पध्दत सुरु केली आहे की, जेव्हा एखाद्या प्रकल्पासाठी जमीन लागते, मग ती खाणीसाठी असेल किंवा इरिगेशन प्रकल्पासाठी असेल तर त्यासाठी जमीन मालकाकडून ती विकत घेऊन ती हॅण्ड ओव्हर करावयाची. त्याप्रमाणे महाराष्ट्रात सुध्दा मुंबई महानगरपालिकेच्या प्रकल्पासाठी जमीन विकत घेऊन ती त्यांच्याकडे हॅण्ड ओव्हर केली तर हा प्रश्न सुटू शकतो. कर्नाटकमध्ये यापध्दतीने धोरण स्वीकारलेले आहे. पण महाराष्ट्राने तसे धोरण स्वीकारलेले नाही. याठिकाणी इरिगेशनच्या प्रकल्पासाठी, खाणीच्या प्रकल्पासाठी, वैतरणा प्रकल्पासाठी महाराष्ट्रात जमीन मिळू शकते, ती मुंबई महानगरपालिकेने जमीन विकत घेऊन त्यांना द्यावी. परंतु महाराष्ट्र शासनाने हे धोरण स्वीकारलेले नाही आणि आपले तशा प्रकारचे प्रपोजलही गेलेले नाही अशी माझी माहिती आहे. आपण जर हे धोरण स्वीकारले तर जे प्रकल्प जमिनीअभावी 2-2 वर्षे अडकून पडलेले आहेत, ते मार्गी लागू शकतील. कर्नाटक सरकारने हे धोरण स्वीकारलेले आहे. पण आपण हे धोरण स्वीकारलेले नाही. जर सरकारने यादृष्टीने निर्णय घेतला तर येथील प्रकल्प सुरु होण्याच्या दृष्टीने सोयीचे होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9362 . . . .

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, आपणही यापध्दतीचे धोरण स्वीकारलेले आहे. जी वन जमीन आहे, ती प्रकल्पामध्ये गेल्यानंतर जी वनेतर जमीन आहे ती खरेदी करुन वनासाठी वापरतो.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी यासाठीच सुरुवातीला विचारले होते की, माननीय मंत्री महोदयांना उत्तरामध्ये काही बदल करावयाचा आहे का ? तर त्यांनी "नाही" असे उत्तर दिले. मग उत्तरामध्ये सांगितले की, 2004 मध्ये कंडीशनल परवानगी मिळालेली आहे. त्यामुळे उत्तरामध्ये विसंगती असल्याचे दिसून येते. 1800 कोटी रुपये बँकेत ठेवलेले आहेत आणि हे पैसे या प्रकल्पासाठी खर्च करु शकत नाही असे ते सांगत आहेत. गेल्या दोन-चार वर्षामध्ये मुंबई महानगरपालिकेने पाण्याच्या करात वाढ केल्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात 200 कोटी रुपयांची भर पडत आहे. यासंदर्भात स्थायी समितीच्या बैठकीमध्ये त्यावेळचे आयुक्त श्री.श्रीवास्तव यांनी असे उत्तर दिले होते की, हे 200 कोटी रुपये पाण्याच्या प्रकल्पासाठीच खर्च करण्यात येतील. तेव्हा प्रतिवर्षी 200 कोटी रुपये याप्रमाणे तीन वर्षात 600 कोटी रुपये आतापर्यंत जमा झाले असतील ते या प्रकल्पासाठी खर्च करण्याकरिता ठेवले आहेत की अन्य हेडखाली वळविण्यात आले आहेत ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, वेगवेगळे हेडस् आहेत. त्यामध्ये पहिले हेड असे आहे, ज्याला घसारा निधी (डिप्रीशिएशन फंड) म्हणतो, ज्या योजना कार्यान्वित आहेत, तेथे ॲसेटस् रिप्लेसमेंट करण्याची आवश्यकता असेल तर, त्यासाठी घसारा निधीची तरतूद आहे. त्याचबरोबर संपदा व पुनर्वसन निधी आहे,पुनर्स्थापना निधी, आग व अपघात निधी, आकस्मिक निधी इत्यादी निधी आहेत. ज्या हेडखाली पैसा साठविला असेल तो त्या हेड खालील योजनांसाठी घेता येतो. पाणी पुरवठयासाठी हा निधी वापरणे शक्य नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

ता.प्र.क्र.9362 (पुढे सुरु....

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, मुळामध्ये मुंबईला पाणीपुरवठा ज्या तलावांमधून होतो. मुंबईमध्ये पाणी येईपर्यन्त मधल्यामधे पाण्याची चोरी होत असते. त्यावर नियंत्रण असणे गरजेचे आहे. त्यासाठी उपाययोजना करणे हे देखील महत्वाचे आहे. त्यासाठी आपण काय उपाययोजना करणार आहात ? दुसरा प्रश्न असा की, मुंबईमध्ये रोज किती दशलक्ष पाणी लागते आणि रोज किती पाणीपुरवठा होतो, किती पाणी कमी पुरविले जाते ? तिसरा प्रश्न असा आहे की,मुंबईमध्ये पाणी बऱ्याच ठिकाणी वाया जाते, पाण्याचा योग्य वापर करण्यासाठी आपण काही उपाययोजना करणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या विसंगत असे वेगळे प्रश्न विचारण्यात आले. आज पाण्याची तूट आहे एवढेच मी सांगेन. मुंबईला साधरणपणे 3225 दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करतो, परंतु मागणी 4,150 दशलक्ष लिटरची आहे. ही पाण्याची तूट राहू नये म्हणून आता मध्य वैतरणा आणि मुंबई 3 "अ" हा प्रकल्प आणतो आहोत. पाण्याच्याबाबतीत आपण 2006 पर्यन्त सरप्लसमध्ये जाऊ अशी परिस्थिती निर्माण होऊ शकणार आहे.

--

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ D/ RJW/

दासगांव ता. महाड येथे माहे जुलै 2005 मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे 43 घरे जमिनदोस्त झाल्याबाबत

(2) * 9753 डॉ. अशोक मोडक , श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री. नितीन गडकरी , श्री. श्रीकांत जोशी : सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दासगांव,ता.महाड येथे माहे जुलै,2005 च्या शेवटच्या आठवडयात झालेल्या अतिवृष्टीमुळे दरड कोसळून 43 घरे जमिनदोस्त झाली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाने 80 कुटूंबांसाठी तात्पुरती निवाराशेड उभारली हे खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर निवारा शेड जवळ पाण्यासाठी ठेवण्यांत आलेल्या पाण्याच्या टाकीत पाणी नाही, तसेच धान्य, रॉकेल उपलब्ध नाही, शाळा दूर अंतरावर आहे, शौचालयाची सुविधा नाही, तर काही जणांना निवारा शेड मिळालेली नाही व या दुर्घटनेत जखमी झालेले अनेकजण शासकीय मदतीपासून अद्यापही वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, सदर आपदग्रस्तांच्या गैरसोयी व अडचणी दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यांत येत आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे,डॉ. पतंगराव कदम यांच्याकरिता : (1) माहे जुलै, 2005 च्या शेवटच्या आठवडयात दासगांव, ता. महाड येथे झालेलया अतिवृष्टीमुळे दरड कोसळून 28 घरे जमिनदोस्त झाली आहेत.

(2) होय.

(3) व (4) नाही. तात्पुरत्या निवारा शेडजवळ पाण्याच्या टाक्या ठेवण्यात आल्या असून त्यामध्ये दररोज टँकरने पाणी पुरवठा केला जातो. शेड पासून 1 कि.मी. च्या आंत असलेल्या सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानातून धान्य दिले जाते. तसेच रॉकेल देण्यासाठीही दुकानाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तात्पुरत्या निवारे शेडपासून 1 कि.मी. चे आंत शाळा उपलब्ध आहे. तात्पुरत्या शेडच्या ठिकाणी शौचालय उपलब्ध करण्यास ग्रामस्थांचा विरोध आहे. त्यामुळे शेडच्या बाजूला असलेल्या हॉटेल ग्रीन फील्ड या इमारतीत असलेली 5 शौचालये व बाथरुमचा वापर करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. संमती दिलेल्या सर्व आपदग्रस्तांना निवारा शेडमध्ये स्थलांतरीत करण्यात आले आहे. तसेच सर्व पात्र आपदग्रस्तांना स्थायी आदेशानुसार मदत देण्यात आलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.97 53....

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, मला शेवटच्या प्रश्नाकडे मंत्री महोदयांचे लक्ष वेधून घ्यायचे आहे. कारण तात्पुरत्या गैरसोई आणि अडचणी दूर केलेल्या आहेत. आम्हा मंडळींचा इंटरेस्ट हा दीर्घकालीन उपाययोजना करण्याच्या संबंधात आहे. या 28 घराचे आपण पुनर्वसन करणार आहात, त्याची आपण कोणती योजना केलेली आहे, की त्यातून स्थायी मार्ग निघू शकेल ? त्यासाठी शासकीय जमीन उपलब्ध आहे काय ? नसेल तर खाजगी जमीन आपण कशी उपलब्ध करुन घेणार आहात ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, त्या ठिकाणच्या दासगावचे संपूर्ण पुनर्वसन करायचे आहे. त्यासाठी जवळच असलेली जमीन घेण्याचा प्रस्ताव आपण ठेवलला आहे. परंतु जमीन घेत असतांना, त्या गावातील सर्वच लोक जाण्यासाठी तयार नाहीत. काही कुटुंबांनी त्या ठिकाणी जाण्याची तयारी दर्शविलेली आहे. काही कुटुंबांनी आम्ही याच गावामध्ये राहू अशापध्दतीचे लिहून दिलेले आहे. तरी देखील संपूर्ण गावाचे पुनर्वसन करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. हे पुनर्वसन करत असतांना काही स्वयंसेवी संस्था देखील या निमित्ताने पुढे आलेल्या आहेत. संपूर्ण गाव पुनवर्सन करुन देण्याची जबाबदारीसुध्दा काही संस्थांनी घेतलेली आहे.

श्री.श्रीकांत जोशी : या प्रश्नाच्या उत्तरामध्ये स्पष्टपणे लिहिलेले आहे की, 80 कुटुंबांसाठी 5 शौचालये व बाथरुमची सोय करण्यात आलेली आहे. खरे म्हणजे 80 कुटुंबे म्हणजे 400-500 व्यक्तींसाठी 5 शौचालये ही सोय होऊ शकते काय ? याला जर आपण सोय म्हणत असाल तर गैरसोय ती कोणती ? त्यामुळे त्वरित यासंबंधामध्ये किमान मुलभूत सोयी, पुरेशी शौचालये, पुरेशी बाथरुम, पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था, आणि दिवसात ही व्यवस्था करणार ? याचा खुलासा करावा.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, पिण्याच्या पाण्यासाठी तात्पुरत्या निवारा शेडमध्ये तीन पाण्याच्या टाक्या ठेवलेल्या आहेत. दररोज एक टँकर त्या ठिकाणी पाठविला जातो. त्या ठिकाणी टँकर गेल्यानंतर त्यांना पिणी मिळाले की नाही, हे त्या शेडमध्ये असलेल्या नागरिकांकडून लिहून घेतले जाते. शौचालयाच्या दृष्टीने त्या ठिकाणी जवळच बंद पडलेले हॉटेल शासनाने ताब्यात घेतले आणि तिचा उपयोग शौचालयासाठी आणि स्नानगृहासाठी करतो आहोत. शौचालये आणि स्नानगृहे बांधण्याच्या संबंधात देखील शासनाने भूमिका घेतलेली आहे. परंतु तात्पुरत्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.97 53....

डॉ.राजेंद्र शिंगणे .....

शेडमध्ये रहाणाऱ्या नागरिकांनी अशाप्रकारे काम करु नये असे सांगितले. म्हणून ते बंद पडलेले हॉटेल होते, त्याच ठिकाणी आपण आता शौचालय आणि स्नानगृहासाठी वापर करतो आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : पुराची गंभीर परिस्थिती निर्माण झाली. विशेषत: दासगावमध्ये मी जाऊन आलेलो आहे. त्यावेळेला राज्य शासनाने आणि माननीय पंतप्रधानांनी, केंद्रीय कृषी मंत्र्यांनीही जाहीर केलेले होते की,....

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9753..

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

या देशामध्ये त्सुनामी लाटा आल्यानंतर जी परिस्थिती निर्माण झाली होती त्यावेळी शासनाने 45 हजार रुपयाचे पॅकेज दिले होते. आज या गोष्टीला पाच महिने झालेले आहेत. शासनाने ती तात्पुरती व्यवस्था केली आहे. त्या ठिकाणी त्या लोकांना जमीन उपलब्ध करुन दिली आणि जे 45 हजार रुपयाचे पॅकेज मान्य केलेले आहे तो निधी त्यांना उपबल्ध करुन दिला तर ते लोक त्या ठिकाणी घरे बांधू शकतील.म्हणून शासन हा निधी त्यांना देण्याची व्यवस्था करणार आहे काय?

डॉ. रजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, पुरामुळे हानी झालेल्या 200 च्यावर गावांचे पुनर्वसन करावयाचे आहे. हे पुनर्वसन करीत असतांना घरे बांधणे, नागरी सुविधा निर्माण करणे या सर्व गोष्टी करावयाच्या आहेत. दोन टप्प्यामध्ये ही योजना आखलेली आहे. पहिल्या टप्प्यात ज्या गावांना त्या ठिक्राणी राहण्याच्यादृष्टीने पुराचा धोका आहे किंवा इतर गोष्टींचा धोका आहे ती गावे पहिल्या टप्प्यत निवडलेली आहेत. त्सुनामी लाटांचा धोका ज्या ठिकाणी आहे त्या संपूर्ण् गावांचे पुनर्वसन करावयाचे आहे आणि त्या ठिकाणी असलेल्या शेतक-यांना मदत देण्याचे काम करीत आहोत.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, दासगावला जी दुर्घटना घडली आहे त्या दुर्घटनेमधील बाधीत लोकांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. त्या ठिकाणी दोन कुटुंबे अशी आहेत की, एका कुटुंबात 8 ते 9 वर्षाची मुलगी आहे आणि दुस-या कुटुंबात 14 ते 15 वर्षाचा मुलगा शिल्लक राहिला आहे. माझा प्रश्न असा आहे की, हे पुनर्वसन करतांना अशा कुटुंबियांची विशेष काळजी घेण्याच्यादृष्टीने शासन काही निर्णय करणार आहे काय?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, यासंदर्भात कोणतेही नियम नसले आणि कायद्यामध्ये तरतूद नसली तरी माणुसकी या नात्याने निश्चितपणाने शासन निर्णय घेईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, पावसाळयापूर्वी त्यांचे पुनर्वसन होणे अत्यंत आवश्यक आहे. तेथील उप जिल्हाधिका-यांनी शासनाकडे त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी जमीन ताब्यात घेण्यासाठी प्रपोजल पाठविले आहे काय? असल्यात ते केव्हा पाठविले आहे? लॅन्ड ॲक्विजिशन ऑफिसरकडून भूसंपादन अधिका-याकडे तो प्रस्ताव कधी देणार ? या सगळया प्रक्रिया पावसाळयापूर्वी पूर्ण होऊन या लोकांचे पुनर्वसन शासन करणार आहे काय?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9753..

डॉ. राजेंद्र शिंगणे : जून-जुलै,2006 पर्यंत हे पुनर्वसन करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. हे पुनर्वसन करण्यासाठी जमीन लागणार आहे ती जमीन ताब्यात घेत असतांना प्रचलित नियमाप्रमाणे जमीन ताब्यात घेतली तर त्याला दोन वर्षे लागतील. म्हणून खासगी वाटाघाटीतून या ठिकाणी लवकरात लवकर जमीन ताब्यात घेण्यात येत आहे. ती जमीन ताब्यात आल्या नंतर ताबडतोबीने पुनर्वसनाचे काम चालू करण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री महोदय येथे बसलेले आहेत. चार दिवसापूर्वी प्रसारमाध्यमातून या गावाच्या बाबतीत खूप मोठी टीका झाली. ज्या लोकांना पुनर्वसनासाठी तेथून हलविले गेले आहे ती सगळी माणसे पूर्णपणे दुर्लक्षित झाली आहेत. म्हणून ती माणसे परत येत आहेत. त्या लोकांची अपेक्षा होती की, त्या ठिकाणी चांगल्या सोई सुविधा मिळतील. पण त्या ठिकाणी पत्र्याच्या शेड टाकल्या असल्यामुळे उन्हात ते पत्रे तापतात त्यामुळे त्यांचे जीवन असहय झालेले आहे. शौचालयाची व्यवस्था नाही पाण्याची व्यवस्था नाही. पाण्याची टाकी ठेवली आहे तेथे प्रत्येक जण येऊन भाडे बुडवून पाणी घेतो. एकंदरीत या सगळया पुनर्वसनाच्या कामाकडे शासनाचे अतिशय दुर्लक्ष झालेले आहे. पुनर्वसन असा त्याचा अर्थ होत नाही.सभापती महोदय, दासगावला दरड कोसळून काही लोक मृत्यूमुखी पडले त्यांचा पत्ता लागलेला नाही. अशा परिस्थितीत शासनाने त्या घटनेकडे लक्ष देऊन तेथील लोकांना दिलासा देण्यासाठी ज्या तातडीने उपाययोजना करावयास पाहिजे होत्या त्या केलेल्या नाहीत. तर फक्त तात्पुरत्या उपययोजना केलेल्या आहेत. त्यामुळे तेथील लोकांनी ते गाव सोडून जाण्याची तयारी केलेली आहे. यादृष्टीने शासनाने या घटनेकडे लक्ष देऊन तेथील लोकांना दिलासा मिळेल. त्यांचे पुनर्वसन वेळेवर होईल आणि त्या ठिक्राणी चांगल्या सोई होतील याची काळजी घेण्यात येणार आहे काय?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, तो तात्पुरता निवारा असल्यामुळे त्या ठिकाणी ज्या सोई उपलब्ध असतील सन्माननीय सदस्य श्री. सरपोतदार साहेबांनी सांगितल्याप्रमाणे निश्चितपणे त्या परिपूर्ण असतील असे मी म्हणणार नाही. परंतु पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत मी सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे तेथे तीन टाक्या ठेवलेल्या आहेत. त्यानंतर 100 मिटरवर तेथे एक विहीर आहे. तसेच 100 मिटरवर प्रायमरी हेल्थ सेंटर आहे त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे.

यानंतर श्री. खर्चे...

अशुद्ध मुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्र. 9753 ..... डॉ. राजेंद्र शिंगणे .....

शौचालयाच्या बाबतीत देखील सांगितले की, जी व्यवस्था सध्या केलेली आहे ती तात्पुरती असून ती अपुरी असू शकते हे मी मान्य करतो. खऱ्या अर्थाने त्यांना ही व्यवस्था पूर्ण मिळाली पाहिजे म्हणून त्या संपूर्ण गावाचे पुनर्वसन आम्ही तातडीने करणार आहोत. मी सुरुवातीलाच सांगितले की, येत्या जून-जुलैपुर्वीच त्या गावाचे सर्व नागरी सुविधांसह पुनर्वसन करावयाचे आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या दासगांव आणि जुई या गावांना मी स्वत: जाऊन आलो आहे. या दोन्ही गावांमध्ये पुनर्वसनासाठी जागा मिळणे अत्यंत कठीण आहे. तेथील उप जिल्हाधिकारी डॉ. शिवाजी पाटील यांनी शासनाकडे जागा मिळण्याबाबतचा प्रस्ताव पाठविलेला आहे. आपण कदाचित त्यांना खाजगी वाटाघाटीने जागा संपादित करण्याचे अधिकार देणार पण एकंदरित या ठिकाणी जावयाचे असेल तर महाडवरुन जावे लागते. या ठिकाणी जी दरड कोसळली त्यासंदर्भात इंजिनिअरिंग तज्ञांचे मत घेऊन तेथून ती दरड फोडून काढून घ्यायची व ती जागा सेफ करावी नंतर त्याच ठिकाणी पुनर्वसन करता येईल काय ? याबाबत विचार करावा. कारण नवीन टेक्नॉलॉजीच्या सहाय्याने ती दरड तेथून फोडून ज्या ठिकाणी गांवकऱ्यांना पुनर्वसन पाहिजे ती जागा सेफ करता येईल याबाबतचा आढावा घेतला तर यातून मार्ग निघून शकतो, कारण ते लोक तेथून दुसरीकडे जाण्यास तयार नाहीत. या ठिकाणी ज्यावेळी दरड कोसळून लोक मेले त्यावेळी अंत्यसंस्कार करण्यात आले ते अशा प्रकारे की, त्यांच्याच घराच्या छप्परावरील फाटे काढून जाळले आणि काळया बाजारातील रॉकेल 13 रुपये लिटरप्रमाणे विकत आणले व तेथून जवळच असलेल्या विसावा हॉटेलमधील जुन्या टायर्सचा उपयोग करुन हे अंत्यसंस्कार करण्यात आले. अशा प्रसंगी जर शासनाने जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी किंवा संबंधित तहसीलदारांना जास्तीचा खर्च करण्याची परवानगी दिली, तसा अधिकार त्यांना दिला तर ही परिस्थिती भविष्यात येणार नाही. म्हणून इंजिनिअरिंग पॉइंट ऑफ व्हयू च्या सहाय्याने नवीन जागा खरेदी करण्याऐवजी जी मूळ जागा आहे तीच थोडी दरड कापून काढली, तांत्रिकदृष्टया ती दरड बारीक करावी, जेणेकरुन दरड पडली तरी ती 100 फुटापर्यंत जाईल अशा प्रकारे तपासणी करण्याबाबत शासनाचा विचार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्र. 9753 .....

डॉ. राजेंद्र शिंगणे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ही बाब अगोदरच तपासून पाहिलेली आहे. जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाचे सिनियर जिऑलॉजिस्ट यांनी ही बाब तपासली असून त्या गावाला धोका असल्यामुळे त्यांचे पुनर्वसन तेथे करणे शक्य नाही, अशा प्रकारे स्पष्टपणे ओपिनियन त्यांनी दिलेले आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी अशी सूचना आहे की, जी दरड कोसळली ती तेथून कापायची व ती जरी पडली तरी 100 फुटापलिकडे जाईल आणि जी जागा रिकामी होईल त्या ठिकाणी दरड कोसळली तरी नागरिकांना हानी पोहचणार नाही यादृष्टीने विचार करुन त्याच जागेवर त्या लोकांचे पुनर्वसन करावे. जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाचे लोक म्हणतात ते म्हणजे जांभा नांवाचा जो दगड आहे त्यामुळे तेथे राहणे शक्यच नाही पण समजा दरड कोसळली तरी जास्तीत जास्त अमुक इतक्या अंतरावरच ती जाईल अशा प्रकारे तांत्रिकदृष्टया विचार केला आणि नागरिकांच्या सुरक्षिततेची सीमा रेषा तयार करुन तेथेच पुनर्वसन करणेही शक्य होईल, यादृष्टीने शासन विचार करणार काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार ही बाब तपासून पाहिली जाईल. कारण जमीन मिळत असतांना अतिशय महागडी जमीन त्या भागात आहे. तसेच शासनाची जमीन मिळेल की नाही याबद्दल शंका आहे, म्हणून खाजगी वाटाघाटीने जमीन घेतल्याशिवाय पर्याय नाही. अशा प्रकारे त्या गावाच्या ठिकाणीच अशा प्रकारे जर त्या गावाचे पुनर्वसन करता आले आणि ते शक्य असेल तर तशी तपासणी करण्यात येईल व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

श्री. जयंत पाटील : महोदय, 80 कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात येणार अशी माहिती मंत्री महोदयांनी दिली आहे. या गावात एकूण कुटुंबे किती आहेत ? या सर्व कुटुंबांना राज्यशासन आणि केंद्रशासनाकडून मदत मिळाली आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : त्या गावात एकूण 80 कुटुंबे आहेत. त्या सर्व 80 कुटुंबांचे पुनर्वसन करण्याचा शासनाचा विचार आहे. यामध्ये 48 कुटुंबे एका गावातील आणि 32 कुटुंबे बाजूच्याच गावातील असून त्यांनाही धोका असल्यामुळे त्यांचेही पुनर्वसन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे व त्यांना शासनाच्या निकषाप्रमाणे सर्व मदत करण्यात आली आहे.

---------- (यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दासगाव आणि जुई या गावाच्या पुनर्वसनाच्या संदर्भात या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी माहिती दिलेली आहे. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, या गावाच्या पुनर्वसनासाठी अंदाजित किती रक्कम खर्च होणार आहे? तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, जशी अतिवृष्टीमुळे दासगाव-जुई सारखी गावे उध्वस्त झाली तसेच विदर्भातील अकोला,यवतमाळ,चंदूर,भंडारा या जिल्हयामध्ये भयंकर पूर आल्यामुळे या ठिकाणचे अनेक नागरीक निर्वासित झाले त्यामुळे या ठिकाणी निर्वासित झालेल्या नागरिकांच्या संदर्भात शासनाचे कोणते धोरण आहे?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, जवळपास आपल्याला 200 च्या वर गावांचे पुनर्वसन करावयाचे आहे. पुनर्वसन करण्याचे काम आपण दोन टप्प्यात करणार आहोत. सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी सांगितल्या प्रमाणे विदर्भातील ज्या ज्या लोकांचे पुनर्वसन करावयाचे आहे त्या सर्वांचे पुनर्वसन आपण पहिल्या टप्प्यात करणार आहोत.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील बेस्ट कंपनीला झालेला आर्थिक तोटा

(३) * ९४३० डॉ. दीपक सावंत , श्री. विलास अवचट , श्री. अरविंद सावंत , श्री. अनंत तरे , डॉ. निलम गोन्हे , श्री. अनिल परब : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेस्ट कंपनीला पेट्रोल व डिझेलच्या किंमतीत झालेल्या दरवाढीमुळे सुमारे ३०२ कोटी रुपयांचा आर्थिक तोटा २००४-२००५ साली झाल्याने बेस्टवर आकारण्यात येणाऱ्या प्रवासी कर पेट्रोंल डिझेलवरील विक्रीकरांत सूट द्यावी अशी मागणी बेस्ट प्रशासनाने राज्य शासनाकडे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेस्ट कंपनी राज्य शासनाला पेट्रोल डिझेलवरील कर ३५ % टक्के प्रवासी कर, विद्युत कर आदिपोटी कोटयावधी रुपये भरत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बस सेवेसाठी तेथील प्रशासन फार मोठी आर्थिक मदत करीत असून तशी आर्थिक मदत राज्य शासनाकडून बेस्ट कंपनीला करण्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे,

(४) तसेच बेस्टच्या प्रस्तावाचा शासनाने विचार केला आहे काय, व असल्यास, त्याचा निष्कर्ष काय आहे ?

श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता: (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, परंतु महानगरपालिका क्षेत्रात चालविणाऱ्या परिवहन सेवेकडून ३५% इतका कर आकरण्यात येत नसून केवळ ३.५ इतक्याच दराने प्रवासी कराची आकरणी करण्यात येते.

(३) व (४) बेस्ट प्रशासनाने प्रवाशांकडून वसुल करण्यात आलेला कर शासनाकडे भरण्यात सूट देण्याबाबत शासनास वेळोवेळी विनंती केली होती. परंतु शासनाने बेस्ट कंपनीची विनंती अमान्य करुन तसे बेस्ट कंपनीला कळविले आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दोन नंबरच्या उत्तरामध्ये थोडी सुधारणा करु इच्छितो. या सुधारित उत्तराचे सर्क्युलेशन देखील करण्यात आलेले आहे. आपण या ठिकाणी प्रवासी कर एवढेच सांगितले होते परंतु डिझेल विक्री करातून किती उत्पन्न मिळते आणि शासनाला ते दिले जाते याची माहिती थोडक्यात दिलेली आहे. ती माहिती अशी आहे की, "डिझेलवरील विक्रीकर ३४ टक्के प्लस १००० रुपये प्रती १००० लिटर अधिभार आकारण्यात येतो म्हणजे एक रुपया अधिभार आहे. विद्युत करापोटी व विविध करांच्या स्वरुपात शासनास एकूण रुपये १७१ कोटी वार्षिक प्रदान करण्यात येतात. शिवाय प्रवासी कर ३.५ या दराने आकारण्यात येतो."

डा. दीपक सावंत : शासनाला जो अव्वाच्या सव्वा कर दिल्यामुळे बेस्ट कंपनीला होतो आहे. वास्तविक बेस्ट ही जगातील अशी एकच ट्रान्सपोर्ट कंपनी आहे की, ती शासनाला ३५ ते ४० टक्के सेल्सटॅक्स देते. बेस्टला करातून सुट देण्याच्या संदर्भात बेस्ट कमिटीच्या चेअरमनने शासनाला विनंती केली होती. तसेच मुख्यमंत्री महोदयांचीही यासंदर्भात भेट घेण्याचे चेअरमनने ठरविले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे..... ता.प्र.क्र. : ९४३०.....

परंतु मख्यमंत्री महोदयांनी त्यांची भेट नाकारली. यासंदर्भात बेस्ट कंपनीने चार पत्रे शासनाला पाठविलेली आहेत. त्यामुळे बेस्ट कंपनीचा कर कमी करण्याच्या संदर्भात शासन पुनरर्विचार करणार का? तसेच ज्यावेळी बेस्टच्या बसेस नव्या मुंबईत जातात, ज्यावेळी टोल नाका क्रॉस करतात त्यावेळी बेस्टच्या बसला टोल द्यावा लागतो. त्यामुळे या टोलमध्ये शासन सूट देणार का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, बेस्टची आर्थिक स्थिती अडचणीची किंवा लॉसेस मधील आहे. मुंबईचे सर्व प्रश्न लक्षात घेऊन शासनाने यासंदर्भात काही महत्वाचे निर्णय घेतलेले आहेत. मुंबईचा जो एमयुटीपीचा प्रोजेक्ट एमएमआरडीए च्या माध्यमातून चालू आहे यामध्ये आपण जवळ जवळ १२८२ नवीन बसेस घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. एमयुटीपीमध्ये ६००-६५० नवीन बसेस आपण देत आहोत. याच बरोबर शासनाच्या वतीने डेडीकेटेड लेन्स, म्हणजे आज मुंबईमध्ये जो ट्रॅफिक जामिंग होतो तो न होण्याच्या दृष्टीकोनातून सेपरेट डेडिकेटेड लेन्स फॉर ओन्ली बसेस असा शासनाने जवळ जवळ २०० कि.मी. पर्यंत ५ मिटर रुंदी असलेला रस्ता हा फक्त बेस्ट बसेससाठी दिलेला आहे. डेडीकेटड लेन्समुळे गतीमान पध्दतीने प्रवास होऊ शकेल. त्याच बरोबर बेस्टला डिझेल सुध्दा कमी लागेल.

(सभापतीस्थानी : माननीय सभापती)

यानंतर श्री. ओटवणेकर ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बेस्टला अधिक फायदा व्हावा म्हणून बेस्टच्या मालकीची 30 टक्के जागा कमर्शियल युजसाठी डेव्हलप करण्यासंबंधीची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. टोल टॅक्सच्या रूपाने शासनाला पैसे मिळतात त्यातून बेस्टला सूट देण्यासंबंधी विचारविनिमय करण्यासाठी जानेवारीच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आडवठयात मुख्यमंत्र्यांची सोयीनुसार त्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येईल. या बैठकीत 1975 पासून असलेल्या जुन्या करासंबंधी देखील विचार करण्यात येणार आहे. एकच बस सातत्याने येत-जात असते त्यामुळे किती वेळा टोल आकारावयाचा असा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. त्यासंबंधी देखील माननीय मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये विचारविनिमय करण्यात येईल.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदया, जगातील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक प्रवासी वाहतूक करणारी सेवा म्हणजे बेस्ट आहे. मुंबई शहराची लोकसंख्या 1 कोटीच्यावर आहे. वाढती लोकसंख्या लक्षात घेता, वाहनांची संख्या लक्षात घेता, बेस्टची परिवहन सेवा गतिशील करावी लागणार आहे. म्हणून शासनाच्या मदतीचा हात बेस्टला हवा आहे. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी येथे रोमँटीक पिक्चर उभे केले आहे. आज बेस्टला 302 कोटीचा तोटा होत आहे. मंत्रिमहोदयांनी 10 वर्षाचा स्पॅन सांगितला आहे. डेडिकेटेड लाईन ही दूरगामी उपाययोजना आहे. खरे म्हणजे बेस्टला ऑक्सिजन देण्याची गरज आहे. म्हणून मी शासनाला असे विचारू इच्छितो की, बेस्टला शासन डिझेलच्या विक्रीकरातून सूट देणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी अतिशय सविस्तर असे उत्तर दिले आहे. शासनाला देखील बेस्टची चिंता आहे. मी येथे रोमँटीक पिक्चर रंगविण्याचा प्रयत्न केलेला नाही. डेडिकेटेड लेनच्या माध्यमातून आपण बेस्टचा प्रवास गतिमान करणार आहोत. एम.यु.टी.पी.मधून नवीन बसताफा बेस्टसाठी घेण्यात आला आहे. बेस्टकडे असलेल्या मोकळया जागेचा वापर वाणिज्य कामासाठी करण्यासंबंधीच्या प्रस्तावावर शासन विचार करीत आहे. तसेच, टॅक्सेसच्या बाबत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जानेवारीच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवडयात बैठक घेण्यात येईल. त्यावेळी शासन सकारात्मक निर्णय घेण्याचा विचार करेल.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, गेल्या तीन वर्षात शासनाला बेस्टकडून कर रूपाने किती पैसा मिळाला आहे ? एम.यु.टी.पी.अंतर्गत बेस्टसाठी बसगाडया घेतल्या नंतर परिवहन सेवेसाठी वेगळे प्राधिकरण करण्यात येणार आहे का ? ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, एम.यु.टी.पी.कर्ज रूपाने बेस्टला बसगाडया उपलब्ध करून देत आहे. गेल्या 3 वर्षाची आकडेवारी माझ्याकडे उपलब्ध नाही. सन 2004-2005 मध्ये बेस्ट उपक्रमाला 196 कोटीचा तोटा झाला. बेस्टला परिवहन सेवेमध्ये जवळपास 302 कोटीचा तोटा झाला आहे, तर विद्युत पुरवठा विभागात 105 कोटीचा फायदा झाला आहे. त्यामुळे सरासरी तोटा हा 196 कोटीचा आहे.

यानंतर श्री.अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9430...

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, बेस्टला लॉस हा डिझेल वरील सेल्स टॅक्समुळे होत आहे. या संदर्भात मी स्वत: बेस्ट ऑफीसमध्ये गेलो होतो. तेंथील अधिकारी श्री.राजेश शर्मा यांना भेटलो होतो. त्यांना मी सूचना केली होती की, बेस्टच्या डिझेल गाड्यांचे रुपांतर सी.एन.जी.मध्ये केले तर लॉस कमी होईलच पण प्रदूषण सुध्दा कमी होईल. गुजरात राज्यामध्ये असा प्रयोग करण्यात आलेला आहे. माझा एक मित्र आहे त्याने आय.टी.मध्ये एक संशोधन केले. कॅनेडियन कीट - युरो-3. असे ते आहे. त्यास केंद्र सरकारच्या नॉर्म्सप्रमाणे परवानगी मिळाली आहे. आपल्याकडे याचा अवलंब केल्यास खऱ्या अर्थाने लॉस कमी होईल आणि मुंबईतील प्रदूषण सुध्दा कमी होईल. आता आपण सी.एन.जी.वर चालणाऱ्या 600-650 नवीन बसेस खरेदी केलेल्या आहेत ही चांगली गोष्ट आहे. पण ज्या जुन्या बसेस आहेत, ज्या टाटा, ले-लँड कंपनीने तयार केलेल्या आहेत. त्या कंपनीच्या इंजिनवर हे युरो-3 मार्फत सी.एन.जी.कीट बसविल्यास लॉस कमी होऊन प्रदूषण सुध्दा कमी होईल. म्हणून मी ही सूचना केलेली आहे. दिल्ली शहरात ही योजना सफल झालेली आहे. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, आपण डिझेल गाड्यांचे रुपांतर सी.एन.जी.मध्ये करणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, एक लीटर सी.एन.जी.साठी 20 रुपये खर्च येतो तर डिझेलसाठी 36 रुपये खर्च येतो. यामध्ये बरीच तफावत आहे. आम्ही सी.एन.जी.वर चालणाऱ्या 650 नवीन बसेस घेतलेल्या आहेत.जुन्या बसेसचे रुपांतर सी.एन.जी.मध्ये करणे सध्या शक्य नाही.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, बेस्ट प्रशासन तोट्यात येत असेल त्याचे कारण म्हणजे घसारा पध्दत हे आहे. प्रत्येक आस्थापनेवर 10 टक्के लेखा पध्दतीने घसारा काढाला जातो. पण बेस्टमध्ये 10 टक्के घसारा लावल्यानंतर पुन्हा 5 टक्के घसारा लावला जातो त्यामुळे बेस्ट प्रशासनाला तोटा येतो. याबाबत बेस्ट प्रशासन विचार करणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे बेस्ट प्रशासनाला तशा सूचना देण्यात येतील.

.2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9430...

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, बेस्ट प्रशासनाच्या लेखा पध्दतीमध्ये जनरल रिझर्व्ह फंड असा हेड आहे. या हेडच्या अनुषंगाने 7 टक्के व्याज देतो. या हेडखाली 70 कोटी रुपये दाखविलेले आहेत. जर 70 कोटी रुपये बजेटमध्ये दाखविले असतील तर तोटा येण्याचा प्रश्न उद्भवत नाही. याबाबत खुलासा करण्यात येईल काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी फार चांगली माहिती सदनाला दिलेली आहे. डिझेलवर टॅक्स जास्त जातो म्हणून बेस्ट तोट्यात येते असे येथे सांगण्यात आले. बेस्ट तोट्यात जाते त्यास सन्माननीय सदस्यांनी बरोबर उत्तर दिलेले आहे. मी त्यांना धन्यवाद देतो. जर तोटे दाखविण्याचा प्रकार असेल तर त्याबाबत संबंधितांना योग्य त्या सूचना देण्यात येतील.

अशुध्दीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील काही भूखंडाचे आरक्षण उठविल्याबाबत

(4) * 10609 श्री. अनिल परब , श्री. विलास अवचट , डॉ. दिपक सावंत , श्री. अनंत तरे : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई शहरातील शाळा, क्रिडांगणे व रुग्णालये आदि साठी राखीव ठेवण्यात आलेल्या भूखंडावरील आरक्षण शासनाने उठविले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास किती भूखंडावरील आरक्षण शासनाने उठविले आहे,

(3) असल्यास, सदर भूखंडाचे आरक्षण उठविल्याबाबत मा. लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रारी केल्याने याबाबतच्या निर्णयाला शासनाद्वारे स्थगिती देण्यात आली आहे अथवा देण्याचा विचार आहे काय ?

श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता : सभापती महोदय, उत्तरामध्ये बदल आहे. त्याचे सर्क्युलेशन सर्व सन्माननीय सदस्यांना करण्यात आलेले आहे.

(1) व (2) होय.महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 च्या कलम 37 मधील तरतुदीनुसार सर्व वैधनिक कार्यवाही पूर्ण करुन मंजूर विकास योजनेतील आरक्षणांमध्ये शासनाकडून वेळोवेळी फेरबदल मंजूर केले जातात.

(3) मा. लोकप्रतिनिधींनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने आरक्षण वगळण्याबाबत केलेल्या काही प्रकरणांमधील फेरबदलाच्या कार्यवाहीस शासनाकडून दिनांक 13.7.2005 रोजी स्थगिती देण्यात आलेली आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मुंबई शहरातील शाळा, क्रीडांगणे व रुग्णालये इत्यांदीसाठी राखीव असलेल्या भूखंडावरील आरक्षण उठविण्याची कारणे काय आहेत ? आपण उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, गेल्या तीन वर्षात प्राथमिक शाळेची -2, रुग्णालयांची -2 व क्रीडागणांची -4 अशी एकूण 8 आरक्षणे वगळली आहेत. या आठ आरक्षणांचा सिटी सर्व्हे नंबर काय आहे ? लोकप्रतिनिधींनी दिलेल्या तक्रारीचे स्वरुप काय आहे ?

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सार्वजनिक बाबीच्या संदर्भात अनेक वेळा असे होते की, गरजेनुसार आरक्षण बदलण्यात येते. काही ठिकाणी आरक्षण बदलण्याचा निर्णय महानगरपालिकेच्या वतीने सु-मोटो आला असून, त्यानुसार शासनानेही कार्यवाही केलेली आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे होऊ नये म्हणून मी सांगू इच्छितो की, तत्कालीन मुख्यमंत्र्यांकडून महानगरपालिकेला सूचना देऊन महानगरपालिकेकडून प्रस्ताव आलेले आहेत. महानगरपालिकेने स्वत:हून आरक्षण बदलण्यासंदर्भात प्रस्ताव पाठविलेले नाहीत. पुणे येथील एका केसच्या संदर्भात आरक्षण बदलल्यामुळे एका मुख्यमंत्र्यावर सुप्रीम कोर्टामध्ये केस चालू आहे. त्यामुळे आरक्षण बदलण्यासंदर्भात नेमकी काय कार्यवाही केली जाईल ? कारण चुकीची माहिती देऊन दिशाभूल करणे योग्य नाही.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सर्वच ठिकाणचे आरक्षण बदलण्याबाबत महानगरपलिकेकडून सु-मोटो प्रस्ताव आलेले नाहीत. काही प्रस्तावच सु-मोटो आलेले आहेत आणि त्याबाबत माझ्याकडे पुरावा आहे. शासनाकडे एकूण 68 प्रस्ताव आलेले आहेत त्या सर्वांच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. शाळांच्या बाबतीत दोन आरक्षण बदलण्यात आलेले आहे. त्यात स्कूल-टू-सीएनजी किंवा स्कूल टू-प्ले-ग्राऊंड असा सार्वजनिक वापराच्या दृष्टीने बदल केलेला आहे. हॉस्पीटलच्या बाबतीत पार्टली डिलीट केलेले आहे. पार्टली डिलीटचा अर्थ त्या ठिकाणी हॉस्पीटलच राहिलेले आहे परंतु उरलेल्या जमिनीवर जी 1979 ची इमारत होती ती रहिवाशांसाठी देण्यात आलेली आहे. पूर्वी प्रश्न निर्माण करण्यात आल्यामुळे तेवढयापुरते पार्टली डिलीशन करण्याची परिस्थिती त्या ठिकाणी निर्माण झाली होती. स्टाफ क्वॉर्टर्स आणि हॉस्पीटल असे जे आरक्षण होते त्याबाबतीत हॉस्पीटल आणि मेडिकल इन्स्टिटयूट करण्यात आलेले आहे. हॉस्पीटलचे दोन आणि शाळेच्या दोन बरोबर जे प्ले-ग्राऊंडचे आरक्षण आहे ते आरक्षण उठविण्यासाठी कॅबिनेटसमोर यावे लागते. त्यामुळे जे चार प्ले-ग्राऊंडचे आरक्षण उठविण्यात आलेले आहे ते शासनाच्या मंजुरीनंतरच उठविण्यात आले आहे. पहिले आरक्षण बदलण्याबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेकडून आलेला आहे. त्या प्रस्तावानुसार प्ले-ग्राऊंड-टू-रेसिडेंशिअल असे रुपांतर करण्यात आलेले आहे. दुसरे आरक्षण हे प्ले-ग्राऊंडचे होते, त्याचे आरक्षण गार्डन मध्ये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रुपांतरित केले आहे. तिसरे आरक्षण रिक्रीएशन ग्राऊंडचे होते, पब्लिक इंटरेस्टच्या दृष्टिकोनातून ते वॉटर ट्रांसपोर्टमध्ये रुपांतरित केलेले आहे. चौथे रिक्रिएशन ग्राऊंड-टू-रेसिडेंशिल आणि रेसिडेंशिअल-टू- रिक्रिएशन ग्राऊंड अशा प्रकारे व्हाइस-व्हर्सा बदल करण्यात आलेला आहे.

श्री.विलास अवचट : महोदय, विकास आराखडयाची अंमलबजावणी करणे महानगरपालिकेचे बंधनकारक कर्तव्य आहे. याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. परंतु कलम 37(1) खाली नगर विकास खात्याने महानगरपालिकेला सूचना देऊन जर, 60 दिवसामध्ये आपण अभिप्राय कळविला नाही तर महानगरपालिकेला ते मान्य आहे असे समजले जाते. परंतु शहराच्या विकासाच्या माध्यमातून निरनिराळे आरक्षण बदलले गेले आहे. काही ठिकाणी असे आरक्षण आहेत की, ते भयंकर आहेत आणि त्यांना माननीय मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिलेली आहे. दिनांक 13/7 रोजी स्थगिती देऊन अजूनही त्याबाबत निर्णय दिलेला नाही. शाहरुख खान या नटाला जो भूखंड दिला त्याबाबतचे आरक्षण का उठविले ? याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी स्पष्टीकरणे करणे आवश्यक आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, आरक्षणाच्या दृष्टिकोनातून 37(1) नुसार शासनाच्या वतीने निर्देश देऊन हरकती व सूचना मागवितो. तसेच 37(2) नुसार आरक्षण उठविण्याची कार्यवाही पूर्ण करतो. माननीय मुंडेसाहेबांनी केलेल्या निवेदनाच्या माध्यमातून 37 (2) पूर्ण झाले होते त्याची एकूण संख्या 39 होती.

नंतर श्री.गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे. ता.प्र.क्र.10609..

एकूण 39 प्रकरणे होते त्यातील 29 पब्लिक इंटरेस्टची होती आणि उरलेली जी 10 प्रकरणे होती त्यापैकी 7 प्रकरणात शासनाने स्टे दिलेला आहे आणि 3 प्रकरणात स्टे दिलेला नाही.त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी उल्लेख केलेला श्री.शहारुख खान यांचा भूखंड आहे. कलम 37 (2) अन्वये ज्यावेळी भूखंडावरील आरक्षण उठवले जाते आणि बांधकाम सुरु होते त्यावेळी जर स्थगिती दिली तर कोणीही कोर्टात जाऊ शकतो त्यामुळे शासनाची बाजू तेथे कमी पडते त्यामुळे त्या हद्दीपर्यन्त स्टे दिलेला नाही. प्रेझेन्ट पोझिशनमध्ये तेथे बांधकाम झालेले होते.म्हणून स्टे दिला नाही.

श्री लक्ष्मण जगताप :सभापती महोदय, खरा प्रश्न असा आहे की,विकास आराखडयातील जी आरक्षणे असतात ती सोडण्यासाठी 20 20 वर्षे का शिल्लक राहतात ? या आरक्षणातील भूखंड विकसित होणार आहेत की नाही ? यासाठी शासन काही प्रयत्न करणार आहे की नाही?अशा आरक्षणातील भूखंड ताब्यात घेण्यासाठी शासनाला किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेला अडचणी येत असतात. स्थानिक स्वराज्य संस्था यासाठी जी नुकसानभरपाईची रक्कम देते तो दर आणि मार्केट मधील दर यामध्ये तफावत असते. बरीच आरक्षणे असमतोल प्रमाणात असतात.उदाहरण द्यावयाचे असेल तर ते असे देता येईल की, एखाद्या ठिकाणी माझी दोन एकर जागा आहे आणि त्याच्या शेजारी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांची किंवा सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांची 20 एकर जागा असेल तर माझ्या दोन एकर जागेवर संपूर्णपणे आरक्षण दाखविण्यात येते आणि 20 एकर जागा तशीच राहते तेव्हा अशा प्रकारे न करता शिल्लक राहिलेल्या सगळया जागेवर समान प्रमाणात रिझर्व्हेशन केले पाहिजे किंवा अशा जागांपैकी 10-15 टक्के जागा इतर आरक्षणासाठी सबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने किंवा शासनाने ताब्यात घ्यावी यासाठी शासन विचार करणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे :सन्माननीय सदस्य श्री.लक्ष्मण जगताप यांनी एक धोरणात्मक प्रश्न येथे उपस्थित केलेला आहे त्याबाबतीत मी एवढेच सांगतो की,या ठिकाणी ही वस्तुस्थिती आहे की अनेक ठिकाणी जे काही डी.पी.मध्ये आरक्षण असते ते आरक्षण विकसित करण्यासाठी महानगरपालिका आणि नगरपालिका यांच्याजवळ निधी नसतो.म्हणून निधी नसल्यामुळे आपण ते आरक्षण विकसित करु शकलो नाही व त्या ठिकाणी जर ॲक्विझिशनची प्रोसेस सुरु झाली नाही

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तर एम.आर.टी.पी.ॲक्टच्या कलम 127 नुसार ते आरक्षण लॅप्स केले जाते.अशा प्रकारे हे आरक्षण लॅप्स करण्यासाठी किंवा रिझर्व्हेशन वगळले जाण्याची कार्यवाही करण्यासाठी सुध्दा अनेक लोक पुढे येत असतात .तेव्हा या संदर्भात धोरणात्मक विचार करण्याची आवश्यकता आहे किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेला निधी पुरविण्याची आवश्यकता आहे तेव्हा त्याबाबतीत शासन जरुर विचार करील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, लेखी उत्तरात असे म्हटलेले आहे , "महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 33 मधील तरतुदीनुसार सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन मंजूर विकास योजनेतील आरक्षणांमध्ये शासनाकडून वेळोवेळी फेरबदल मंजूर केले जातात" माननीय मंत्रिमहोदयांनी तोंडी उत्तर देतांना असे म्हटले की, "शासन महानगरपालिकेकडून प्रस्ताव मागवते आणि महानगरपालिकेकडून प्रस्ताव आल्यानतर शासन सुमुटो निर्णय काही केसेसमध्ये घेत असते ". माझा माननीय मंत्रिमहोदयांना स्पेसिफिक प्रश्न आहे. शासन आरक्षण बदलून घेण्याच्या संदर्भात महानगरपालिकेकडून प्रस्ताव मागवून घेत असते परंतु त्या संदर्भात एक चॅनल असे काम करत असते की शासनाकडून प्रस्ताव मागवावयाचा आणि महानगरपालिकडे पोहोचण्यापूर्वी ते पत्र काढून घेण्यात येते आणि 60 दिवसापर्यन्त वाट पाहिल्यानंतर महानगरपालिकेकडे ते पत्र मिळत नाही त्यामुळे सुमोटो आरक्षण बदलण्यात येते.या संबंधी महानगरपालिकेची मंजुरी आल्याशिवाय आरक्षण बदलले जाणार नाही असे धोरण सरकार ठरविणार आहे काय ? याबाबतीत मी अकोला महानगरपालिकेचे उदाहरण देण्यास तयार आहे.अकोला महानगरपालिकेतून अशा प्रकारचे पत्र गहाळ करुन परस्पर शासनामार्फत आरक्षणे बदलण्याची प्रक्रिया आजही सुरु आहे ही प्रक्रिया थाबविण्यात येणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे :महानगरपालिकेच्या मंजुरी शिवाय आरक्षण बदलण्यात येऊ नये असे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे मत आहे.ब-याच महानगरपालिकांना किंवा स्थानिक स्वराज्य सस्थांना आरक्षणे बदलण्याच्या बाबतीत साठ दिवसांची जी मुदत दिलेली आहे त्या मुदतीत त्यांनी ते न केल्यमुळे एम.आर.टी.पी. कायद्यातील कलम 37(1)(अे) खाली शासनाला आपला अधिकारी नेमता येऊ शकतो.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत मत / प्रसिद्धीसाठी नाही

अशी तरतूद कायद्यामध्ये यासाठी केलेली आहे की, यामध्ये खाजगी बाबीच असतात असे नाही तर सार्वजनिक बाबी देखील असतात आणि त्यामुळेच ते काम गतीने व्हावे म्हणून 37ए अशी तरतूद आपण केलेली आहे. इतकेच नव्हे तर सार्वजनिक बाबींच्या दृष्टीकोनातून पुढे 37.1ए ची सुद्धा तरतूद केलेली आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.फुंडकर यांनी जो प्रश्न येथे उपस्थित केला तो अतिशय मुलभूत असाच आहे. त्यांनी सांगितले की, अशा प्रकारची पत्रे संबंधित महापालिकांना मिळणारच नाहीत याची काळजी घेतली जाते आणि मग ती प्रकरणे विशिष्ट मुदत संपल्यानंतर शासनाकडे परस्पर येतात आणि शासन त्याला मंजुरी देते. तेव्हा शा प्रकारची प्रकरणे महापालिकेला प्राप्त झाली आहेत की नाही याची तरी खात्री शासनाने त्याबाबत निर्णय घेण्याअगोदर करणे आवश्यक आहे. परंतु तसे काही न करता अशा प्रकरणी शासनाला स्वतंत्र रित्या निर्णय घेता यावा यासाठीच ही तरतूद केलेली आहे. क्रीडांगणे, हॉस्पिटल इत्यादींची आरक्षणे अशा प्रकारचे उठविली जातात. मुंबईमध्ये आता जे काही भूखंड शिल्लक आहेत त्यासाठीच हे केलेले आहे. आज मुंबईमध्ये आपल्या शासनाची आणि महापालिकांचीच नव्हे तर खाजगी हॉस्पिटल्समध्ये पाहिले तरी तेथे रूग्णांची एवढी गर्दी असते की, जमिनीवर रूग्णांना झोपविले जाते. तेव्हा अशा प्रकारे रिझर्व्हेशनस् उठविण्याबाबत शासन जवळपास एकतर्फी निर्ण घेते आणि नगरपालिका, महापालिका त्याबाबत अंधारात राहतात. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, अशा प्रकारचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर महापालिकेकडून त्यांना त्याबाबतचे शासनाचे पत्र पोहोचले आहे किंवा नाही याची खात्री करून घेऊन नंतरच त्या रिझर्व्हेशनच्या बाबतीत शासन निर्णय घेणार का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या बाबतीत आपण महापालिकेकडून अहवाल मागवितच असतो आणि त्यानंतरच आपण निर्णय घेतो.

(काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात .... अडथळा ...)

तरीही अशा पद्धतीने ज्या ज्या ठिकाणी काही घटना घडल्याअसतील तर त्याची माहिती दिल्यास त्याबाबत जरूर चौकशी करण्यात येईल. परंतु आपण म्हणता त्याप्रमाणे नेहमीच घडते असेही नाही.

..... एमएम 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे, तरीही मी माननीय राज्यमंत्र्यांना उत्तर पूर्ण करण्याची संधी देतो.

(अडथळा)

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण जे काही सांगितले त्याबाबतच्या नेमक्या काही केसेस असतील आणि त्या आपण आमच्याकडे दिल्या तर जरूर त्याबाबत कारवाई आपण करू. परंतु अशा पद्धतीने अहवाल घेऊन नंतरच त्याबद्दल कारवाई केली जाते हे मी पुन्हा एकदा आपल्याला सांगू इच्छितो.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास आता संपलेला आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात. ... अडथळा ..)

सॉरी, प्रश्नोत्तराचा तास संपण्यास अजून काही अवधी बाकी आहे. तेव्हा मी याबाबत उत्तर देण्यास माननीय मुख्यमंत्र्यांना संधी देतो.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी येथे अशी तक्रार केली की, काही वेळेस शासनाच्या वतीने महापालिकेला पत्र पाठविले जाते पण मधल्या मध्ये ते गहाळ केले जाते आणि 60 दिवसांची वाट तांत्रिकदृष्ट्या पाहिली जाते व त्यानंतर सरकार त्याबाबत महापालिकेकडून काही आक्षेप नाही असे समजून आपल्या बाजूने त्या प्रकरणी कारवाई सुरू करते. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, सरकार कोठलाही निर्णय अंधारात घेत नाही. तर त्याचे नोटिफिकेशन काढले जात असते, त्याला प्रसिद्धी दिली जाते, त्याबाबत आक्षेप, सजेशन्स मागविल्या जातात इतकेच नव्हे तर त्याबाबत टाऊन प्लॅनरकडून हिअरींग देखील दिले जाते आणि मग महापालिकेचा प्रस्ताव येतो. समजा आपण म्हणता त्याप्रमाणे महापालिकेला सरकारचे पत्र मिळाले नाही तरी त्याबद्दलचे आक्षेप महापालिका स्वत: देखील घेऊ शकते. कारण त्याची प्रसिद्धी आपण केलेली असते. तेव्हा सरकार असा एकदम निर्णय कोठलाही घेऊ शकत नाही. टाऊन प्लॅनर कडून त्याबाबत प्रसिद्धी दिली जाते, त्याबाबत आक्षेप मागविले जातात. म्हणून मी आपल्याला सांगू इच्छितो की, अशा प्रकारे सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच सरकारकडून त्या प्रकरणी निर्णय घेतला जातो. आपण सांगता आहात तितक्या सहजतेने कोठल्याही फाईलवर निर्णय घेतले जातात असे नाही. ..

(यानंतर श्री. सरफरे ..... एनएन 1 ..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 10609...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, शासनाने महानगरपालिकेकडून ॲक्नॉलेजमेंट घ्यावी अशी माझी सूचना आहे...

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी शासनाने महानगरपालिकेला जे पत्र दिले जाईल त्याची यापुढे महानगरपालिकेकडून ॲक्नॉलेजमेंट घेतली पाहिजे अशी सूचना केली आहे ती सूचना मी मान्य करतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी माझी सूचना मान्य केल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. महानगरपालिकेकडून जे पेपर्स गहाळ होतात ते यापुढे होणार नाहीत. मला माननीय मुख्यमंत्र्यांना विचारावयाचे आहे की, या प्रकरणामध्ये जे आरक्षण बदलले गेले त्याला आपण तात्पुरती स्थगिती दिली. क्रीडांगण, हॉस्पिटलसाठी राखीव असलेल्या जागेवरील आरक्षण उठविणे ही गंभीर बाब आहे. त्याला आपण तात्पुरती स्थगिती दिल्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. दुसरा प्रश्न असा आहे की, ही स्थगिती काही दिवसांसाठी आहे. तो कालावधी संपल्यानंतर पुढे काय होणार आहे? तसेच, यामध्ये जे गैरप्रकार झाले, गैर वैधानिक काम झाले म्हणून त्याला स्थगिती द्यावी लागली. त्याला जे जबाबदार आहेत त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे?

श्री. विलासराव देशमुख : स्थगिती देण्यामागील कारण असे की, सरकारने यासंबंधी जे प्रोसिजर फॉलो केले पाहिजे ते केले नाही. कुणाला तरी फेव्हर करण्यासाठी म्हणून हा निर्णय घेतला अशाप्रकारचा आरोप झाला होता. म्हणून त्या प्रकरणाला स्थगिती दिली. तेव्हा हे सर्व प्रकरण तपासले जात आहे. यामध्ये महानगरपालिकेने त्यांच्या स्वत:च्या कामासाठी निम्मे आरक्षण सुचविले होते. त्यामध्ये वैयक्तिक फायदा किंवा तोटा अशातला भाग नाही. म्हणून त्यावरील स्थगिती उठविली. अमूक एका कामासाठी आम्हाला ही जागा राखीव करावी असे महानगरपालिकेने सुचविले होते म्हणून ते प्रकरण निकाली निघाले. क्रीडांगणावरील आरक्षण उठविण्याच्या बाबतीत मंत्रिमंडळासमोर तो विषय जातो, ते आरक्षण उठविण्याबाबत संबंधित मंत्री निर्णय घेत नाहीत. म्हणून असलेली क्रीडांगणाची जागा वेगळया कारणासाठी वापरु नये म्हणून त्यामागील कारणमीमांसा लक्षात धेऊन मंत्रिमंडळापुढे तो प्रस्ताव जाऊन त्यावर निर्णय होतो. अशाप्रकारचे निर्णय यापूर्वी झाले आहेत. आणि क्रीडांगणासाठी राखीव असलेल्या भूखंडावरील आरक्षण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख.. ता.प्र.क्र. 10609...

उठविण्याबाबत मंत्रिमंडळाची मान्यता यापूर्वीही घेतली आहे. म्हणून हे प्रकरण अडवून ठेवण्याचे कारण नाही. या सर्वच प्रकरणांची माहिती मागविली आहे. ती माहिती पाहिल्यानंतर त्या संदर्भात निर्णय करु.

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी क्रीडांगणावरील आरक्षण उठविले आहे. याबाबत मी असे विचारु इच्छितो की, अंधेरी पश्चिम येथील डी.एन.नगर मधील सर्व्हे नंबर 106/अ वरील क्रीडांगणासाठी असलेले आरक्षण उठविले आहे काय? दुसरा प्रश्न असा आहे की, त्या भागामध्ये या अगोदर फार मोठे क्रिडांगण मैदान होते. त्यावरील आरक्षण उठवितांना सांगण्यात आले की, उरलेल्या जागेवर क्रीडांगण राहील. त्यानंतर अर्धे आरक्षण उठविल्यानंतर थोडे आरक्षण राहील असे सांगण्यात आले. आता ते आरक्षण उठवून त्या ठिकाणी इमारत उभी रहायला लागली आहे. त्याविरुध्द डी.एन.नगरच्या रहिवाश्यांचे चार ते सहा महिन्यांपासून आंदोलन सुरु आहे, मारामाऱ्या झाल्या आहेत, त्याबाबत पोलीस स्टेशनमध्ये कंप्लेंट नोंदविली आहे. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, त्याठिकाणी आरक्षण उठवून सोसायटी बांधायला परवानगी दिलेली आहे तिला स्थगिती देणार काय?

श्री. राजेश टोपे : माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या अंधेरी पश्चिम येथील डी.एन.नगरच्या क्रीडांगणाच्या जमिनीच्या आरक्षणासंबंधीची माहिती या ठिक्राणी उपलब्ध नाही . ती माहिती घेऊन मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

(विरोधी पक्षाकडील अनेक मा. सदस्य उभे राहून बोलू लागतात.)

सभापती महोदय, मी याठिकाणी एवढे सांगतो की, पहिला क्रीडांगणाचा विषय आहे तो माटुंगा येथील विद्यमान क्रीडांगणाच्या आरक्षणासंबंधी आहे. त्याचप्रमाणे दुसरा क्रीडांगणाचा विषय हा सिटी सर्व्हे क्रं.75 या जागेवरील आरक्षणाचा आहे. यामध्ये अंधेरीच्या डी.एन. नगरचा विषय निश्चितपणे नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधीत प्रत / शोधनीसाठी नाही

ता.प्र.क्र.10609 . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी 67 आरक्षणांच्या बाबतीत स्पेसीफीक प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांनी प्रश्न उपस्थित करताना अंधेरी येथील डी.एन.नगर बाबत सांगितले. तसेच तेथील सोसायटीने तक्रार केली असल्याचेही सांगितले आहे. तर या प्रकरणामध्ये शासन निश्चितपणे स्थगिती देईल, याची पूर्ण माहिती घेऊन मग निर्णय घेण्यात येईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

. . . .2 ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे.

मु.शी.: अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली,दुसरी,तिसरी,
चौथी व पाचवी यादी सभागृहासमोर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी,तिसरी,चौथी व पाचवी यादी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी व पाचवी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात.)

. . . .2 ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाचा सन 1999-2000 चा 28 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादितचा सन 2003-2004 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ.सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे सन 2004-2005 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादितचा सन 2003-2004 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.अशोक चव्हाण (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मँगनीज ओर (इंडिया) लिमिटेडचा सन 2004-2005 चा 43 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादितचा सन 2003-2004 चा तेविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

पृ.शी./मु.शी. :अंदाज समितीचा अहवाल सादर करणे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा तिसरा अहवाल सभागृहाला सादर करते.

मी हा अहवाल सादर करीत असताना त्यातील काही महत्वाच्या बाबींचा याठिकाणी उल्लेख करु इच्छिते. राज्य शासनाच्या पुणे येथे असलेल्या ग्रामविकास व जलसंधारण विभागांतर्गत "यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी (यशदा) प्रशिक्षण संस्था" स्थापन करण्यामागे शासनाचा उद्देश कितपत सफल झाला आहे याची छाननी करण्याचा निर्णय समितीने घेतला. यशदा या संस्थेची स्थापना राज्य शासनाच्या जिल्हा प्रादेशिक व राज्य स्तरावरील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याकरिता करण्यात आली आहे. समितीने संस्थेस प्रत्यक्ष भेट देऊन माहिती घेतली. संस्थेने दहा वर्षाच्या कालावधीत एकूण 28,462 शासकीय अधिकाऱ्यांना व लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण दिले आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (पुढे चालू...

2005 वर्षाअखेर एकूण 30,000 प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. केंद्र शासनाने या संस्थेला 2003-2004 मध्ये दिलेल्या अनुदानापेक्षा 2004-2005 साली दिलेले अनुदानप साडे पंधरा लाखांनी कमी झाले आहे. वास्तविक अनुदान वाढले पाहिजे या कार्यक्रमाच्या अनुषंगाने विचार येतो की, अंमलबजावणीमध्ये संस्था कोठे कमी पडते का ? तरी दर वर्षी या संस्थेला मिळणाऱ्या केंद्र शासनाच्या अनुदानामध्ये वाढ कशी होईल या दृष्टीने संस्थेने तसेच शासनाने विशेष मोहीम आखून प्रयत्न करावेत, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

शासकीय अधिकारी/कर्मचारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी यांचेसाठी संयुक्त प्रशिक्षण अभ्यासक्रम आखून त्याची अंमलबजावणी करावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. राज्य शासनाच्या अनेक अधिकाऱ्यांना विधानमंडळाच्या व विधानमंडळाच्या समित्यांची कामकाजाची, कार्यपध्दतीची माहिती नसते. अनेक जिल्हा स्तरीय प्रशासनिक अधिकाऱ्यांना राज्य शासनाची वैधानिक व अर्थविषयक कामे कशी चालतात याची माहिती नसते. विधानमंडळाच्या अनेक समित्यांच्या ही बाब अनेकवेळा निदर्शनास येत असते. सबब, विधानमंडळाच्या वैधानिक व अर्थविषयक कामकाजा संदर्भातील माहितीचा यशदा संस्थेने मान्य केल्यामाणे त्यांच्या प्रशिक्षणाच्या कार्यक्रमामध्ये समावेश त्वरित करावा आणि संबंधित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी पाचारण करण्यासंबंधात योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपली आभारी आहे. धन्यवाद. मी हा अहवाल सभागृहाला सादर केला आहे.

सभापती : अंदाज समितीचा तिसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. व मु.शी. : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्रीमती सुधा जोशी (समिती सदस्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिलांचे हक्क व कल्याण समितीचा आठवा अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

महोदय, अहवाल सादर करीत असतांना त्यातील प्रमुख बाबींचा मी उल्लेख करु इच्छिते.

महोदय, पुणे महानगरपालिकेच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष आणि पदोन्नती तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत तसेच प्रेरणा महिला वसतिगृह, बारामती (जि.पुणे) याबाबतचा आठव्या अहवालात प्रामुख्याने खालील शिफारशी करण्यात आल्या आहेत.

महानगरपालिकेच्या मार्केट मधील जास्तीत जास्त गाळे महिलांना उपलब्ध करुन द्यावेत, तसेच महिलांनी तयार केलेल्या वस्तुंच्या विक्रीसाठी विक्री केंद्रे वाढविण्यात यावी, त्याचबरोबर महिला उद्योगातून तयार होणाऱ्या वस्तू प्राधान्याने आणि प्रसंगी शासन आदेशानुसार त्यांचा दर 10 टक्क्यांनी जास्त असला तरी महानगरपालिकेने द्याव्यात.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आमच्या असे निदर्शनास आले आहे की, सगळया समित्यांचे अहवाल सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी सादर करत आहेत, त्या सगळयाच समित्यांवर आहेत काय ?

श्रीमती सुधा जोशी : मी त्या समितीवर सदस्य आहे. सदस्य म्हणून अहवाल सादर करण्याची मला संधी मिळालेली आहे, ती संधी मी घेत आहे.

श्री.नितीन गडकरी : इतर महिलांनाही अहवाल सादर करण्याची संधी द्या ना?

श्रीमती सुधा जोशी : काल इतर सन्माननीय सदस्यांनी तो हक्क बजावलेला आहे.

सभापती महोदय, महिला व बालकल्याणासाठी अर्थसंकल्पात राखून ठेवण्यात आलेला 5 टक्के निधीतून कोणकोणती कामे आणि कार्यक्रम घेता येईल याबाबत 1993स चे परिपत्रका जुने आहे. त्यामध्ये सुधारण करुनसुधारित परिपत्रक सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषदा यांना निर्गमित करण्यात यावे. तसेच महिलांचे हक्क व बालकल्याण या संदर्भातील शासनाचे व्यापक धोरणलक्षात घेता, विधानमंडळ सदस्यांच्या स्थानिक विकास निधी कामा अंतर्गत बाल संस्कार केंद्र व महिला लघु उद्योग, बाल केंद्र या कामांचा समावेश करावा, अशी विशेष शिफारस करण्यात आली आहे. मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ RJW/ D/

सभापती : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा आठवा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.:.:अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. नानासाहेब बोरस्ते (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सादर करतो.

सभापती :अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

पृ.शी./मु.शी.:रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. सागर मेघे (समिती सदस्य): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती :रोजगार हमी योजना समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

सभापती : आता नियम 93 अन्वये सूचना घेण्यात येतील.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती :याबाबतीत आपले असे ठरले होते की, माझ्या दालनात सदस्यांनी यावयाचे आणि माझ्या बरोबर चर्चा करावयाची. जर औचित्याच्या प्रश्नांच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी काही विशेष सांगितले आणि मी त्याला परवानगी दिली तरच ते औचित्याचे मुद्दे सभागृहात मांडण्यात येतील. मी अशी परवानगी दिलेली नाही. त्यामुळे या ठिकाणी औचित्याचा मुद्दा मांडता येणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर यांनी "महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शासन धोरणाच्या विपरीत आदेश काढल्यामुळे खामगाव शहरासाठी प्रलंबित असलेली पाणी पुरवठा योजना पूर्ण होऊ न शकणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यानी 15 तारखेला किंवा जास्तीत जास्त 16 तारखेला निवेदन करावे.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी यासंदर्भातील पार्श्वभूमी थोडक्यात सांगतो. या मध्ये गांभीर्य असे आहे की. गेल्या पंधरा दिवसापूर्वी माननीय अजितदादा पवार यांच्या चेंबरमध्ये एक बैठक झाली. बुलढाणा जिल्हयात सरासरीपक्षा 50 टक्के पाऊस कमी झालेला आहे. त्यामुळे येथील धरणे भरलेली नाहीत. नदी आणि तलावामध्ये पाणी नाही. खामगाव सारख्या पाच नगरपालिका आहेत.शेगाव,नांदूरा, बुलढाणा, जळगाव, जामोद आणि खामगाव या नगरपालिकांचा पाणी पुरवठा या धरणातून होतो. हे धरण न भरल्यामुळे या पाणीपुरवठयाच्या बाबतीत प्रॉब्लेम तयार झालेला आहे. त्यामुळे तात्पुरत्या पाणी पुरवठयाच्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांच्या दालनात एक बैठक झाली. त्या बैठकीमध्ये 10 टक्के नगरपालिकाचा वाटा अणि 90 टक्के शासनाचा वाटा अशा पध्दतीने खामगावच्या 11 कोटीच्या योजनेला मान्यता दिली होती. त्याप्रमाणे त्या नगरपालिकचे पत्रही आले की, दहा टक्के पैसे भरायला नगरपालिका तयार आहे. पण दोन दिवसानंतर पुन्हा फॅक्स आला की, ही योजना 10:90 मध्ये बसणार नाही.त्यामुळे नगरपालिका 60 टक्के पैसे भरावे लागतील आणि 40 टक्के पैसे हे शासन देईल.सभापती महोदय, अशा पध्दतीने विचार केला तर खामगावच्या जनतेला पाणी मिळणार नाही. त्या ठिक्राणी पाऊस पडलेला नाही त्यामुळे दुष्काळ सदृष्य परिस्थिती झालेली आहे. ही तात्पुरती योजना केली तर या शहराला पाणी मिळणार आहे. त्या ठिकाणी 50 टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. म्हणून या प्रश्नासंबंधीचे निवेदन तातडीने करण्यात यावे. हे निवेदन दोन-तीन दिवसांनी किंवा पुढच्या आठवडयात येणार असेल तर या प्रश्नाचे उत्तर मिळणार नाही. म्हणून या प्रश्नाचे निवेदन तातडीने देण्याचे आदेश आपण द्यावेत अशी विनंती करतो.

सभापती : हा अत्यंत गंभीर प्रश्न असल्यामुळे शासनाने या संबंधीचे निवेदन उद्या दिनांक 15-12-2005 या तारखेला किंवा जास्तीत जास्त दि.16-12-2005 या तारखेला सदनामध्ये करावे.

यानंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय

.....

माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते व इतर, वि.प.स. यांनी "चंद्रपूर जिल्हयाच्या शिक्षणाध्किारी (माध्यमिक) यांनी अपात्र शिक्षकांना मान्यता देऊन केलेले नियमबाहय वर्तन "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. तथापि, याबाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे.

यानंतर माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे व इतर वि.प.स. यांनी "प्रसिध्द मराठी अभिनेत्री उषा चव्हाण यांची बिबवेवाडी येथील जागेसंदर्भात तक्रार डेक्कन जिमखाना पोलीस ठाण्यात नोंदवून न घेतल्यामुळे त्यांना दिनांक 30 नोव्हेंबर, 2005 रोजी करावे लागलेले उपोषण" या विषयासंबंधी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. त्याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी "दि. 13.12.2005 रोजी अकोला येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकीय निवासस्थानात पोलिसांनी छापा टाकून देह विक्री करणाऱ्या दोन युवतींसह पाच जणांना केलेली अटक" या विषयासंबंधी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. तथापि, याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे व इतर वि.प.स. यांनी 24 नोव्हेंबर, 2005 रोजी "दिनांक 24 नोव्हेंबर, 2005 रोजी मलकापूर येथे स्टेट बँकेतील लेखापाल श्री. वऱ्हाडे यांच्या घरात घुसून राजेंद्र पाथरकर याने केलेल्या भीषण चाकू हल्ल्यामुळे जखमी झालेल्या सौ. वऱ्हाडे यांचा उपचारादरम्यान दिनांक 12.12.2005 रोजी झालेला मृत्यू" या विषयासंबंधी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. तथापि, याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी, वि.प.स. यांनी "मुंबई/ठाणेसाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत असलेले नीळे केरोसीन गैरमार्गाने विल्हेवाट लावल्याप्रकरणी मेसर्स युनिटी एंटरप्रायझेस व अन्य संबंधितांच्या अनुज्ञप्ती रद्द करण्याबाबत" या विषयासंबंधी नियम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. तथापि, याबाबत शासनाने निवेदन करावे.

.....2

14-12-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) RR-2

PFK/ RJW/ D/ पूर्वी कु. थोरात.... 14:15

माननीय सभापती .....

यानंतर सर्वश्री सागर मेघे व इतर वि.प.स. यांनी "नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील ऊंच इमारतीत अग्निशामक यंत्रणा नसतांनाही ना हरकत प्रमाणपत्र देणा-या मुख्य अग्निशामक अधिकाऱ्याविरुध्द कारवाई होण्याची आवश्यकता" याविषयासंबंधी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. तथापि, याबाबत शासनाने निवेदन करावे. अन्य सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्यासंबंधी.

सभापती : (माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे व माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याबाबत विंनंती केलेली आहे. त्यांनी आपले मुद्दे मांडावेत.)

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याच्या माध्यमातून पुढीलप्रमाणे वस्तुस्थिती शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते.

"विदर्भातील विशेषत: भंडाऱ्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला रास्त भाव नसणे, व्यापारी पडिक भावाने धान घेत आहेत. धानाला भाव नसल्याने आधीच कर्जबाजारी असलेल्या धान उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत असतांना त्यांच्या आर्थिक समस्येकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, धान रास्त भावाने खरेदी करण्याबाबत शासनाने केंद्रे उघडण्याची नितांत आवश्यकता आहे. विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या धानाला योग्य भाव देण्यासाठी शासनाने तात्काळ कोणती उपायोजना केली आहे अथवा करण्यात येत आहे, याबाबत मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करु इच्छिते."

डॉ. श्रीकांत जोशी : कळमनुरी येथे बेकायदेशीररित्या एका चौकाचे "औरंगजेब चौक" असे नामकरण करण्यात आल्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी याबाबत वस्तुस्थिती तपासून घ्यावी, अशी विनंती या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शासनाला मी करीत आहे.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, मी पुढील औचित्याच्या माध्यमातून शासनाचे या बाबीकडे लक्ष वेधू इच्छितो. :--

" दि. 11 डिसेंबरपासून वसई जि. ठाणे येथे 20 जण बेमुदत उपोषणास असले आहेत. वसई तालुक्यात एस.टी.एस सेवेचे खाजगीकरण या धोरणाच्या विरोधात सुरु असलेल्या उपोषणाचा आज चवथा दिवस आहे. उपोषण करणाऱ्यांपैकी दोन महिला अत्यवस्थ आहेत. त्यांच्या बाबतीत सहानुभूती दाखविण्यासाठी आज सकाळपासून मुंबई-अहमदाबाद महामार्गावर सहस्त्र लोक "रास्ता रोको" करीत आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: वांद्रे (पूर्व) येथील सरकारी वसाहतींमध्ये होत असलेल्या घरफोडया.

मु.शी.: वांद्रे (पूर्व) येथील सरकारी वसाहतींमध्ये होत असलेल्या घरफोडया या विषयासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी "वांद्रे (पूर्व) येथील सरकारी वसाहतींमध्ये होत असलेल्या घरफोडया" या विषयावर जी नियम 93 अन्वये सूचना दिली होती त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा. सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या आहेत. म्हणून मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : महोदय, खेरवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील शासकीय वसाहतीतील वांद्रे (पूर्व) येथे घरफोडयांचे प्रमाण वाढलेले आहे. सन 2004 च्या तुलनेत हे प्रमाण अत्यंत कमी आहे, लोक तक्रारी करीत नाहीत, अशा प्रकारे शासन समर्थन करीत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे.....

चोरीचा काही सुध्दा तपास लागत नाही. पोलीस आणि चोरांचे संबंध आहेत. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, ज्या चो-या होतात त्यांचा काहीही तपास लागत नाही, त्यांना न्याय मिळत नाही. ज्यांच्या चो-या होतात त्यांना त्यांचा मुद्देमाल परत मिळत नाही. आपण निवेदनात म्हटले आहे की, यासंदर्भात वारंवार कोम्बींग ऑपरेशन करण्यात येते त्यामुळे आपण हे कोम्बींग ऑपरेशन कोणकोणत्या तारखेला व कोणकोणत्या ठिकाणी केलेले आहे? जे सराईत गुन्हेगार असतात त्यांना एमपीडी ॲक्ट का लावला जात नाही? या ज्या चो-या झालेल्या आहेत त्या शासकीय वसाहतीत झालेल्या आहेत. शासकीय कर्मचारी वसाहतीतील कर्मचारी कामावर गेल्यानंतर त्याच्या घरातून 87 हजार रुपयांचा मालाची चोरी झालेली आहे. त्यामुळे जे सराईत गुन्हेगार आहेत त्यांच्यावर एमपीडी ॲक्ट नुसार कारवाई का होत नाही?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, गुन्हयाच्या स्वरुपावरुन गुन्हेगारांवर कलमे लावली जात असतात व त्यानुसार कारवाई केली जाते. तसेच कोम्बींग ऑपरेशन वेळोवेळी केले जाते.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, शासकीय वसाहतीच्या बाजूलाच पोलीस स्टेशन आहे. असे असतांनाही या ठिकाणी चोरी झालेली आहे. या ठिकाणी जी चोरी झालेली आहे ती दिवसा ढवळया झालेली आहे. चोरीमध्ये कोणत्या गुन्हेगांराचा संबंध आहे हे पोलिसांना माहिती असते तरी सुध्दा अशा चोरांकडून रिकव्हरी केली जात नाही. शासकीय कर्मचा-यांना आपण संरक्षण देणार नसाल तर आपण अजून कोणाला संरक्षण देणार आहात? या ठिकाणी जो गुन्हा घडलेला आहे त्यासंदर्भात कठोर कारवाई केली जाणार आहे काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, संपूर्ण जगामध्ये ज्या चो-या होतात त्यामध्ये 30 ते 32 टक्केच चो-या उघडकीस येतात. तसेच प्रत्येक चोरीमध्ये रिकव्हरी होतेच असेही नाही. तसेच ज्या ठिकाणी चो-या हेतात तेव्हा त्या ठिकाणचे जे सराईत गुन्हेगार असतात त्यांचा या चोरीमध्ये काही संबंध आहे का याचा सुध्दा तपास घेतला जात असतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या ठिकाणी चोरीच्या संदर्भातील विश्लेषण माननीय मंत्रीमहोदयांनी केलेले आहे. परंतु ही जी चोरी झालेली आहे ती शासकीय वसाहतीत झालेली आहे. या वसाहती जवळच पोलीस स्टेशन आहे. वाटले तर आपण स्वत: या पोलीस

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.....

स्टेशनला भेट द्या. ज्यावेळेस पोलीस रात्री गस्त घालतात त्यावेळेस पोलीस शिट्टी का वाजवितात हे मला काही समजत नाही. पोलीस शिट्टी वाजवित गस्त घालीत असल्यामुळे चोरांना समजते की, आपल्या बाजूला पोलीस येत आहे त्यामुळे हा चोर पळून जातो. जवाहर नगर आणि निर्मल नगर या ठिकाणी दरोडा पडला होता त्यावेळेस सुध्दा पोलीस शिट्टी वाजवित गस्त घालीत असल्यामुळे हे चोर सावध होऊन गेले. या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, जगामध्ये केवळ 35 टक्केच चो-या उघडकीस येत असतात. परंतु मुंबईच्या पोलिसांची जी ख्याती आहे त्या प्रमाणे मुंबई पोलीस 100 गुन्हयांचा शोध लावू शकतात. परंतु असे असतांनाही चोर पकडले जात नाही. कोणत्या भागात कोणते चोर आहेत याची माहिती पोलिसांना असते. परंतु तरी सुध्दा चोरीचा शोध लावला जात नाही. त्यामुळे चोरीच्या संदर्भात पोलिसांचे प्रयत्न कमी पडतात की, पोलीस चोरांना संरक्षण देतात? याचा तपास करण्यात यावा. शासकीय वसाहतीतील कर्मचारी कामावर जातांना घराला कुलूप लावतो व कार्यालय संपल्यानंतर तो रात्री घरी येतो. परंतु कोणते घर दिवसा बंद असते, त्या घरात माणसे किती आहेत, ती घरी कधी येतात यासंदर्भात चोर टेहळणी करीत असतात. व त्यांनतरच घरे किंवा दुकाने लुटली जातात, फोडली जातात. व्यापा-यांच्या बाबतीत सुध्दा अशाच घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे या पोलीस स्टेशनला माननीय मंत्रीमहोदय जेव्हा भेट देतील त्यावेळेस संबंधित सदस्यांना त्या ठिकाणी बोलावून चर्चा करणार आहेत का? तसेच चो-या होऊ नयेत यासाठी कडक उपाययोजना करण्यात येणार आहे का?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : होय.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: नवी मुंबई महानगर पालिकेने वाशी सेक्टर 19 मधील इमारत विकण्याचा घेतलेला निर्णय.

मु.शी.: नवी मुंबई महानगर पालिकेने वाशी सेक्टर 19 मधील इमारत विकण्याचा घेतलेला निर्णय या विषयासंबंधी सर्वश्री मधू चव्हाण व विनोद तावडे वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री) : माननीय सदस्य सर्वश्री मधू चव्हाण व विनोद तावडे यांनी "नवी मुंबई महानगर पालिकेने वाशी सेक्टर 19 मधील इमारत विकण्याचा घेतलेला निर्णय" या विषयावर जी नियम 93 अन्वये सूचना दिली होती त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्या प्रमाणे,मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या आहेत म्हणून मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था): शासनाने नवी मुंबई महानगर पालिकेच्या संदर्भात पहिल्यांदाच चांगला निर्णय घेतला असल्यामुळे मी धन्यवाद देतो.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

पृ.शी.: राज्यात चोरटी प्रवासी वाहतूक उघडपणे चालू असणे.

मु.शी.: राज्यात चोरटी प्रवासी वाहतूक उघडपणे चालू असणे याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, वि.प.स. यांनी "राज्यात चोरटी प्रवासी वाहतूक उघडपणे चालू असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, 98032 वाहने तपासलेली आहेत. त्यावरून एस.टी.महामंडळ तोटयात जाण्याचे कारण लक्षात येते. यात दोषी वाहनांची संख्या 27745 एवढी असून जप्त केलेल्या वाहनांची संख्या 3998 इतकी आहे, तर निकाली 14573 प्रकरणे निकाली काढली आहेत. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, उर्वरित प्रकरणे निकालात का काढलेली नाहीत ? मी आपले लक्ष पान क्र.2 वरील तिसऱ्या परिच्छेदाकडे वेधू इच्छितो. यात नमूद करण्यात आले आहे की, "राज्यातील अवैध प्रवासी वाहतुकीस आळा बसावा व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे बुडणारे उत्पन्न वाचविण्याच्या दृष्टीने शासनाने मोटार वाहतन विभाग व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अधिकारी यांचा समावेश असलेल्या संयुक्त तपासणी पथकाची स्थापना केलेली आहे." असे जरी असले तरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, दादर (पूर्व) मुंबई 400 014 येथे खोदाद सर्कल पर्यंतचे ट्रॅव्हल्स एजंटचे स्टॉल्स आहेत, ते आपण तपासले आहेत का ? असल्यास, आपल्या पथकाने किती वेळा तपासणी केली आहे व त्या तपासणीत काय सापडले आहे ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदया, 13 हजार प्रकरणे निकाली काढावयाची आहेत. लवकरात लवकर त्यासंबंधीची कार्यवाही करून त्यात जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. दादर, मुंबई येथे मी स्वत: धाड टाकली होती. त्यावेळी 21 बसगाडयांना दंड आकारण्यात आला होता. एस.टी.डेपो पासून 200 मीटरच्या आत राज्य परिवहन उपक्रमाची वाहने वगळता अन्य कुठल्याही वाहनातून प्रवासी घेण्यास अथवा उतरविण्याकरिता हायकोर्टाने मनाई केलेली आहे. या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. चोरटया प्रवासी वाहतुकीला आळा बसावा म्हणून वेगवेगळी पथके स्थापन करण्यात आली आहेत. यासंबंधी आर.टी.ओ.यांनासुध्दा सूचना देऊन आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे. चोरटी वाहतूक होऊ नये म्हणून मोठया प्रमाणावर चेक ठेवण्याचे काम चालू आहे.

श्री.मधुकर चव्हाण : माननीय मंत्री श्री.सिध्दाराम म्हत्रे यांनी दादर येथील अवैध प्रवासी वाहतुकी संबंधी चांगली कारवाई केली होती. सहा महिने तेथील लोकांना चांगला दिलासा मिळाला होता. वाहतूक पोलिसांच्या समोर कोंडुसकर, महाराजा, प्रेम या ट्रॅव्हल्स एजंटच्या बसगाडया थांबलेल्या असतात. खोदाद सर्कल,दादर पूर्व, येथे जवळ जवळ 150 ट्रॅव्हल्स एजंट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

आहेत. गरजू लोकांसाठी महानगरपालिकेने दिलेले खोके 2-2 लाखामध्ये विकत घेऊन ते अवैधरित्या प्रवासी वाहतूक करीत आहेत. त्यामुळे आपण यासंबंधी त्वरित कारवाई करणार आहे का ? असा माझा प्रश्न आहे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदया, अवैध प्रवासी वाहतूक चालू असेल तर ताबडतोब कारवाई करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, मंत्रिमहोदयांनी दादर पूर्व येथे धाड टाकली होती. असे जरी असली तरी आजही तेथून प्रवासी वाहतूक सुरू आहे. या भागामध्ये कायमस्वरूपी वाहतूक पोलीस चौकी उभारून तेथे नियंत्रण ठेवणार आहात काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदया, अवैध प्रवासी वाहतुकीला निर्बंध घालण्यासाठी फ्लाईंग स्कॉडला आदेश देण्यात येतील.

श्री.अनंत तरे : सभापती महोदया, राज्यात चोरटी प्रवासी वाहतूक उघडपणे होत आहे. त्यामुळे यास निर्बंध घालण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.धर्मारावबाबा आत्राम : सभापती महोदया, विना परवाना अवैधरित्या वाहतूक केल्याचे आढळून आले तर संबंधितांचा परवाना रद्द करण्यात येतो, त्याच बरोबर त्याच्या गाडीचे रजिस्ट्रेशन देखील रद्द करतो. खोदाद सर्कल, दादर पूर्व येथे वाहतूक पोलीस चौकी निर्माण करण्यासंबंधीची सूचना करण्यात आली आहे. तेथे नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने वाहतूक पोलीस चौकीची व्यवस्था करण्यात येईल.

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना शासकीय सेवेत सामावून न घेणे.

मु.शी.: उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना शासकीय सेवेत सामावून न घेणे याबाबत सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी व पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी व पांडुरंग फुंडकर यांनी "उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना शासकीय सेवेत सामावून न घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सागर मेघे : सभापती महोदया, दिनांक 13 रोजी या विषयावर लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती त्यावेळी सन्माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देताना ऑक्टोबर महिन्यापर्यंत नेमणुका करण्यात येतील असे आश्वासन दिले होते. परंतु त्यानंतर विदर्भतील एकाही उमेदवाराची नेमणूक करण्यात आली नाही. निवेदनात सांगितले आहे की, यावर्षी साधारणत: चार कोटी किलोमीटर वाहतूक कमी झाल्याचे मान्य करण्यात आले आहे. प्रवासी संख्येत वाढत झालेली आहे. लोक इतर वाहनातून प्रवास करणे पसंत करतात याचे कारण परिवहन मंडळाच्या बसेसमधून प्रवास करणे त्यांना सोईचे वाटत नाही काय ? त्यामुळे परिवहन मंडळाच्या कार्यक्षमतेमध्ये घट झालेली आहे, असे शासनास म्हणावयाचे आहे काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदया, लक्षवेधीवर उत्तर देताना असे आश्वासन दिले होते की, ऑक्टोबर महिना संपल्यानंतर टप्प्याटप्प्याने आम्ही नेमणुका करणार आहोत. आम्ही तीन हजार लोकांना नोकरी दिलेली आहे. आता बसेसच्या जवळ जवळ 975 फेऱ्या बंद केलेल्या आहेत. जसजशा फेऱ्या वाढतील त्याप्रमाणे निर्णय घेतला जाईल. आम्ही त्यांना वेटींग लीस्टवर ठेवलेले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, एकूण 7787 उमेदवारांपैकी 3006 उमेदवारांची निवड करण्यात आलेली आहे. बाकीच्या उमेदवारांची निवड केली नाही. आपण जी 3006 उमेदवानांची निवड केली ते कोठले आहेत ? माझ्या माहितीप्रमाणे त्यामध्ये विदर्भातील एकही उमेदवार नाही. पश्चिम महाराष्ट्रातील सगळ्या उमदेवारांची निवड केलेली आहे. मंत्रिमहोदयांनी येथे बस फेऱ्यांची अडचण सांगितली. आता पावसाळा हंगाम संपलेला आहे. प्रवाशांच्या संख्येत वाढ होते. त्यामुळे माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, आपण उर्वरित उमेदवारांची ताबडतोब निवड करुन त्यांना नोकरीत समाविष्ट करुन घेणार आहात काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदया, चार डिव्हीजनमध्ये म्हणजे वर्धा, चंद्रपूर, नागपूर आणि भंडारा याठिकाणी भरतीमध्ये फार मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाला होता. म्हणून आम्ही ती भरती रद्द केली होती. काही ठिकाणी ओव्हर रायडींग झाल्यामुळे 28 डिस्ट्रीक्ट कंट्रोलर विरुध्द चार्जशीट दाखल केलेली आहे. तसेच 102 अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्दसुध्दा चार्जशीट दाखल केलेली आहे. अमरावती आणि यवतमाळ येथे जवळ जवळ 5 लोकांना सस्पेंड केलेले आहे. 1400 उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, ही तपासणी पूर्ण झाल्यानंतर उर्वरित उमेदवारांची आपण निवड करणार आहात काय ?

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदया, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांच्या प्रश्नाला उत्तर देण्यापूर्वी मी माननीय मंत्रिमहोदयांना आठवण करुन देतो की, सन्माननीय सदस्य श्री.सागर मेघे यांनी ज्यावेळी मुंबईच्या अधिवेशनात या विषयाबाबतची लक्षवेधी सूचना मांडली होती त्यावेळी त्यावर सविस्तर चर्चा झाली होती. चर्चेच्या अनुषंगाने माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले होते की, ज्या अधिकाऱ्यांनी भरती प्रक्रियेमध्ये पैसे घेतले असतील, गैरव्यवहार केला असेल त्यांच्यावर जी काही कारवाई करावयाची असेल ती करु. ज्या बेरोजगारांची भरती प्रक्रियेमध्ये नावे आलेली होती, त्यांची वेटींग लिस्ट जाहीर झालेली आहे हे आपण मान्य करीत आहात. नागपूर, भंडारा, चंद्रपूर आणि वर्धा येथील एकाही उमेदवाराला आपणांस घ्यावयाचे नाही असे दिसत आहे. विदर्भात भ्रष्टाचार झाला आहे असे आपण सांगत आहात, मग इतर विभागात जी भरती झाली ती खरोखरच चांगली झाली आहे काय ? आपणांस दोषी अधिकाऱ्यांना जी शिक्षा द्यावयाची असेल ती द्या, त्यांच्या घरावर सी.बी.आय. च्या धाडी टाकावयाच्या असतील तर टाका, परंतु या बेरोजगारांना सेवेमध्ये सामावून घ्या. त्यांना अधिकाऱ्यांनी केलेल्या गैरव्यवहाराची शिक्षा देऊ नका. आपण मुंबईमध्ये मान्य केले होते की, या विद्यार्थ्यांवर अन्याय होणार नाही, त्यांना नोकऱ्या देऊ. परंतु तुमच्या विभागातील लोकांनी निर्णय घेतला आहे की, या भागातील विद्यार्थ्यांना सेवेत घ्यावयाचे नाही. विदर्भावर भरती प्रक्रियेमध्ये अन्याय करण्याची आपल्याला संधी मिळाली आहे असे मला वाटते. या जिल्हयांतील मुलांवर आपण कशासाठी अन्याय करीत आहात ? त्या उमेदवारांचे ट्रेनिंग सुध्दा झालेले आहे. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, त्या उमेदवारांना आपण सेवेमध्ये सामावून घेणार आहात काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदया, या चार जिल्हयांमध्ये 1400 पदांच्या संदर्भात भरती प्रक्रिया घेण्यात आली होती. परंतु या भरती प्रक्रियेबाबत भ्रष्टाचारासंदर्भात तक्रारी आल्या होत्या. त्यामुळे पुन्हा इंटरव्हयू घेण्यात आले. त्यापैकी 962 उमेद्वारांना सिलेक्शन लिस्टमध्ये ठेवलेले आहे. प्रवाशी संख्या आणि बसेसच्या फेऱ्या वाढल्यामुळे त्यांना नियुक्ती देण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदया, त्या सिलेक्शन लिस्टची मुदत किती राहणार आहे ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम : महोदया, त्या उमेद्वारांची नावे सिलेक्शन लिस्टमध्ये राहणार आहेत. त्यामुळे ज्यावेळी प्रवाशी संख्या आणि बसेसच्या फेऱ्या वाढतील त्यावेळी त्यांना नियुक्त्या देण्यात येतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : त्या सिलेक्शन लिस्टची मुदत वाढवून देणार आहात काय ?

श्री.सुरुपसिंग नाईक : सभापती महोदया, सिलेक्शन लिस्टला मुदत वाढवून देणार आहोत.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पत्रकारांना कामकाजाची कागदपत्रे न पुरविणे.

श्री.विलास अवचट : सभापती महोदया, या सभागृहाचे कामकाज पत्रकारांच्या माध्यमातून संपूर्ण राज्याला समजत असते. परंतु सभागृहात जे कामकाज चालू आहे त्या कामकाजासंदर्भातील कागदपत्रे पत्रकारांना मिळालेली नाहीत. त्यामुळे सभागृहात जे कामकाज होते त्यासंदर्भातील कागदपत्रे पत्रकारांना पुरविण्याची व्यवस्था करण्यात यावी

प्रा.बी.टी.देशमुख : महोदया, लक्षवेधी सूचनेची निवेदने, नियम 93 च्या सूचनेची निवेदने जर पत्रकारांना उपलब्ध होत नसतील तर त्यांना चाचपडल्यासारखे होते. कागदपत्रे मिळत नाहीत असे पत्रकारांनी कालही सांगितले होते आणि आजही सांगितलेले आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, गॅलरीमध्ये बसावयास जागा सुध्दा पुरत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. अनेकवेळा त्यांना उभे राहावे लागते किंवा बाहेर जावे लागते.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, आम्हाला एकाच विषयासंदर्भातील तीन-चार प्रती देण्यापेक्षा पत्रकारांना निदान एक-एक तरी प्रत देण्यात यावी असे मला वाटते.

तालिका सभापती : आपण जी बाब निदर्शनास आणून दिली त्या अनुषंगाने मी सांगू इच्छिते की, पत्रकारांना ताबडतोब कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात येतील. यासंदर्भात पुन्हा तक्रार येता कामा नये याची अधिकाऱ्यांनी खबरदारी घ्यावी.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अधिवेशन बंदोबस्तासाठी आलेल्या पोलीस शिपायाचा मृतदेह पोलीस मुख्यालयासमोर आढळणे.

मु.शी.: अधिवेशन बंदोबस्तासाठी आलेल्या पोलीस शिपायाचा मृतदेह पोलीस मुख्यालयासमोर आढळणे या विषयावर डॉ.नीलम गोऱ्हे वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "अधिवेशन बंदोबस्तासाठी आलेल्या पोलीस शिपायाचा मृतदेह पोलीस मुख्यालयासमोर आढळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

अशुधारित प्रत / परिपक्वासाठी नाही

:: **निवेदनानंतर** ::

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, आम्ही वारंवार पोलिसांच्या संदर्भात या ठिकाणी प्रश्न विचारत असतो. राज्याचे गृहमंत्री सांगतात की, पोलीस हा सुध्दा माणूस आहे, त्यामुळे त्याचा विचार करा, त्याच्यावर टीका करु नका. परंतु खेदाची आणि संतापजनक बाब अशी आहे की, दगा भबुता भील हा पोलीस शिपाई पाच दिवसांपासून कामावर नव्हता. त्याच्या अनुपस्थितीचे कारण काय आहे यासंदर्भात कोणी चौकशी केली होती काय ?

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे ..

हा पोलीस कॉन्स्टेबल राहुटीमध्ये परत आला नाही याबाबतीत संबंधित अधिका-यानी काही विचारणा केली होती काय ?त्याचा जो मृत्यू झाला आहे तो कशामुळे झाला आहे प्रथमदर्शनी हा मृत्यू घातपातामुळे झाला आहे की त्याने आत्महत्या केली आहे ? धुळे जिल्हयातून हा पोलीस या ठिकाणी बंदोबस्तासाठी आला होता व त्याचा संशयास्पद मृत्यू झाला आहे असे मला वाटते आणि त्याच्या मृत्यूची नोंद फक्त अपघाती मृत्यू एवढीच करण्यात आलेली आहे. तेव्हा मला असे विचारावयाचे आहे की ,या पोलिसाचा मृत्यू नक्की कशामुळे झाला आहे आणि त्याच्या कुटुंबियांना मदत देण्याच्या बाबतीत काय उपाययोजना केली जाणार आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, दगा भबुता भील हा पोलीस शिपाई दिनांक 10.12.2005 रोजी गैरहजर होता.त्याला नागपूरच्या एअरपोर्टवर डयूटी देण्यात आली होती.त्याच्या मृत्यूच्या बाबतीत डॉक्टरांनी जो अहवाल दिलेला आहे त्यात डॉक्टरांनी असे म्हटले होते हृदयाच्या लेफटकडील 2/3 भाग ब्लॉक झाला होता त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला असावा. परतु त्याचा व्हिसेरा राखून ठेवण्यात आला असून त्याची तपासणी करुन अहवाल आल्यानंतर मृत्यूचे नक्की कारण समजू शकेल.या पोलीस शिपायाचा मृत्यू झाल्यामुळे त्याचे कुटुंब उघडयावर पडलेले आहे. सरकारी नियमाप्रमाणे जी काही मदत देय असेल ती मदत त्याच्या कुटुंबियांना देण्यात येईल.

श्रीमती कांता नलावडे :सभापती महोदया, निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की,"या पोलीस शिपायाच्या मृत्यू बाबत शवविच्छेदनाचा अहवाल वैद्यकीय अधिका-यांनी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांच्याकडून व्हिसेरा अहवाल प्राप्त होईपर्यत राखून ठेवला आहे " आता माननीय मंत्रिमहोदयांनी तोंडी उत्तर देतांना असे सांगितले की "हृदय विकारामुळे त्याचा मृत्यू झाला आहे " तेव्हा या पोलीस शिपायाचा मृत्यू याच कारणामुळे झाला आहे हे आपल्याला कशावरुन कळले आहे आणि वैद्यकीय अधिका-यांनी शवविच्छेदनाचा अहवाल राखून का ठेवला आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : प्रथमदर्शनी त्याच्या हृदयाकडच्या लेफट साईडचा 2/3 भाग ब्लॉक झाला असल्यामुळे त्याचा मृत्यू झाला असावा. परंतु जो पर्यन्त व्हिसेरा तपासणी केल्या नंतरचा अहवाल येत नाही तोपर्यन्त मृत्यूसंबंधी फायनल अहवाल देता येणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : नाशिक जिल्हयातील इगतपुरी येथे मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी आलेल्या रुग्णांना चुकीची औषधे देणे

मु.शी : नाशिक जिल्हयातील इगतपुरी येथे मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी आलेल्या रुग्णांना चुकीची औषधे देण्यासबंधी डॉ.दीपक सावंत, सर्वश्री अनंत तरे, अरविंद सावंत,वि.प.स. यानी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.रणजित काबंळे (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री): सभापती महोदय, डॉ.दीपक सावंत,सर्वश्री अनंत तरे,अरविंद सावंत यांनी " नाशिक जिल्हयातील इगतपुरी येथे मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी आलेल्या रुग्णांना चुकीची औषधे देणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

..

(प्रेस कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदया, नाशिक जिल्हयात इगतपुरी येथे कृत्रिम भिंगारोपण

शस्त्रक्रिया शिबिरात दाखल झालेल्या रुग्णांना चुकीचे औषध व दुप्पट डोस देण्यात आले होते. त्या ठिकाणी जवळजवळ 84 रुग्ण दाखल झाले होते आणि त्यांना हे औषध दिल्यामुळे झोप जास्त येत होती ते कोमामध्ये जाण्याच्या स्थितीत होते अशी माझी माहिती आहे. रेस्टील गोळयांचा वापर करण्यात आला असल्याचे निवेदनात सांगण्यात आलेले आहे तेव्हा या गोळयांचा वापर शस्त्रकियेपूर्वी नेहमीच केला जातो काय ? त्याचबरोबर निवेदनात असेही म्हटलेले आहे की "नाशिक येथील संबंधित जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक वर्ग एक व 2 वैद्यकीय अधिकारी गट - अ (नेत्र शल्य चिकित्सक)2 अधिपरिचारीका व 2 परिसेविका प्रथमदर्शनी दोषी आढळून आल्याचे त्यांच विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे" तेव्हा शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे म्हणजे नेमके कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? सध्या हे कर्मचारी ड्युटीवर आहेत काय ?

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर देताना मी सांगू इच्छितो की, रेस्टील नावाचे हे जे औषध आहे ते ऑपरेशनच्या अगोदर दिले जाते आणि रूग्णांच्या चार्टवर देखील त्याप्रमाणे उल्लेख होता मात्र ते औषध 0.25 या मात्रेमध्ये द्यायला पाहिजे होते. ...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी हे निवेदन आपण वाचले तर आपल्याला दिसून येईल की, तेथे रूग्णांना हे रेस्टील औषध द्यायचे होते त्याबाबत या निवेदनात आपण म्हटलेले आहे की, "... या गोळ्यांचा डोस देण्यापूर्वी संबंधित अधिपरिचारिकेने नेत्र कक्षातील नेत्र शल्य चिकित्सकांचे कोणतेही मार्गदर्शन घेतले नाही वा रूग्णपत्रिका तपासून कुठल्या प्रकारचा औषधोपचार किती मात्रेत द्यावयाचा आहे याची खातरजमा केली नाही. त्याचप्रमाणे नेत्र शल्य चिकित्सकांनी कोणते रूग्ण शस्त्रक्रियेसाठी आहेत या बद्दलची सुस्पष्ट कल्पना अधिपरिचारिकांना दिली नाही तसेच शस्त्रक्रियापूर्व औषधोपचार निश्चित कोठल्या स्वरूपाचा द्यावयाचा आहे याच्या नोंदी रूग्णपत्रिकेवर केल्या नाहीत. त्यामुळे प्रमाणापेक्षा अधिक मात्रेचा डोस लाभार्थ्यांना दिला गेला व गाढ झोप लागणे, गुंगी येणे अशा स्वरूपाचा त्रास सदर रूग्णांना झाला." तेव्हा आता आपण देत असलेल्या उत्तरामध्ये आणि या लेखी उत्तरामध्ये तफावत दिसून येते आहे. तेव्हा नेमकी वस्तुस्थिती काय आहे त्याचा खुलासा मंत्री महोदय करतील काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदया, कदाचित त्या लेखी उत्तरात चूक आहे...

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : मग आपणास आपले उत्तर सुधारावयाचे आहे का?

श्री. रणजित कांबळे : होय. मला उत्तर सुधारावयाचे आहे. रूग्णांच्या रूग्णपत्रिकेमध्ये रेस्टील हे औषध देण्याबाबत लिहिलेले होते. रूग्णाला तो हॉस्पिटलमध्ये आल्यानंतर तपासणीअंती त्याचेवर काय उपचार करावयाचे ते त्या रूग्णपत्रिकेवर लिहून दिले जाते. कॅट्रक्टच्या ऑपरेशनच्या रूग्णांच्या चार्टवर रेस्टिल या औषधाचा उल्लेख करण्यात आला होता काय असे जे सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे त्याला माझे उत्तर 'होय' असे आहे. त्यानंतर मी आपल्याला या संबंधात सांगू इच्छितो की, यामध्ये लॅप्सेस झालेले आहेत हे नक्की आहे. तरीही डी.इ. पूर्ण झाल्यानंतरच संबंधितांवर योग्य ती कारवाई आपण करू. यामध्ये जे कोणी दोषी आढळतील ... मी आपल्याला

..... XX 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रामाणिकपणे सांगू इच्छितो की, त्यामध्ये जे सर्जन आहेत त्यांचीदेखील चूक आहे, सिस्टर-इनचार्ज आणि नर्स आहेत त्यांची देखील चूक आहे. थोडक्यात प्रत्येक पातळीवर चूक झालेली आहे. मात्र कोणत्या हद्दीपर्यंत चूक झालेली आहे आणि त्याबद्दल काय व किती कारवाई करावयाची आहे विभागीय चौकशी केल्यानंतरच समजून येईल आणि म्हणूनच विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतरच या संबंधात संबंधितांवर योग्य ती कारवाई आपण करू.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदया, आता हे जे गरीब पेशंटस् आहेत, ते गरीब आहेत म्हणून त्यांचेवर कशीही ट्रीटमेंट करावयाची असे आपल्या सेवेमध्ये आहे काय ? ज्यांनी चूका केलेल्या आहेत त्यांना आपण किमान तात्पुरते तरी निलंबित करणार आहात का ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदया, या प्रकरणी संबंधित नर्सला निलंबित केलेले आहे. तसेच अन्य जे डॉक्टर आणि सिस्टर-इनचार्ज आहेत त्यांचेवर विभागीय चौकशी आपण प्रस्तावित केलेली आहे. त्या चौकशीमध्ये जे काही आढळेल त्याप्रमाणे योग्य ती कारवाई करू.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, या प्रकरणी आपण कारवाई करणार आहात ही चांगली गोष्ट आहे. परंतु तुमची जी उत्तरे येथे येतात ती एकूणच पांढऱ्यावर काळे करणे अशा प्रकारची असतात. यामध्ये आपण म्हटले आहे की, "... या मात्रेच्या गोळ्या उपलब्ध नसल्यामुळे..." आपल्याकडे योग्य मात्रेच्या गोळ्या उपलब्ध नव्हत्या तर बाहेर बाजारामध्ये देखील त्या गोळ्या नव्हत्या का ? आणि म्हणून आपण कमी मात्रेच्या गोळ्या दिल्या ? आपण एकूणच अशा प्रकारची उत्तरे येथे देता की, त्यावर पी.एचडी. करता करता येईल. आपल्याकडे योग्य मात्रेच्या गोळ्या नव्हत्या म्हणून कमी वा जास्त मात्रेच्या गोळ्या ज्याने पुरविल्या त्याची देखील यामध्ये चूक आहे. त्या गोळ्या पुरविताना त्याने तसे सांगून नोंद केलेली आहे का हेही आपण पाहिले पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, हा डोळ्यांच्या ऑपरेशनच्या रूग्णांच्या बाबतीतील प्रश्न असल्याने ज्यांना वाचता येते त्यांनी वाचायचे ठरविले तरी तसे त्यांना करता आले नसते. तेव्हा आपण मघाशी येथे वाचले आणि सांगितले की, परिचारिकेचा दोष असेल तर तिच्यावर त्याबद्दल कारवाई केली जाईल. परंतु अशा प्रकरणांमध्ये नेहमी ही खालच्या स्तरावरील कर्मचारीच दोषी ठरविली जातात. परंतु यामध्ये जे मुख्य अधिकारी आहेत, डॉक्टर आहे त्यांचेवर देखील कारवाई आपण केली पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

..... एक्सएक्स 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदया, मी अगोदरच सांगितले आहे की, या प्रकरणात वेगवेगळ्या स्तरावर वेगवेगळ्या चुका झालेल्या आहेत. सर्व प्रथम यामध्ये सर्जनची चूक होती. म्हणजे या ठिकाणी ऑपरेशनसाठी एकंदर 84 पेशंटस् आले होते त्यापैकी 47 जणांवर ऑपरेशन केले गेले आणि बाकीच्या 37 जणांना विविध आजार असल्याने त्यांना अन्य फिजिशिअनकडे रेफर करावयाचे होते आणि त्याप्रमाणे त्यांना लाईन ऑफ ट्रीटमेंट देखील जी काही होती ती बदलावयास पाहिजे होती. ते त्यांनी केले नाही असे दिसते आहे. त्यानंतर सिस्टर-इनचार्ज आहे त्यांची चूक अशी आहे की, संध्याकाळी रेस्टिन या पेशंटना द्यायचे होते. हे औषध ऑपरेशनपूर्वी सुद्धा देतात. त्याप्रमाणे संध्याकाळी औषध द्यावयाचे तर प्रिस्क्राईब करण्यात आलेल्या क्षमतेचे औषध लॉकर मध्ये होते आणि त्याच्या चाव्या सदर सिस्टर इन चार्ज कडे होत्या. त्यामुळे स्टोअररूम मध्ये जाऊन त्या औषधाची मागणी केली असता तेथे 0.25 क्षमतेचे औषध नव्हते म्हणून स्टोअरकीपरने .50 मि.ग्रा. एवढ्या मात्रेच्या गोळ्या दिल्या. ...

(यानंतर श्री. सरफरे ....वायवाय 1 ..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे...

अशाप्रकारे वेगवेगळया स्तरावर चूक झाली आहे हे मी मान्य करतो. ज्या नर्सच्या हातून ही चूक झाली आहे तिने 0.5 एम.जी. या गोळी ऐवजी 0.05एम.जी. असे समजून 5 गोळया दिल्या.

डॉ.दीपक सावंत : What is the quantity of dose? Is it .25mg or .50 mg?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, माझे उत्तर मला पूर्ण करु दिले पाहिजे. माझे उत्तर पूर्ण झाल्यानंतर आपण प्रश्न विचारावा. मी पुन्हा त्याचे उत्तर देण्यास तयार आहे. माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विचारलेल्या प्रश्नाचे मी उत्तर देत आहे. स्टोअर-रुममध्ये जाऊन पाहिले असतांना त्याठिकाणी 0.5एम.जी. या गोळया होत्या. त्यामुळे प्रत्येक पातळीवर चूक झाली असल्यामुळे यामध्ये सर्वांना जबाबदार धरुन त्यांचेवर कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचनेसंबंधी...

तालिका सभापती : आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमातील पहिली लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे. आता क्र. 2ची लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबईतील टॅक्सी, ऑटोरिक्षा चालकांनी मनमानी पध्दतीने भाडे आकारणे.

मु.शी.: मुंबईतील टॅक्सी, ऑटोरिक्षा चालकांनी मनमानी पध्दतीने भाडे आकारणे या विषयासंबंधी सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, श्रीमती कांता नलावडे,वि.प.स. यांनी दिलेली लज्जवेधी सूचना

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : अध्यज महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीज्डे आपल्या अनुमतीने समाजीय परिवहन मंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यांनी निवेदन ज्रावे. अशी विनंती ज्रतो.

"मुंबईतील चालणा-या टॅक्सी, ऑटोरिक्षांना परिवहन विभागाकडून नेमून दिलेल्या छापील भाडे तख्त्याप्रमाणे भाडे न आकरता मनाप्रमाणे भाडे आकारणे, त्याचप्रमाणे गाडीमध्ये खोटे छापील भाडे तख्ते ठेवणे व त्यानुसार भाडे आकारणे, मुंबई पोलीसांच्या वाहतूक शाखेने संबंधित टॅक्सी चालकांची तक्रार केली असता चालकावर कोणतीही कारवाई न करण्यामुळे टॅक्सी व ऑटोरीक्षा चालकांची वाढलेली दंडेली, मुंबईतील रस्त्यावर टॅक्सी तसेच ऑटोरिक्षा स्टँडची कमी असणारी संख्या, त्यामुळे टॅक्सी, ऑटोरिक्षा रहदारीच्या रस्त्यांवर नो पार्कींगच्या ठिकाणी पार्क करणे व अशा चालकांविरुध्द अल्पप्रमाणात होत असलेली कारवाई तसेच टॅक्सी, ऑटोरिक्षा चालक गि-हाईक शोधण्याच्या नादात अत्यंत हळू वेगाने डाव्या बाजूने चालवण्याने वाहतूकीस निर्माण होणारा अडथळा यामुळे त्रस्त झालेले वाहन चालक, मालक तसेच पदचारी यांच्यामध्ये पसरलेला असंतोष व संतापाची भावना, या प्रकरणाची शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदया, लक्षवेधी सूचनेसबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

तालिका सभापती : निवेदन सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यांत आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी म्हणाल्याप्रमाणे आपण आम्हाला वेडे, अज्ञानी समजता काय? आपले अधिकारी निबंध लिहितात काय? प्रश्न अतिशय सरळ विचारला आहे. मुंबईमध्ये टॅक्सी चालक भाडयामध्ये लुटत आहेत त्यावर शासन काय उत्तर देत आहे? "ऑटोरिक्षा व टॅक्सी यांची सेवा हा मुंबई शहरातील वाहतूक व्यवस्थेचा अविभाज्य घटक आहे. बेस्ट सारख्या सार्वजनिक वाहतूक सेवा ज्या ठिकाणी पोहचू शकत नाहीत किंवा प्रवाशांकडे जास्त सामान असणे, आजारी व्यक्ती सोबत असणे, वेळेची कमतरता इत्यादी कारणांकरिता या सेवेचा जनतेकडून वापर केला जातो". हे सर्व आम्हाला माहीत आहे. म्हणून या टॅक्सी आहेत काय? मोटार वाहन कायदा वगैरे सर्व आम्हाला माहीत आहे. तुम्ही जनतेची किती सेवा करता हे आम्हाला माहीत आहे. यामध्ये गंभीर गोष्ट अशी की, मुंबई शहरामध्ये टॅक्सीचालक लोकांना लुटत आहेत. त्यांचे मीटर वेगाने फिरत आहेत. त्यांचे मेकॅनिकल मीटर सध्या अस्तित्वात आहेत. याठिकाणी इलेक्ट्रॉनिक मीटरला ते कां विरोध करीत आहेत? आपल्या निवेदनामध्ये "दि.01.04.2005 ते 30.11.2005 या कालावधीत एकूण 1861 वाहने तपासली त्यापैकी दोषी वाहने 1839 आढळून आली". म्हणजेच जवळ जवळ 100 टक्के दोषी वाहने आढळून आली. यावरुन किती लूटमार चालली आहे याची आपण दखल घेतली आहे काय? आपण या खात्याचे मंत्री म्हणून आपल्या खात्यामध्ये काय चालले आहे याबद्दल कधी अस्वस्थ झालात काय? निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, "त्यांच्याकडून रु.5,41,857 दंड/तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे" तडजोड कसली करता? म्हणजे 500 रुपये दंड लावला असेल तर 200 रुपये मला दे 100 रुपये तू घे, तुझे 100 रुपये वाचतील. दंड किंवा शिक्षा ही तडजोडीमध्ये होते कां?. एखादा अपराध सिध्द झाल्यानंतर न्यायाधीश आरोपीला विचारतात कां? तू बलात्कार केला आहेस, चोरी केली आहे, खून केला आहेस, बोल तुला काय शिक्षा देऊ?आपण तडजोड करु. फाशीच्या शिक्षेऐवजी चार महिन्याची, सहा महिन्याची शिक्षा देऊ. रिगरस पनिशमेंट देऊ की, सिंपल पनिशमेंट देऊ अशाप्रकारची तडजोड केली जाते कां?आपण काय उत्तर देत आहात? म्हणून माझा आपणाला प्रश्न आहे की, मुंबईमध्ये 1973 साली इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याचा निर्णय झाला होता. विशेषत: महाराष्ट्रातील टॅक्सी चालक आहेत त्यांची लोकांना फसविण्याची इच्छा नसते. त्यांच्या ज्या वेगवेगळया युनियन्स आहेत, व त्यांचे काही लीडर हे माजलेले आहेत. ज्याप्रमाणे मुंबईमध्ये पावसाळा आल्यानंतर किंवा साथीचे रोग आल्यानंतर त्यांच्या युनियन्स संपावर जातात. याप्रमाणे त्यांची आपण कां दंडेली चालवू देता?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

सभापती महोदया, जगामध्ये सर्वच ठिकाणी आज इलेक्ट्रॉनिक मीटर आहेत. मुंबई शहरामध्ये टॅक्सी चालकांकडे एक कार्ड असते त्यावर तुमचा शिक्का मारलेला नसतो. ज्यावेळी टॅक्सी सिग्नलला उभी रहाते त्यावेळी 2 रुपयाला कुणीतरी कार्ड विकायला आणतो तो ते कार्ड विकत घेतो. अनेक वेळा हे लोक महाराष्ट्रामध्ये दोन महिन्यापूर्वी आलेले असतात. त्यांना जर विचारले की, "तुम कब से गाडी चलाते हो तो वह उत्तर देता है कि दो महीने से. किसी ने पूछा कि महाराष्ट्र में कब से आये तो वह उत्तर देता है कि 6 महीने से." तो म्हणतो की, तुम्ही टॅक्सीमध्ये बसा मी तुम्हाला दादर वगैरे सर्व ठिकाणी घेऊन जातो. जर अनोळखी टॅक्सीवाले असतील त्यांना तुम्ही विचारले की, तुला लायसन्स कधी मिळाले? मुंबई शहरात कधी आलास? तो सांगतो मी चार महिन्यापूर्वी आलो. चार महिन्यापूर्वी तू आलास, तुला लायसन्स कसे मिळाले? तो म्हणतो, "पिता जी ने एप्लीकेशन किया था इसलिए लाइसेंस मिल गया". म्हणून मूळ मुद्दा असा की, मुंबई शहरामध्ये सर्व ठिकाणी इलेक्ट्रॉनिक मीटरच्या टॅक्सी कां फिरवीत नाहीत? हे मेकॅनिकल मीटर असते त्यामध्ये एक चकती असती ती जर लहान आकाराची लावली तर ते मीटर 42 पेक्षा जास्त वेळा फिरते. म्हणजे जर एखाद्या ठिकाणी 5 रुपये भाडे असेल, 15 रुपये भाडे असेल तर त्या ठिकाणी 35 रुपये, 40 रुपये, 50 रुपये घेतले जातात. आणि आपण आता म्हटले की, काय तुमचे साळसूदपणाने रामराज्य चालले आहे, गांधीवादी समाजवाद चालला आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण . . . .

याठिकाणी निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की,"ऑटो रिक्षा व टॅक्सी चालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे. तसेच प्रवाशांशी उद्धट वर्तणूक करु नये याबाबत रिक्षा/टॅक्सी चालकांना वाहतूक शाखेच्या वाहतूक प्रशिक्षण संस्थेतर्फे प्रशिक्षण शिबीरे व प्रबोधन शिबीरे आयोजित केली जातात.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, मुंबई शहराच्यादृष्टीने हा महत्वाचा प्रश्न आहे. थोडा वेळ गेला तरी चालेल. 1973 सालापासून इलेक्ट्रॉनिक मीटर का बसविण्यात येत नाही? याचे कारण यामध्ये संबंधित खात्यातील अधिकाऱ्यांचा हात आहे असा माझा स्पष्ट आरोप आहे. इलेक्ट्रॉनिक मीटर का बसवित नाही ? तुम्ही राज्य करताना अतिशय कठोर व्हावयास पाहिजे.जे लोकांच्यादृष्टीने व्यापक हिताचे आहे ते का करीत नाही ? यासंबंधात रिक्षा, टॅक्सीवाले संपावर गेले तरी ते किती दिवस संपावर जातील ? मग त्यांच्या युनियनच्या नेत्यांना विचारावे लागेल की, तुम्ही जनतेची लूटमार करणाऱ्यांच्या बाजूने उभे राहणार असाल तर तुमच्यावर खटले भरले जातील असा त्यांना दम द्या. युनियन चालविणे हा एक धंदा झाला आहे, ज्याला आयुष्यात काही करता येत नाही . . . .

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

मला माफ करा. मी शब्द मागे घेतो. काही लोक असे मला म्हणावयाचे आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना दिली आहे आणि लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत ते एवढे व्याख्यान देत आहेत म्हणजे गांधीवादी, समाजवाद येथपर्यंत ते पोहोचत असतील तर हा लक्षवेधी सूचनेच्या संबंधातील विषय नाही . . . .

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी "धंदा" हा शब्द मागे घेतो.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, नाहीतर या विषयावर अल्पकालीन चर्चा करावी.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, तुम्ही मुंबई शहरात नाक्यानाक्यावर थांबा. माझा मुद्दा एवढा आहे की, ...

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

. . . .2 झेड-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय,माझा मुद्दा एवढाच आहे की, तुम्ही इलेक्ट्रॉनिक मीटर बसविणार आहात का ? हे मीटर बसविण्यामध्ये अडचणी काय आहेत ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याबाबत जी सूचना केलेली आहे, त्याबद्दल आम्ही योग्य तो विचार करु. तसेच "तडजोड" म्हणजे . . . .

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदया, मला बोलू द्यावे. तडजोड म्हणजे काय ते सांगतो.

श्री.मधुकर चव्हाण : सभापत महोदया, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, योग्य तो निर्णय घेऊ म्हणजे काय ?

तालिका सभापती : माननीय मंत्री महोदयांचे अर्धे वाक्य झाल्यावर हरकतीचा मुद्दा उपस्थित करु नका. त्याचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे, मग हरकतीचा मुद्दा उपस्थित करावा.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, "तडजोड" म्हणजे जे गुन्हे मान्य होतात, त्यांना आपण तडजोड म्हणतो. यामध्ये हप्ते वगैरे असे काही नाही. आमच्याकडे ते काही चालत नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

मी जे सांगतो ते खरे सांगतो, आपल्याला तसे वाटत असेल ते ठीक आहे.

एक सन्माननीय सदस्य(खाली बसून) : बाकीचे सांगतात ते.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, मी माझ्या खात्याबद्दल सांगतो. सन्माननीय सदस्यांनी इलेक्ट्रॉनिक मीटरबाबत सांगितले आहे. तर त्याबाबतीत आम्ही योग्य तो विचार करु आणि विचार करुन त्यातून आपल्याला काय मार्ग काढता येईल तो काढू.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे की, 1973 मध्ये इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याबाबत निर्णय झाला. तुमची इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्यास काय हरकत आहे ? अशा प्रकारचे मीटर का बसवित नाही ते सांगा. याला शासनाची काय हरकत आहे? आज लोकांची लूटमार सुरु आहे. परदेशी प्रवांशाना, अज्ञानी लोकांना लुटतात. म्हाताऱ्या-कोताऱ्यांना लुटतात, गरजू लोकांना लुटतात, पाहिजे तेवढे पैसे घेतात. जवळच्या अंतरावर जात

. . . .2 झेड-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण . . . .

नाहीत. रात्रीच्या वेळीही जवळच्या अंतरावर जात नाहीत,हाफ मीटर टाकतात. मुंबई शहरात काय सुरु आहे ? म्हणून इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्यास शासनाची अडचण काय आहे ? सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी, आपण बोलावे. आपण हे लोकांसाठी बोलत आहोत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आपल्याला सुध्दा लोकांसाठीच करावयाचे आहे. मुख्य म्हणजे यांच्या सर्व युनियन्स्ची आपण मुंबईमध्ये बैठक घेऊ.

श्री.मधुकर चव्हाण (खाली बसून) : यासाठी युनियनची बैठक कशासाठी पाहिजे ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, कारण याला त्यांचा विरोध होणार आहे म्हणून आपण सगळयांची बैठक घेऊन टप्प्याटप्प्याने आपण याबाबतीत विचार करु.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये शेवटी म्हटलेले आहे की, "ऑटो रिक्षा व टॅक्सी चालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे. तसेच प्रवाश्यांशी उद्धट वर्तणूक करु नये याबाबत रिक्षा/टॅक्सी चालकांना वाहतूक शाखेच्या वाहतूक प्रशिक्षण संस्थेतर्फे प्रशिक्षण शिबिरे व प्रबोधन शिबिरे आयोजित केली जातात." हे सर्व करुन देखील आपण येथे सांगत आहात की, टॅक्सी ड्रायव्हर, रिक्षा चालक चुका करीत आहेत, त्यांच्यावर कारवाई करतो. मग याठिकाणी तुमचा फ्लाईंग स्कॉड झोपलेला आहे का ? तेव्हा प्रशिक्षण द्यावयाचे झाले तर प्रथम या फ्लाईंग स्कॉडला द्यावे. जर कुठे अशा प्रकारच्या तक्रारी आल्या तर पहिल्या प्रथम फ्लाईंग स्कॉर्डच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, आमच्याकडे कोणी गैरवर्तणक केल्या बाबतची तक्रार आली तर आम्ही जरुर कोणताही अधिकारी असला तरी कारवाई करु.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, मला तीन प्रश्न विचारावयाचे आहेत. मुळामध्ये मुंबईतील रिक्षा आणि टॅक्सी पाहिल्या तर किती तरी वर्षापूर्वीच्या आहेत. त्यांचा कालावधी काही तरी असला पाहिजे. किती वर्षाच्या रिक्षा किंवा टॅक्सी आहेत, यावर आपले नियंत्रण नाही. त्यावर आपण नियंत्रण करणार आहात काय ? सी.एन.जी.वर चालणारी टॅक्सी आणि डिझेलवर चालणारी टॅक्सी दोघांचेही दर सारखेच का आहेत ? याबाबत आपण काही निर्णय करणार आहात काय ? विदेशातून येणारे जे प्रवासी आहेत ते पहाटे येतात, रिक्षा आणि टॅक्सीवाले हे त्यांना अक्षरश: लुटतात. त्यांच्याकडून जास्त पैसे घेतच असतात, पण मधेच त्यांना लुटण्याचेही प्रकार होतात. मुंबई सेंट्रल, मैत्रिपार्क दादर या भागामध्ये प्रवाशांना रहात्या ठिकाणी जायचे असेल तर टॅक्सी व रिक्षांचे मिटर हे बोगस असतात, रेट कार्डही बोगस असतात, त्यामुळे प्रवाशांना जास्त पैसे द्यावे लागतात,प्रवाशांना लुटण्याचे काम केले जाते. यावर आपण नियंत्रण करणार आहात काय ? रिक्षा आणि टॅक्सी चालकांचे प्रबोधन कसे काय करणार आहात ? हे समजत नाही, त्याचेही स्पष्टीकरण करावे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, विदेशातून प्रवासी येतात त्यांच्याकरिता प्रिपेडची व्यवस्था एअरपोर्टवर केलेली आहे. त्यांना ज्या ठिकाणी जायचे असेल त्या ठिकाणचे रेट ठरविलेले आहेत त्याप्रमाणे त्यांनी तेथेच पैसे भरण्याची व्यवस्था केलेली आहे. बाकीच्या सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत, त्याबाबत योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. आज ज्या मुंबईमध्ये टॅक्सी चालतात त्या दहा वर्षापूर्वीच्या फियाट कंपनीच्या आहेत ती कंपनी बंद झालेली आहे. सगळ्या टॅक्सी या फियाटच्या नावाने चालविल्या जात आहेत. दिल्लीमध्ये अशाचप्रकारची परिस्थिती होती. त्या ठिकाणी घाणेरडी अवस्था होती. हायकोर्टाच्या निर्देशाप्रमाणे दिल्लीमधील सर्व टॅक्सी बदलल्या गेल्या. त्या जागी आता अत्यंत सुरेख अशाप्रकारच्या टॅक्सी आलेल्या आहेत. आजही मुंबईतील टॅक्सीमधील मिटर हे 1973 सालचे आहेत ते मिटरसुध्दा बदललेले नाहीत. मिटर बदलण्याबाबत कार्यवाही करत नाही, याचे कारण आपल्याला टॅक्सीवाल्यांची धास्ती वाटते.. ज्या काही टॅक्सी चालविल्या जात आहेत, त्यांचे अपघात होतात, प्रवाशांचे मुडदे पडतात, तरी देखील आपण काही कारवाई करत नाही, नवीन टॅक्सी चालविण्याबाबत आग्रह केला जात नाही. त्यांचे मिटर बदलविण्याच्या संदर्भाची भूमिका शासन घेणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ RJW/ MHM/ SBT/

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी जी सूचना केलेली आहे, त्याबद्दल कार्यवाही केली जाईल.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, हायकोर्टाने या संबंधात किती वर्षांनी टॅक्सी स्क्रॅप करावी याबाबत निर्देश दिलेले आहेत. अन्यथा सीएनजीमध्ये त्याचे रुपांतर करावे, अशाप्रकारचा उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. याबाबत मंत्री महोदयांनी सांगितले पाहिजे होते.याची त्यांना माहिती असायला पाहिजे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम (बसून) : मी यापूर्वी उत्तर दिलेले आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, टॅक्सीवाले मिटरमध्ये लुबाडतात, हे मुंबईतील कोणीही सामान्य माणूस सांगेल. सभापती महोदय, आपण टॅक्सीमध्ये बसला तर आपल्यालाही ते लुटतील. त्यामध्ये फार मोठे काही नाही. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, ठाणेकरांच्या मागणीच्या संबंधाने मी लोकप्रतिनिधी म्हणून शासनाला अनेक पत्रे पाठविलेली आहेत. ठाणे येथील बॉर्डरवर चेकनाका आहे. त्या ठिकाणी बॉन्ड्री केलेली आहे....त्या चेक नाक्यावर आनंद दिघे प्रवेशद्वार म्हणून लिहिलेले आहे. शिवसेनेसाठी म्हणून आम्हीच ते केलेले आहे. तेथून 100 मिटर अंतरावर टोल नाका आहे. मुलुंड येथील मंडळी वारंवार मागणी करत आहेत की, या टोल नाक्यावर टॅक्सी आणि रिक्शा स्टँड करावे. मुलुंडकडे जाण्यासाठी त्या बाजूला आणि ठाण्याकडे जाण्यासाठी या बाजूला असे टॅक्सी स्टॅन्ड करावे. म्हणजे 20 रुपयाचा टोल वाचेल आणि मुंबईकरांना आणि ठाणेकरांना न्याय मिळेल. वारंवार अशाप्रकारची मागणी केली जाते, परंतु त्याकडे अधिकारी लक्ष देत नाहीत.

(सभापतीस्थानी : माननीय उपसभापती)

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड..

मिटिंग घेत नाहीत. त्यामुळे ती पत्रे कुठे जातात तेच मला कळत नाही. सगळे डिपार्टमेंट हप्त्यावर चालते. माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. मिटर फास्ट आहेत अशा कमीत कमी 57 तक्रारी एका महिन्यात मी स्वत: नोंदविलेल्या आहेत. त्यांच्यावर काहीही कारवाई झालेली नाही. म्हणून संपूर्ण टॅक्सीजना इलेक्ट्रॉनिक मिटर्स किती महिन्यात बसविणार? टोल नाक्याच्या प्रश्नावर अंदाजे किती महिन्यात योग्य तो अंतिम निर्णय घेणार ?

श्री. धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, इलेक्ट्रॉनिक मीटर बद्दल मी यापूर्वीच सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जी सूचना केली ती शासन मान्य करीत आहे. टोलनाक्याच्या रिक्षस्टँडबद्दल येथे प्रश्न उपस्थित करण्यात आला तो सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन किती महिन्यात करणार ते सांगितले पाहिजे.

श्री. धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, ताबडतोबीने करु.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण टॅक्सीला इलेक्ट्रॉनिक मिटर्स बसविण्याचे मान्य केले आहे.या बद्दल धन्यवाद. माझा प्रश्न असा आहे की, बोगस बॅजेस आणि बोगस लायसन्स घेऊन अनेक परप्रांतीय रिक्षा आणि टॅक्सीच्या व्यवसायात आहेत. बांगला देशीय नागरिक पण या व्यवसायात आहेत. तर याच्या विषयी शासन एक धडक मोहीम राबविणार आहे काय?

श्री. धर्मरावबाब अत्रम : सभापती महोदय, पूर्ण तपासून घेऊन ही मोहीम राबविण्यामध्ये शासनाला काही अडचण नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : दि मराठा मंदिर को.ऑप.बँक येथे अनियिमित कर्ज देण्याचे उघडकीस आलेले प्रकरण.

मु. शी : दि मराठा मंदिर को.ऑप.बँक येथे अनियिमित कर्ज देण्याचे उघडकीस आलेल्या प्रकरणासंबंधी सभागृहाचे सदस्य सर्वश्री गरुनाथ कुलकर्णी, जितंद्र आव्हाड, रीमती मंदा म्हात्रे, श्री.विनायकराव मेटे वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सभागृहाचे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

57 वर्षापूर्वी स्थापन झालेली दि. मराठा मंदिर को.ऑप.बँक येथे अनियमित कर्ज देण्याचे नुकतेच उघडकीस आलेले धक्कादायक प्रकरण, करोडो रुपयाची बोगस कर्ज वाटप व त्यामध्ये प्रत्यक्षपणे संचालकांचा असलेला सहभाग व उकळलेले कमिशन तसेच विद्यमान संचालकांपैकी 10 संचालक गेली 25 वर्षे कारभार पहात आहेत. पैकी 5 संचालक विचारे नावाच्या एकाच गावातील सर्व नातेवाईक असून दरवर्षी चुकीचे ताळेबंद पत्रक सादर करुन त्यानी सभासदांची केलेली दिशाभूल, यामध्ये सहकार खात्यातील अधिकारी वर्ग याचाही असलेला सहभाग, परिणामी बँकेची डबघाईला आलेली आर्थिक स्थिती, त्यामुळे आरबीआयने आजारी बँक म्हणून जाहिर केलेली असूनही तेच संचालक मंडळ अद्यापही कार्यरत असणे, बोगस कर्ज देण्याची व कमिशन उकळण्याची प्रक्रिया अजून तशीच चालू असणे, बँकेच्या विद्यमान संचालकांची सारस्वत व कॉसमॉस या बँकेमध्ये विलिनीकरण करण्याची घाई चालू असून तसा देण्यात आलेला प्रस्ताव, एका बाजूला विलीनीकरण असताना दुसऱ्या बाजूला मोठी कर्ज प्रकरणी वन टाईम सेटलमेंटच्या नावाखाली अतिशय अल्प व्याजदर घेऊन खाते बंद करण्याचा चुकीचा प्रयत्न करणे, त्यामध्ये मोठया प्रमाणात कमिशन घेतले जाणे, 30 हजार सभासद 240 कर्मचारी व 12 शाखांचा विस्तार असणाऱ्या या बँकेचे कर्मचारी, ठेवीदार व ग्राहक यांच्यावर आत्महत्या करण्याची आलेली पाळी, मराठा मंदिर बँक भागधारक, ठेवीदार, खातेदार फोरमतर्फे संचालक मंडळ बरखास्त करुन प्रशासक नेमण्याची मागणीही सहकार खात्याकडून डावलल्यामुळे सर्व संबंधितांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची व नैराश्याची भावना,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

श्री.जयप्रकाश दांडेगावकर(सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो, असे करीत असतांना मी निवेदनामध्ये पुढील दुरुस्ती करु इच्छितो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उत्तराच्या शेवटी थोडी दुरुस्ती आहे. शेवटच्या ओळीत असे म्हटले आहे की,"ही बाब विचारात घेता याप्रकरणी सद्य:स्थितीत वेगळया कार्यवाहीची आवश्यकता नाही." या ऐवजी "तथापी बँकने सदर निर्बंध लागू झाल्या नंतरही वन-टाईम सेटलमेंट योजना राबविल्याचे निदर्शनास येते, याबाबत चौकशी करण्यात येत असून चौकशीअंती योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल."

उपसभापती : □विवेद□ सभा□हाच्या पटलावर ठेव□यात आले आहे.

□विवेद□

(प्रेस : येथे सोबतचे □विवेद□ छापावे.)

....4 ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या बँकेला जवळ जवळ 58 वर्षे पूर्ण झालेली आहेत. 1972 साला पासून या बँकेला "अ " वर्ग दिला आहे.या बँकेच्या साधारणत: 277 कोटी रुपयाच्या ठेवी होत्या आणि 366 कोटी रुपये खेळते भांडवल होते. सभापती महोदय, ही बँक 18 टक्के डिव्हिडंट 2001 पर्यंत देत होती. 2001 पासून या बँकेला उतरती कळा लागली. आज रिझर्वे बँकेने या बँकेचे सर्व व्यवहार बंद करण्याचे निर्देश दिलेले आहेत. पहिल्यांदा कमीतकमी पाच हजार रुपये काढण्याला परवानगी होती आता ती 20 हजार रुपयापर्यंत पैसे काढण्यास परवानगी दिलेली आहे. या बँकेचे पाच संचालक हे एकाच घरातील आहेत.या बँकेने जे कर्ज दिलेले आहेत ते कधीही वसूल न होणारे कर्ज दिलेले आहे.ही सर्व परिस्थिती असतांना मी शासनाला धन्यवाद देऊ इच्छितो. साऊथ इंडियन बँकेचे असेच एक प्रकरण झाले होते. 99 वर्षाच्या त्या बँकेचे सध्या असलेल्या बँकेच्या संचालकांनी संपूर्णपणे तीन-तेरा, साडेबारा वाजवून टाकले आहेत. म्हणून मी आपल्या दालनात आलो होतो. आपण आपल्या दालनात बैठक घेतली. त्या संचालक मंडळाने बँकेत एवढा फ्रॉड करुन सुध्दा तेच संचालक मंडळ त्या ठिकाणी होते. त्याच्या विरुध्द कारवाई करण्याची मी विनंती केली होती.

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ती कारवाई आपण केली पाहिजे, त्याच्याविरुध्द पोलीस केस दाखल झालेली आहे. तसेच ही बँक कॉसमॉस बँक अथवा सारस्वत बँकेमध्ये विलीन करावी अशी परिस्थिती असतांना उत्तरात सांगितले की, संचालक मंडळ निवडणूकीतून निवडून आलेले आहे. म्हणून माझी मागणी अशी आहे की, हे संचालक मंडळ ताबडतोब बरखास्त करणार काय ? तसेच ज्या संचालकांनी हा सर्व गैरप्रकार केलेला आहे त्यांची ताबडतोब चौकशी करुन त्यांच्याकडून ज्यांना ज्यांना वसूल न होऊ शकणारी कर्जे दिलेली आहेत ती कर्जे वसूल करणार काय ? त्याचप्रमाणे या बँकेवर ताबडतोबीने प्रशासक नेमून प्रशासकाच्या ताब्यात ही बँक शासन देणार काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर : महोदय, या बँकेची कलम 83 प्रमाणे चौकशी चालू आहे. या चौकशीचा अहवाल आल्यानंतर त्या आधारे कारवाई करण्यात येईल. तसेच त्यामध्ये संचालक मंडळ दोषी आढळून आले तर ते बरखास्त करुन या बँकेवर प्रशासकाची नेमणूक करण्यात येईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : महोदय, रिझर्व बँकेने तसे पत्र या बँकेच्या बाबतीत दिलेले आहे की, ही बँक डबघाईस आलेली आहे, आता शासन यासंबंधीची चौकशी कसली करीत आहे ?

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, रिझर्व बँकेने 15-16 अनियमितता झाल्याचे कळविले आहे. तरी देखील प्रोसिजरप्रमाणे कलम 83 नुसार चौकशी करावी लागेल व तशी चौकशी चालू आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मा. मंत्री महोदयांनी निवेदनात म्हटले आहे की, वन टाईम सेटलमेंट करण्याबाबतचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. परंतु मला असे सांगावयाचे आहे की, बँकेतील 2-4 संचालकांनी स्वत:च्या अखत्यारित हे सेटलमेंट केले होते काय ? तसेच असे वन टाईम सेटलमेंट केल्यानंतर जनरल बॉडीसमोर ते ठेवले होते काय ? आणि ऑडिटरची परवानगी या सेटलमेंटसाठी घेतली होती काय ? तशी परवानगी घेतली नसेल तर हे संचालक मंडळ ताबडतोब बरखास्त करावे लागणार आहे. सभागृहाच्या निदर्शनास मला ही बाब आणावयाची आहे की, गेली तीन अधिवेशने आपण वन टाईम सेटलमेंटसाठी सभागृहात भांडतो, परंतु आता जे सेटलमेंट झालेले आहे त्यासंबंधीचे निकष ठरवून दिलेले आहेत त्यांचे उल्लंघन केल्यामुळे या मराठी मंदिर बँकेच्या संचालक मंडळावर ताबडतोब कारवाई करण्यामध्ये शासनाला कोणती अडचण आहे ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर : महोदय, सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे निर्बंध लागू होण्यापूर्वी या संचालक मंडळाने साधारणपणे 297 प्रकरणांमध्ये 16.5 कोटीची कर्जे दिली आहेत.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, उत्तरातच म्हटले आहे की, वन टाईम सेटलमेंटसंबंधी रिझर्व बँक ऑफ इंडियाने निर्बंध घातल्यानंतर अशा प्रकारे सेटलमेंट करता येत नाही, हे आपणच कबूल करीत आहात. या प्रकरणामध्ये हाच मुद्दा बेकायदेशीर आहे, कायदयाने तसे करणे गुन्हा आहे. म्हणून या संचालक मंडळाविरुध्द ताबडतोबीने कारवाई करण्यामध्ये शासनाला कोणती अडचण आहे ?

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर : महोदय, निर्बंध घातल्यानंतर सुध्दा संचालक मंडळाने 32 प्रकरणे कर्जाची मंजूर केलेली आहेत. वन टाईम सेटलमेंटबाबत संपूर्ण चौकशी करुन कारवाई करण्यात येईल असे मी म्हटले आहे. हया सर्व अनियमितता रिझर्व बँकेच्या निदर्शनास आल्या आहेत. त्या अनुषंगानेच ही कलम 83 नुसार चौकशी होत आहे. या चौकशीचा अहवाल मागवून संबंधितांविरुध्द कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, वन टाईम सेटलमेंटच्या प्रकरणात दोषी आढळून आलेल्यांच्या संदर्भात या ठिकाणी सन्माननीय मंत्री महोदयांनी माहिती सांगितलेली आहे. परंतु वन टाईम सेटलमेंटच्या संदर्भात निर्बंध असतांना बँकेच्या संचालकांनी वन टाईमची 16.5 कोटीं रुपयांची प्रकरणें केली. हे सिध्द झालेले आहे. हे सर्व सिध्द झाल्यामुळे आपण आता कोणती चौकशी करणार ? त्यामुळे या मंडळावर बरखास्तीच्या संदर्भात कारवाई केली जाणार आहे का?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, याबाबतीत मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, यासंदर्भात बँकेकडून अहवाल मागवून कलम 83 नुसार कारवाई केली जाईल.

उपसभापती : प्रश्न विचारण्याची संधी दुस-याही सदस्यांना मिळाली पाहिजे यासाठी एका सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे एक चिठ्ठी पाठविली आहे व या चिठ्ठीत त्यांनी म्हटले आहे की, "I am sorry to say that if a Member raises his hand to draw your kind attention and does not shout or stand to do so as some Members do, does he fail to draw your kind attention, please?".

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, या लक्षेवधी सूचनेच्या संदर्भात चर्चा होण्याच्या ऐवजी संबंधित मंत्रीमहोदयांनी या लक्षवेधीच्या निवेदनात सुधारणा केलेली आहे. मा. मंत्रीमहोदयांनी रिझर्व्ह बँकेच्या कायद्याच्या संदर्भात माहिती दिलेली आहे परंतु कायद्यामध्ये म्हटले आहे की, बँकींग नियम 1955(25) अन्वये वनटाईम सेटलमेंटल राबविता येत नाही. माझ्याकडे यासंदर्भात दोन तीन प्रकरणे आहेत. दत्तात्रय डेव्हलपर्सकडे मंजूर कर्ज 40.78 लाख रुपये होते व थकीत कर्ज 1.25 कोटी रुपये होते. परंतु वनटाईम सेटलमेंटच्या नावाखाली अवघे 30 लाख रुपये वनटाईम सेटलमेंट करण्यात आली. दुसरे प्रकरण म्हणजे रावकर पोल्ट्रीचे मंजूर कर्ज 78 लाख, आजमितीपर्यंत थकित कर्ज 1.30 लाख रुपये होते परंतु वन टाईम सेटलमेंटच्या नावाखाली 70 लाख घेऊन खाते बंद करण्यात आले. म्हणजे सकृत दर्शनी रिझर्व्ह बँकेच्या कायद्या प्रमाणे या ठिकाणच्या संचालकांनी गुन्हा केलेला आहे हे स्पष्ट दिसते. सर्व वस्तुस्थिती आपल्या समोर असल्यामुळे या ठिकाणचे संचालक मंडळ आपण बरखास्त करणार का? तसेच त्यांच्यावर कायदेशीर म्हणजे फौजदारी कारवाई करणार का?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभपाती स्थानी माननीय तालिका सभापती श्री. विलास अवचट)

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, अनेक वेळा अशी प्रकरणे येतात आणि त्यावेळेला त्या ठिकाणी प्रशासक नेमण्याची मागणी केली जात असल्यामुळे त्या ठिकाणी प्रशासक नेमला जातो परंतु आपल्याला माहिती आहे की, प्रशासक नेमल्यानंतर त्या संस्थांचे पुढे काय होते हे मात्र पाहिले जात नाही. कलम 83 नुसार दोन महिन्याच्या आत चौकशी पूर्ण करुन, या मंडळावर कडक कारवाई करुन यामध्ये मंडळ दोषी आढळल्यास हे मंडळ बरखास्त करण्यात येईल. अनियमितता होणार नाही यासाठी त्यांच्यावर कडक निर्बंध घालण्यात येतील.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, एका बाजूला भ्रष्ट संचालक मंडळ, भ्रष्ट महाव्यवस्थापक आहेत. या महाव्यवस्थापकाने सुध्दा स्वत:साठी गृहकर्ज काढले. परंतु महाव्यवस्थापकाने गृहकर्जाचे फक्त 21 हप्ते भरले बाकीचे हप्ते भरलेच नाहीत. मॅनेमेंट आणि बोर्डाचे संगनमाताने हे सर्व काम चालले आहे. यामध्ये एकूण दोन मुद्दे आहेत. त्यामुळे या या ठिकाणचे संचालक मंडळ बरखास्त करणे आवश्यक आहे. हा विषय गेल्या तीन चार अधिवेशनात येत असतांनाही अजून चौकशी पूर्ण झालेली नाही म्हणजे आश्चर्य करण्याचीच गोष्ट आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, आपण हे सुध्दा म्हटले आहे की, कॉसमॉस बँक आणि सारस्वत बँक यांनी विलिनीकरणाचा प्रस्ताव दिला व हा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेने मान्य केला तसेच तो निबंधकांनी देखील मान्य केला आहे. ठेवीदाराच्या ठेवींचे संरक्षण होण्यासाठी ही बँक त्वरीत सारस्वत बँकेच्या हातात दिली जाणार आहे काय?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सारस्वत बँक ही मल्टी स्टेट को-ऑपरेटीव्ह असल्यामुळे राज्यसरकारने विलिनीकरणासाठी याला एनओसी दिलेली आहे सेंट्रल रजिस्ट्रारने याबाबतीत निर्णय घेतला तर त्या विलिनीकरणाला कुठलीही अडचण राहणार नाही.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे : कलम 83 प्रमाणे चौकशी पूर्ण झाल्याशिवाय संचालक मंडळ बरखास्त करता येत नाही. तेव्हा शासनाने कलम 83 प्रमाणे चौकशी कधी सुरू केली आहे ? सदर बँक ही सारस्वत बँकेत मर्ज होणार आहे. तेथील 240 कर्मचारी, अधिक अधिकारी यांना देखील सारस्वत बँकेत सामावून घेतले जाणार आहे का ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, 13 डिसेंबर रोजी कलम 83 ची चौकशी सुरू करण्यात आली आहे.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, रिझर्व्ह बँकचे ऑब्जेक्शन आल्यानंतर चौकशी कधी सुरू व्हावयास पाहिजे होती ?

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, लक्षवेधी लागल्यामुळे शासनाने चौकशी सुरू केलेली आहे. ही निषेधार्ह बाब आहे. गेली 4 वर्षे हा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी या बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्यासंबंधीचे निदेश दिले पाहिजेत. या प्रकरणी शासनाच्या मार्फत चूक झाली आहे. रिझर्व्ह बँकेने केलेले आरोप हे सत्य आहे. त्यामुळे शासानाने संचालक मंडळ बरखास्त करण्यासंबंधीचे आदेश दिले पाहिजेत.

तालिका सभापती : मंत्रिमहोदयांना उत्तर देऊ द्या.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, एकाच वेळी तीन-तीन जण प्रश्न विचारत असल्यामुळे मूळ प्रश्न काय आहे हे समजत नाही. कलम 83 ची चौकशी कधी सुरू केली असे विचारण्यात आले आहे. मी सांगितले की, 13 डिसेंबर रोजी चौकशी सुरू करण्यात आलेली आहे.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. रिझर्व्ह बँकेने सदर बँकेत झालेले घोटाळे पुढे आणलेले आहेत. त्यात बँकेचे संचालक मंडळ दोषी आहेत, असे सुध्दा सांगितले आहे. असे असताना यापूर्वीच शासनाने कलम 83 ची चौकशी का सुरू केली नाही ? त्यामुळे आजच बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्यासंबंधीची घोषणा मंत्रिमहोदयांनी करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, एखाद्या बँकेच्या संचालक मंडळाने गैरव्यवहार केला तर शासन त्याला संरक्षण देणार नाही. आर.बी.आय.च्या निरीक्षणामध्ये काही दोष आढळून आले आहेत. त्या आधारावर कलम 83 नुसार आपण चौकशी करीत आहोत. या बँकेच्या संचालक मंडळावर निश्चितपणे कडक कारवाई करण्यात येईल. सदर बँकेचे संचालक मंडळ हे जवळ जवळ बरखास्त होण्यासारखेच वागले आहेत.

श्री.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या विषयासंबंधी लक्षवेधी लागली आहे. हे प्रकरण आजचे नाही. या विषयासंबंधीचा पाठपुरावा 3-4 वर्षापासून सर्वजण करीत आहेत. संचालक मंडळ भ्रष्टाचार करीत आहे. संपूर्ण कमिशन खात आहेत. या संचालक मंडळाने दुसऱ्याच्या नावावर बेनामी कर्ज दिले आहे. लक्षवेधी लागल्यानंतर कलम 83 नुसार चौकशी करण्याची कारवाई करण्यात येईल असे सांगण्यात येत आहे. दिनांक 13 डिसेंबर रोजी शासनाने चौकशी सुरू केली आहे. त्यामुळे आपणावर कोणाचे दडपण आहे ? त्यामुळे या बँकेचे संचालक मंडळ आजच्या आज बरखास्त करावे अशी मी मागणी करीत आहे ?

श्री.जयप्रकाश दांडेकर : सभापती महोदय,दिनांक 7.1.2004 पासूनचा घटनाक्रम मला द्यावा लागेल. दिनांक 7.5.2004 रोजी आर.बी.आय.ने सूचना दिल्या की, एनपीएचे प्रमाण 25 टक्क्यापेक्षा कमी आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दिनांक 12.8 रोजी सहकार आयुक्तांनी कलम 79 खाली रेशो मेंटेन करण्याच्या सूचना बँकेला दिल्या. दिनांक 13.8.2004 रोजी आर.बी.आय.ने बॅन्कींग रेग्युलेशन ॲक्टप्रमाणे नोटीस दिली आणि बँकेच्या व्यवहारावर निर्बंध आणले. दिनांक 1.7.2005 रोजी एक वर्षाचा ॲक्शन प्लॅन तयार करण्याच्या सूचना दिल्या गेल्या. त्यानुसार बँकेने ॲक्शन प्लॅन केला आहे. दिनांक 11.7.2005 रोजी सारस्वत बँकेमध्ये विलीनीकरणाचा प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे. दिनांक 11.10.2005 रोजी सहकारी आयुक्तांनी विलीनीकरणाच्या प्रस्तावावर सहया केल्या आणि एन.ओ.सी दिली. दिनांक 6.12.2005 रोजी विलीनकरणाचा प्रस्ताव केंद्रीय निबंधकाला सादर केलेला आहे. दरम्यान दिनांक 13.12.2005 रोजी कलम 83 प्रमाणे चौकशी करण्यासाठी अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे.

यानंतर श्री.अजित.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर.....

मला या ठिकाणी बोर्डला संरक्षण देण्याचे काही कारण नाही. मी जर येथे सु-मोटू निर्णय घेऊन संचालक मंडळ बरखास्त केले तर या निर्णयास न्यायालयात स्थगिती मिळू शकते. सभागृहाची भावना असल्यामुळे मी संचालक मंडळ बरखास्त करीत आहे.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, आपण संचालक मंडळ बरखास्त केल्यानंतर जे 240 अधिकारी आणि कर्मचारी आहेत त्यांना सेवेत मर्ज करणार आहात काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, विलिनीकरणाचे जे नियम आहेत त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विनाअनुदानित महाविद्यालयातील ओ.बी.सी.विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत दिलेले स्थगितीचे आदेश..

मु.शी.: विनाअनुदानित महाविद्यालयातील ओ.बी.सी.विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत दिलेले स्थगितीचे आदेश या संबंधी सर्वश्री सुधाकर गणगणे, जयंत प्र. पाटील, नतिकोद्दीन खतिब, संजय दत्त, रमेश निकोसे, सुरेशदादा देशमुख, मुझफ्फर हुसेन सय्यद, जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सुधाकर गणगणे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय विमुक्त, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सन 2003-2004 यास शैक्षणिक वर्षापासून भारत सरकार पुरस्कृत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना शासकीय व अनुदनित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व सन 2004 मध्ये शासन निर्णयान्वये ही योजना विनाअनुदानित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लागू करण्यात आलेली असणे, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षणासाठी इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांकरिता फी माफी व शिष्यवृत्तीबाबत राज्य शासनाने अचानक स्थगितीचे आदेश दिले असणे, यामुळे शैक्षणिक वर्षाअखेर सदरहू फीची रक्कम भरणा केल्याशिवाय इतर मागासवर्गीय गरीब विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता न येणे, शासकीय कार्यवेळेमध्ये आपल्याच काळात शासनाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग या तिन्ही वर्गातील अनुदानित व विनाअनुदानित संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फी माफी आणि शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतला असून त्या निर्णयाला राज्य शासनाने घेतलेल्या स्थगितीमुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग या तिन्ही वर्गातील विद्यार्थ्यांची व त्यांच्या पालकांची निर्माण झालेली उपेक्षा, मागील विधिमंडळ अधिवेशनात राज्य शासनाने दिलेल्या आश्वासनाची पूर्ती न झाल्याने राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष व त्यांच्यावर झालेला अन्याय, याबाबत शासनाची भूमिका."

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम (विमुक्त, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग कल्याण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.विलास अवचट) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, गेल्या सहा महिन्यात तीन वेळी ही लक्षवेधी आलेली आहे. महाराष्ट्रातील 52 टक्के ओ.बी.सी. विद्यार्थ्यांचा प्रश्न निर्माण झालेला आहे. महाराष्ट्रामध्ये ओ.बी.सी.मध्ये जे उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी आहेत त्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय शासनाने 31 मार्च 2004 रोजी घेतला होता. सभापती महोदय, निवदेनामध्ये जे उत्तर दिलेले आहे ते दिशाभूल करणारे आहे. दिनांक 31 मार्च 2004 रोजी शिष्यवृत्ती देण्याचे मान्य केल्यानंतर आता निवेदनात असे म्हटलेले आहे की, " ..... ही योजना लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे." शासनाने ही योजना लागू करुन लाखो विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय देण्याच्या दृष्टीने आणि शिक्षणापासून वंचित होऊ नयेत म्हणून आपण त्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणार आहात काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, जवळ जवळ 40 हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती द्यावयाची आहे. आम्ही या प्रस्तावासाठी वित्त विभागाकडे 12 कोटी रुपयांची अतिरिक्त मागणी केली होती. ही मागणी ताबडतोब मंजूर करावी म्हणून आमचा पाठपुरावा चालू आहे. निर्णय झाल्यानंतर आम्ही शिष्यवृत्ती देऊ.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही लक्षवेधी चौथ्यांदा येत आहे. हा प्रश्न सुटावा म्हणून दोन्ही बाजुचे सदस्य मागणी करीत आहेत. मार्च 2004 मध्ये निर्णय घेण्यात आला की, विनाअनुदानीत तत्वावरील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाईल. ही शिष्यवृत्ती एक वर्षापर्यंत लागू केली होती. त्यानंतर निवडणुका पार पडल्या. मला अशी शंका वाटते की, निवडणुकीपुरता हा निर्णय घेण्याता आला असावा. कारण त्यानंतर हा निर्णय रद्द करण्यात आला. मागच्या लक्षवेधीच्या वेळी जे उत्तर दिले होते तेच उत्तर याठिकाणी देण्यात आलेले आहेत. शब्द सुध्दा तेच आहेत. प्रश्न विचाराधीन आहे, प्रश्न मंत्रिमंडळासमोर ठेवणार आहे, निधीची तरतूद करीत आहोत अशा पध्दतीची उत्तरे आपण देऊ नका. महात्मा फुले व डॉ.आंबेडकर, महात्मा गांधी यांच्या नावाने राज्य करणारे हे सरकार मागासवर्गीय लोकांच्या उपेक्षा किती दिवस करणार आहात ? आपण शिष्यवृत्ती नाकारल्यामुळे लाखो विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होत आहेत. यासाठी जो काही 12 -15 कोटी रुपये निधी लागेल तो आपण उपलब्ध करुन द्यावा. ही रक्कम काहीजास्त नाही.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ..

सभापती महोदय, या सभागृहामध्ये अनेक वेळा हा प्रश्न उपस्थित केला जाणे, प्रत्येक अधिवेशनामध्ये वर्षानुवर्षे प्रश्न उपस्थित केला जाणे . ही गोष्ट आपल्यासाठीसुध्दा बरोबर नाही. तेव्हा या संदर्भात आपण मला संरक्षण द्यावे. या प्रश्नाचा निर्णय या अधिवेशनामध्ये आणि आजच लागला पाहिजे .

श्री.सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे की, मागच्या अधिवेशनामध्ये यासबंधीचा प्रश्न विचारण्यात आला होता आणि राज्यमंत्र्यांनी त्या संदर्भात उत्तर दिले होते. त्यानंतर किंवा त्या अगोदर पासून आम्ही हे मान्य करीत आहोत की, या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली गेली पाहिजे. त्यांना शिष्यवृत्ती मिळावी त्या मताचे हे शासन आहे. त्याकरता नोट व फाईल तयार केलेली आहे परंतु पैशाचे वितरण करण्यासाठी मंत्रिमंडळाची मान्यता पाहिजे.....

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात)

श्री.पांडुरंग फुंडकर :सहा महिन्यापासून हेच उत्तर दिले जात आहे.

श्री.सुरुपसिंग नाईक : माझे उत्तर पूर्ण ऐकून घेतले पाहिजे.....

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात)

तालिका सभापती (श्री.विलास अवचट) : सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रथम खाली बसावे.सन्माननीय मंत्रिमहोदयांना मला हे सांगावयाचे आहे की, या बाबतीत सभागृहाच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. चार वेळा ही लक्षवेधी सूचना मांडण्यात आली असून मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात येणार आहे असे उत्तर प्रत्येक वेळी देण्यात आले होते. गेल्या चार महिन्यामध्ये मंत्रिमंडळाच्या बैठका किती वेळा झाल्या आहेत ? शासनाला हे प्रकरण गांभीर्याने घ्यावयाचे नाही काय ? याबाबतीत सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र असतील तर मला वेगळा निर्णय द्यावा लागेल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.माननीय मत्रिमहोदयांनी मघाशी उत्तर देतांना स्पष्टपणे असे सांगितले की, या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा शासनाचा विचार आहे. त्यासाठी मंत्रिमंडळासमोर जावे लागणार आहे.माननीय मंत्रीमहोदय शासन म्हणून या ठिकाणी उत्तर देत आहेत. खिचडी तयार करीत असतांना स्टोव्ह पेटवावयाचा आणि बाकीची जी काही तयारी करावी लागत असते ती तिकडे आपण करावी.या ठिकाणी बोलत असतांना आपण

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख....

शासन म्हणून बोलत आहात व शासन म्हटल्यानंतर त्यामध्ये वित्त विभाग, मंत्रीमंडळ आले आहे. या ठिकाणी बोलत असतांना आपल्याला तुकडे तुकडे करुन बोलता येणार नाही.माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, याबाबतचा निर्णय घेतला आहे असे आपण म्हणत आहात तेव्हा त्याची अंमलबजावणीची तारीख सांगा. आम्ही सुध्दा याच मताचे आहोत असे आपण मघाशी उत्तर दिलेले आहे.तेव्हा शासन हे काही दोन चार मतांचे आहे काय ? माननीय मंत्रीमहोदय याठिकाणी उत्तर देत आहेत ते शासनाचे प्रतिनिधी म्हणून देत आहेत ना ? अशा प्रकारे उत्तरे देण्याची साथ वाढत चालली आहे.तुम्हाला जे काही करावयाचे असेल ते तुम्ही तिकडे करावे. या ठिकाणी आपण सांगत आहात की वित्त विभागाकडे फाईल गेली आहे किंवा मंत्रिमंडळासमोर जावयाचे आहे. अशा प्रकारचे उत्तर देणे हे बरोबर नाही व ते शास्त्राला सोडून आहे. ही शिष्यवृत्ती देण्याच्या मताचे शासन आहे आणि आपण या ठिकाणी शासन म्हणूनच उत्तर देत आहात .तेव्हा आम्हाला या संबंधीची तारीख सांगावी.

श्री.सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय,. मी सदनाची दिशाभूल करीत आहे असे सांगितले गेले पंरतु या ठिकाणी दिशाभूल करण्याचा बिलकूल प्रश्न नाही.

तालिका सभापती (श्री.विलास अवचट) :मंत्रीमहोदय दिशाभूल करीत आहेत असे कोण म्हणाले होते ?

श्री.सुधाकर गणगणे :गेल्या सहा महिन्यापासून तेच तेच उत्तर देण्यात येत आहे असे मी म्हणालो होतो.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. विधान परिषदेच्या जुलैच्या अधिवेशनामध्ये अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये असलेल्या प्रश्नाला उत्तर देताना शालेय शिक्षण मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे की, चालू आर्थिक वर्षापासून सदरहू विनाअनुदानित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल. अर्थसंकल्पामध्ये यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, आम्ही हा जो प्रश्न विचारला होता त्यावर जुलैच्या अधिवेशनामध्ये हे उत्तर शासनाकडून देण्यात आलेले आहे आता माननीय मंत्री महोदय येथे सांगत आहेत की, यासाठी 12 कोटी रूपये लागतील वगैरे वगैरे. एका बाजूला शासन उत्तर देत आहे की, यासाठी आर्थिक तरतूद करून ठेवली आहे आणि त्यामुळे याला आता कोणतीही अडचण येणार नाही. परंतु माननीय मंत्री महोदय येथे सांगत आहेत की, हा प्रस्ताव विचाराधीन आहे, मंत्रिमंडळासमोर जावे लागेल वगैरे. तर असे सांगण्याचा अर्थ काय आहे ? गेल्या वर्षभरामध्ये मंत्रिमंडळाच्या बैठका झालेल्या नाहीत काय ? झाल्या असतील तर त्यामध्ये आपण हा प्रस्ताव का ठेवला नाही ? आणि सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री. पुरके यांनी जे उत्तर जुलैच्या अधिवेशनात दिलेले आहे ते असत्य होते काय ?

श्री. सुरूपसिंग नाईक : सभापती महोदय, हा मागासलेल्या विद्यार्थ्यांच्या संदर्भातील प्रश्न आहे ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आणि जुलैच्या अधिवेशनातील जो प्रश्न येथे वाचून दाखविला तो प्रश्न मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठीच आम्ही विचारला होता. गेले वर्षभर आम्ही हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करीत आहोत आणि तरीही तेच ते उत्तर येथे दिले जात आहे. म्हणजे तुम्ही या मागासवर्गीयांची मजाक लावली आहे का ? सभापती महोदय, आज या प्रश्नाचा निकाल लागलाच पाहिजे, आणि माननीय मंत्र्यांनी ताबडतोब या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आपण देणार आहात की नाही ?

श्री. सुरूपसिंग नाईक : सभापती महोदय, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती द्यायचीच आहे, हे मी मान्य करतो. परंतु त्यासाठी तरतूद नाही म्हणूनच मंत्रिमंडळासमोर आम्ही जाणार आहोत. ... (अडथळा)

..... 3एच 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे उत्तर आम्ही गेले वर्षभर ऐकतो आहोत.

(काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात ... अडथळा ..)

तालिका सभापती (श्री. विलास अवचट) : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण सर्व प्रथमत: खाली बसावे. ... मी माननीय मंत्री महोदयांना येथे सांगू इच्छितो की, गेले एक वर्ष सातत्याने ही लक्षवेधी सूचना येत आहे. शासनाकडून जे उत्तर त्यावर येणे अपेक्षित आहे ते येत नाही. म्हणून मी आपल्याला विनंती करतो की, आज तरी या संदर्भात आपण काही ठोस उत्तर देणार आहात काय ? अन्यथा मला या संबंधात निदेश द्यावे लागतील.

श्री. सुरूपसिंग नाईक : सभापती महोदय, एक महिन्याच्या आत यावर कारवाई करण्यात येईल. (अनेक सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात .... अडथळा ...)

तालिका सभापती : कारवाई नको, आपण शिष्यवृत्ती देणार का ते सांगावे. कारवाई करणार म्हणजे नेमके काय करणार आहात ?

श्री. सुरूपसिंग नाईक : कारवाई म्हणजे निर्णय घेणार.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात .... अडथळा ...)

सभापती महोदय, कारवाई करण्यात येईल म्हणजे एक महिन्याच्या आत निर्णय घेण्यात येईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात .... गोंधळ ...)

तालिका सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे, शांत बसावे. मी मंत्री महोदयांना प्रश्न विचारतो. आपण एक महिन्याच्या आत या शिष्यवृत्तीचे वाटप करणार आहात का? नसेल तर मी आता निदेश देतो की, एक महिन्याच्या आत आपण या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करावे.

आता यानंतर या लक्षवेधी सुचनेवरील चर्चा मी येथे थांबवित आहे आणि यानंतर पुढील लक्षवेधी सूचना घेण्यात येईल. ...

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, बिना अनुदानित महामविद्यालय में जहां विद्यार्थियों ने प्रवेश लिया है, वह इस उम्मीद में प्रवेश लिया है कि ...

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मी यावर रूलिंग दिलेले आहे तेव्हा हा विषय संपलेला असून आपण पुढील विषय पुकारलेला आहे.

यानंतर श्री सरफरे ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अमरावती शहराच्या पश्चिम बाजूने जाणाऱ्या अकोली वळण रस्त्यासाठी आवश्यक असलेल्या वन जमिनीच्या हस्तांतरण प्रस्तावामध्ये वन संरक्षकांनी काढलेल्या त्रूटी.

मु. शी : अमरावती शहराच्या पश्चिम बाजूने जाणाऱ्या अकोली वळण रस्त्यासाठी आवश्यक असलेल्या वन जमिनीच्या हस्तांतरण प्रस्तावामध्ये वन संरक्षकांनी काढलेल्या त्रूटी यासंबंधी स□मा□□ीय सदस्य सर्वश्री प्रा. बी.टी. देशमुख, व्हि. यु. डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी. एल. अैनापूरे, वि.प.स. यां□ी दिलेली ल□वेधी सूच□ा.

प्रा. बी.टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : अध्य□ महोदय, मी आपल्या अ□ुमती□ ि□यम 101 अ□वये पुढील तातडीच्या व सार्वजा□□ महत्वाच्या बाबी□डे स□मा□□ीय वन मंत्र्यांचे ल□ वेधू इच्छितो आ□ि त्याबाबत त्यां□ी ि□वेद□ □रावे, अशी वि□ती □रतो.

"अमरावती शहराच्या पश्चिम बाजूने जाणाऱ्या अकोली वळणरस्त्यासाठी आवश्यक असलेल्या 1.99 हेक्टर वनजमिनीच्या हस्तांतरण - प्रस्तावाबाबत मुख्य वनसंरक्षक (व केंद्रस्थ अधिकारी) नागपूर यांनी त्यांच्या 30 जुलै, 2005 च्या पत्रान्वये उपस्थित केलेल्या अनाकलीय तृटी, वस्तूत: महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 26 (1) अन्वये अमरावती शहराची प्रारुप विकास योजना दिनांक 30 ऑक्टोबर, 1988 रोजी प्रसिध्द होणे, हरकती व सूचनांचा विचार होवून दिनांक 4 डिसेंबर, 1992 रोजी शासनाने मंजुरी देऊन ती अंतिम होणे, दिनांक 25 फेब्रुवारी, 1993 पासून योजनेचा अंमल सुरु होणे, हा वळणरस्ता या योजनेचा भाग आहे याची माहिती करुन दिल्यानंतरसुध्दा वन प्रस्तावास मान्यता देण्याचे बाजूला ठेवून वनेत्तर जमिनीवर कामे का केली ? अशी त्रुटी मुख्य वनसंरक्षकांनी काढणे, पर्यायी वनीकरणासाठी जिल्हाधिकारी अमरावती यांनी देऊ केलेली मौजे भिलखेडा ता.चिखलदरा येथील भूबँकेतील जागा अयोग्य असल्याची अनावश्यक त्रुटी मुख्य वनसंरक्षकांनी काढणे, वस्तुत: या जमिनीचा भाग असलेली जमिन इतर प्रकल्पासाठी योग्य असल्याचे केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण मंत्रालयाने दिनांक 13 एप्रिल, 2000 च्या पत्रान्वये एका प्रकल्पासाठी व दिनांक 20 जानेवारी, 2005 च्या पत्रान्वये दुसऱ्या प्रकल्पासाठी मान्य करणे, दिनांक 12 एप्रिल, 2004 च्या पत्रान्वये उपवनसंरक्षक मेळघाट वनविभाग

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी. देशमुख...

यांनी भिलखेडयाची ही जागा तीनही दृष्टीने योग्य असल्याची तीन प्रमाणपत्रे सादर करणे, वस्तुत: ही जागा वनक्षेत्राशी सलग असतांना सुध्दा ती सलग नसल्याची त्रुटी मुख्य वनसंरक्षकांनी काढणे, चुकीच्या त्रुटीपूर्तीच्या आग्रहामुळे अन्यथा पूर्णपणे तयार होत आलेल्या या वळणरस्त्याचे काम बंद पडण्याची निर्माण झालेला धोका, यासंदर्भात नागरिकात पसरलेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका"

श्री.बबनराव पाचपुते (वनमंत्री) : सभापती महोदय, ल□वेधी सूच□संबंधीच्या नि□वेद□ाच्या प्रती मा□□ीय सदस्यां□ा आधीच वितरीत □ल्या असल्यामुळे मी ते नि□वेद□ आपल्या अ□ुमती□ सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : नि□वेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेव□यात आले आहे.

नि□वेद□

(प्रेस : येथे सोबतचे नि□वेद□ छापावे.)

....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, या सभागृहाच्या इतिहासातील अतिशय दुर्दैवी अशाप्रकारचे हे उत्तर आहे. मी 8 ते 9 असे निरनिराळे मुद्दे उपस्थित केले होते त्यामधील फक्त एका मुद्दयाला त्यांनी उत्तर दिले. बाकीच्या मुद्दयांना उत्तर दिले नाही. याचे कारण लेखी उत्तर दिल्यामुळे अपप्रकार नागवे होतात. मंत्रिमहोदय म्हणतील की, मी आता तोंडी उत्तर देतो. तुम्ही तोंडी उत्तर दिले तर ही नागवी झालेली उत्तरे झाकली जातात. हे अधिवेशन विदर्भामध्ये भरले आहे. अमरावतीच्या बाय पासच्या प्रश्नामध्ये 1.99 हेक्टर जमिनीच्या हस्तांतरणाचा प्रश्न आहे. सभापती महोदय, या 9 प्रश्नांना मी नोटीस देऊन उत्तर मागितले आहे. मी यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, 12.04.2004 रोजी उप वनसंरक्षक, वन विभाग यांनी पर्यायी वनीकरणाची जमीन सर्व दृष्टीने फिट आहे अशाप्रकारची तीन सर्टिफिकेट दिले आहेत. सभापती महोदय, याला उत्तर दिले नाही. अमरावतीचे जिल्हाधिकारी यांनी 9 नोव्हेंबर 2005 ला सर्टिफिकेट दिले. ही जमीन या कामासाठी योग्य आहे. याचे उत्तर नाही. गव्हर्नमेंट ऑफ इंडियाने 20.9.2005 च्या पत्राअन्वये म्हटले की, ही जमीन हस्तांतरणासाठी, पर्यायी वनीकरणासाठी योग्य आहे. त्याचे उत्तर दिले नाही. मी या लक्षवेधी सूचनेमध्ये सुरुवातीला म्हटले की, ड्राफ्ट डेव्हलपमेंट प्लॅन कायद्यानुसार 1966 च्या नगर रचना अधिनियम 26/1 अन्वये ही योजना हरकती व सूचनांसाठी 30 ऑक्टोबर 1988 रोजी प्रसिध्द झाली. त्यावर तुमच्या विभागाने काहीही हरकत घेतली नाही असे मी म्हटले आहे. त्याला एका कवडीचेही उत्तर दिले नाही. 4 डिसेंबरला ही योजना फायनल झाली त्यालाही कवडीचेही उत्तर दिले नाही. 25 फेब्रुवारी 1993 ला तुम्ही गॅझेंटमध्ये नोटीफिकेशन काढले व योजनेचा अंमल सुरु झाला. त्या । कवडीचेही उत्तर दिले नाही. मी यामध्ये पुन्हा असेही म्हटले आहे की, केंद्र सरकार म्हणते की ही जमीन योग्य आहे. सभापती महोदय, आमच्या जिल्हयामध्ये एक भू बँक आहे. कशासाठी? जर तुम्हाला कुठेही वन जमिनीसाठी पर्यायी जमीन पाहिजे असेल तेथील जमीन द्यायची. सरदार सरोवरासाठी आमची जमीन दिली ती योग्य आहे. नरखेड रेल्वेलाईनसाठी जमीन दिली ती योग्य आहे. आणि फक्त या बायपास साठी एक ते दीड हेक्टर जमीन पाहिजे तर हे नागपूरात बसलेले बादशहा, सुलतान केंद्रस्थ अधिकारी आहेत. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया बाजूला राहिले. ते सारे बाजूला राहिले. आणि हे सांगतात की ही जमीन मॅनेजमेंटला योग्य नाही. सभापती महोदय, जर त्याची उत्तरे दिली असती तर सभागृहासमोर ते नागवे झाले असते. सभापती महोदय, यामध्ये आणखी एक मुद्दा आहे. हा डेव्हलपमेंट प्लॅनमधील रस्ता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी. देशमुख...

असल्यामुळे हे बांधकाम जवळ जवळ पूर्ण होत आले आहे. डेव्हलपमेंट प्लॅन फायनल झालेला आहे. हा जिल्हा सर्व क्षेत्रामध्ये नंबर 1 चा भाग असलेला जिल्हा आहे हे या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी उभे राहून सांगितले आहे. ही अडचण आहे म्हणून आमच्या खर्चाने आम्ही ही जमीन घेऊन देऊ. पाच-सहा कोटी रुपये खर्च केले. 100 हेक्टर खाजगी जमीन ताब्यात दिली रस्ता बांधून झाला. आता यांची फक्त महापूजा शिल्लक राहिली आहे. त्यालाही उत्तर दिले नाही. यामध्ये म्हटले आहे की, खाजगी जमीन ताब्यात घेण्यासाठी राज्य शासनाने पाच-सहा कोटी रुपये दिले. आम्हाला सभागृहाने न्याय दिला आहे. आणि म्हणून तो पश्चिमेकडील बायपास त्यांनी कबूल केला. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेली उत्तरे माझ्याकडे आहेत. या वनजमिनीसाठी पर्यायी जमीन दिली असून त्याची कार्यवाही पूर्ण करुन ही जमीन ताब्यात दिली जाईल असे त्यांनी उत्तर दिले आहे. हे नागपूरात बसलेले सुलतान व बादशहा म्हणतात की, याबाबत आम्हाला विचारले नाही. म्हणून माझा पहिला प्रश्न असा की, या मुद्दयांना तुम्ही उत्तरे कां दिली नाहीत?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बऱ्याच गोष्टींचा ऊहापोह केला आहे आणि उत्तराच्या संदर्भात सांगितले आहे. आपण सांगितलेल्या पध्दतीने मी उत्तरे दिलेली आहेत. शेवटी प्रश्न एकच आहे...

प्रा. बी. टी. देशमुख : ही उत्तरे यामध्ये नाही आहेत. त्यांचे पत्र फक्त तुम्ही कोट करुन दिले आहे. सभापती महोदय, मला आपले संरक्षण पाहिजे...

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा. त्यांच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्यास मी तयार आहे. अमरावती शहराच्या पश्चिम बाजूला जाणाऱ्या अकोली वळण रस्त्यासाठी आवश्यक असलेली 1 हेक्टर 99 आर जमीन देण्याच्या संदर्भात हा प्रश्न आहे. या संदर्भात कोणत्याही वन जमिनीचे हस्तांतरण करायचे असेल तर त्यासाठी फॉरेस्टचे रुल आणि ॲक्ट आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

आणि त्यामध्ये अप टू डेट माहिती दिलेली आहे. त्यापध्दतीने वन खात्याच्या अधिकाऱ्यांनी . . . .

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ...

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे एक मिनिट ऐकून घ्यावे. त्यानंतर जेवढे प्रश्न विचारावयाचे असतील तेवढे त्यांनी विचारावेत. मी माहिती देण्यास तयार आहे. वन खात्याच्या अधिकाऱ्यांनी येथे मुद्दाम काही केलेले नाही. पण एक, दोन, तीन या प्रत्येक बाबींच्या बाबतीत रुलप्रमाणे नोटीस दिलेली आहे ही वस्तुस्थिती आहे. आमची अशी इच्छा आहे की, हा वळण रस्ता व्हावा. यासाठी एकूण 1 हेक्टर 99 आर इतकी जमीन लागणार आहे. ही जमीन देण्यासाठी पर्यायी जमीन द्यावी लागेल. ती देत असताना . . .

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, तुमच्या वन अधिकाऱ्यांनी लेखी उत्तर दिले नाही.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुखसाहेब मी तुमचे म्हणणे ऐकून घेतले. आता तुम्ही माझे ऐकून घ्यावे. तुमचे काही मुद्दे राहिले तर पुन्हा सगळे प्रश्न विचारावेत. मी उत्तर देण्यास तयार आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी नोटीस दिलेली आहे, त्याला उत्तर देत नाहीत. त्यांनी सर्टीफीकेट दिले आहे की नाही ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे थोडे ऐकून घ्यावे. जी जमीन दिलेली आहे, ती जमीन चांगली आहे याबद्दल काही शंका नाही. हे अधिकाऱ्यांनी सांगितले. पण मी माझ्याकडे नकाशा मागवून घेतलेला आहे. जी जमीन द्यावयाची असते, ती वनाच्या शेजारी द्यावयाची असते आणि येथे हे वन एका बाजूला राहीले आणि जमीन दुसऱ्याच बाजूला दिली आहे. म्हणून आम्ही त्यांना सांगितले की, वनाच्या शेजारची जमीन असेल तर त्याला कम्पाऊंड करुन द्यावे. पण कम्पाऊंड करावयाचे असेल तर खर्च वाढतो आणि त्याबाबतीत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना बोलविण्यात आले होते,त्यांच्याबरोबर चर्चा झाली.परवा एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर यांनाही बोलविले होते. त्यांच्याबरोबर चर्चा झाली आणि त्यांनी सांगितले की, हे बरोबर आहे. कायद्यामध्ये ज्या गोष्टी आहेत. याठिकाणी सरकार किंवा वन विभाग मुद्दाम अडवणूक करीत

. . . .3 जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही. यासाठी 1980 चा कायदा आहे, त्यानंतर त्यात सुधारणा केलेली आहे आणि रुल व ॲक्टप्रमाणे सर्व गोष्टी कराव्या लागतात. महाराष्ट्रातील विशेषत: विदर्भातील 57 मोठया प्रोजेक्टसाठी वर्षभरामध्ये काम केले आहे आणि सर्वांना आपण नो-ऑब्जेक्शन देण्याची व्यवस्था केलेली आहे आणि जमिनीच्या बाबतीत सुध्दा, पूर्वी झुडपी जंगल घेत नव्हतो, तर आता आपण झुडपी जंगल सुध्दा स्विकारण्यास सुरुवात केली आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी झुडपी जंगलाचे कौतुक करु नका.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मघाशी आपण विचारले म्हणून मी सांगत आहे. आपण सिनिअर सभासद आहात. आपण जर माझे ऐकून घेतले तर बरे होईल. मी तुमच्या प्रश्नाबाबत सांगतो. त्यानंतर मग तुम्ही मला प्रश्न विचारावा. माझे उत्तर पूर्ण होऊ द्या. मग तुम्ही विचारा म्हणजे तुम्हाला तुमच्या प्रश्नाचे उत्तर मिळेल आणि लक्षवेधी सूचनेला न्याय मिळेल. यामध्ये आपण सूचना केल्या होत्या. प्रत्यक्षात प्रस्ताव सादर केला, पण जोपर्यंत तुम्हाला फायनल ॲथॉरिटीकडून मान्यता दिली जात नाही तोपर्यंत कोणत्याही प्रकारचे काम करता येत नाही. येथे व्हॉएलेशन सुध्दा झालेले आहे आणि अधिकाऱ्यांनी मान्य केले की, हे व्हॉएलेशन आहे. कारण फायनल परवानगी येत नाही, त्याअगोदर आम्ही अशा प्रकारची चुक केली आहे आणि एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर . . . .

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अमरावती महाराष्ट्रात नाही का ? डेव्हल्पमेंट प्लॅनचे किती कौतुक करणार आहात ? हे काय सांगत आहेत ? मग लेखी उत्तर देताना संकोच का वाटला ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माझे ऐकून घ्यावे. आपण थोडा संयम ठेवला तर मला सगळे सांगता येईल. लक्षवेधी सूचनेला न्याय द्यावयाचा असेल तर सर्व ऐकून घेतले पाहिजे. जर अधिकाऱ्यांनी चूक केली असेल तर मी सभागृहात अधिकाऱ्यांना पाठीशी घालणार नाही. हा प्रस्ताव सादर केला. त्यानंतर . . . .

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आम्ही महाराष्ट्र राज्यात आहोत. या राज्यात डेव्हल्पमेंट होऊ नये असे वन विभागाचे असे म्हणणे आहे का ? आम्ही जेव्हा शेजारच्या राज्यात जातो. कर्नाटकमध्ये गेलो, मद्रासमध्ये गेलो तर असे दिसून येते

. . . .3 जे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

की, तेथील डेव्हल्पमेंट आपल्यापेक्षा जलद गतीने होत आहे. तुम्ही अशा प्रकारे बाजू मांडत आहात, पण अमरावती येथील वळण रस्त्याबाबत आम्ही गेली पाच वर्षे ऐकत आहोत. आमची आमदारकीची मुदत संपत आली तरी ते अमरावतीचे वळण रस्ता होत नाही. पण याठिकाणी माननीय मंत्री महोदय हे कसे होणार नाही याबाबतीत जास्त जोरात सांगत आहेत. तुम्ही सांगा की, हे असे-असे होईल. आपण असे करु या. परंतु तुम्ही ते कसे होणार नाही आणि आमच्या अधिकाऱ्यांनी ऑब्जेक्शन कसे योग्य घेतले आहे ते सांगत आहात आणि ते चुकीचे आहे. आपण जर असे उत्तर देणार असाल तर आम्हाला उत्तर ऐकण्याची गरज नाही. ही चर्चा येथेच थांबवावी. आम्ही वेगळ्या तऱ्हेने हा विषय मांडू. हे बरोबर नाही. काय चालले आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही, तर माहिती अपूरी दिली . . . .

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आम्ही याचा निषेध करु . 1842 हेक्टर . . . .

तालिका सभापती : सभापती महोदय, माझे उत्तर तर ऐकून घ्यावे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर ऐकून घ्यावे आणि त्यानंतर काही शिल्लक राहीले असेल तर मग त्यांनी बोलावे. मी जे उत्तर देत आहे, ते पूर्ण नाही. पण त्यामधून अर्थ काढावयाचा. आधीचे आणि शेवटचे वाक्य जोडले नाही तर ध चा मा देखील होऊ शकतो. मी असे सांगितले की, अमरावतीच्या वळण रस्त्यासाठी एकूण 1 हेक्टर 99 आर जमीन लागणार आहे. ही जमीन देण्याच्या सबंधात वन खात्याची तयारी आहे. मला याची माहिती मिळाली तेव्हा मी सर्व अधिकाऱ्यांची बैठक घेतली.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री.बबनराव पाचपुते (पुढे चालू...

मिटिंग घेतल्यानंतर अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव मागितला. त्या प्रस्ताव आल्यानंतर त्या अधिकाऱ्यांनी नऊ चुका लक्षात आणून दिल्या. प्रस्ताव सुधारण्यासाठी अशा पध्दतीने प्रस्ताव पाठवा असे सांगितलेले होते. तो प्रस्ताव दिनांक 6-12-2005 ला आमच्याकडे आला. त्या प्रस्तावाची छाननी देखील झालेली आहे. परवा हा प्रस्ताव आला... आपल्या जशा तीव्र भावना आहेत तशा माझ्याही तीव्र भावना आहेत. महाराष्ट्रातील प्रकल्प वन खात्यामुळे अडलेले 1,034 प्रकल्प हे वर्षामध्ये 750 प्रस्ताव दुरुस्त केलेले आहेत. तुमची भावना आणि आमची भावना वेगळी नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी कर्नाटकामध्ये, आंध्रमध्ये डेव्हलपमेंट होत असल्याचे सांगितले. त्यांनी ज्या सुधारणा केल्या, त्या आपणही येथे आणलेल्या आहेत. 1980 चा कायद्याप्रमाणे कशाप्रकारे प्रस्ताव सादर करायचा याबाबत बुकलेट तयार करुन त्या त्या खात्याकडे पाठविलेले आहे. तुम्ही असे सांगितले की, जमीन आम्ही देणार नाही. जमिनीचे प्रपोजल भोपाळला पाठवावे लागते आणि त्यांच्याकडून मंजुरी मिळते. मी आपल्या बाजूने बोलतो आहे... हा रस्ता व्हावा यासाठी बोलत आहे. भोपाळला हा जर प्रस्ताव पाठवायचा असेल तर, काही त्रुटीमुळे त्यांच्याकडून तो परत येतो. एक किंवा दोन मुद्यांची त्रुटी काढून प्रस्ताव परत येऊ नये म्हणून परिपूर्ण प्रस्ताव त्यांच्याकडे पाठवावा असा प्रयत्न आहे. तो परिपूर्ण प्रस्ताव एक आठवड्याच्या आत करणार आहोत. त्यासाठी मंत्रीमंडळाकडे किंवा मंत्रालयात प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता नाही. पाच हेक्टरच्या आतील जमीन आहे. दोन हेक्टरच्या आतमध्ये असल्यामुळे येथून डायरेक्ट भोपाळला प्रस्ताव पाठविण्याची व्यवस्था करु. एवढेच नाही तर भोपाळला प्रस्ताव गेल्यानंतर त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून लवकरात लवकर परवानगी देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

प्रा.बी.टी देशमुख : परवानगी देण्याचे त्यांनी मान्य केले. तो प्रस्ताव भोपाळला पाठवावा लागतो. मला मनापासून दु:ख होते की, माझ्या जिल्ह्यामध्ये 1842 हेक्टरची भू बँक आपल्या वन अधिकाऱ्यांनी जाहीर केलेली आहे. वन अधिकाऱ्यांनी सारी जमीन पसंत केलेली आहे. जिथे जिथे ती लागेल तेथे वाटप चालू आहे. सरदार सरोवरासाठी जमीन दिली, रेल्वेसाठी जमीन दिली. आता या सभागृहाने आम्हाला न्याय दिला. माझे मंत्री महोदयांच्या उत्तराने समाधान झालेले आहे. माझे म्हणणे एकच आहे की, त्या 1800 हेक्टर जमिनीपैकी ही नाही तर ती जमीन घ्यावी, तीच जमीन घ्या, असे आमचे म्हणणे नाही. एवढी मोठी बँक आहे, केंद्रस्थ अधिकाऱ्यांवर ही जबाबदारी सोपवावी. त्यांना सांगा की, तेथे जाऊन प्रत्यक्ष जमीन पहावी. ही नाही तर ती जमीन घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

प्रा.बी.टी.देशमुख (पुढे सुरु...

येथून फक्त काडया करु नका....दीड वर्षे झाले, आम्ही या गोष्टीला त्रासून गेलो. माझे एकच म्हणणे आहे की, केंद्रस्थ अधिकाऱ्यांवर ही जबाबदारी सोपवावी. आठ दिवसामध्ये त्यांनी प्रस्ताव पाठविला पाहिजे, आणि अनुकूल निर्णय घेतला पाहिजे.

श्री.बबनराव पाचपुते : सजेशन फॉर ॲक्शन.

प्रा.बी.टी.देशमुख : सजेशन फॉर ॲक्शन म्हटल्यामुळे पुन्हा घोटाळा झाला.

श्री.बबनराव पाचपुते : सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, एखाद्या केंद्रस्थ अधिकाऱ्याकडे ही जबाबदारी सोपवा. तशी जबाबदारी घेऊन आपला हा प्रस्ताव आठ दिवसाच्या आत भोपाळला पाठविला जाईल. भोपाळला पाठविल्यानंतर तो प्रस्ताव परत येऊ नये, या दृष्टीने प्रयत्न होईल. सन्मानीय सदस्यांनी सांगितले की, जमिनी दिलेल्या आहेत. त्याबद्दल त्यांच्या जिल्ह्याचा मी आभारी आहे. पण जमीन देत असतांना वन खात्याच्या रुलमध्ये असे आहे की, वनाच्या शेजारी जमीन पाहिजे. तशी ती जमीन नव्हती. ही बाब कलेक्टर आणि कमिशनरांच्या लक्षात आणून दिली. त्यावर ते म्हणाले की, आमची चूक झालेली आहे. चूक दुरुस्त करुन ते पुन्हा प्रस्ताव पाठवीत आहेत. मी म्हटले की, प्रस्ताव पाठवू नका. वन खाते आणि बाकीचे विभाग यांमध्ये पत्रव्यवहार चालतो. मी आता 1 तारखेपासून अशाप्रकारचा पत्रव्यवहार बंद करुन टाकलेला आहे. वन खात्याचे कार्यालय मंत्रालयामध्ये नाही तर ते नागपूर येथे आहे. प्रत्येक महिन्याच्या गुरुवारी,शुक्रवारी दोन दिवस येथे येऊन बसतो आणि ज्या काही वन खात्याच्या गोष्टी अडलेल्या आहेत, त्या रुलमुळे थांबलेल्या आहेत. त्या खात्याचे लोक आणि आमच्या खात्याचे लोक एकत्रित एका टेबलावर बसून त्यांच्या ज्या काही अडचणी आहेत, त्या समजून घेतल्या जातात. यामध्ये समोरासमोर टेबल टू टेबल चर्चा होते. म्हणूनच महाराष्ट्रातील 1,024 प्रकल्पापैकी 750 प्रकल्प आपण एक वर्षामध्ये तयार करण्याचे काम केलेले आहे. यासाठी मी आठ दिवस म्हटलेले होते परंतु जास्तीत जास्त तीन किंवा चार दिवसामध्ये किंवा येथून जाण्याअगोदर सन्माननीय सदस्यांना प्रस्ताव भोपाळला पाठविल्याचे सांगणार आहे

यानंतर कु.थोरात....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती फौजीया खान :सभापति महोदय, जब से माननीय श्री बबनराव पाचपुते वन विभाग के मंत्री बने है, तब से वे बहुत अच्छे निर्णय ले रहे हैं. मैं इस संबंध में उनका अभिनंदन करती हूं. मैं माननीय मंत्री जी के ध्यान में एक बात लाना चाहती हूं. अभी जिस विषय या काम के बारे में लक्षवेधी आयी है, उसके संबंध में और अन्य कार्यों के बारे में हम देख रहे हैं कि 12 साल हो गए हैं लेकिन विकास के काम को गति नहीं दी जा रही है. पूरे महाराष्ट्र में वन विभाग के जो सर्विस रुल्स है, वे इसका कारण है. क्योंकि फॉरेस्ट कंझरवेशन एक्ट, 1980 का आधार लेकर और उसका दुरुपयोग करके उच्च स्तरीय अधिकारी गलत मार्गदर्शन करते हैं. यह मैं कहना चाहती हूं. जैसे पुलिस विभाग के अन्तर्गत उनके सर्विस रुल्स बदले गए हैं, वैसे ही वन विभाग के अन्तर्गत सर्विस रुल्स बदलने की जरुरत है. क्योंकि वन विभाग के अन्तर्गत अधिकारों का केन्द्रीयकरण बहुत ज्यादा हो गया है. वन विभाग के उच्च स्तरीय अधिकारी अपने अधिकारों का दुरुपयोग कर रहे हैं, नियमों का दुरुपयोग कर रहे हैं. इन अधिकारियों को महाराष्ट्र के विकास से कोई मुहब्बत नहीं है. इसलिए मैं यह निवेदन करना चाहती हूं कि वन विभाग के अन्तर्गत सर्विस रुल्स में चेंज करने के लिए और अधिकारों का विकेन्द्रीयकरण करने के लिए एक कमीशन नियुक्त करें, यह कमीशन इस संबंध में अभ्यास करके अपनी रिपोर्ट पेश करें ताकि विकास के कार्यो को गति मिल सके.

श्री बबनराव पाचपुते :रुल्स में सुधार करना हमारे हाथ में नहीं है.

श्रीमती फौजीया खान :मैं वन विभाग के एक्ट के बारे में नहीं बोल रही है. वह अच्छा है. मैं सर्विस रुल्स में चेंज करने की बात कर रही हूं. क्योंकि विद्यमान रुल्स में अधिकारों का केन्द्रीयकरण बहुत ज्यादा है. इसलिए अधिकारों के विकेन्द्रीयकरण की आवश्यकता है. अतएव क्या आप वन विभाग के सर्विस रुल्स चेंज करेंगे ?

श्री बबनराव पाचपुते :सभापति महोदय, अभी माननीय सदस्या ने जो कहा है, उसके बारे में उन्हें पता है. उन्होंने जो बताया है, उसके बारे में जरुर सोचेंगे. लेकिन अभी तक ऐसा कुछ नहीं हुआ है. फॉरेस्ट कंझरवेशन एक्ट के तहत ही काम हो रहा है.

श्रीमती फौजीया खान : मैं सर्विस रुल्स के इन्टरपीटेशन के बारे में कह रही है.

श्री बबनराव पाचपुते : सर्विस रुल्स के इन्टरपीटेशन के बारे में जरुर बैठकर बात करेंगे और अगर आपका कोई सुझाव होगा तो वह सुझाव भी लिया जाएगा.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृशी. :अलिबाग तालुक्यातील समुद्रकिना-याची अस्वच्छतेमुळे झालेली दयनीय अवस्था.

मु.शी. : अलिबाग तालुक्यातील समुद्रकिना-याची अस्वच्छतेमुळे झालेली दयनीय अवस्था याबाबत श्री. जयंत प्र.पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"अलिबाग तालुक्यातील प्रामुख्याने मांडवा, सासवणे,किहीम या भागातील समुद्रकिना-याची अतिशय दयनीय अवस्था झाली आहे. मुंबईतील प्लॅस्टिकचा कचरा समुद्राच्या पाण्याच्या भरती बरोबर वाहत येऊन मांडवा, सासवणे, किहीम येथील समुद्र किना-यावर येऊन बसतो. त्यामुळे येथील किनारे अस्वच्छ होतात. समुद्र किनारे अस्वच्छ झाल्यामुळे या ठिकाणी येणा-या पर्यटकांवर त्याचा परिणाम होतो. पर्यायाने या समुद्र किना-यांवर जे स्थानिक व्यावसायिक धंदा करतात त्यांच्याही धंद्यावर त्याचा परिणाम झाल्याने येथील स्थानिक व्यवसायिकांवर उपासमारीची पाळी येणे.

तरी शासनाने मुंबई मधील प्लॅस्टिक कचरा जेणे करुन मांडवा, सासवणे, किहीम या समुद्रकिना-यावर कसा येणार नाही याबाबत उपाययोजना करावी व येथील स्थानिक व्यावसायिकांना त्यांचा धंदा कसा उत्तेजीत करता येईल यादृष्टीने मदत करावी यासाठी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष या महत्वपूर्ण बाबीकडे वेधीत आहे."

सभापती महोदय, मांडवा, सासवणे, किहीम या समुद्रकिना-याची अवस्था भयानक झालेली आहे. मुंबईवरुन भरतीच्या पाण्यासोबत प्लॅस्टिकच्या पिशव्या अलिबागला येतात. त्यामुळे या ------ किना-यावर अस्वच्छता निर्माण झालेली आहे. प्लॅस्टिकच्या पिशव्या मुंबईत टाकल्या जातात त्या अलिबागला येतात त्यामुळे ही किनारपट्टी बकाल होत आहे. म्हणून या पिशव्या येणार नाहीत याचा बंदोबस्त शासनामार्फत व्हावा. किंवा हा किनारा स्वच्छ ठेवण्यासाठी त्या त्या विभागातील

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

ग्रामपंचायत, नगरपालिका आणि शासनाकडून स्वच्छता करण्यात यावी. सभापती महोदय, दर आठवडयाला शनिवारी आणि रविवारी या दोन दिवसात जवळ जवळ 8 ते 10 हजार पर्यटक अलिबागच्या किना-यावर येत असतात. त्यादृष्टीकोनातून प्लॅस्टिकच्या पिशव्या ताबडतोब उचलण्यासाठी कोणती तरी सोय शासनामार्फत झाली पाहिजे. ग्रामपंचायतीची एवढी आर्थिक क्षमता नाही. ही किनारपट्टी स्वच्छ ठेवण्याच्यादृष्टीकोनातून या विशेष उल्लेखद्वारे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो की, हे किनारे स्वच्छ कसे हातील याकडे शासनाने लक्ष द्यावे.

यानंतर श्री. खर्चे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: ठाणे शहरातील कॅडबरी नाक्याजवळ उड्डाण पुलाला पडलेले भगदाड.

मु.शी.: "ठाणे शहरातील कॅडबरी नाक्याजवळ उड्डाण पुलाला पडलेले भगदाड" या बाबत श्री. अनंत तरे, यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून सुमारे 75 कोटी रुपये खर्च करुन ठाणे येथील कॅडबरी नाक्याजवळील चंदनवाडी या मध्यवर्ती विभागातून जाणारा उड्डाण पूल तयार करण्यात आला. या पुलाचे उद्घाटन माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्या हस्ते त्यावेळी झालेले होते. सन 1999 मध्ये हा पूल तयार झाला आणि आता सहा वर्षे झाली. या पुलावरुन भिवंडी, वाडा, घोडबंदर रोड तसेच शहराची वाहतूक मोठया प्रमाणावर होत आहे. त्यामुळे प्रचंड प्रमाणात वाहतुक या पुलावरुन होत असते. या ठिकाणी फार मोठा खड्डा पडल्यामुळे गेले 15 दिवस तो पूल बंद आहे. हा पूल बंद असल्यामुळे वाहतुकीचा खोळंबा होत आहे. या माध्यमातून मी शासनाचे या गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो की या पुलावर हा खड्डा पडल्यामुळे ही वाहतूक आज बंद आहे. तो खड्डा तातडीने दुरुस्त करुन ही वाहतूक पुर्ववत सुरु करावी. फक्त सहा वर्षामध्येच एवढा मोठा खड्डा या पुलाला पडल्यामुळे संबंधित ठेकेदाराला जो 75 कोटीचा ठेका दिला होता त्याची चौकशी करावी व त्याचे डिपॉझिट जप्त करावे तसेच बीओटी तत्वावर बांधला असेल आणि त्यापोटी टोल वसूल करण्यात येत असेल तर तो ताबडतोब थांबवावा अशी विनंती शासनाला मी करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MHM/ RJW/ SBT/ D/ पूर्वी कु. थोरात.... 16:00

पृ.शी.: नवीन उद्योजकांना शासनाकडून सहकार्य मिळणेबाबत.

मु.शी.: नवीन उद्योजकांना शासनाकडून सहकार्य मिळणेबाबत याबाबत श्री. संजय दत्त, यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यात औद्योगिक क्षेत्र वाढावे, नवनवीन उद्योग सुरु व्हावेत व बेरोजगार तरुणांना काम मिळावे यासाठी आपले आघाडी सरकार प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. ज्या गरजू तरुणांना राज्यात प्रकल्प उभारावयाचे आहेत, जेणेकरुन मोठया प्रमाणात या राज्यात उद्योगधंदे उभे राहतील व बेरोजगार हातांना काम मिळेल. बऱ्याच ठिकाणच्या उद्योगधंदयांचा अनुशेष भरण्याचाही प्रामाणिक प्रयत्न सरकार करीत आहे. कारखानदारी वाढली तर आपल्या राज्याची आर्थिक परिस्थितीही सुधारेल व ज्या उद्योगधंदयामुळे आम्हास परकीय चलनही प्राप्त होणार, अशा रोजगार उपलब्ध करुन देणाऱ्या उद्योजकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे. मात्र काही ठिकाणी काही क्षुल्लक कारणांमुळे किंवा विघ्नसंतोषी मंडळीमुळे एखादा उद्योग बंद पडावयाच्या मार्गावर असेल तर सरकारने सकारात्मक भूमिका घेऊन अशा उद्योजकाला सहकार्य करणे गरजेचे आहे. त्यांचे मनोबल वाढेल अशी ताकद त्यांच्या पाठीशी उभी करणे आवश्यक आहे. कोंकणातील औद्योगिक अप्रगत सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ला तालुक्यात अडेली या ठिकाणी रामचंद्र ॲग्रो फॉर्ममधील अल्टेक कन्टेनर्स हा प्रकल्प काही समाजकंटक मंडळींमुळे धोक्यात आला असून बंद पडण्याच्या मार्गावर आहे. जर तो बंद पडला तर स्थानिक लोकांची रोजीरोटी बंद पडेल व त्यामुळे स्थानिक लोकांचा रोजंदारीचा प्रश्न उद्‌भवणार असून शासनाच्या आर्थिक धोरणासही कुठेतरी खीळ बसण्याची शक्यता आहे. या प्रकल्पात कीटकनाशकासाठी ॲल्युमिनियम बॉटल्स तयार करण्यात येतात व त्याची निर्यात विदेशात मोठया प्रमाणात होते. त्यामुळे आपल्या देशास परकीय चलनही मोठया प्रमाणात प्राप्त होते म्हणून शासनाने त्वरित या घटनेची गंभीर दखल घेऊन या प्रकल्पात निर्माण झालेल्या अडचणी त्वरित दूर करण्याबाबतचे आदेश संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना द्यावेत, अशी विनंती मी आपल्यामार्फत शासनाला करीत आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: जात पडताळणी कार्यालयातील गैरवर्तणूकीमुळे संबंधित कर्मचाऱ्याला बडतर्फ करणेबाबत.

मु.शी.: जात पडताळणी कार्यालयातील गैरवर्तणूकीमुळे संबंधित कर्मचाऱ्याला बडतर्फ करणेबाबत, या विषयासंबंधी ॲड. अनिल परब, यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री. अनिल परब यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड. अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : महोदय, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती व समाजकल्याण अधिकारी, मुंबई विभाग, मुंबई यांच्याकडे श्रीमती गीता वसंत यादव, नगरसेविका यांच्या बोगस जातीच प्रकरणी दि. 25.11.2005 रोजी श्री. मोरे व इतर दोन अधिकाऱ्यांसमोर सुनावणी होऊन श्रीमती गीता वसंत यादव यांची सादर केलेले पुरावे व कागदपत्रे खरे मानून तसा निर्णय देणे, श्री. यशवंत मोरे जात पडताळणी समितीच्या सदस्यांनी त्यांची तेथून बदली होऊनही कार्यालयातील फाईल प्रतिवादीच्या वकीलाच्या सल्ल्याने अहवाल (निकाल) तयार केला. परंतु त्या निकालावर विभागीय जात पडताळणी समितीच्या मान्य दोन सदस्यांनी सहया करण्यास नकार दिला. त्यानंतर हे प्रकरण कोर्टात गेल्यावर श्रीमती गीता यादव यांच्या जातीचे प्रमाणपत्र बनावट असल्याचा दिलेला निकाल, इतकेच नव्हे तर श्री. ध्रुव आटे, विभागीय अधिकारी, समाजकल्याण विभाग, मुंबई यांनी श्री. यशवंत मोरे जात पडताळणी अधिकारी यांना निलंबित करण्याचे सचिव, समाजकल्याण विभाग, मंत्रालय मुंबई यांना पाठविले असतांनाही शासनाने सदर पत्रावर अद्याप कारवाई न करता श्री. मोरे यांना दिलेले संरक्षण. श्री. मोरे यांना तात्काळ बडतर्फ करण्याबाबत शासनाने तसे आदेश काढावे, अशी मी विनंती करीत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: सर्वशिक्षा अभियान योजनेअंतर्गत देण्यात येणारे अनुदान संरपंचाना न देणे याबाबत.

मु.शी.: सर्वशिक्षा अभियान योजनेअंतर्गत देण्यात येणारे अनुदान संरपंचाना न देणे याबाबत श्री. रामनाथ मोते यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते :(कोकण विभाग शिक्षक) : महोदय, मी आपल्या अनुमतीने विशेष उल्लेखाच्या संदर्भात सर्वशिक्षा अभियानाच्या ज्या शाळा खोल्यांचे बांधकाम होते त्यांच्या संदर्भात माझे विचार मांडणार आहे. सर्वशिक्षा अभियान योजने अंतर्गत प्राथमिक शाळांना अन्य सुविधांबरोबर वर्ग खोली बांधण्यासाठी अनुदान दिले जाते. सदरचे अनुइदान शाळेचे मुख्याध्यापक व संबंधित गावातील ग्रामपंचायतीचे सरपंच यांच्या संयुक्त नावाने बँकेत जमा होते. गावातील सरपंच हे राजकारणी व राजकीय पक्षाचे कार्यकर्ते असल्याने मुख्याध्यापकांना धमकी, दमदाटी देऊन वर्गखाली बांधकामासाठी कॉन्ट्रॅक्टरला पेसे देण्याच्या नावाखाली को-या चेकवर सहया घेतात. सर्व शिक्षा अभियानाचे वर्गखाली बांधकामाचे पैसे संबंधित कॉन्ट्रेक्टरला न देता व बांधकाम न करता अपहार करतात. वर्गखोलीचे बांधकाम न झाल्याबद्दल संबंधित मुख्याध्यापकास जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द पोलीस केसेस दाखल झाल्या असून अनेकांचे वेतन बंद झाले आहे. अशा केसेसमध्ये मुख्याध्यापकांना पोलीस स्टेशनमध्ये खेट घालावे लागतात. मुख्याध्यापकांच्या विरोधात अशा प्रकारच्या केसेस होत असल्यामुळे तो अपमान सहन न झाल्यामुळे अनेक मुख्याध्यापकांच्या पत्नीने आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, सर्वशिक्षा अभियानाच्या शाळा खोल्यांचे काम मुख्याध्यापकाकडून काढून टाकण्यात यावे किंवा यांसदर्भातील सरपंचाचे अधिकार तरी काढून घ्यावेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: परभणी येथे महाराणा प्रताप यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याबाबत.

मु.शी.: परभणी येथे महाराणा प्रताप यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याबाबत श्रीमती फौजिया खान यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे त्यांनी ती मांडावी.

श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त) : परभणी येथे जेल कॉर्नर, जिंतूर रोड या चौरस्त्यावर महाराणा प्रताप यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याबाबतचा प्रस्ताव सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करुन मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग औरंगाबादने दि. 12.2.1997 अन्वये शासनास सादर केलेला असून शासनाने दि. 12.8.2004 च्या पत्रान्वये पुतळा समितीचे अध्यक्ष बालूसिंग ठाकूर यांना जिल्हाधिका-यांच्या अभिप्रायानुसार पुतळा बसविणे शक्य नसल्याचे कळविले आहे. शासनाला असे कळवित असतांना जिल्हाधिका-यांनी नेमक्या कुठल्या निकषावर हा प्रस्ताव सादर केला या विषयी पुतळा समिती अनभिज्ञ असून यामुळे पुतळा समितीच्या सदस्यांमध्ये तसेच महाराणा प्रताप यांच्या अनुयायांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. त्यांची ही नाराजी विचारात घेऊन तातडीने कार्यवाही होण्याची आवश्यकता आहे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: वसंतराव नाईक महामंडळाकडून धनगर समाजावर होणा-या अन्यायाबाबत.

मु.शी.: वसंतराव नाईक महामंडळाकडून धनगर समाजावर होणा-या अन्यायाबाबत श्री. प्रकाश शेंडगे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रकाश शेंडगे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांचा विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दि.8.2.1984 रोजी वसंतराव नाईक महामंडळ स्थापन करणे. हे महामंडळ 14 विमुक्त जाती , 28 भटक्या जमाती धनगर व त्यांच्या 21 पोटजाती वंजारी तसेच विशेष मागास प्रवर्गातील जातीसाठी असणे. महामंडळाच्या स्थापनेपासून आजतागायत या महामंडळाने धनगर समाजाला सापत्न भावाची वागणूक दिलेली आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात धनगर समाजाला अर्थसहाय्य महामूंडळाकडून कर्ज न मिळणे ही परिस्थिती पाहता 1984 पासून आजपर्यंत आपल्या महामंडळावर एकाच समाजाचे वर्चस्व असणे, या महामंडळाने कोणत्या जातीच्या किती लोकांना आणि केवढे अर्थसहाय्य केले हे न सांगणे, दिलेले अर्थ सहाय्य भाग भांडवल महामंडळाने वर्षभर केलेले कर्जवाटप आणि त्याची वसूली याची आकडेवारी उपलब्ध नसणे यामुळे विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला आहे आतापर्यंतचे रेकॉर्ड पाहिले तर विशिष्ट समाजाच्या व्यक्तीला डायरेक्टर बॉडीवर नेमून विशिष्ट समाजाला विकास निधी दिला जात नाही, हा निधी स्वत:च्या मतदार संघात वाटून टाकावयाचा अशी अनेक उदाहरणे घडलेली आहेत. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, ज्या प्रमाणे बिंदू नामावली प्रमाणे रोस्टर मेन्टेन केले जाते त्याच पध्दतीने संचालकाची सुध्दा निवड केली जावी अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबईतील अंध-अपंग व्यावसायिकांच्या टेलिफोन बुथचे कमी कलेले आकारमान.

मु.शी.: मुंबईतील अंध-अपंग व्यावसायिकांच्या टेलिफोन बुथचे कमी केलेले आकारमान याबाबत डॉ.दीपक सावंत यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यानी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यानी ती मांडावी.

डॉ.दीपक सावंत : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. मुंबईतील अंध-अपंग व्यावसायिकांच्या टेलिफोन बुथचे आकारमान कमी करण्याच्या निर्णयामुळे होत असलेल्या गैरसोयी बद्दल मी विशेष उल्लेख मांडत आहे. सुप्रीम कोर्टाने आदेश दिल्यामुळे अंध-अपंग व्यावसायिकांच्या टेलिफोन बुथचे आकारमान कमी करण्यात आले आहे. अपंग व्यक्तिची व्हील चेअर बुथमध्ये जावी म्हणून बुथचे आकारमान मोठे होते. दुसरे असे की, त्यांचे कौंटींग मशिन देखील मोठे असते. पण आता या बुथचे आकारमान 1x1 मीटर करणे आवश्यक आहे. त्यामुळे अपंगाची व्हीलचेअर बुथमध्ये जाऊ शकणार नाही. त्यामुळे अपंगाना व्हीलचेअर सकट आतमध्ये जाण्यास अडथळा होणार आहे. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निदेशानुसार जर बुथचे आकारमान ठेवले नाही तर अपंगांच्या बुथवर कारवाई होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अंध-अपंगांवर होणाऱ्या अन्यायाबाबत विचार करून सर्वोच्च न्यायालयामध्ये रिट फाईल करावे व अंध-अपंग टेलिफोन व्यावसायिकांना न्याय मिळूवन द्यावा अशी मी विनंती करतो.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. वसई येथे एस.टी.सेवा बंद करून खाजगी ठेकेदाराच्या माध्यमातून बससेवा सुरू करण्याचा प्रयत्न झालेला आहे. त्यामुळे गेल्या 4 दिवसांपासून श्रमजीवी संघटनेचे श्री.विवेक पंडित हे उपोषणाला बसले आहेत. खाजगी बससेवेच्या विरोधात आज मुंबई अहमदाबाद महामार्गावर 2000 लोकांनी रास्तारोको आंदोलन केले आहे. दिनांक 11 डिसेंबरपासून श्री.विवेक पंडित, रॉबर्ट डाबरे, विल्सन मथ्याडो, किरण शेठ, राजेंद्र जोशी, जनार्दन गोवारी, लुईस डिकूना, जानू मेघवाल, गीता वेर्णेकर, छाया पाटील व डॉमनिका डोबरे हे कार्यकर्ते उपोषणाला बसले असून त्यातील काही जण अत्यवस्थ आहेत. प्रवासी वाहतुकीसाठी एस.टी.सेवा उपलब्ध होती. परंतु, तेथील नगरपालिकेने ठराव पारित करून खाजगी ठेकेदाराच्या मार्फत बससेवा सुरू करण्याचे निश्चित केले आहे. त्यास नागरिकांचा विरोध नव्हता. परंतु आजूबाजूच्या 4-5 नगरपालिकांचा समावेश करून टेंडर काढण्यात आले असल्यामुळे नागरिकांचा विरोध आहे. खाजगी ठेकेदाराच्या मार्फत बससेवा सुरू होणार असल्यामुळे शालेय विद्यार्थी, वरिष्ठ नागरीक, पत्रकार, स्वातंत्र्यसैनिक यांना कोणत्याही प्रकारची सवलत बसभाडयामध्ये मिळणार नाही. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे. सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी या खाजगी बससेवेला विरोध केलेला आहे. वसई तालुक्यातील एस.टी.ची सेवा म्हणजे जीवन वाहिनीच आहे. भल्या पहाटे अडीच वाजल्यापासून एस.टी.महामंडळाची सेवा पुरवली जात असल्यामुळे मुंबई शहराला ताजा भाजीपाला, दूध व मासळीचा पुरवठा होतो. एस.टी.च्या सेवेचा फायदा नोकरदार आणि कष्टकरी वर्गाबरोबरच विद्यार्थ्यांना देखील होतो. आज एस.टी महामंडळातर्फे वसई तालुक्यात प्रतिदिवशी 2284 बस फेऱ्या होत असून दर दिवशी 66 हजार प्रवाशी त्याचा लाभ घेत आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे कमालीचा ताण वाहतूक व्यवस्थेवर येत आहे. तेव्हा वसईतील एस.टी.बचाव आंदोलनाकडे शासनाने लक्ष देऊन तेथील एस.टी.सेवा पूर्ववत करावी अशी मी विनंती करतो. कारण एस.टी.ही प्रवाशांच्या सेवेसाठी आहे, तर खाजगी बसचा ठेका हा माव्यासाठी आहे.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, शासनाने नोंद घेतली आहे आणि यासंबंधी उचित कारवाई केली जाईल.

तालिका सभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.45 वाजता पुन: भरेल.

(4.14 ते 4.45 पर्यंत मध्यंतर)

....

यानंतर श्री.अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

सभापतीस्थानी माननीय उपसभापती

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, काल रात्री उशिरापर्यंत सभागृह सुरु होते. माझी आपणास विनंती आहे की, आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेली अल्पकालीन चर्चा उद्या सकाळी ठेवावी.

उपसभापती : उद्या सकाळी दहा वाजता चर्चा ठेवायची काय ?

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेतील कामकाज कुठेपर्यंत होते हे पाहून नंतर निर्णय घ्यावा असे वाटते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2005-2006 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

उपसभापती : पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा आज दिनांक 14 डिसेंबर, 2005 रोजी घेण्यात येत आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्यांनी भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्रांचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबींपुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नको. कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

<u>विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या.</u>

उपसभापती : आज खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :

1) उपमुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक -बी-1, बी-4,
2) महसूल विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक सी-1,सी-4,सी-5,सी-6, सी-9,सी-10,
3) ग्रामविकास व पर्यटन विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक बी-7, एल-2, एल-4, एल-5,
4) सहकार, पुनर्वसन व मदत कार्य विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक व्ही-2, व्ही-5,
5) परिवहन, बंदरे व विमुक्त, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण विभागाच्या मागण्या क्रमांक - बी-3, बी-9,
6) पणन, रोजगार हमी योजना, संसदीय कार्य व महिला व बालकल्याण मंत्री विभागाच्या मागण्या क्रमांक व्ही-4, एक्स-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय उपसभापती.....

7) वस्त्रोद्योग, माजी सैनिकांचे कल्याण व रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या मागण्या क्रमांक - व्ही-3, झेडए-1

8) कृषि, जलसंधारण व खार जमीन विभागाच्या मागण्या क्रमांक - डी-3, आय-5, एल-3, एल-7.

9) पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय व औकाफ विभागाच्या मागण्या क्रमांक डी-1, डी-4, डी-5, डी-6, डी-12.

10) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाची मागणी क्रमांक -आर-1.

11) सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य विभागाच्या मागण्या क्रमांक - एन -3, एन-4,

12) वन विभागाची मागणी क्रमांक- सी-7;

आता यानंतर या चर्चेला प्रथम सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील सुरुवातील करतील.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी बाब क्रमांक 241,पान क्रमांक 221 - पणन विभाग - राज्यामध्ये भात खरेदी केंद्र ही मार्केटींग फेडरेशन मार्फत होतात. कोकणामध्ये विशेषत: रायगड जिल्ह्यामध्ये आणि विदर्भामध्ये जी भात खरेदी झाली आहे. मार्केटींग फेडरेशन या सोसायट्यांना आणि सहकारी संस्थांना सबएजन्ट म्हणून नेमते. असे असताना सुध्दा या खरेदीमध्ये जी घट आलेली आहे. सन 2000-2001, 2001-2002, 2002-2003 आणि 2003-2004 या चार वर्षामधील घट शासनाने मार्केटींग फेडरेशनला दिलेली नाही किंवा जी घट आली ती मंजूर केली नाही. त्यामुळे सबएजन्ट होण्यासाठी कोणत्याही संस्था पुढे येत नाहीत. खरे म्हणजे ऑक्टोबर महिन्यापासून खरेदी केंद्र सुरु करणे कायद्याने बंधनकारक असताना सुध्दा आमच्या रायगड जिल्ह्यामध्ये ही खरेदी केंद्र सुरु झालेली नाहीत. कारण याठिक्राणी दोन-तीन वर्षापूर्वी केलेली खरेदी अजून त्या गोडावूनमध्ये पडून आहे. गोडावून सुध्दा चांगल्या दर्जाची नाहीत. यावर्षी पूर आल्यावर त्या गोडावूनमध्ये पाणी शिरले त्यामुळे संपूण धान्य भिजलेले आहे. त्यामुळे घट जास्त येण्याची शक्यता आहे. त्यामुळे जी गेल्या चार वर्षाची तूट आलेली आहे ती शासनाने प्रथम भरुन काढावी.

यानंतर श्री.गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ..

विशेषत: आपल्या राज्यामध्ये गोदामे कमी आहेत तेव्हा पणन महामंडळ आणि सहकारी संस्था या दोन्हीच्या माध्यमातून जास्त गोदामे कशी उभी राहतील हे पाहण्याची जबाबदारी या खात्याची आहे त्यानुसार त्यांनी या बाबीकडे लक्ष द्यावे असे मला माननीय मंत्रिमहोदयांना सांगावयाचे आहे.अनेक ठिकाणी गोडावून नसल्यामुळे शेतक-यांकडील भाताची खरेदी होऊ शकत नाही आणि कमी दराने हा भात व्यापा-यांना द्यावा लागत आहे त्यामुळे शेतक-यांचे मोठया प्रमाणावर नुकसान होत असते.सभापती महोदय, यानंतर मला आरोग्य विभागाच्या .बाब क्रमांक 206 पान नंबर 346 सबंधी मला बोलावयाचे आहे. रायगड जिल्हयातील अलिबाग येथे सिव्हील हॉस्पिटलमध्ये सी.टी.स्कॅन मशिनची व्यवस्था करण्यात यावी अशा प्रकारची मागणी मी यापूर्वी अनेकदा केली होती त्यानुसार शासनाने सी.टी.स्कॅन मशिन खरेदी करुन दिले आहे. त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.सहा महिन्यापूर्वी आमच्याकडे सी.टी.स्कॅनचे मशिन आलेले आहे. परंतु त्यासाठी लागणारा टेकनिकल स्टाफ तेथे नसल्यामुळे हे सीटी स्कॅनच्या मशिनला बारदान लावण्यात आले आहे आणि ते गोदामामध्ये ठेवण्यात आलेले आहे.हया मशिनचा लवकर उपयोग लोकांसाठी कसा होईल या दृष्टीने त्यासाठी लागणारा टेकनिकल स्टाफ तातडीने नेमण्यात यावा तसेच तज्ज्ञ डॉक्टर्सची त्वरित नेमणूक करण्यात यावी अशी मागणी मी या पूरक मागणीच्या निमित्ताने शासनाकडे करीत आहे.

सभापती महोदय, या नंतर मला गृह विभागाच्या पूरक मागण्यासंबंधी बोलावयाचे आहे. बाब क्रमांक 17, पान नंबर 14 संबंधी मला असे म्हणावयाचे आहे की, पनवेल आणि त्या औद्योगिक परिसरात रेल्वे आल्यापासून मुंबईतील सगळे दरोडेखोर व सगळे गुन्हेगार पनवेल पर्यन्त यावयास लागले आहेत आणि या ठिकाणी दरोडे घालावयास लागले आहेत.त्यामुळे आमच्या भागात दरोडयांचे प्रमाण फार वाढलेले आहे.ही वस्तुस्थिती आहे. ही बाब मी अनेक वेळा सभागृहात मांडलेली आहे.या भागात दरोडयांचे प्रमाण वाढलेले असल्यामुळे पनवेल भागात विविध बॅन्का काम करण्यास हतबल झाल्या आहेत. आतापर्यन्त या परिसरातील ज्या बॅन्कांवर दरोडे पडलेले आहेत त्या दरोडयांपैकी एकाही दरोडयाचा तपास अद्यापी लागलेला नाही. तेव्हा हा तपास लागण्यासाठी तेथे सक्षम पोलीस दल दिले पाहिजे. पनवेल परिसरात बॅन्का लुटण्याचे प्रकार टोळयांच्या माध्यमातून होत असतात एक टोळी येते त्यातील एक जण बॅन्केतील अधिका-याला पिस्तूल दाखवतो आणि बॅन्केतील सर्व

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रक्कम पळवून नेतो. ते गुन्हेगार सापडत नाहीत . या टोळयांमध्ये उत्तर भारतीय गुन्हेगारांचे प्रमाण जास्त आहे असे पोलीस विभागाचे म्हणणे आहे. तेव्हा आतापर्यन्त जे दरोडे पडलेले आहेत त्यांचा तपास लवकरात लवकर लागला पाहिजे आणि येथून पुढे दरोडे पडू नयेत यासाठी गृह खात्याने लक्ष देणे आवश्यक आहे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला महसूल विभागाच्या पूरक मागण्यासंबंधी बोलावयाचे आहे बाब क्रमांक 46 पान नंबर 30 संबंधी बोलत असतांना मला असे सांगावयाचे आहे की, कसेल त्याची जमीन हा कायदा या राज्यात आणि देशात करण्यात आला होता. आमच्या रायगड जिल्हयातील शेतक-यांनी जी चळवळ उभी केली होती त्या चळवळीमुळे हा कायदा करण्यात आला होता.रायगड जिल्हयातील मुरुड तालुक्यात नबाबांची जमीन आहे 1957 सालापासून ते 2004 सालापर्यन्त तेथील जमिनीच्या सातबाराच्या उता-यावर कुळांची नावे होती .2005 नंतर आता त्यांची नावे काढून नबाबांची नावे लावण्यास महसूल खात्याने सुरुवात केलेली आहे तेव्हा अचानकपणे अशी सुरुवात का करण्यात आली आहे ? कोणाच्या अधिकारात आणि कोणाच्या सांगण्यावरुन तसे करण्यात आलेले आहे ? या पूरक मागणीच्या माध्यमातून माझी शासनाला अशी विनंती आहे की, ज्या शेतक-यांच्या नावावर ही जमीन होती त्या शेतक-याच्या जमिनीच्या सात बा-यावर त्यांची नावे तातडीने लावण्यात आली पाहिजेत.त्याबाबतीत तेथील तहसीलदासरांना व प्रातं अधिका-यांना त्वरित आदेश दिले पाहिजेत अशी मी या पूरक मागण्यांच्या निमित्ताने मी मागणी करीत आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ...

सभापती महोदय, बाब क्रमांक 78, पृष्ठ क्रमांक 44 - मत्स्यसंवर्धन विभागाची ही पूरक मागणी आहे. रायगड जिल्ह्यातील मुरूड तालुक्यात राजापुरी कोळीवाडा आणि रोहा तालुक्यातील बोरलिंगचा कोळीवाडा या ठिकाणी जे चॅनल आहेत ते प्रदूषणमुक्त असे चॅनल आहेत, तेथे कोणतेही केमिकलयुक्त पाणी सोडले जात नाही. त्या दृष्टीकोनातून त्या ठिकाणचे चॅनल मच्छिमारांसाठी, मच्छिमार व्यवसाय करणाऱ्यांसाठी स्वतंत्रपणे राखून ठेवलेले आहेत. त्या दृष्टीने नोटिफिकेशनदेखील झालेले आहे. परंतु आता बंदर खात्यामार्फत तेथे वेगवगळ्या लोकांमार्फत जेट्टी देण्याचे काम, वेगवेगळे उद्योग आणण्याचे काम केले जात आहे. सभापती महोदय, या सभागृहामध्ये या संदर्भात वेळोवेळी आश्वासने देण्यात आलेली आहेत. तेव्हा ही दोन्ही चॅनल्स मच्छिमारांसाठी राखीव कशी राहतील याची काळजी शासनाने घेतली पाहिजे अशी सूचना मी या निमित्ताने करू इच्छितो. तसेच राजापुरी कोळीवाड्यामध्ये मासळी सुकविण्यासाठीचे जे ओटे आहेत त्यांचे मध्यंतरी झालेल्या पुरामुळे आणि अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यांची तातडीने दुरूस्ती करण्यासाठी जी 50 लाखाची मागणी मत्स्य व्यवसाय व संवर्धन खात्याकडून केलेली आहे ती पूर्ण झाली पाहिजे अशी मी सूचना करतो आणि या पुरवणी मागण्यांवरील माझे विचार संपवितो.

****

(सभापतीस्थानी - माननीय तालिका सभापती श्री.विलास अवचट)

..... 3आर 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आजच्या पुरवणी मागण्यांमध्ये गृहखात्यावरील पुरवणी मागण्या मांडलेल्या आहेत त्या संदर्भात मला येथे काही प्रश्न उपस्थित करावयाचे आहेत. सभापती महोदय, बाब क्रमांक 14, पृष्ठ क्रमांक 13 आणि त्याच पानावरील बाब क्रमांक 16 या दोन बाबीसंबंधात मी प्रथम बोलणार आहे. पोलीस खात्याच्या गुप्त वार्ता गोळा करण्याच्या उद्देशाने हा खर्च यामध्ये दाखविला आहे. बाब 14 मध्ये 40 लाख रूपये आणि बाब क्र.16 मध्ये 2 कोटी 60 लाख रूपयांचा खर्च दाखविला आहे. हा एवढा सगळा निधी गुप्तावार्ता खात्यावर खर्च करावयाचा आहे, चांगली गोष्ट आहे. गुप्त वार्ता मिळविण्याची गरज आहे आणि हे सगळे खाते आहे ते समर्थपणे चाललेच पाहिजे, या खात्याने सदासर्वदा दक्ष असले पाहिजे. माहिती मिळविली पाहिजे. असे असले तरी अनेकवेळा असे घडते की, नक्षलवादी लोक पोलिसांवर हल्ले करतात, पोलिसांच्या गाड्या बॉम्बस्फोटाने उडवून लावतात. थोडक्यात सांगावयाचे प्रामुख्याने हे नक्षलवादी पोलिसांवर हल्ले करीत असतात. प्रत्येक वेळी जेव्हा जेव्हा आम्ही नागपूर अधिवेशनासाठी येथे येतो तेव्हा तेव्हा आम्ही हे पाहिले आहे की, या नक्षलवादी कारवायांवर अद्याप कंट्रोल आपण मिळविलेला नाही, किंबहुना त्या वाढत चालल्या आहेत. या बाबतीत एकदा माननीय मुख्यमंत्र्यांनी, उपमुख्यमंत्र्यांनी केंद्राशी चर्चा करून हे ऑपरेशन व्यवस्थित करावे आणि हा जो नेहमीचा रोग लागलेला आहे तो ठीक करावा. ही नक्षलवादी चळवळ आपल्या राज्यामध्ये का वाढते आहे हे यासाठी शोधले गेले पाहिजे. तेथील गरीब आदिवासी जनता आहे, त्या जनतेवर त्या भागातील पोलीस अन्याय करतात, त्यांचेवर संशय घेऊन अत्याचार करतात आणि मग भीक नको पण कुत्रे आवर अशी परिस्थिती तेथील जनतेची पोलिसांच्या बाबतीत होते व त्यांना वाटू लागते की, पोलिसांकडून आम्हाला त्रास होतो पण नक्षलवादी लोक मात्र आम्हाला मदत करतात. खरे म्हणजे आपल्या पोलिसांच्या गुप्तवार्ता खात्याने, या नक्षलवादी कारवाया तेथे कशा चालल्या आहेत याबाबत समाजाच्या निरनिराळया क्षेत्रामध्ये जाऊन त्याबाबत माहिती काढून त्यावर उपाय योजना करण्याची गरज आहे. अर्थात त्याबाबत आपल्याकडून उपाय योजना होत आहेत, नाही असे नाही, पण जे काही होते आहे त्याचे प्रमाण कमी आहे. त्या विभागात जे पोलीस आहेत त्यांच्याबाबतीत उलटसुलट आरोप होतात. तेव्हा या नक्षलवादी कारवाया कमी कशा होतील हे आपण पाहिले पाहिजे. या दोन्ही बाबीमधून जवळ जवळ 3 कोटी रूपये आपण देत आहोत, तर ते कशा पध्दतीने वापरले जाणार आहेत ? ... (यानंतर श्री.सरफरे ...3एस 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

जवळ जवळ 3 कोटी रुपये कशापध्दतीने वापरले जाणार आहेत, त्याचा उपयोग कसा होणार आहे. या संपूर्ण निधीचा वापर व फायदा कसा झाला हे पुढील वर्षी ज्यावेळी अशाप्रकारची मागणी येईल त्यावेळी त्याची माहिती द्यावी.

सभापती महोदय, पृष्ठ क्र. 15 व बाब क्रमांक 21 यामध्ये सुध्दा नक्षलवाद्यांकरिता पूरक मागणी करण्यात आली आहे. जे नक्षलवादी आत्मसमर्पण करीत आहेत, त्यांना आर्थिक मदत देण्यासाठी ही बाब आहे. त्यासाठी आपण जवळ जवळ 5 कोटींचा निधी मागितला आहे. म्हणजे आधीचे 3 कोटी आणि हे 5 कोटी रुपये नक्षलवादी चळवळीसाठी खर्च करणार आहात. ही नक्षलवादी चळवळ कशी फोफावते आहे याचा शोध खात्याने घेतला पाहिजे. केवळ त्यावर मोठया प्रमाणात खर्च करुन चालणार नाही. पोलीस दलाकडून ही चळवळ संपविण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. शेजारच्या राज्यामध्ये, आंध्रप्रदेश व हैद्राबादमध्ये नक्षलवादी चळवळ सुरु आहे. संपूर्ण देशामध्ये ही चळवळ फोफावली आहे. त्याठिकाणी कोणत्या प्रकारची उपाय योजना केली जात आहे याबाबत शोध घेऊन आपण उपाय योजना केली पाहिजे. त्या दृष्टीने हे गृह खाते काम करील असे मी मानतो.

सभापती महोदय, बाब क्र. 23 मध्ये नक्षलवाद्यांच्या हल्ल्यामध्ये बळी पडलेल्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी आपण 41 लाखाची तरतूद केली आहे. नक्षलवाद्यांच्या चळवळीमध्ये मोठया प्रमाणात सर्वसामान्य नागरीक बळी पडत आहेत, आदिवासी समाजाचे लोक बळी पडत आहेत, निरपराध लोक बळी पडत आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारची सुविधा लाभत नाही. त्यादृष्टीने या चळवळीकडे आपण पाहून अधिक लक्ष देण्याची गरज आहे. सभापती महोदय, बाब क्रमांक 24 व पृष्ठ क्र. 16 मध्ये वीज चोरीला आळा घालण्यासाठी नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती करणे यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. ही बाब सुध्दा मोठी चमत्कारीक आहे. राज्य विद्युत मंडळाने श्वेतपत्रिका जाहीर केली होती. त्या श्वेतपत्रिकेनुसार 39 टक्के वीज चोरीला जाते. 1 टक्के वीज चोरीला गेली तर 120 कोटी रुपयांचे नुकसान होते, 40 टक्के वीज चोरीला गेली तर किती नुकसान होत असेल? त्यासाठी आपण स्वतंत्र पोलीस दल निर्माण करीत आहात. अनेक वेळा चोरांची नावानिशी माहिती पोलीस स्टेशनला दिलेली असते. परंतु त्या ठिकाणी चोराला पकडून नंतर सोडून दिले जाते आणि निरपराध लोकांना पकडण्यात येते. दोन दिवसानंतर वीजेच्या प्रश्नावर चर्चा होणार आहे त्यावेळी मी सविस्तरपणे बोलणार आहे. फक्त एकच सांगावयाचे आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

की, वीजेची चोरी थांबविण्यासाठी केवळ पोलीस स्टेशन नेमून चालणार नाही. खरे तर या मंडळामध्येच जास्तीत जास्त चोरी करणारे लोक आहेत. त्यांच्या आशिर्वादाने, त्यांच्या मार्गदर्शनाखाली या चोऱ्या होत असतात याबाबत मी चर्चेच्या वेळी बोलेन. आणि आवश्यकता भासली तर काही लोकांची नावे सुध्दा घेईन.

सभापती महोदय, बाब क्र. 28 मध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून देण्यात येणाऱ्या सवलतींच्या पुस्तक समायोजनाकरिता तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी 100 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ही बाब मला समजली नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

ही योजना नेमकी काय आहे ? ही योजना कशासाठी आहे हे मला कळलेले नाही. म्हणून कृपया परिवहन विभागाच्या माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत खुलासा करावा. कारण याठिकाणी 100 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे आणि ही मोठी मागणी आहे. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत उत्तराच्या भाषणात माहिती द्यावी अशी विनंती करतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

. . . .3 टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, परिवहन व इतर मागासवर्गीय कल्याण विभागाच्या पान क्र.148 व 154 आणि बाब क्र.186 व बाब क्र.203 बाबत सांगावयाचे आहे. राज्यातील अनेक समाज आजही मागासलेल्या अवस्थेत आहेत. संख्येने लहान असलेल्या व विखुरलेल्या समाजाचा आवाज शासनापर्यंत पोहोचू शकत नाही. त्यामुळे वर्षानुवर्षे अशा समाजाच्या मागण्या प्रलंबित राहतात. त्यासाठी शासनाने एक अभ्यास गट नेमावा. महाराष्ट्रातील नाभिक समाजाच्या अनेक मागण्या सन 1989 पासून शासन दरबारी पडून आहेत. या समाजाच्या मागण्या फार अवास्तव नाहीत व शासनावर आर्थिक बोजा पडेल अशाही नाहीत. त्यांची पहिली मागणी आहे की, प्रत्येक एस.टी.स्टॅण्डच्या आवारामध्ये ज्याप्रमाणे रसवंती गृह, पेपरवाला, बेकरी, पानपट्टीचे दुकान, असते. त्याप्रमाणे एस.टी.स्टॅण्डच्या आवारामध्ये सलून साठी देखील जागा द्यावी. याचा फायदा फक्त त्या समाजालाच नाही तर त्यामुळे प्रवाशांचीही सोय होणार आहे. मी तर असे म्हणेन की, एस.टी.स्टॅण्डच्या आवारामध्ये धोबी, चर्मकार यांनाही जागा द्यावी. त्याठिकाणी धोबी बसेल तर तेथे जे प्रवासी उतरतात, त्यांना आपल्या कपडयांना इस्त्री करुन घेता येईल किंवा कोणाची वहाण तुटली तर तेथे चर्मकार असल्याने तो लगेच शिवून देऊ शकेल. त्यामुळे याठिकाणी अशा प्रकारची सोय केली तर ती अनाठाई होणार नाही. नाभिक समाज विखुरलेला आहे. त्यांना उभे करण्याच्यादृष्टीने " श्री.संतसेना आर्थिक विकास महामंडळ "स्थापन व्हावे अशी त्यांनी मागणी केली आहे, त्याचा सुध्दा जरुर विचार करावा. याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांपासून अनेक मंत्री महोदयांनी आश्वासन देऊन देखील त्याचा अद्याप विचार केलेला नसल्यामुळे परवा 12 तारखेला हजारोंच्या संख्येने त्यांचा मोर्चा येथे आला होता. त्यावेळीही माननीय समाजकल्याण मंत्री महोदयांनी त्यांना आश्वासन दिलेले आहे. याठिकाणी माननीय समाजकल्याण मंत्री उपस्थित आहेत, तर त्यांनी हे आश्वासन पूर्ण करावे अशी मी विनंती करते. कारण हे लोक आमच्याकडे सतत मागणी घेऊन येतात. त्यामुळे मी ही मागणी तुमच्यासमोर मांडत आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संबंधात पान क्र.161, बाब क्र.205 बाबत सांगावयाचे तर राज्यातील हॉस्पीटलनां लागणारा औषध पुरवठा अनेक वर्षापासून त्याच-त्याच कंपन्यांकडून करण्यात येतो. तरी याबाबतीत नव्याने निविदा काढून, दर्जेदार औषध खरेदी करुन त्याचा पुरेसा कोटा सर्व जिल्हा रुग्णालयामध्ये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपलब्ध करुन द्यावा. अपुऱ्या कोटयामुळे सामान्य माणसाची जी औषधाची गरज आहे, ती प्राथमिक आरोग्य

. . . .3 टी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी . . . .

केंद्रातून भागविली जात नाही.

सभापती महोदय, याच विभागाच्या बाब क्र.206 बाबत सांगावयाचे तर अनेक रुग्णालयात वर्ग-4 ची हजारो पदे 15-15, 20-20 वर्षे रोजंदारीवर राबविली जात आहेत. त्यांना कायम करण्याच्या दृष्टीने कुठेतरी विचार करण्याची आवश्यकता आहे. तसेच पान क.165, बाब क्र.208 नागपूर येथील बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय आणि अनुसंधान केंद्र या नावाने सुरु करण्यात आलेल्या रुग्णालयाला ज्यासाठी 8 कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत, त्या रुग्णालयात बांधकामासाठी फक्त अडीच कोटी रुपये देण्यात आले आहेत.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (पढे चालू...

सभापती महोदय, इंडोअर बिल्डिंग मेंटेनन्ससाठी अजून 32 लाखाची गरज आहे. आंतर रुग्ण विभाग तसेच फिनिशिंग वर्कसाठी अद्याप 4 कोटी रुपयांची गरज आहे. हॉस्पिटलला अद्याप लेखाशीर्ष क्रमांक मिळाला नाही तो तातडीने द्यावा. तो क्रमांक नसल्यामुळे त्यांचे सर्व आर्थिक व्यवहार मेयो हॉस्पिटलच्या हेडच्या अंतर्गत केला जातो. त्यामुळे या हॉस्पिटलला लवकरात लवकर लेखा शीर्ष क्रमांक देण्याची कार्यवाही माननीय मंत्री महोदयांनी करावी. वैद्यकीय शिक्षण विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे कोणकोणते विषय आहेत, याबद्दल आम्हाला गोंधळायला होते. या मंत्री महोदयांना तरी माहिती आहे की नाही कल्पना नाही.

सभापती महोदय, याशिवाय रुग्णालयामध्ये वर्ग चारची पदे भरलेली नाही, ती वर्ग चारची पदे भरावीत.

त्यानंतर सहकार व वस्त्रोद्योग विभागाचे पृष्ठ क्रमांक 221, बाब क्रमांक 241 च्या मागणीच्या संबंधाने मी वस्त्रोद्योग मंत्र्यांना सुचवू इच्छिते की, राज्यातील अनेक कापड गिरण्या आजारी अवस्थेत आहेत. विशेषत: ज्या गिरण्यांच्या भोंग्यावर मुंबई जागी व्हायची त्या भोंग्याचा आवाज बंद झ ाला आहे. त्या जागांवर बिल्डर लॉबीची वक्रदृष्टी पडलेली आहे. परंतु मुंबईला गत वैभव प्राप्त करुन देऊन मराठी माणसाचे हित साधायचे असेल तर ज्या शिल्लक गिरण्या आहेत, त्यांचे आधुनिकीकरण करुन त्या पुन्हा सुरु करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत. तसेच महाराष्ट्रातील सूत गिरण्यांची जी अवस्था आहे, ती शासनाला भुषणावह नाही. या सूत गिरण्यांना अनुदान देऊन जिवंत करावे, अशी मी शासनाला विनंती करते.

रोजगार, स्वयंरोजगार विभागाची बाब क्रमांक 266, पृष्ठ क्रमांक 243 या वर मी बोलणार आहे. सन 1991 पासून प्रलंबित असलेल्या राज्यातील जनगणना कर्मचाऱ्यांचा प्रश्न सुटावा म्हणून त्यांनी धरणे, मोर्चे, आमरण उपोषण वगैरे सर्व मार्गांचा अवलंब केला. त्यानुसार कोल्हापूर जिल्ह्यातील 265 जनगणना कर्मचाऱ्यांपैकी इतक्या वर्षात फक्त 145 कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेतले आहे. अद्याप 120 खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना वगळलेले आहे, त्यांनाही सामावून घेण्याबाबत विचार करावा, एवढे बोलून ज्या पूरक मागण्या सादर केलेल्या आहेत त्याला पाठिंबा देते आणि माझे भाषण संपविते. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, आजच्या पुरवणी मागण्यांच्या संबंधात मी माझे मनोगत व्यक्त करतो.

बाब क्रमांक 205 पान क्रमांक 161-162, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मागण्यांच्या संदर्भात बोलणार आहे. जिल्हा रुग्णालयामध्ये आणि विशेषोपचार कक्षाकरिता बरीचशी पदे भरण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

त्या पदाना आणि अन्य खर्चासाठी सुमारे एक कोटीची पुरवणी मागणी या ठिकाणी सादर केली आहे. जवळ जवळ 3347 पदे निर्माण करुन ती पदे भरण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये शिपाई, आया,सफाई कामगार, कक्ष सेवक, नळकारागीर, सुतार या सारख्या पदांवर शेकडो नेमणुका होणार आहेत. या सगळया नेमणुका नियमित वेतनश्रेणीवर होणार आहेत. मला वाटते आरोग्य विभागाने हा चांगला निर्णय घेतला आहे.आरोग्य विभागाने या संदर्भात शिक्षण विभागाला सुध्दा मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे. शिक्षण क्षेत्रात जे शिक्षण सेवक आहेत त्यांना आरोग्य विभागात आयांना जो पगार मिळणार आहे त्यापेक्षा कमी मानधन मिळते. म्हणजे उच्च माध्यमितक शाळेत शिकवणिा-या शिक्षकांचा पगार चार ते पाच हजार रुपये आहे. आणि इकडे आया आणि सफाई कामगार आमच्या एम.ए.बी.एड. शिक्षकापेक्षा जास्त पगार घेणार आहेत. याचाही शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे.ही सगळी पदे नियिमित वेतनश्रेणीमध्ये भरण्यात येत असल्यामुळे मी या विभागाचे अभिनंदन करतो.

बाब क्रमांक 187 पान क्रमां 149. सामाजिक न्याय विभाग. यामध्ये मोटारवाहन चालक प्रशिक्षणासाठी मागासवर्गीय प्रशिक्षणार्थींना वित्तीय सहाय्य देण्यासाठी ही पुरवणी मागणी सादर केली आहे. यामध्ये जवळ जवळ 12 लाख 53 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. दोन विशिष्ट जिल्यामध्ये ही योजना राबविली गेली. मला वाटते सन्माननीय मंत्रिमहोय, श्री. हंडोरेसाहेबांना याचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. ही योजना संपूर्ण राज्यभर राबविण्याचा त्यांनी चांगला निर्णय घेतलेला आहे.फक्त मागणीच्या संदर्भात मी शासनाकडून दोन-तीन गोष्टी जाणून घेऊ इच्छितो.हया योजनेचा राज्यभर विस्तार करण्याच्यादृष्टीने नियोजन केलेले आहे. किती विद्यार्थ्यांना या योजनेचा फायदा होणार आहे? त्यामध्ये एस.सी.चे किती विद्यार्थी आहेत. एन.टी.चे किती विद्यार्थी आहेत. एस.टी.चे किती विद्यार्थी आहेत. आणि ओबीसीच्या विद्यार्थ्यांना सुध्दा या योजनेंतर्गत ते सहाय्य करण्यात येणार आहे किंवा नही याचा येथे खुलासा होणे आवश्यक आहे.

बाब क्रमांक 188 पान क्रमांक 149.वसतिगृहाच्या विस्तराच्या कामासाठी जवळ जवळ 98 लाख 14 हजार रुपयांची मागणी केलेली आहे. त्यामध्ये 13 नवीन कामे सुरु करण्याचा विचार केलेला आहे. तसेच जी दोन कामे चालू आहेत ती कामे पूर्ण करण्यासाठी ही पुरवणी मागणी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

केलेली आहे. तेव्हा त्यातील 13 नवीन कामे कोणती आहेत? आणि कोणती दोन कामे पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत? याचा खुलासा होणे आवश्यक आहे. वसतिगृहाच्या बाबतीत संपूर्ण महाराष्ट्रात फार मोठया प्रमाणात तक्रारी आहेत. वसतिगृहामध्ये मिळणा-या सुविधा, विद्यार्थ्यांच्या राहनीमानाच्यादृष्टीने त्या ठिकाणी मिळणा-या सोयी यांची अत्यंत परवड आहे. याच्या संदर्भात फार तक्रारी आहेत. पण माझ्या माहिती प्रमाणे श्री. हंडोरे साहेबांनी ज्या ज्या वसतिगृहांना भेटी दिलेल्या आहेत त्या त्या वसतिगगृहांची परिस्थिती सुधारलेली आहे, हे निश्चितपणे मान्य करावे लागेल. पण श्री. हंडोरे साहेब हे प्रत्येक वसतिगृहाला भेट देऊ शकणार नाहीत. पण मला वाटते आपले नियंत्रण थोडेसे कडक केले तर निश्चित स्वरुपात या वसतिगृहांची अवस्था सुधारु शकते. वसतिगृहांच्या सुधारणेसाठी चांगले काम सुरु झालेले आहे.

बाब क्रमांक 189. पान क्रमांक क149. यामध्ये अधीक्षक, स्वंयपाकी,मदतनीस, चौकीदार यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याचा अत्यंत चांगला निर्णय घेतलेला आहे. अत्यंत तुटपुंज्या मानधनावर 500 ते 600 रुपयावर ही मंडळी काम करीत होती. त्यांच्या मानधनात वाढ करण्याचा जो निर्णय घेतलेला अहे, त्याबद्दल मी मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करतो. जवळ जवळ 20 कोटी 92 लाखाची पुरवणी मागणी या कर्मचा-यांसाठी केलेली आहे. याचा किती लोकांना फायदा होणार आहे.याची माहिती मिळाली तर फार बरे होईल

बाब क्रमांक 191 पान क्रमांक 150. यामध्ये विद्यार्थ्यांच्या शिक्षण फी आणि परीक्षा फी देण्यासाठी जवळ जवळ 1 कोटी 25 लाखाची मागणी केलेली आहे.सभापती महोदय, 2004-2005 ची फी देण्यासाठी ही तरतूद केलेली आहे. जवळ जवळ 3554 विद्यार्थ्यांना ही फी माफी परत मिळणार आहे. ही फी माफी 2004-2005 चे फी शुल्क परत द्यावयाचे असल्यामुळे ते विद्यार्थ्यांना मिळेल किंवा काय याबद्दल मी निश्चितपणे साशंक आहे. या विभागामध्ये काय घडते, अधिकरी काय करतात, संबंधित संस्थाचालक काय करतात याची मला पूर्ण जाणीव आहे आणि आपल्यालाही चांगल्या प्रकारे माहीत आहे. मी ते आपल्याला सांगण्याची आवश्यकता नाही.सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून आदरणीय मंत्रिमहोदयांना विनंती करणार आहे की, ...

यानंतर श्री. खर्चे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

कृपा करुन अशा प्रकारचा निर्णय शासनाने घ्यावा की ज्या लाभार्थ्यांना हे पैसे द्यावयाचे आहेत त्यांच्याच नांवाने ड्राफ्ट करुन अथवा चेकने ही रक्कम त्या मुलांना मिळाली पाहिजे अशी व्यवस्था करावी तरच खऱ्या अर्थाने शासनाने जी तरतूद केली आहे ती कारणी लागणार आहे.

त्यानंतर बाब क्र. 192, पृ.क्र.150 सैनिकी शाळांतील मागासवर्गीयांना निर्वाह भत्ता देण्याबाबत शासनाने ही 1.95 कोटीची तरतूद केलेली आहे. हा निर्वाह भत्ता सन 2004-05 व 2005-06 असा दोन वर्षांचा द्यावयाचा असून तो देखील त्या मुलांनाच मिळेल म्हणून चेकने ही रक्कम अदा करण्याबाबतचा निर्णय शासनाने घ्यावा. त्यानंतर व्यावसायिक महाविद्यालयांशी संलग्न असलेली जी वसतिगृहे आहेत त्या वसतिगृहातील मुलांच्या निर्वाह भत्त्यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आली असून ही रक्कम सुध्दा चेकनेच मिळाली पाहिजे अशी माझी विनंती आहे. ही रक्कम देखील सन 2004-05 मधील 2000 विद्यार्थ्यांना मिळावयाची आहे त्याबाबत देखील माझी अशी सूचना आहे की, ही रक्कम चेकने देण्यात यावी.

महोदय, बाब क्र. 194 आणि पृ.क्र.195 च्या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, पाचवी ते सातवीच्या मुलींना सावित्रीबाई फुले योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती योजनेसाठी 7.06 कोटीची तरतूद केली असून ही रक्कम देखील या मुलींना धनादेशानेच अदा करण्यात यावी. तसेच बाब क्र. 195 मध्ये तांडा वस्ती सुधारण योजनेअंतर्गत 10 कोटी रुपयाची तरतूद केली आहे. विशिष्ट विभागासाठी ही योजना शासनाने ठरवून दिलेली आहे, हा पैसा त्या भागातील तांडयांवरच खर्च झ ाला पाहिजे. तो तसा होत आहे की नाही याबाबत योग्य तो अंकुश ठेवणे आवश्यक आहे, तसा चेक-अप असणे आवश्यक आहे. तरच खऱ्या अर्थाने ज्या उद्देशाने आपण तांडयांच्या विकासासाठी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आपण 10 कोटी एवढया रकमेची तरतूद केली आहे. म्हणून खऱ्या अर्थाने त्यांनाच फायदा होण्यासाठी शासनाचा यावर काही तरी अंकुश असणे आवश्यक आहे व तशी उपाययोजना करण्यात यावी, अशीही माझी सूचना आहे.

यानंतर बाब क्र. 199, पृ.क्र.153 च्या संदर्भात या ठिकाणी अपंगांविषयीच्या शाळांना तदर्थ अनुदान देण्यासाठी 22.40 लाखाची तरतूद या ठिकाणी केलेली आहे. या ठिकाणी शासनाने 56 नवीन आणि विना अनुदानित शाळांसाठी हे अनुदान मागितलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

परंतु पुढे असेही म्हटले आहे की, या शाळा सुरु करण्यात येणार आहेत. याबाबतीत माझा संभ्रम असा आहे की, शाळा सुरु झालेल्या आहेत की, त्या सुरु होण्यापुर्वीच आपण हे अनुदान देणार आहात, याचे स्पष्टीकरणही मंत्री महोदयांनी करणे आवश्यक आहे. कारण ज्या शाळांना हे अनुदान द्यावयाचे आहे त्यांना आपण अनुदान दिले आहे की, देण्याचा विचार आहे, कारण शासन मान्यता देत आहे असा उल्लेख येथे केला आहे. म्हणजे ज्या शाळा अस्तित्वात यावयाच्या आहेत त्यांच्यासाठी हे अनुदान द्यावयाचे की काय, याचा खुलासा कृपया करावा, अशी माझी विनंती आहे.

यानंतर बाब क्र. 200 पृ.क्र. 153 च्या माध्यमातून शासनाने अपंगांकरिता 7 विना अनुदानित शाळांना मान्यता देण्याचे ठरविले आहे आणि त्यासाठी या 20.90 लाखाच्या रकमेची मागणी केली आहे. परंतु अस्तित्वात नसलेल्या शाळांना अगोदरच अनुदान देण्यासाठी तरतूद केली आहे की काय याबाबतचा खुलासा करावयाचा आहे. वास्तविक हया शाळा सुरु झालेल्या असून त्यांच्यासाठी ही मागणी करण्यात आली असे म्हणायला पाहिजे होते. याबाबतचा खुलासा करावा, अशी माझी सूचना आहे. कारण या अपंगांच्या शाळांच्या बाबतीत आज राज्यभरातून मोठया प्रमाणावर तक्रारी येत असतात. यासंदर्भात मी माननीय मंत्री महोदयांबरोबर एक दोन बैठका देखील घेतलेल्या आहेत. काही प्रश्न त्यातून सुटण्याच्या मार्गावर आहेत आणि काल याच संदर्भात चर्चा झाली आहे व अजून मी त्यांच्याकडे चर्चा करण्यासाठी वेळ मागणार आहे. अपंगांच्या शाळा ज्या भागात आहेत त्या भागात काम करणारे जे कर्मचारी आहेत ते या अंध आणि अपंग व असहाय्य विद्यार्थ्यांसाठी मोठया प्रमाणावर मेहनत करतात, आई-वडिलांसारखे त्या विद्यार्थ्यांना सांभाळतात. अशा कर्मचाऱ्यांची दुरावस्था होणे हे बरोबर नाही. त्या कर्मचाऱ्यांचे वेगवेगळे प्रश्न आहेत. त्यात त्यांच्या अनुज्ञप्तीचा प्रश्न देखील आहे. ज्या शाळांना पाच पाच वर्षे झालेली आहेत त्या शाळांची पाच वर्षानंतर देखील चौकशी होते व त्यानंतर खरोखरच हया शाळा चालण्यासारख्या आहेत काय असे शासनाला वाटते त्यावेळी त्यांना परमनेंट इंडेक्स नंबर मिळतो. तसेच ज्या शाळांच्या कुठल्याही तक्रारी नाहीत, श्रेणी चांगली आहे, दरवर्षी त्यांना अनुज्ञप्ती प्रमाणपत्र घेण्याची सक्ती करण्यात येते. परमनेंट अनुज्ञप्ती प्रमाणपत्र त्यांना दिले पाहिजे आणि

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

अशा शाळांच्या बाबतीत काही तक्रारी आल्या तर त्यांच्यावर कारवाई करण्याचा अधिकार शेवटी शासनाकडेच राहणार आहे. परंतु दरवर्षी त्यांना अनुज्ञप्ती प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्ताव पाठवावा लागतो, आणि असे प्रमाणपत्र मिळण्यासाठी काय काय कसरत करावी लागते हे आपणा सर्वांनाच माहिती आहे. किती लोकांच्या दाढया धराव्या लागतात, किती लोकांच्या पाया पडावे लागते, हे मी प्रत्यक्ष पाहिलेले आहे. अशा शाळांच्या बाबतीत शासनाने विचार करावा, अशी माझी सूचना आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

त्यामुळे हे सगळे बंद करावे आणि काही वर्षापुरते तात्पुरत्या स्वरुपाचे आणि पुढे मात्र कायमस्वरुपी अनुज्ञाप्ती प्रमाणपत्र मिळण्याच्या संदर्भात निर्णय घ्यावा. दुसरा एक महत्वाचा प्रश्न अपंगाच्या शाळांच्या बाबतीत आहे. प्रवेशासंबंधीची क्षमता डीसेबिलीटी ॲक्टमध्ये 40 टक्क्याची होती ती आपण 60 टक्क्यावर केली आहे. यासंदर्भात या सभागृहात विरोध होऊन त्यावर चर्चा देखील झाली होती.

त्यामुळे कायद्याच्या तरतुदीप्रमाणे ते प्रमाण 40 टक्केच असले पाहिजे. कायद्याविरुध्द परिपत्रक काढून आपल्याला निर्णय घेता येणार नाही. त्यामुळे प्रवेशाच्या संदर्भात विद्यार्थ्यांचे अपंगत्व 40 टक्केच असावे यासंदर्भातील खुलासा माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा तसेच बाब क्रमांक 201 मध्ये श्रावणबाळ योजनेसाठी 20.26 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. खरे म्हणजे आकस्मिक खर्च झाला तर तो पुरवणी मागणीत येणे हे आम्ही समजू शकतो परंतु श्रावणबाळ योजना ही महत्वाची योजना आहे त्यामुळे या योजनेसाठी पैसा कमी पडला म्हणून 20.26 कोटी रुपयांची बाब पुरवणी मागणीत येणे हे मला योग्य वाटत नाही. सुरुवातीलाच यासंदर्भात मागणी येणे आवश्यक होते. या ठिकाणी मला पुरवणी मागणीवर बोलण्याची आपण जी संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करुन मी माझे बोलणे संपवितो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.:पृ.शी./मु.शी.: कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री):सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो. कामकाज सल्लागार समितीच्या बुधवार दिनांक 14 डिसेंबर, 2005 रोजी भरलेल्या बैठकीत गुरुवार दिनांक 15 व शुक्रवार दिनांक 16 डिसेंबर, 2005 रोजीचे सभागृहाचे कामकाज पुढील प्रमाणे ठरविण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचा कार्यक्रम छापावा.)

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2005-2006 च्या पूरक विवरणपत्रावर

चर्चा पुढे सुरु.

ॲड. अनिल परब (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, गृहविभागाच्या पुरक मागण्यावरील बाब क्रमांक 16, पृष्ठ क्रमांक 16 वर मी बोलू इच्छितो. यामध्ये गुप्तसेवांकरिता अतिरिक्त तरतूद, कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता गुप्त माहिती गोळा करणे, गुन्हेगांराना शोधून काढणे, पोलिसांच्या खब-यांना पैसे देणे, सापळा रचणे, धोरणीपणे सापळा रचणे इत्यादीबद्दल पाठपुरावा करण्यासाठी पोलीस विभागासाठी तरतूद करणे असे या ठिकाणी म्हटलेले आहे. गुप्त विभागाकडून माहिती घेणे, चौकशी करणे यासाठी ही तरतूद असली तरी मी याबाबतीत एकच उदाहरण देऊ इच्छितो की, नुकतीच मालवणला जी पोटनिवडणूक झाली या पोटनिवडणूकीत शिवसेनेचा एक कार्यकर्ता श्री. रमेश गावकर हा 11 नोव्हेंबर पासून गायब आहे. या कार्यकर्त्याच्या पालकांनी 11 तारखेला पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविलेली आहे. 11 तारखेपासून तो आजतागायत सापडलेला नाही. यासंदर्भात मी उच्च न्यायालयात एक हेबियस कॉर्पस दाखल केलेले आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब....

हॅबिअस कॉर्पस्च्या सुनावणीच्या वेळी पोलीस अधिकाऱ्यांना उपस्थित रहावे लागते. परंतु, त्यावेळी कोणीही पोलीस अधिकारी उपस्थित नव्हता. तेव्हा न्यायाधीश साहेबांनी सांगितले की, पुढच्या वेळी तपास अधिकारी किंवा अन्य अधिकाऱ्यांनी माहिती घेऊन हजर रहावे. ज्यावेळी हॅबिअस कॉर्पस्ची सुनावणी असते त्यावेळी न्यायाधीश संबंधिताला 24 किंवा 48 तासात हजर करावे असे आदेश देतात. परंतु, अधिकारी निवडणुकीत गुंतले असल्यामुळे पुढची तारीख मागण्यात आली. पुढची तारीख मागण्यासाठी पैसा खर्च करणार असाल तर त्याचा काय उपयोग ? आजपर्यंत शोधापर्यंत कुठलीही चौकशी गेलेली नाही. पोलिसांनी प्रतिज्ञापत्र सादर केल्यानंतर त्यांनी काय काय प्रयत्न केले हे कथन करणे आवश्यक असते. नातेवाईकांकडे जाऊन चौकशी करायला हवी. असे असताना त्याचा मित्र श्री.प्रविण कोरगावकर याला पोलिसांनी उचलून नेले आणि झोडले व त्याला सांगितले की, जी.जी.उपरकर असे लिहू दे. एका बाजूला न्याय मिळावा म्हणून निधीची तरतूद करीत आहोत, तर दुसऱ्या बाजूला पैसे पाण्यात जात आहेत. अशाप्रकारे एकतर्फी कारवाई होत आहे म्हणून माझा या मागणीला विरोध आहे. माझे असे मत आहे की, योग्य कारणासाठी निधीचा वापर झाला पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्रमांक 36 - कारागृह विभागाच्या तुरुंग अधिकारी ते रक्षक यांना देण्यात येणाऱ्या आहार भत्त्याच्या दरात सुधारणा करणे या बाबीवर बोलणार आहे. कारागृहातील तुरुंग अधिकारी ते रक्षक यांच्या आहार भत्त्यात वाढ करण्यासंबंधीची मागणी सभागृहासमोर आली आहे. तेव्हा मी उपमुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, तुरुंगातील किती रक्षक व अधीक्षक स्वत:च्या घरचे जेवतात यासंबंधीची त्यांनी माहिती द्यावी. बंदींसाठी घरून जे डबे येतात, ते तपासणीच्या नावाखाली अर्धे केले जातात. सगळे पोलीस बंदींसाठी आलेल्या डब्यातीलच अन्न जेवतात. ते स्वत:च्या घरातील अन्न जेवत नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, कारागृहातील बंदींना घरातून येणाऱ्या अन्नाद्वारे कोणतीही इजा होऊ नये म्हणून अन्नाची चव घ्यावी लागते. म्हणून पहिले पोलीस अन्न जेवतात आणि मग बंदी जेवतात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, सन्माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले ते अतिशय योग्य आहे. बंदींना बाहेरच्या जेवणातून विषबाधा होऊ नये म्हणून जेवण तपासण्यासाठी एक अधिकारी नेमलेला असतो. हा अधिकारी प्रथम मांजर किंवा कुत्र्याला अन्न देतो. त्यांनी अन्न खाल्ल्यानंतर मग ते अधिकाऱ्यांना खायचे असते. अशी फार जुनी पध्दत आहे. कारागृहातील जे अधिकारी किंवा रक्षक हे स्वत:च्या घरचे जेवत असतील तर त्यांना आहार भत्ता देण्यास हरकत नाही. मात्र ते जे अधिकारी किंवा रक्षक हे बंदींच्या डब्यातील अन्न खातात त्यांना आहार भत्ता देण्यास माझा विरोध आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

.....

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री नतिकोद्दीन खतिब (महाराष्ट्र विधानसभा सदस्यों द्वारा निर्वाचित): सभापति महोदय, मैं वर्ष 2005-06 की पूरक मांगों का समर्थन करने के लिए खड़ा हूं. बाब क्रमांक 22, गृह विभाग - इस मांग के अन्तर्गत मैं यह कहना चाहता हूं कि महाराष्ट्र में पुलिस सिपाही के करीब 10-11 हजार पद रिक्त हैं. कई पुलिस सिपाहियों ने अपने कर्तत्य का पालन करते हुए अपनी जान दी है, कई पुलिस सिपाही नक्सलवादियों के हमले में अपनी जान गवां चुके हैं, कई सिपाही दुर्घटना, बीमारी इत्यादि वजह से मर गए हैं. मेरी यह मांग है कि इन मृत सिपाहियों के बच्चों को अनुकंपा तत्व पर नौकरी प्रदान करें. दो तीन साल से सिपाहियों के बच्चें नौकरी की प्रतीक्षा कर रहे हैं. मेरी माननीय मंत्री जी से विनती है कि 400-500 सिपाहियों के बच्चें हैं, जिन्होंने अनुकंपा तत्व पर नौकरी देने हेतु अर्जी दी हैं, उनके अर्जी पर विचार करें और उन्हें नौकरी प्रदान करें. ताकि बॅकलॉग भी दूर हो सकेगा और जिन सिपाहियों ने देश की रक्षा के लिए अपनी सेवा अर्पित की है उनके बच्चों को भी न्याय मिल सकेगा.

सभापति महोदय, ग्रामीण क्षेत्र में जो पुलिस थाने हैं, उनकी हालत बहुत खराब है. इन पुलिस थानों में न तो कम्प्यूटर है, न तो फर्नीचर है, न पर्याप्त स्टाफ है और न ही आवश्यक सामान हैं. इसलिए मेरी मंत्री महोदय से विनती है कि ग्रामीण क्षेत्र के पुलिस थानों को आवश्यक वस्तुएं तुरंत मुहैया कराए और इन थानों को कम्प्यूटर के माध्यम से जिले के थानों से जोड़ने की व्यवस्था करें ताकि वहां के स्टाफ को कार्य करने में सुविधा हो सके.

सभापति महोदय, मैं महसूल विभाग के अन्तर्गत रखी गई पूरक मांग के सिलसिले में यह कहना चाहता हूं कि अकोला जिले में बालापुर तहसील है. अकोला में इस साल बाढ़ आई थी, जिससे नगरपरिषद का और नगरपरिषद क्षेत्र में काफी नुकसान हुआ था. इस दृष्टि से प्राकृतिक आपदा के संबंध में नगरपरिषद को अनुदान दिया जाना चाहिए. इस विषय से संबंधित फाईल मंत्रालय में पेंडिंग है. इस फाईल का जल्द से जल्द निपटारा किया जाए ताकि नगरपरिषद को अनुदान मिलने के बाद रोड, पुल, मरम्मत एवं अन्य आवश्यक कार्य किए जा सके. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2005-2006 च्या पूरक मागण्या या सभागृहासमोर आलेल्या आहेत त्या पुरवणी मागण्यांचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महादेय, मी फक्त दोन-तीन बाबींकडे लक्ष वेधाणार आहे. बाब क्रमांक 40, पृष्ठ क्रमांक 21- कोकण रेल्वे महामंडळासाठी भांडवली अंशदानाकरिता 11 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. महामंडळाचे अधिकृत भांडवल 806 कोटी रुपयांचे असून राज्य शासनाने 164.46 कोटींची रक्कम महामंडळास पूर्वीच दिलेली आहे. आता उरलेल्या 11 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. राज्य शासनाचे मी अभिनंदन करतो कारण कोकण रेल्वे ही कोकणवासियांचे स्वप्न होते. हे स्वप्न ऊराशी बाळगून कोकणी माणूस जगत होता. काही दिवसांपूर्वी या सदनामध्ये आपण प्रा.मधु दंडवते यांच्याबद्दलचा शोकप्रस्ताव आणला होता. त्यांचे स्मरण त्या निमित्ताने झाले. केंद्रामध्ये प्रा.मधु दंडवते वित्त मंत्री होते, जॉर्ज फर्नांडीस हे रेल्वे मंत्री होते आणि आपल्या राज्यामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार होते. ज्यावेळी केंद्रात कोकण रेल्वेचा प्रस्ताव आला, त्यावेळी इतका खर्च करणे शक्य होणार नाही असे उत्तर देण्यात आले होते. तरी सुध्दा कोकणामध्ये रेल्वे धावली पाहिजे म्हणून कोकण रेल्वे महामंडळ निर्माण करण्यात आले. ज्या ज्या राज्यांतून ही रेल्वे जाईल त्या त्या राज्यांचे कॉन्ट्रीब्युशन घेण्याचे ठरले. अशाप्रकारे हा रेल्वे प्रकल्प अस्तित्वात आला. या महामंडळाचे भागभांडवल 806 कोटी रुपये होते त्यापैकी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांनी 177 कोटी रुपये मंजूर केले होते. एवढेच नव्हे तर गोवा, कर्नाटक आणि केरळ ही राज्ये कोकण रेल्वे प्रकल्पात येत असाताना सुध्दा एक-दोन राज्यांची हमी आपल्या राज्य सरकारने घेतली होती. आता हा कोकण रेल्वे प्रकल्प पूर्ण झालेला आहे. जी काही रक्कम राहिली आहे, त्याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.गायकवाड.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी ...

सभापती महोदय, यानंतर मला वन खात्याची जी एकच पूरक मागणी आहे त्यासबंधी बोलावयाचे आहे. बाब क्रमांक 61 पान नंबर 37 वर .सांगली येथे वनीकरण करण्यासाठी 94लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे.माननीय वन मंत्र्यांना मला या चर्चेच्या निमित्ताने असे सांगावयाचे आहे की संपूर्ण राज्यात वन खात्याच्या अंतर्गत आणि वन संज्ञेच्या अंतर्गत 62,500हेक्टर जमीन ताब्यात घेण्यात आली आहे. त्यातील 42,.500 हेक्टर जमीन एकटया सिंधुदूर्ग जिल्हयातील आहे सॅटेलाईटवरुन पाहणी करण्यात आली होती आणि जेथे जेथे हिरवागार भाग त्यांना दिसला तो सर्व भाग शासनाने घेतला पाहिजे. अशा प्रकारची भूमिका घेण्यात आली होती. ही जमीन खाजगी असतांना वन संज्ञे खाली ती जमीन आणल्यामळे त्या जमिनीवर घर बांधावयाचे असेल, झाडे लावावयाचे असेल वा असलेले झाड तोडावयाचे असेल वा गोठा बांधावयाचा असेल तर वन खात्याचे अधिकारी सबंधित शेतक-यांना काहीही मदत करीत नाहीत. वन संज्ञे खालीही जमीन आणल्यामुळे त्या ठिकाणी मोठया प्रमाणापवर अडचण निर्माण झाली आहे.ज्यावेळी युतीचे शासन होते त्यावेळी तत्कालीन जिल्हाधिका-यांनी 42 हजार 500 हेक्टर जमिनीच्या बाबतीत प्रस्ताव तयार केला होता त्यानंतर पुन्हा पाहणी करण्यात आली होती आणि त्या पाहणीनुसार पुन्हा आठ हजार हेक्टर जमीन वन संज्ञेखाली आणावयास पाहिजे होती परंतु त्या दरम्यान सुप्रीम कोर्टामध्ये उत्तरप्रदेश राज्यातील एकजण गेले होते व सुप्रीम कोर्टाने जो निर्णय दिला होता त्या संदर्भात राज्य शासनाने एक नोटीस काढली होती आणि कोणत्याही अधिका-याला वा मंत्रिमहोदयांना न विचारता वन खात्याच्या अधिका-यांनी सुप्रीम कोर्टात ॲफेडेव्हिट फाईल केले होते.त्यामुळे सिंधुदूर्ग जिल्हयातील 42500 हेक्टर जमीन घेण्याच्या बाबतीत तेथे शिक्कामोर्तब करण्यात आले होते.आज त्यामुळे तेथील शेतकरी अडचणीत आलेले आहेत हा मुद्दा मी या चर्चेच्या निमित्ताने माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो.यानंतर मला दुसरा एक मुद्दा मांडावयाचा आहे कर्नाटकातून दोडामार्ग परिसरात मोठया प्रमाणावर हत्ती येतात आणि ते शेतातील पिकांची मोठया प्रमाणावर नासधूस करीत असतात..तेव्हा या हत्तीना पुन्हा पाठविण्याच्या बाबतीत वन खात्याकडे कोणती योजना आह ? हे आम्हाला माहीत नाही.मध्यंतरी "एलिफन्ट गो बॅक टू होम" अशी मोहीम काढण्यात आली होती आणि त्यामध्ये मीसुध्दा सामील झालो होतो. माननीय उपमुख्यमत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की त्यावेळी मला जो काही अनुभव आला होता

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याचे वर्णन मी या ठिकाणी चांगल्या प्रकारे करु शकतो. "एलिफन्ट गो बॅक टू होम" ही मोहीम अयशस्वी झाली आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, "एलिफन्ट गो बॅक टू होम " असा आम्ही इंग्रजीतून बोर्ड लावला होता परंतु हे हत्ती कर्नाटकातून आलेले असल्यामुळे व त्या हत्तीना इंग्रजी समजत नसल्यामुळे आता जंगलात लावण्यात येणारे बोर्ड हे कन्नड भाषेतून लावण्यात येतील.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या जंगली हत्तीचे आक्रमण थांबविण्यासाठी काही तरी करा यासाठी सावतवाडी व दोडामार्ग या भागातील शेतकरी सतत टाहो फोडत आहेत..मध्यंतरी हे हत्ती गोव्यामध्ये गेले होते आणि तेथे त्यांना अडविण्यात आले होते परंतु कर्नाटकामध्ये परत न जाता पुन्हा सावंतवाडी आणि दोडामार्ग परिसरात ते स्वैरपणे वावरत आहेत. त्या भागातील शेतामध्ये जे काही पीक होते त्याचे नुकसान त्यांनी केले आहे. त्याचबरोबर फोफळी आणि नारळाच्या बांगाचेसुध्दा त्यांनी नुकसान केलेले आहे.ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहे त्यांना नुकसानभरपाई देण्यात येईल असे शासनाने जाहीर केलेले आहे परंतु त्याबाबतीत काहीही कार्यवाही झालेली नाही या हत्तीचे आक्रमण थांबविण्यात आले पाहिजे आहे आणि शेतक-याच्या पिकाची जी हानी होते ती थांबविण्याचा प्रयत्न करण्यात यावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. कुलकर्णी ...

सभापती महोदया, मी शेवटचा मुद्दा आता येथे मांडणार आहे. बाब क्रमांक 217, पृ.174 - लातूर येथे आपण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय दिले आहे तयासाठी 78 लाख 13 हजाराचा खर्च दाखविला आहे. सभापती महोदय, यापूर्वी सन्माननीय श्री.खानविलकर हे आरोग्यमंत्री असताना या राज्यामध्ये 3 मेडिकल कॉलजेस सुरू करण्यात आली होती. पैकी एक लातूर, दुसरे कोल्हापूर आणि तिसरे अकोला येथे करण्यात आले. पण आज संपूर्ण कोकणपट्टीमध्ये कोठेही मेडिकल कॉलेज नाही. त्यासाठी आम्ही येथे सातत्याने मागणी करीत आहोत. रत्नागिरी येथे एक सुसज्ज असे हॉस्पिटल आहे, तेव्हा रत्नागिरी येथे तरी मेडिकल कॉलेज देण्यात यावे. आज संपूर्ण कोकणपट्टीमध्ये, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे या ठिकाणी एकही शासकीय मेडिकल कॉलेज नाही. ठाणे येथे जे हॉस्पिटल आहे ते वेड्यांचे हॉस्पिटल आहे. तेव्हा कोकणपट्टीला एक तरी मेडिकल कॉलेज आपण द्यावे. आम्ही त्याची व्यवस्था करू शकणार नाही असे शासनाला वाटते आहे का ? राज्यामध्ये इतरत्र आपण मेडिकल कॉलेजेस देत असताना माझी या निमित्ताने मागणी आहे की, या पुढील काळामध्ये, पुढील वर्षामध्ये ज्याप्रमाणे ही तीन मेडिकल कॉलेजेस देण्यात आली तशाच पकारे कोकणाला देखील मेडिकल कॉलेज मिळाले पाहिजे. माझ्या या मागणीचा आपण गांभीर्याने विचार करावा अशी विनंती करून मी आपली रजा घेतो.

****

..... 4बी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, पृ.161, बाब क्रमांक 205 - शासकीय रूग्णालयांसाठी औषधे व साधन सामग्रीसाठी 3 कोटी 11 लाख 90 हजाराची पुरवणी मागणी येथे करण्यात आलेली आहे. ही 1998 पासून 2000 पर्यंतची तरतूद आहे. तोपर्यंत आपण औषधे रूग्णांना कशी दिली ? त्यांना औषधे लिहून देऊन बाहेरून आणा म्हणून सांगितले काय ? आणि पुढे 2005 पर्यंत आपण काहीच दिलेले नाहीत. तेव्हा त्यासाठी 2010 साली आपण देणार आहात काय ? याचा खुलासा कृपया मंत्री महोदयांनी करावा.

त्यानंतर पृ.165, बाब क्र.210 - 14 जिल्ह्यांमध्ये ग्रामीण हॉस्पिटल्स अनुशेष समितीच्या अहवालानुसार करणार आहात. त्यासाठी वार्षिक खर्च सुमारे 16 कोटी पर्यंत येणार आहे. येथे तरी आपण औषधे आणि साधन सामग्री देणार आहात काय ? की, पाच वर्षांनंतर देणार आहात ?

सभापती महोदय, त्यानंतर पृ.166, बाब क्र.211 च्या संदर्भात बोलताना मी शासनाचे अभिनंदन करणार आहे. डॉ.आनंदीबाई जोशी गौरव पुरस्कार देण्यासाठी म्हणून ही 50 लाखाची तरतूद केलेली आहे पण ती खूप उशीरा केलेली आहे. जमदग्नीसारखा पती श्री.गोपाळराव जोशी यांनी आपल्या पत्नीला शिकविण्यासाठी, डॉक्टर करण्यासाठी जंगजंग पछाडले, पत्नीला विलायतेमध्ये पाठविले आणि ती बाई देखील परदेशामध्ये जाऊन शिकली आणि येथे आल्यानंतर प्रत्यक्ष तिच्या ज्ञानाचा लाभ येथील लोकांना झाला नाही. पण पहिली महिला डॉक्टर म्हणून आज तिचे नाव घेतले जाते. ज्यावेळेस शिक्षणाचे काहीही साधन नव्हते, सुविधा नव्हत्या अशा काळामध्ये अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये या बुद्धीमान महिलेने आपले शिक्षण परदेशामध्ये जाऊन पूर्ण केले. तिच्या पतीने तिचा गौरव तर केलाच पण त्याची जाण अुशीरा का होईना शासनाने ठेवली आहे आणि राज्यातील कुटुंब कल्याण कार्यक्रमात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अशासकीय संघटना, आरोग्य संघटना, आणि महिला डॉक्टर यांना आपण डॉ.आनंदीबाई जोशी यांच्या नावाने पुरस्कार देणार आहात. ही नवी सेवा आहे. तरीही परत परत याबद्दल शासनाचे मला अभिनंदन करावेसे वाटते.

त्यानंतर पृ.13, बाब 15 - सापळा रचून जप्त केलेली रक्कम तक्रारदारांना परत करण्यासाठी 18.60 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून एखादा माणूस पुढे येऊन भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी म्हणून स्वत:चे पैसे देऊ करतो.,

..... 4बी 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती रायकर ...

उदाहरण द्यायचे झाले तर श्री.अरविंद चोबे नावाच्या एका शिक्षकाने एका इन्स्पेक्टरच्या विरोधात जाऊन 80 हजार रूपये देऊ केले होते. त्याची रक्कम त्याला उशीराने परत मिळाली. पण यासाठी इतका उशीर का लागतो ? ज्यांनी अशा कामासाठी रक्कम दिली असेल तर ते काम झाल्यानंतर लगेचच महिनाभरामध्ये त्याची रक्कम त्याला परत का केली जात नाही ? कालांतराने त्यासाठी तरतूद कशासाठी करावी लागते आहे ? काम झाल्याबरोबर लगेचच ज्याची त्याला रक्कम देऊन टाकावी. अन्यथा भ्रष्टाचार रोखण्यासाठी समाजातून कोणीही पुढे येणार नाही. अशा कामासाठी रक्कम गुंतविल्यानंतर ती लगेच परत मिळत नसेल तर ती रक्कम देणाऱ्यास प्रश्न पडतो की, आम्ही रक्क्म कशासाठी द्यायची ? तेव्हा शासनाने त्वरित याबाबत खुलासा करावा तसेच याबाबत ताबडतोब कारवाई केली तर बरे होईल.

(यानंतर श्री. सरफरे .... 4सी 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर...

अजून सुध्दा श्री. अरविंद चौबे हे न्यायालयाने चुकीचा निर्णय दिला म्हणून चार वर्षापासून नोकरीच्या बाहेर आहेत. त्यामुळे त्यांना आज दाद मागण्यासाठी उच्च न्यायालयामध्ये जावे लागले आहे. अशाप्रकारे जर न्याय मिळणार असेल तर भ्रष्टाचार रोखण्यासाठी कुणीही पुढे येणार नाही? सभापती महोदय, पृष्ठ क्र. 33 वरील बाब क्र. 54 मध्ये राज्यातील पूरजन्य नैसर्गिक आपत्तीवरील खर्च भागविण्यासाठी तरतूद केली आहे ही चांगली गोष्ट आहे. परंतु खरोखरच जे गरजवंत आहेत त्यांना ही मदत मिळाली नाही. यामध्ये मदतीचे वाटप करीत असतांना जे आपल्या जवळचे आहेत, लोकप्रतिनिधींना देखील त्यांच्या जवळचे जे आहेत त्यांनाच मदत दिली गेली आहे. त्यामध्ये दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर रहाणाऱ्या लोकांना त्यांचे काहीही नुकसान झाले नसतांना मदत दिली गेली आहे.

सामाजिक न्याय विभागाच्या पृष्ठ क्र. 148 वरील बाब क्रमांक 185 मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज वस्तुसंग्रहालयाला सहाय्यक अनुदान देण्यासाठी तरतूद केली आहे. ही चांगली बाब आहे. आपण दरवेळी तरतूद करुन मोठया लोकांचे पुतळे उभे करतो. परंतु त्यांच्या जीवनातील वैशिष्टयपूर्ण कार्य आहे त्याचा परिचय लोकांना करुन देणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे आपण आनंदीबाई जोशी यांच्याबाबतीत केले आहे. त्याप्रमाणे आपण राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या बाबतीत देखील करीत आहात ही चांगली गोष्ट आहे. त्यानंतर पृष्ठ क्र. 149 व बाब क्र.189 मध्ये स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या अनुसूचित जातींच्या मुलामुलींसाठी अनुदानित वसतिगृहाकरिता सहाय्यक अनुदान देण्यासाठी तरतूद केली आहे. या मागणीव्दारे आपण वसतिगृहातील कर्मचाऱ्यांच्या मानधनामध्ये वाढ केली आहे ही चांगली गोष्ट आहे. परंतु याबाबत आपण जर तपासणी केली तर अधिक चांगले होईल. कित्येक वेळा या स्वयंसेवी संस्थांच्या वसतिगृहांमध्ये मुलींची हेळसांड होत असते. विधीमंडळाची महिला तदर्थ समिती नेमण्यात आली होती, त्या समितीने याबाबत विश्लेषण केले आहे. या वसतिगृहातील मुलींना योग्य प्रकारच्या सुविधा पुरविल्या जातात काय? त्या कर्मचाऱ्यांना मिळतात काय? तसे होत नाही तर संस्था चालक त्या सुविधा घेऊन जातात. म्हणून त्यांची सखोल चौकशी करावी. पृष्ठ क्र. 150 मध्ये बाब क्र. 191 मध्ये तरतूद करुन आपण गेल्या वर्षीची 2004-05 ची फीची रक्कम यावर्षी देत आहात. ही फीची रक्कम देण्यासाठी आपल्याला एक-एक वर्षे उशीर कां लागत आहे? गरीब मुलांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर...

शिक्षणाच्या चांगल्या सोयी दिल्या पाहिजेत. म्हणून गेल्या वर्षीची फी आपण यावर्षी देणार आहात ही गोष्ट योग्य नाही. बाब क्र. 192 मध्ये देखील तीच मागणी करण्यात आली आहे. सैनिक शाळांमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्यासाठी अतिरिक्त तरतूद केली आहे. 2004-05 मध्ये याकरिता 645 अर्ज प्रलंबित होते. यावर्षी म्हणजे 2005-06 मध्ये 699 अर्ज आले आहेत. दोन्ही वर्षाचे मिळून आपण 1 कोटी 95 लाख 56 हजार रुपये देणार आहात. माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विचारल्याप्रमाणे हे पैसे आपण चेकने देणार आहात काय? कां मुलांचे अंगठे घेऊन दुसऱ्याकडे हे पैसे जाणार आहेत? त्याचप्रमाणे बाब क्र. 193 मध्ये आपण निर्वाह भत्ता देण्यासाठी तरतूद केली आहे. त्याकरिता 2004-05 मध्ये 1967 अर्ज आले व 2005-06 मध्ये 3992 अर्ज आले . त्यासाठी आपण 1 कोटी 95 लाख 59 हजार रुपयांची तरतूद केली आहे. ही रक्कम आपण उशीरा कां देत आहात याचा खुलासा केला पाहिजे. बाब क्र. 194 मध्ये इयत्ता पाचवी ते सातवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती देण्यासाठी अतिरिक्त तरतूद केली आहे. आज काल मुली शिक्षण घेण्यासाठी पुढे येत नाहीत किंवा त्यांना पुढे आणले जात नाही. त्यासाठी आपण 300 वरुन 600 रुपये इतकी शिष्यवृत्ती केली आहे ही चांगली गोष्ट आहे. 2004-05 मधील शिष्यवृत्तीची रक्कम आपण यावर्षी देणार आहात त्यासाठी 7 कोटी 6 लक्ष 90 हजाराची तरतूद करण्यात आली आहे. सभापती महोदय, पृष्ठ क्र. 153 व बाब क्र. 199 मध्ये आपण अंध, अपंग, मनोविकलांग यांसाठी तरतूद केली आहे. खरे म्हणजे हे खातेच अपंग झाले आहे असे कधी कधी म्हणावेसे वाटते. या शाळांतील शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार मिळत नाही. त्यामुळे दरवर्षी ते याठिकाणी धरणे व उपोषणे करीत असतात. कधी तरी कां होईना पगार मिळाल्याबद्दल त्यांना समाधान वाटत असते. आपण याठिकाणी तीन-तीन वर्षाची अनुज्ञप्तीची योजना आणली आहे. त्यासाठी सुध्दा त्यांना खूप कष्ट करावे लागले. महिन्याच्या महिन्याला त्यांना आपल्या पगारासाठी सुध्दा चिरीमिरी द्यावे लागते.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर . . . .

येथील शाळेतील कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करावी यासाठी गेल्या दहा वर्षापासूनची मागणी आहे. ती मागणी मंत्रीमंडळाने नामंजूर केली. कोर्टाने आदेश दिल्यामुळे पुन्हा आता ही मागणी मंत्रीमंडळापुढे जाणार आहे. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश शासन लवकर पाळत नाही. हे आदेश पाळावेत अशी माझी विनंती आहे आणि आता अपंगांचे प्रश्न सुटतील अशी आशा आहे. या शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी 40 टक्के अपंगत्वाची अट आहे आणि यावर बरेच सन्माननीय सदस्य बोलले आहेत. मी मागे एका अपंग शाळेमध्ये गेले असताना तेथे एक लहान मुलगी होती. तिचे पाय लहान होते. 40 टक्के अपंगत्व पाहिजे असे म्हणता, पण ते कसे ठरवता ? याचे आश्चर्य वाटते. या मुलीची स्थिती पाहिल्यानंतर खूप वाईट वाटले. माझ्या बरोबर माजी सभापती प्रा. ना. स. फरांदेसाहेब होते. त्यांनी त्या मुलीला उचलून टेबलावर बसविले तिची अवस्था पाहिल्यावर त्यांच्याही डोळयात पाणी आले. नागपूर येथील शाळेमध्ये 50 कर्मचारी अतिरिक्त आहे, त्यातील 13 जणांना न्याय मिळाला आहे, बाकीच्या लोकांचे काय ? तसेच अपंगांच्या काही योजना जिल्हा परिषदेकडे वर्ग केल्या आहेत. त्यामुळे याबाबतीत जिल्हा परिषदच कार्यवाही करणार आहे. पण तेथील लोकांना यांच्या समस्यांच्या प्रश्नाची जाण येईपर्यंत वेळ लागणार आहे.त्यामुळे लोक नाराज आहेत. या लोकांना लवकर योग्य न्याय मिळणार नाही. म्हणून समाजकल्याण विभागाकडेच यासंबंधातील योजना वर्ग कराव्यात. कारण समाजकल्याण विभागाच्या लोकांना अपंगांच्या शाळेतील कर्मचाऱ्यांच्या समस्यांची जाण आहे, त्यामुळे ते अधिक आत्मियतेने काम करु शकतील. म्हणून या योजना परत समाजकल्याण विभागाकडेच घेण्यात याव्यात अशी मी परत परत कळकळीची विनंती करीत आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

. . . .4 डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी गृह विभागाच्या पान क्र.13, बाब क्र.16 बाबत बोलणार आहे. माझ्यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी मालवण निवडणुकीचा थोडासा अनुभव विशद केला आहे. सुदैवाने माननीय गृहमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. याठिकाणी जी तरतूद करण्यात आली आहे, त्यामध्ये म्हटलेले आहे की, "गुप्त सेवांकरिता अतिरिक्त तरतूद. संवेदनशील भागांमध्ये" याठिकाणी कसे शब्द रचले आहेत ते पहा. "संवेदनशील भागामध्ये कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी गुप्त माहिती गोळा करणे, गुन्हेगारांना शोधून काढणे, पोलिसांच्या खबऱ्यांना पैसे देणे, तसेच सापळा रचणे, धोरणीपणे चौकशी करणे आणि सापळा इत्यादी बद्दल पाठपुरावा करणे यासाठी पोलिसांच्या विविध विभागांसाठी तरतूद करण्याची गरज आहे." मी या निवडणुकीच्या वेळी संपूर्ण कालावधीमध्ये मुख्य निवडणूक प्रतिनिधी म्हणून काम पाहिलेले आहे. आपणही 1966 पासून या सर्व कार्यामध्ये भाग घेत आहोत. 1968 मध्ये मी पोलींग एजन्ट होतो. त्या निवडणुकीपासून अगदी कालच्या म्हणजे 19 नोव्हेंबरच्या निवडणुकीपर्यंत मी काम केले आहे पण एवढा विदारक अनुभव मला माझ्या जीवनात अजूनपर्यंत आलेला नाही, एवढी तेथे भयानक परिस्थिती होती. तुम्ही येथे तरतूद करीत आहात, चेष्टा करीत आहात. त्याठिकाणी एवढे भयानक वातावरण होते की, राज्याला गृहमंत्री आहेत की नाही ? अशी शंका यावी. मी माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याबद्दल अतिशय आदर बाळगून बोलत आहे. महाराष्ट्र राज्यात त्यांची प्रतिमा अतिशय चांगली आहे. पण ती प्रतिमा मला तेथे पावलागणिक मलीन होताना दिसत होती. तेथे पोलिसांचे, कायदा आणि सुव्यवस्थेचे राज्य नव्हते. आपण कोणाचे तरी गुलाम आहोत असा अनुभव आला. मी या निवडणुकीच्या वेळी मालवण, सिंधुदूर्गमध्ये जो अनुभव आला, तो जाणीवपूर्वक सांगणार आहे, तुम्ही तरतूद करीत आहात ना. त्यांनी घोषणा केली की, तेथे दुपारी 3.00 वाजण्याच्या आत 6 डी.एस.पी.रँकचे अधिकारी जिल्हयात येतील आणि तुम्हाला तक्रार करण्यास वाव रहाणार नाही. निवडणुका अशा लढवतात ? आजपर्यंत अनेक निवडणुका लढविल्या. शिवसेनेची स्वत:ची प्रतिमा आहे, तिला सुध्दा राजकीय प्रतिमा आहे पण त्याला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न केला. 1966 नंतर अनेक निवडणुका झाल्या. किंबहुना 1977 च्या निवडणुकीच्या वेळेला शिवसेनेने वाईट अनुभवही घेतलेला आहे. त्यावेळी शिवसेना भवनावर झालेला हल्लाही अनुभवला आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धीत मत / शोधनेसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (पुढे चालू...

तुम्ही राजकीय उत्तरे देता. शिवसेनेला दहशतीचे कसे वावडे वाटायला लागले. तुम्हालाही असेच अपेक्षित होते की, आम्ही देखील अशीच उत्तरे द्यावी. आठवून पहा. आपल्याला अतिशय आदर आणि अभिमान वाटेल की, श्री.शेषन यानी जेव्हा या देशामध्ये निवडणुकीच्या संदर्भात सारे नियम आणले. त्याबाबतीतील सर्वात पहिले स्वागत हे शिवसेना प्रमुखांनी केले. सांगितले की, त्याचे पालन आम्ही करु. त्याचे पालन आम्ही त्या ठिकाणीही करत होतो. गावामध्येसुध्दा फिरता येत नव्हते. मी कांदळगावला गेलो. मला निवडणुकीच्या संदर्भातील राजकारण आणायचे नाही. मला कायदा व सुव्यवस्थेच्यासंबंधात माझे म्हणणे मांडायचे आहे. मी राजकारणावर बोलणार नाही. मी माझ्या मित्राच्या घरामध्ये बसलो. तेथून मी बाहेर आलो. कोणत्या तरी गाव गुंडांना आम्ही येथे आल्याचे कळल्यानंतर त्यांनी आम्हाला अडविले. पोलीसांनी बघ्याची भूमिका घेतली. मधे कोणीतरी बॉन्ड्री टाकायची, अडवून ठेवायचे, दुसरीकडून कोणीतरी शिव्या घालत होते. पण पोलिसांनी त्यांना बाजूला हटविले नाही., त्यांच्यावर दांडका उगारला नाही. खुद्द शिवसेनाप्रमुख श्री.उध्दवजी ठाकरे यांना मालवणमध्ये आले असतांना त्यांना जाहीर चौकात अडविले. ही आपली कायदा आणि सुव्यवस्था आहे काय ? तेथे काहीतरी झाले असते तर.... तरीही तुम्ही सांगता...तुमचे खबरे आहेत की त्यांचे खबरे आहेत ? मी स्वत: सिंधुदूर्ग पोलीसस्टेशनमध्ये किती तरी वेळा गेलो होतो. आमदारांना मारहाण होत होती. आमदारांना मारहाण झाली. तुमचेच केलेले भाषण काढून आपल्याला दाखवायला हवे होते. तुम्ही जेव्हा विधानसभेच्या निवडणुकीत गैरप्रकार होतात, त्याबाबत आपण अतिशय संवेदनशील भाषण केलेले आहे, काळजाला हात घालणारे आपण भाषण केलेले आहे. गैरप्रकाराबद्दल भाषण केलेले आहे. पैशाच्या गैरवापराबद्दल भाषण केले. आपण मनापासून बोलत नसाल तर आर.आर. आबा आपण दांभिक आहेत असे म्हणावे लागेल. आपली समाजाला सांगण्यासाठी एक भाषा असते. दाखवायचे दात वेगळे, खायचे दात वेगळे असा अर्थ होईल. पहिल्यांदा एक तक्रार आली. शिवसेना नेते आणि या सभागृहाचे सन्माननीय आमदार श्री.दिवाकरजी रावते, विधानसभेचे सदस्य सन्माननीय आमदार श्री.सुभाष देसाई आम्ही सर्व कणकवलीच्या पोलीस स्टेशनमध्ये गेलो. दोन तास कणकवलीच्या पोलीस स्टेशनवर इन्स्पेक्टरच्या समोर बसून होतो. ते एकाही प्रश्नाचे उत्तर देत नव्हते. आर.आर. आबा हे भूषणावह नाही. दीड तास आम्ही बसून होतो, त्यांना सारखे विचारत होतो की, तुम्ही काही तरी कारवाई करणार आहात की नाही, ते सांगा. पण मौन, विनोबा भावे. शेवटी इतका त्रागा झाला की, श्री.दिवाकर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (पुढे सुरु.....

रावते यांनी पोलीस स्टेशनमधील टेबलवर डोके आपटले, मी हतबल झालो याची मला कीव येते. म्हणून त्यांनी डोके आपटले. टेबलावरील काच फुटली म्हणून त्यांच्यावर उलट केस दाखल केली, नवीन काच आणून दिल्यानंतरही त्यांच्यावर केस दाखल केली. दाखल करु द्या. काय करायचे असेल ते करावे. पण डोके आपटले, हे कायदा व सुव्यवस्थेला भूषणावह नाही. तुमचा इन्स्पेक्टर बोलतही नाही, सांगतही नाही. किती बायस आहे ? 17 तारखेला मी स्वत: पोलीस स्टेशनमध्ये गेलो होतो. कणकवली पोलीसस्टेशनला मेन गेट आणि कंपाऊंड वॉल आहे. माझी गाडी कंपाऊंडच्या आत येऊ दिली नाही. मी गाडीतून उतरुन चालत गेलो. चौकीवर गेलो. दरवाजातून आत जात असतांना ताबडतोब एक पी.एस.आय. आले आणि त्यांनी सांगितले आतमध्ये जायचे नाही. त्याला विचारले, तक्रार नोंदविण्यासाठी आत जायचे नाही काय ? त्या ठिकाणी बोर्ड लावलेला आहे की, "या, बसा, नमस्कार." मी म्हटले तो बोर्ड काढून टाका. एका आमदारांची ही अवस्था असेल तर सर्वसामान्यांची तक्रार करण्याची काय हिंमत आहे ? कित्येक पोलीस तक्रारदारांच्या घरी जाऊन सांगत होते की, तक्रारी मागे घ्या, नाही तर तुम्ही अडचणीत याल. एवढेच नव्हे तर मी नाव घेऊन सांगतो. मला अडविल्यानंतर डी.वाय.एस.पी. श्री.विवेक जाधव. सगळा अविवेक आहे. खिशात हात घालून नाक्यावरील टपोऱ्या पोरांसारखे उभे राहिले होते. त्यांनी सांगितले की हो, साहेब मी इकडे उभा आहे.त्यांना हे सांगता आले नाही की, बसा, मीही आत येतो. अशा अधिकाऱ्यावर आपण काय कारवाई करणार आहात ? प्रोटोकॉल आहे. त्यांनी सांगायला पाहिजे होते की, तुम्ही आज बसा, मी येतो. ते म्हणाले बोला, काय बोलता. मी उभा आणि तेही उभे. ते आत जाऊ तुमची काय तक्रार आहे, ती मी ऐकून घेतो असे म्हणाले नाहीत. आबा, आपण सांगता की, पोलीस हा जनतेचा मित्र झाला पाहिजे. तो आमदाराचा मित्र होत नाही तर तो जनतेचा काय होणार आहे ? या श्री.विवेक जाधव यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ते सांगावे. त्यांनी माझी तक्रार घेतली नाही. ठाण्याच्या महापौरांवर हल्ला झाला होता....

यानंतर कु.थोरात...

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

सभापती महोदय, खालच्या सभागृहातील सदस्य चोपडयाचे आमदार पाटील त्यांच्यावर हल्ला ---- झाला. ते एक सज्जन माणूस आहेत. त्यांच्या गळयात माळ आहे.ते निर्व्यसनी आहेत. भक्तीच्या मार्गातील माणूस आहेत. सात्विक वृत्तीचे माणूस आहेत. त्यांना मारले त्यांची गाडी फोडली. त्यामुळे कानडीला ते तक्रार करायला गेले. कनडीजवळ एक चेकपोस्ट आहे. तेथील कोणी पोलीस आले नाहीत. त्या आमदाराबरोबरचा अंगरक्षक त्यां पोलिसांना जाऊन सांगतो तुम्ही चला, त्या गाडीचा पंचनामा करायचा आहे. दुपारी दीड ते दोन वाजता झालेल्या घटनेचा पंचनामा संध्याकाळी 6.00 वाजेपर्यंतझाला नाही. म्हणून 6.00 वाजता कनकवलीच्या पोलीसस्टेशनला ते आले. तोपर्यंत ज्यांनी गाडी फोडली होती तेच कनकवली पोलीसस्टेशनला येऊन तक्रार करुन गेले. सभापती महोदय, मंत्रिमहोदय गंभीर नसतील तर मी खाली बसतो. मी काही राजकीय बोलत नाही मी या ठिकाणी अतिशय पोटतिडिकेने बोलत आहे. आपण एक लक्षात घ्या?. समाजात हा संदेश जाणार आहे. प्रत्येक आमदार आपापल्या मतदारसंघात असाच वागयचा विचार करेल? तुम्ही कोण? चला येथून निघा? प्रचाराला यायचे नाही.? हे सर्व मार्ग आमदारांनी अवलंबिले तर प्रत्येक आमदाराचे तेथील पोलीस गुलाम होतील. शासनाचे त्यांच्यावर काय नियंत्रण राहणार आहे?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, हे सगळे एका पक्षाचे असतांना राष्ट्रवादीने तेथे काय सोसले असेल याची केवळ कल्पना आणि विचार केलेला बरा.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, दुर्दैव आहे की, एवढे करुन पुन्हा मंत्रिमहोदय तेथेच जात आहेत. ठीक आहे. सभापती महोदय, हे सगळे करतांना लोकांना एक नवीन मार्ग, नवीन दिशा मिळणार आहे. तेथे काय घडले? माननीय मंत्रिमहोदय, चोपडयाचे तुमच्या पक्षाचे माननीय श्री. अरुण गुजराथी यांचा पराभव केला ते माननीय आमदार श्री. कैलास पाटील पोलीसस्टेशनला गेले. त्यांच्या सोबत ठाण्याचे महापौर होते. 6.00 वाजेपर्यत त्यांची गाडी फोडल्याची तक्रार घेतली नाहीत. त्यांना तेथे बसवून ठेवण्यात आले आणि उलट त्यांच्या विरुध्द क्रॉस कम्प्लेन करण्यात आली. ज्या विवेक जाधवांनी मला माझी गाडी पोलीस्टेशनच्या कम्पाऊंडच्या आत आणू दिली नाही, ज्या विवेक जाधवांनी मला त्या ठिकाणी उभे केले त्यांनीच माझ्या समक्ष पाच मिनिटात खालच्या सभागृहामधील सन्माननीय मंत्री श्री.अनिस अहमद आणि सगळे आमदार चार गाडया घेऊन आले कंपाऊंउमध्ये येऊ दिले. धाड-धाड सगळे गेट उघडून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

त्या गाडया आतमध्ये आल्या.आम्ही समोर उभे होतो, ही या शासनाची कायदा व सुव्यवस्था आणि न्याय भूमिका. आमची गाडी मात्र बाहेर, आम्ही तेथून चालत यायचे, दरवाज्यावर पी.एस.आय. येऊन अडवतो की, आत जायचे नाही. आणि तुमच्या स्वागताला पायघडया घालून गाडया उभ्या राहतात. डी.एस.पी. स्वागत करतो, बाहेर उभा राहतो.. श्री. अनिह अहमद आणि अनेक आमदार सोबत येतात. आणि सांगतात उलट कारवाई करा. गाडी कोणाची फोडली? मार कुणाला दिला? आमदार कैलास पाटील यांची आणि तक्रार कुणाची? तर मारणा-यांची. म्हणून सभापती महोदय, मला माहीत आहे मंत्रिमहोदयांना खूप काही करावेसे वाटते, तळमळ असते, तडफड असते. पण तुमची तळमळ, जेव्हा तुमच्याच नजरेसमोर तुमचा पराभव होईल तेव्हा तुम्हाला कळेल की, आपण काय पेरले आणि आता आपल्याला काय मिळत आहे. एका निवडणुकीपुरता हा विषय नाही. हाच प्रकार महाराष्ट्राच्या सर्व जिल्हयात उद्या घडायला लागेल. बिहारचा पाया मालवणमध्ये घातला आहे. महाराष्ट्राचा सुध्दा बिहार होईल. म्हणून तातडीने नुसती तरतूद करुन जमणार नाही. तर यासंदर्भात कारवाई करावी अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. सभापती महोदय, राज्य परिवहन महामंडळाच्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदय आहेत म्हणून हा विषय मी मांडीत आहे .राज्य परिवहन महामंडळाच्या संदर्भात मी मघाशी मांडले होते. वसई तालुक्यातील परिवहन सेवा ठेकेदाराला देण्याचे काम चालले आहे. वसई शहरातील महानगरपालिका आणि नगरपालिकांना स्वत:ची परिवहन सेवा सुरु करण्याचा अधिकार आहे.त्याला आमचे ऑब्जेक्शन नाही. आणि त्यांचेही ऑब्जेक्शन नाही. पण त्या ठेकेदाराला शहर सोडून तालुक्यात सुध्दा वाहतूक करु द्यायची आणि एस.टी.वाहतूक बंद पाडायची असा घाट घातला आहे.यासंदर्भात श्री विवेक पंडित आणि त्यांचे सहकारी उपोषणाला बसले आहेत.आजही त्याठिकाणी आता उपोषण चालू आहे. आजचा उपोषणाचा त्यांचा चौथा दिवस आहे.आज त्यांनी अहमदाबाद हाय-वे रस्ता रोखला आहे. --------

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

आपण तातडीने यामध्ये लक्ष घालून ताबडतोब हे उपोषण सोडवावे आणि एस.टी.चीच सेवा तेथील जनतेला पाहिजे ती सुरु ठेवावी. कोंकणातील रेल्वेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी आताच बोलले. मी फक्त एवढेच सांगू इच्छितो की, या कोंकण रेल्वेसाठी या ठिकाणी तरतूद केलेली आहे. परंतु यासाठी केंद्रशासनाचा असाही नवीन प्रस्ताव आहे की, कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन बरखास्त करावे म्हणून आमची कोंकण रेल्वे ही भविष्यात आमची राहील की नाही याबाबत शंका वाटते. जी कोंकण रेल्वे स्व. मधू दंडवते यांच्या अथक प्रयत्नांनी सुरु झालेली आहे ती आपलीच रहावी अशी आमची इच्छा आहे. या कोंकण रेल्वेवर मुंबई-सावंतवाडी अशी ट्रेन सुरु होणे आवश्यक आहे आणि ती झाल्याशिवाय जी तरतूद या ठिकाणी करण्यात आली आहे तो पैसा देऊ नये व त्यासाठी शासनाने मुंबई-सावंतवाडी ही नवीन ट्रेन सुरु करण्याबाबत आग्रह केंद्रशासनाकडे धरावा. कारण गोव्याला जावयाचे असेल तर आपल्याला सध्या अस्तित्वात असलेल्या गाडीत जागाच मिळत नाही, त्यामध्ये टुरिस्ट जास्त असतात, म्हणून याकडे शासनाने कटाक्षाने लक्ष द्यावे, अशी माझी सूचना आहे.

महोदय, बाब क्र. 54 च्या निमित्ताने मी फक्त एवढेच सांगू इच्छितो की, दक्षिण सोलापूरमधील भीमा नदीवरील 1666 कुटुंबांना पुराचा फटका बसलेला आहे, त्यांना अद्यापही मदत मिळाली नाही. या ठिकाणी 1666 कुटुंबांचे पंचनामे केले व त्यातील पात्र लाभार्थी फक्त 472 एवढेच ठरविले आणि त्यापैकी देखील 372 लाभार्थ्यांनाच प्रत्यक्षात मदत देण्यात आली, 100 लाभार्थी बाकी आहेत. तसेच अक्कलकोटमध्ये 664 कुटुंबांना फटका बसला असून त्यातील पात्र लाभार्थी 194 ठरविले व त्यांच्यापैकी 180 कुटुंबांनाच सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आले, बाकीच्या 14 कुटुंबांना देखील तातडीने ही मदत देण्यात यावी. तसेच उर्वरित कुटुंबांना सुध्दा मदत देण्यात यावी. या विषयाच्या संदर्भात आज आपल्याकडे ठराव असल्यामुळे मी त्यावेळीच सविस्तरपणे बोलणार आहे. या निमित्ताने मुंबईतील कुर्ला भागात माननीय मुख्यमंत्री स्वत: गेले होते आणि मुख्यमंत्र्यांनी सुध्दा कबूल केले अशा क्रांतिनगर, सहयोग नगर, हनुमान चाळ या ठिकाणी 12 फुट पाणी भरलेले होते. त्या ठिकाणी प्रत्येक कुटुंबाला मदत मिळाली पाहिजे असे मुख्यमंत्र्यांनी त्याच वेळी आदेश दिले होते. तसेच नारायण नगर, गैबनशहा दर्गा आणि अशोकनगर हा भाग टेकडीवर असून त्यांना मदत मिळाली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

यानंतर बाब क्र. 175 - लहान पाटबंधारेच्या बाबतीत मला एकच मुद्दा मांडावयाचा आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयातील कणकवली तालुक्यात कुंभेवाडी या गावाला मी भेट दिली. त्या ठिकाणी जो कोल्हापूर बंधारा आहे त्याच्या दुरुस्तीबाबत अगोदर शासनाने मान्य करण्यात आले की, या कोल्हापूर बंधाऱ्याची दुरुस्ती आम्ही करुन देऊ. परंतु नंतर मला नव्याने शासनाकडून असे पत्र आले की, आपण पाणीवापर संस्था स्थापन करावी तरच या बंधाऱ्याची दुरुस्ती शासनाकडून करण्यात येईल. माझी याबाबतीत विनंती आहे की, कोंकणातील गावांमध्ये पाणीवापर संस्था स्थापन कितपत शक्य आहे ? कारण ज्या ठिकाणी पिण्याचेच पाणी मिळत नाही, पश्चिम महाराष्ट्र अथवा उत्तर महाराष्ट्रासारखे मोठमोठे दोन फर्लांग अंतर असलेले बंधारे तेथे नसतात, तर हे केवळ 60-70 फुट अंतराचेच आणि छोटया छोटया वाडया असलेल्या ठिकाणी बंधारे असल्यामुळे पाणीवापर संस्था त्या भागात होणे शक्य नसते आणि अशा बंधाऱ्यांमध्ये किती पाणी साचणार आहे. म्हणून याबाबत माझी विनंती आहे की, शासनाचे याबाबतीतील जे निकष असतील ते शिथील करुन आणि अशा प्रकारच्या अडचणी न टाकता त्या कोल्हापूर बंधाऱ्याची दुरुस्ती करावी. म्हणून या ठिकाणी जी तरतूद करण्यात आली आहे ती या बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी मिळेलच अशी मी अपेक्षा करतो. महोदय, शेवटचा मुद्दा असा की, आदिवासींसाठी स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी शासनाने 260 कोटी रुपयाची तरतूद केली आहे. आज मुंबई शहरात असंख्य बेरोजगार आहेत परंतु या निमित्ताने माझी शासनाला अशी विनंती आहे की, सरकारी, निमसरकारी, केंद्रशासन आणि खाजगी या सर्व क्षेत्रात मुंबईत भरती करतांना रिजनल स्वयंरोजगार केंद्रांशिवाय रिक्रुटमेंट करु नये असा क्लॉज त्यात टाकल्याशिवाय भूमिपुत्रांना न्याय मिळणार नाही. असे केले तरच आपल्या राज्यातील बेकारी काही प्रमाणात कमी करण्यात आपल्याला यश मिळू शकेल. परप्रांतीयांना आपण रोखू शकणार नाही परंतु आपल्या राज्यातील मुलांना कसा न्याय देता येईल याकडे पॉझिटिव्हली पाहिले आणि त्याची अंमलबजावणी तशाच प्रकारे केली तरच हे शक्य होईल, अशी सूचना करुन माझे भाषण संपवितो.

जय हिंद जय महाराष्ट्र.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एम.ए. अजिज (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्यातील गृहखाते आणि महसुल खात्याच्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. गृहखात्याची बाब क्रमांक 18, पृष्ठ क्रमांक 14 वर क्रिमिनल इनव्हेस्टीगेशन या संदर्भात 3 कोटी 84 लाख 86 हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. यासंदर्भात जी तरतूद करण्यात आलेली आहे त्याच्या संदर्भात मला काही बोलावयाचे नाही. परंतु क्रिमिनल इनव्हेस्टीगेशन पोलीस कसे करतात यासंदर्भात मला या ठिकाणी माझे विचार मांडावयाचे आहे. क्रिमिनल इनव्हेस्टीगेशन करतांना कलम 151 खाली करावयाची असते. यासंदर्भात सिनिअर इन्सपेक्टर टारगेट देतो की, कलम 151 खाली 25 लोकांना पकडून आणा. खरे म्हणजे रस्त्यावर संशयास्पद फिरणा-या लोकांना यामध्ये अटक करावयास पाहीजे. परंतु पोलीस लोक कोणत्या तरी कारखान्याच्या समोर उभे राहतात आणि बाहेर येणा-यांना कलम 151 खाली अटक करतात. तसेच पोलिसांनी मेथड ऑफ डिटेक्शनची दुसरीच पध्दत शोधून काढली आहे. ही पध्दत फक्त भारतातच अवलंबविली जाते. समजा एखाद्या अल्पवयीन मुलीचे अपहरण झाले असेल तर त्या मुलीचे नातेवाईक पोलीस स्टेशनमध्ये येऊन तक्रार नोंदवितात त्यावेळी पोलीस त्यांना विचारतो की, तुमचा कोणावर संशय आहे का? समजा त्या नातेवाईकांनी एखाद्यावर संशय व्यक्त केला असेल तर पोलीस त्या घरी जातात आणि घरामध्ये त्या मुलाचे आई-बाप असेल तर त्यांना पकडून पोलीस स्टेशनमध्ये आणतात. आणि सांगतात की, तुमच्या मुलाने अमुक अमुक मायनर मुलीचे अपहरण केलेले आहे. त्यामुळे आई-बापाला 2-2 दिवस पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवले जाते. परंतु अध्यक्ष महोदय, आपण मला सांगा आताच्या जमान्यात कोणता मुलगा बापाचे ऐकतो? त्यामुळे मुलाने जर अशा प्रकारचा गुन्हा केला तर त्याच्या आई-वडीलांना अटक करण्याचे काय कारण आहे. मुलाने जर गुन्हा केला असेल तर मुलाला अटक करा आणि बापाने जर गुन्हा केला असेल तर बापाला अटक करा. परंतु मुलाने गुन्हा केला तर बापाला अटक करणे हे काही योग्य नाही. आता मी क्रिमिनल ऑफेन्स आणि सिव्हील मॅटरच्या संदर्भात बोलणार आहे. बरेच क्रिमिनल ऑफेन्सस हे पोलीस स्टेशनमध्ये आपल्याला सिव्हील मॅटर झालेले दिसतील. पोलिसांना क्रिमिनलला सोडून द्यावयाचे असेल तर पोलीस सांगतात की, आम्ही त्यांच्या संदर्भात काहीही करु शकत नाही कारण ती सिव्हील मॅटर आहे. नागपाडयातील कामाठी पु-यात एका मुलाचे घर होते. या मुलाला दोन तीन

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बहिणी होत्या. त्या मुलाच्या घरात त्याची बहिण राहायला आली. तेव्हा त्या मुलाच्या पत्नीने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली तेव्हा पोलिसांनी मुलाला सांगितले की, तुझ्या आईने मरतांना तुझ्या बहिणीच्या नावे खोली केली होती.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याची एक बहीण अंधेरीला राहते. सहा महिन्यानंतर ती पोलीस ठाण्यामध्ये येते आणि त्या घरामध्ये माझा वाटा आहे असे सांगते. त्यावेळी पोलीस त्या बाईला सांगतात की, तू त्या घरात जाऊन रहा. दरम्यान त्या घरातील दुसरी स्त्री पोलीस ठाण्यामध्ये येते आणि तिने तक्रार केल्यानंतर पोलीस सिव्हील मॅटरची केस तयार करतात. अशाप्रकारची पध्दती पोलिसांकडून वापरण्यात येते. ही जी पध्दत आहे, ती बदलायला पाहिजे.

यानंतर मी पान क्र.16 वरील बाब क्रमांक 27 वर बोलणार आहे. फोरेन्सिक लॅबसाठी शासनाने 1 कोटी रुपयाची तरतूद केली आहे. फोरेन्सिक लॅबमध्ये रक्ताचे नमुने पाठविले जातात. रक्तात अल्कोहोलचे प्रमाण किती आहे यासंबंधीचे रक्त तपासणीसाठी पाठविल्यानंतर तत्संबंधीचा रिपोर्ट फोरेन्सिक लॅबमधून वेळेवर मिळत नाही. त्या रक्ताची चाचणी वेळेत न केल्यामुळे रिपोर्ट निगेटीव्ह येतो. व्हिसेरासंबधीच्या किंवा विषप्राशन केल्यासंबंधीचा चाचणीवरील रिपोर्ट फोरेन्सिक लॅबमधून तीन-तीन महिने येत नाही. या चाचणीसाठी जठर किंवा पोटातील काही भाषाचा तुकडा काढून चाचणी केली जाते. पण तीन-तीन महिने त्याची तपासणी होत नसल्यामुळे पोटेंशियल कमी होते व रिपोर्ट निगेटीव्ह येतो. फोरेन्सिक लॅबसाठी आपण 1 कोटी रुपयांची तरतूद करीत आहात, पण ही जी पध्दत आहे, ती प्रथम बदलायला हवी.

यानंतर मी महसूल विभागाच्या बाब क्र.49 वर माझे विचार मांडणार आहे. औरंगाबादच्या आयुक्तांना प्रशासकीय कामकाजासाठी 9,38,89,625 ची तरतूद केली आहे. मी वक्फ बोर्डासंबंधी गेल्या अधिवेशनामध्ये महसूल मंत्री आणि वित्त मंत्र्यांशी बोललो होतो. त्यानंतर मग वक्फ बोर्डाची स्थापना झाली आहे. मला या निमित्ताने सांगावयाचे आहे की, जॉईंट पार्लमेंटरी कमिटी नेमण्यात आली होती. या कमिटीने 2 वर्ष आढावा घेतल्या नंतर केंद्र शासनाला अहवाल सादर केला. 1995 साली वक्फ बोर्ड स्थापन करण्यासंबंधीचा कायदा झाला. परंतु, महाराष्ट्रात वक्फ बोर्ड स्थापन करण्यात आले नव्हते म्हणून उच्च न्यायालयाने वक्फ बोर्ड स्थापन करण्यासंबंधीचा आदेश दिला. त्यानंतर मग सन 2000 मध्ये वक्फ बोर्डाची स्थापना महाराष्ट्रामध्ये झाली. याकरिता मनुष्यबळ निर्माण करण्याकरिता निधीची तरतूद करावी म्हणून मी महसूल मंत्री व वित्त मंत्र्यांना विनंती केली. परंतु काही तरतूद करण्यात आली नाही. आज वक्फ बोर्डाच्या कोटयवधी रुपयाच्या मालमत्तेवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझिज.....

अतिक्रमण झाले आहे. हे अतिक्रमण शासनाच्या दिरंगाईमुळे झाले आहे. वक्फ राज्यमंत्री येथे बसलेले आहेत. त्यांच्याकडून देखील काही कारवाई झालेली नाही. वक्फ बोर्ड हे महसूल विभांगाच्या अखत्यारित येत असल्यामुळे महसूल मंत्र्यांनी लक्ष घालावे अशी विनंती करतो आणि माझ ो भाषण पूर्ण करतो.

.....

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान(महराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : माननीय सभापति महोदय, वर्ष 2005 - 2006 की पूरक मांगों पर अपने विचार रखने के लिए मैं यहां पर खड़ी हुई हूं. मुझे पूरी उम्मीद है कि जनहित के लिए पूरक मांगों के संदर्भ में सदन में की गयी मांगों पर सरकार द्वारा सहानुभुतिपूर्वक विचार किया जाएगा.

माननीय सभापति महोदय, बाब क्रमांक 16 पर बोलते हुए मैं कहना चाहूंगी कि गुप्त सेवा को मजबूत करने के लिए तथा उसको और अधिक सुचारु रुप से चलाने के लिए यहां पर मांग की गयी है. यह तरतूद आवश्यक है, ऐसा मैं मानती हूं. लेकिन मैं यहां पर यह भी कहना चाहूंगी कि महिलाओं पर होने वाले अत्याचारों के बारे में भी हमें सोचने की जरुरत है. मैं कहना चाहूंगी कि परभणी एक ऐसा जिला है जहां पर ऐसा लगता है कि पुलिस प्रशासन दीर्घकाल के लिए छुटटी पर चला गया है. इस तरह का संदेह हमको वहां पर होता है. कुछ दिन पहले परभणी पुलिस स्टेशन के पुलिस निरीक्षक को राजकीय पार्टी के एक कार्यकर्ता ने भरे बाजार में पीटा, उसको मारा,.उस कार्यकर्ता के खिलाफ गुनाह दर्ज होने के बावजूद वहां माफी मांगकर वह मामला रफा दफा कर दिया. ऐसी हालत हमारे राज्य में कुछ जगह पर है. जो कार्यकर्ता पुलिस को मारता है उसी से हफ्ता वसूल किया जाता है. यदि ऐसी स्थिति हमारे राज्य में होगी तो हम आसानी से अंदाज लगा सकते हैं, हम आसानी से समझ सकते हैं कि हमारे राज्य में सामान्य लोगों को कितनी तकलीफों का सामना करना पड़ता है ? माननीय अध्यक्ष महोदय, परभणी जिले में महिलाओं की स्थिति को देखते हुए मेरा सुझाव है कि जिस तरह से नासिक में महिलाओं की सुरक्षा के लिए विशेष कक्ष बनाया गया है उसी तरह से परभणी में भी महिलाओं की सुरक्षा के लिए विशेष कक्ष स्थापित किया जाये. मैं यहां पर कहना चाहूंगी कि बड़ी मात्रा में क्राइम होने के बावजूद, क्राइम रेशो कम दिखाने के लिए क्राइम केसीज रजिस्टर ही नहीं किए जाते हैं. यह स्थिति महिलाओं के बारे में तो और भी अधिक है. अनेक महिलाएं हमें आकर बताती हैं कि पुलिस स्टेशन में हमारी कंप्लेंट रजिस्टर ही नहीं हुई है. हमारे यहां पर बॉम्ब ब्लास्ट हुए हैं, मर्डर हुए हैं लेकिन एक भी गुनाह ट्रेस नहीं हुआ है. इसलिए मैं मांग करती हूं कि परभणी जिले में एक अशासकीय दक्षता समिति स्थापित की जाये. ताकि वह अशासकीय..

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DD/

प्रा. फौजिया खान...

दक्षता समिति यह निगरानी कर सके कि कितने क्राइम वहां पर हुए हैं और उनमें से कितने क्राइम रजिस्टर हुए और कितने क्राइम रजिस्टर नहीं हुए हैं. साथ ही रजिस्टर हुए गुनाहों में से कितने केसीज ट्रेस हुए और कितने केसीज ट्रेस नहीं हुए हैं. इन सब बातों की रिपोर्ट शासन को एक महीने में की जानी चाहिए. क्योंकि एक भी ऐसा केस नहीं है जो कि फायनली ट्रेस हुआ है. अशासकीय दक्षता समिति बनाने से सरकार पर भी कोई आर्थिक बोझ नहीं पड़ेगा और वहां पर सुरक्षा की दृष्टि से यह अशासकीय दक्षता समिति अच्छा काम कर सकेगी.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती कांता नलावडे)

माननीय सभापति महोदया, महसूल विभाग की बाब क्रमांक सी 4 पर भी मैं अपने विचार यहां पर रखना चाहूंगी. मैं कहना चाहूंगी कि खेलों का विकास होने के लिए क्रीड़ा संकुलों का विस्तारिकरण होना बहुत जरुरी है. लेकिन हमारे यहां पर उस काम के लिए जमीन हस्तांरित न होने की वजह से क्रीड़ा संकुल के लिए दी गयी निधि दूसरी ओर चली गयी है. जमीन से संबंधित फाइल आज माननीय महसूल मंत्री महोदय की टेबल पर है. यदि माननीय मंत्री महोदय उस फाइल को अपनी मंजूरी दे देते हैं और साथ ही वहां पर निधि का प्रावधान किया जाता है तो वहां पर लंबे समय से की जाने वाली मांग पूरी हो सकती है.

माननीय सभापति महोदया, पूरक मांग नंबर सी 5 जो कि सामाजिक सुरक्षा और कल्याण से संबंधित है उस मांग पर भी मैं बोलना चाहूंगी. इस विषय पर बोलते हुए मैं एक बहुत महत्वपूर्ण विषय की ओर सदन का ध्यान आकर्षित करना चाहूंगी. यह विषय कास्ट सर्टिफिकेट के बारे में है. इस संबंध में शासन के पास एक ऐसा प्रस्ताव प्रलंबित है जिसे यदि मंजूरी मिल जाती है तो कास्ट सर्टिफिकेट इशु करने में आने वाली बहुत सारी दिक्कतों पर नियंत्रण पाया जा सकता है. मैं यहां पर बताना चाहूंगी कि सन् 1998 में नागपुर विभाग के उप जिला अधिकारी और तहसीलदार ने जाति प्रमाण पत्र इशु करने के बारे में बहिष्कार डाला था और उस समय यह विषय पूरे राज्य में चर्चा का विषय हो जाने की वजह से तत्कालीन महसूल मंत्री श्री नारायण राणे साहब नागपुर आये थे और यहां आकर संबंधित अधिकारियों की संगठना की बैठक ली थी. उस समय अधिकारियों ने बताया कि केवल कास्ट सटिर्फिकेट इशु करने में ही उनका सारा

...4 के 1

अशोधित प्रत / अशोधित नाही

प्रा. फौजिया खान.

समय चला जाता है. साथ ही उन्होंने कहा कि कास्ट सर्टिफिकेट इशु करने के सबंध में कोई स्पेसिफिक नमुना न होने की वजह से गलत लोगों को कास्ट सर्टिफिकेट इशु होने का डर बना रहता है. इसलिए इस चिंता को दूर करने के लिए और काम का बोझ कम करने के लिए उस समय एक सुझाव सामने आया था कि पूरी फॅमिली के लिए एक ही कास्ट सर्टिफिकेट इशु किया जाये और उसकी एन्ट्री राशन कार्ड में की जाये. उस समय के महसूल मंत्री माननीय राणे साहब ने उस सुझाव को अच्छा बताया था और प्रिंसिपली उस सुझाव को मान्यता दी थी, साथ ही उस प्रस्ताव को मंजूर करने का आश्वासन भी उस समय दिया था. माननीय सभापति महोदया, संयोग की बात यह है कि अब फिर से माननीय राणे साहब महसूल मंत्री हैं. इसलिए हमारा कहना है कि उस समय का दिया हुआ प्रस्ताव यदि मजूर हो जाता है तो न केवल अधिकारियों को बल्कि आम जनता को भी कास्ट सर्टिफिकेट मिलने के बारे में जो परेशानी होती है, उस परेशानी का भी कुछ हल जरुर निकल सकेगा. इसलिए कास्ट सर्टिफिकेट की एन्ट्री राशन कार्ड में होनी चाहिए,ऐसा सुझाव मैं यहां पर देना चाहती हूं. इस समय सोलापुर में राशन कार्ड कंप्युट्राइजेशन के संबंध में जो पायलट प्रोजेक्ट चालू है, वहां पर इस तरह की व्यवस्था करने के संबंध में मैं सुझाव देना चाहूंगी.

माननीय सभापति महोदया, औरंगाबाद शहर का निर्माण हुए चार सौ साल पूरे हो चुके हैं. लोगों की मांग है कि वहां पर चार सौ साल पूरे होने के उपलक्ष्य में सेलिब्रेशन किया जाये. ऐसा करने की वजह से स्वाभाविक रुप से वहां का विकास हो सकेगा. वहां पर जो मान्युमेंट्स हैं उनका कंजरवेशन अच्छी तरह से होने के संबंध में व्यवस्था की जानी चाहिए. औरंगाबाद शहर , वर्ल्ड मेप पर टूरिस्ट शहर के रुप में जाना जाता है.वहां पर जो बीबी का मकबरा और अजेंटा एलोरा जैसे हिस्टोरिकल मान्युमेंट्स हैं, उनका ऐतिहासिक महत्व है. इसलिए मेरा कहना है कि वहां पर चतुर्थ शताब्दी वर्ष सेलिब्रेट किया जाये. इस संबंध में तीन सौ करोड़ रुपए की एक योजना शासन के पास है. उस योजना को मंजूरी दी जाये और वहां के मान्युमेंट्स का कंजरवेशन अच्छी तरह से किया जाये तथा उस शहर का विकास अच्छी तरह से किया जाये, ऐसी मेरी मांग है.

माननीय सभापति महोदया, ग्राम विकास विभाग पर भी मैं बोलना चाहूंगी. मेरा कहना है

4 के 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कि बचत गट के द्वारा बनाये गए सामान की मार्केटिंग के लिए गाले बनाये जाते है. महाराष्ट्र में बचंत गट बहुत महत्वपूर्ण काम करते हैं. बचत गट द्वारा बनाए गए सामान की मार्केटिंग के लिए यह जरुरी है. लेकिन सवाल यह है कि उसकी मार्केटिंग कौन करेगा. हमारा कहना है कि इसकी मार्केटिंग के लिए किसी एन. जी. ओ. की मदद से यह काम किया जाना चाहिए, इसकी परमीशन ग्राम विकास मंत्रालय की तरफ से मिले, ऐसी मैं मांग करती हूं.

माननीय सभापति महोदया, मैं पूरक मांग क्रमांक बी 5 पर भी बोलना चाहूंगी. हमारा कहना है कि परभणी में कॉटन फॅडरेशन की 660 कामगार महिलायें ऐसी हैं, जिनका अभी तक भविषय निर्वाह निधि का पैसा रुका हुआ है, वह पैसा उनको मिला नहीं है, इसलिए मेरी मांग है कि उनका भविष्य निर्वाह निधि जल्दी से जल्दी दिया जाये, उनका पैसा रुका होने की वजह से उनको अपनी गुजर बसर करने में काफी परेशानी हो रही है.

माननीय सभापति महोदया, समय कम होने की वजह से आप मुझे बैठने के लिए कह रही हैं. लेकिन मेरे दो तीन विषय बहुत ही महत्वपूर्ण हैं. यदि आप मुझे कुछ समय और बोलने की परमीशन दें तो अच्छा होगा, ऐसी मेरी विनती है.

तालिका सभापति : ठीक है.

श्रीमती फौजिया खान : माननीय सभापति महोदया मैं बाब क्रमांक 26 पर बोलते हुए स्वयं रोजगार विषय पर बोलना चाहूंगी. मेरा कहना है कि ऐसा प्रावधान है कि स्वयं सहायता गट द्वारा बनी वस्तुओं को शासकीय कार्यालयों के लिए खरीदा जाये. लेकिन इस प्रोवीजन का इम्पलीमेंटेशन नहीं होता है. हमरा कहना है कि इस प्रोवीजन को अनिवार्य किया जाना चाहिए. शासकीय कार्यालयों में छोटे छोटे विक्री केंद्र और दुकानें बनायी जानी चाहिए तथा वहां पर इन स्वयं सहायता गटों को केंटीन चलाने की परमीशन भी देनी चाहिए. उनकी सहायता के लिए आमदार निधि से पैसा दिये जाने की व्यवस्था भी की जानी चाहिए ताकि उनका विकास हो सके. हमारा कहना है कि इस संबंध में बैंको को भी सूचना दी जानी चाहिए कि इन गटों को ज्यादा से ज्यादा फायनेंस किया जाये.

माननीय सभापति महोदया, अब यह मेरी लास्ट आइटम है. यहां पार बोलते समय मैं

.. 4के 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

बाब क्रमांक 184 पर भी अपने विचार रखना चाहूंगी. नांदेड में जनवरी 2006 में अखिल भारतीय मराठी नाटय सम्मेलन आयोजित किया गया है. उस काम के लिए वहां पर 25 लाख रुपए का प्रावधान किया गया है. मैं इस प्रोवीजन का स्वागत करती हूं. हमारा मानना है कि हमारी संस्कृति में जिस तरह से कला का महत्व है उसी तरह से साहित्य का भी बहुत महत्व है. हमारा कहना है कि परभणी में अखिल भारतीय बाल कुमार साहित्य सम्मेलन का आयोजन किया गया है, उसके लिए कम से कम 15 लाख रुपए का प्रावधान किया जाना चाहिए,ऐसी मैं मांग करती हूं. इतना कहकर ही मैं अपनी बात खत्म करती हूं. धन्यवाद.

-0-

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदया, 2005-2006 सालच्या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्याकरता मी उभा आहे. सर्व प्रथम मला सार्वजनिक आरोग्य विभागातील बाब क्रमांक 210 पान नंबर 165 सबंधी बोलावयाचे आहे. प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या कार्यक्रमा अंतर्गत निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवालानुसार राज्यात 14 जिल्हयात नवीन ग्रामीण रुग्णालये स्थापन करण्याचे शासनाने ठरविले असून त्याकरता ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे.या बाबत बोलत असतांना मी माननीय मंत्रिमहोदयांचे लक्ष एका गोष्टीकडे वेधू इच्छितो की, राज्यात 14 जिल्हयात नवीन ग्रामीण रुग्णालये उघडण्यात येणार असल्याचे या ठिकाणी सांगण्यात आलेले आहे.14 जिल्हयात ग्रामीण रुग्णालये स्थापन करण्यात येणार आहेत परंतु जिल्हयाची जी यादी देण्यात आलेली आहे त्यामध्ये ठाणे,नाशिक,धुळे,अहमदनगर,नंदुरबार,सोलापूर,सातारा,को-ल्हापूर औरंगाबाद, नांदेड, उस्मानाबाद वाशिम आणि यवतमाळ अशा 13 जिल्हयांचा उल्लेख करण्यात आलेला आहे एक जिल्हा मात्र कमी दिसून येत आहे तेव्हा तो जिल्हा कोणता आहे याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तराच्या बाबतीत खुलासा करावा त्याचबरोबर प्रत्येक जिल्हयाच्या नावासमोर जी संख्या दाखविण्यात आलेली आहे त्याची बेरीज केली असता ही बेरीज 35 होते. तेव्हा त्याही बाबतीत मंत्रिमहोदयांनी उत्तराच्या भाषणात खुलासा करावा. ग्रामीण भागातील लोकांना जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी 14 जिल्हयात ग्रामीण रुग्णालये स्थापन करण्याचा शासनाने जो निर्णय घेतला आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.कवाडे ....

सभापती महोदया, बाब क्रमांक 209, पृ.क्र.165 द्वारा, प्रादेशिक विकास कार्यक्रमांतर्गत मराठवाडा विभागामध्ये 9 ट्रॉमा केअर युनिट व 13 मोबाईल हेल्थ युनिट स्थापन करण्याचा निर्णय आपण घेतला आहे आणि त्यासाठी 5 कोटी 99 लाख 91 हजार रूपयांची तरतूद येथे करण्यात आली आहे. त्याचबरोबर बाब क्रमांक 207 द्वारा जिल्हा नागरी रूग्णालय, बुलढाणा आणि सातारा यांच्याकरिता सी.टी.स्कॅन यंत्र बसविण्यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे त्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांचे स्वागत करतो. परंतु इतरही जिल्ह्यांमधील नागरी रूग्णालयांमध्ये अशा सोयी व्हाव्यात अशीही मागणी मी या निमित्ताने आपल्याकडे करतो.

सभापती महोदया, गृह विभागाची बाब क्रमांक 13, पृ.13 यामध्ये गुप्त सेवांकरिता अतिरिक्त तरतूद म्हणून 2.60 कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे. यावर या ठिकाणी अनेकांनी चर्चा केली आहे. परंतु संवेदनशील ग्रामीण भागामध्ये अलिकडच्या काळामध्ये दलित आणि बौद्ध समाजावर अत्याचार होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. ही बाब वारंवार शासनाच्या निदर्शनास आणून दिल्याने होणाऱ्या अत्याचारांची संख्या काहीशी कमी झालेली आहे. परंतु मला असे सांगावयाचे आहे की, अशा प्रकारचे ॲट्रॉसिटी ॲक्ट खालील होणाऱ्या गुन्ह्यांची दखल पोलीस घेत नाहीत, त्यांची नोंदही करीत नाहीत त्यामुळे त्याचे प्रमाण प्रत्यक्षात जास्त असले तरी रेकॉर्डवर मात्र त्यांची संख्या कमी दिसते. म्हणून आमच्या ग्रामीण भागामध्ये महत्त्वाचा अधिकारी जो पोलीस पाटील होता, त्या पोलीस पाटील यंत्रणेकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे, त्यांचेकडून जास्त कठोर कारवाई केली तर दलित व बौद्ध समाजावर होणारे अत्याचार कमी होतील.

सभापती महोदया, पृ.20, बाब क्र.37 यामध्ये मराठवाडा एकात्मिक विकास कार्यक्रमांतर्गत पर्यटनाच्या विकासासाठी 7 कोटीची तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्ये विशेष पॅकेज माहूर विकास आराखड्यासाठी म्हणून 10 कोटी रूपये देण्यात आले. त्यामध्ये मंदिर आणि तीर्थक्षेत्रे आहेत. त्यांचा विकास तसेच माहूर भागामध्ये राहणारी जी बौद्ध जनता आहे, तेथील बौद्ध लेणी आहेत, बौद्ध तीर्थक्षेत्रे आहेत त्यांचा देखील समावेश यामध्ये करावा अशी मी सूचना करतो.

..... 4एम 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ....

सभापती महोदया, त्यानंतर महसूल व वन विभागाच्या पूरक मागण्यांतील बाब क्र.53, पृ.क्र.33 या संदर्भात बोलताना मला सांगावयाचे आहे की, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी जी तरतूद करण्यात आली आहे त्यामध्ये आमची नैसर्गिक आपत्ती निवारण आणि केंद्र स्तरावरील आपत्ती निवारण यंत्रणा आहे त्यासाठी विशेष तरतूद केली आहे त्याबद्दल मी अभिनंदन करतो.

त्यानंतर कृषी, पशु संवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागाच्या पुरवणी मागण्यांमधील बाब क्र.53, पृ.क्र. 43 या संदर्भात बोलताना मला सांगितले पाहिजे की, महाराष्ट्र पशु व मत्स्य व्यवसाय विज्ञान विद्यापीठ जे या नागपूरमध्ये आहे आणि त्यातील कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीच्या उपर्जित व्याजाची तरतूद करण्यासाठी 1 कोटी 83 लाख 92 हजाराची तरतूद करण्यात आली आहे, ती अत्यंत उचित अशीच आहे. या निमित्ताने मी असेही सांगू इच्छितो की, नागपूरातील या पशु व मत्स्य व्यवसाय विज्ञान विद्यापीठामध्ये असणारी अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती समाजासाठी असलेली व्याख्याता आणि अधिव्याख्याता ही पदे भरण्यामध्ये अनेक प्रकारचे गैरप्रकार घडलेले आहेत. ....

(यानंतर श्री. सरफरे .... 4एन 1 ..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

अनेक प्रकारचा अन्याय मागासवर्गीयांवर केला गेला आहे त्या संदर्भात शासनाने कठोर कारवाई करावी असे मला म्हणावेसे वाटते.

सभापती महोदया, पृष्ठ क्र. 48 व बाब क्र. 78 मध्ये मच्छीमारांना पुरविलेल्या हायस्पीड डिझेल तेलावरील विक्री कराच्या रकमेची प्रतिपूर्ती आपण केली आहे. राज्यामध्ये 1 एप्रिल 2005 पासून व्हॅट लागू केला आहे, नवीन करप्रणाली सुरु झाली आहे. त्यामुळे मच्छीमारांना 100 टक्के विक्रीकर मुक्त हायस्पीड डिझेल तेल पुरविण्याची पूर्वीची योजना बंद करण्यात आली आहे. आणि आता तेल कंपन्यांव्दारे मच्छीमार सहकारी संस्थांना पुरविण्यात आलेल्या हायस्पीड डिझेल तेलावरील चुकत्या केलेल्या विक्रीकराच्या रकमेची प्रतीपूर्ती करण्यात आली आहे. याव्दारे मच्छीमार बांधवांची अनेक दिवसांची मागणी पूर्ण झाल्याबद्दल मी शासनास धन्यवाद देतो. सभापती महोदया, पृष्ठ क्र. 229 वरील बाब क्र. 238 मध्ये साखर निर्यातीसाठी सहकारी साखर कारखान्यांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी तरतूद केली आहे त्याबाबत मी शासनाचे अभिनंदन करतो. साखर कारखान्यांसाठी येणारा खर्च भागविण्यासाठी आपण कोणतीही तरतूद केली नव्हती. आज आपली साखर विदेशामध्ये जाण्यासाठी ही तरतूद केली आहे ती खरोखरच उचित आहे. यामुळे सहकारी साखर कारखान्यांना आपली साखर विदेशामध्ये निर्यात करण्यास चांगली संधी आणि चांगला वाव मिळेल असे मला सांगावेसे वाटते. त्यानंतर पृष्ठ क्र. 243 व बाब क्र. 266 मध्ये आदिवासी उमेदवारांसाठी शिकवणी-नि-मार्गदर्शन केंद्राच्या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थी उमेदवारांना विद्यावेतन देण्यासाठी तरतूद केली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांचा विद्यावेतनाचा दर 375 रुपयांवरुन 1 हजार रुपये केला आहे, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 149, बाब क्र. 188 मध्ये स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या अनुसूचित जातींच्या मुलांसाठी व मुलींसाठी अनुदानित वसतीगृहांच्या विस्तारविषयक कामासाठी तरतूद करण्यात आली आहे. जी अनुदानित वसतीगृहे चालविली जातात त्यांचा विस्तार करण्यासाठी ही तरतूद केली असल्यामुळे यामुळे अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना जास्त संधी, वाव मिळेल. या वसतीगृहांचा केवळ विस्तार करुन चालणार नाहीतर नवीन वसतीगृहे शासनाने उघडण्यासाठी विचार करावा. जेणेकरुन जास्तीत जास्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या मुली-मुलांना उच्च शिक्षणाची संधी प्राप्त होईल. त्यानंतर पृष्ठ क्र. 150 व बाब क्र. 191 मध्ये अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या मॅट्रिकोत्तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

शिष्यवृत्तीच्या आधारे विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण फी व परीक्षा फी देण्यासाठी सन 2004-05 मध्ये अपुऱ्या तरतुदीमुळे 3554 अर्ज प्रलंबित होते ते निकाली काढण्यात आले नव्हते. ते निकाली काढण्यासाठी याठिक्राणी तरतूद करण्यात आली आहे. यामुळे भटक्या व विमुक्त जातीच्या विद्यार्थ्यांना निश्चितपणे लाभ होईल. परंतु हे करीत असतांना इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती देण्याबाबत शासन विचार करणार आहे की नाही? सभापती महोदया, बाब क्र. 200 व पृष्ठ क्र. 153 मध्ये अशासकीय संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या सात विना अनुदानित संस्थांना मान्यता देण्याचे ठरविण्यात आले आहे, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदया, मी शेवटचा मुद्दा सांगून माझे भाषण संपविणार आहे. पृष्ठ क्र. 153 वरील बाब क्र. 201 मध्ये श्रावणबाळ सेवा योजनेकरीता अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. सदरहू श्रावणबाळ सेवा योजनेसाठी केलेली तरतूद अपुरी होती म्हणून अतिरिक्त 20 कोटी 26 लाख रुपयांची ही तरतूद करण्यात आली आहे. यामुळे राज्यातील वयोवृध्द मंडळींना निश्चितपणे लाभ मिळेल. सभापती महोदया, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण संपवितो. धन्यवाद. जय भीम.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी गृह विभागाच्या संदर्भातील दोन मागण्यांच्या संदर्भात बोलणार आहे आणि त्या अनुषंगाने दोन उदाहरणे देणार आहे. पहिल्यांदा पान क्र.14, बाब क्र.17 बाबत बोलणार आहे. यामध्ये विशेष सरकारी अभियोक्त्याच्या फीची तरतूद करण्यात आली आहे. एकतर अबू सालेमला वेगवेगळया कोर्टामध्ये नेत असताना 1993 मध्ये जो बॉम्बस्फोट झाला, त्यामध्ये त्याची इन्व्हॉलमेंट असल्यामुळे त्याला कोर्टात आणण्यात आले आणि कोर्टातून परत नेत असताना, त्या खटल्यात दाखल असलेले, सहयोगी असलेले आणि गेली 12-13 वर्षे तुरुंगात असलेले जे आरोपी आहेत, त्यातील एक आरोपी त्याला असे म्हणाला की," सालेम भाई आप भाई हो, भाई बनकर ही रहना, डरना मत. हम 12 साल से मजे में हैं. हमें भी साथ में ही डाला है.आप डरना मत." हे सर्व वर्तमानपत्रामध्ये आलेले आहे. मला याविषयी जास्त काही बोलावयाचे नाही. शासन किंवा गृह विभाग याबाबतीत जी काही उपाययोजना करावयाची आहे ती करेल. परंतु या पापाचे धनी आपणच आहोत. 1993 मध्ये बॉम्ब स्फोट झाला आणि त्यात अनेक निरपराध माणसे मारली गेली, अनेकांची घरे उध्वस्त झाली. काही घरातील मुले दहावी-बारावीच्या परीक्षेला होती पण त्यांच्या शरीराच्या चिंधडया झाल्या. हे सगळे हरामखोर देशद्रोही 13 वर्षानंतरही याठिकाणी अशा प्रकारे बोलू शकतात की," सालेम भाई आप भाई बनकर ही रहना, आप डरना मत."मला असे म्हणावयाचे आहे की, इतर वेळेला तुम्ही एन्काऊंटर करता, मग जो असे बोलू शकतो त्याचेही गाडीतून नेता-नेता एन्काऊंटर का केले नाही? मग काय ते कायद्यामध्ये पाहिले असते. त्यांची इतकी हिंमत होऊ शकते, त्याचे कारण आपण आहोत. खरे म्हणजे 13 वर्षामध्ये आपण हा खटला वेळेवर चालवून त्यांना एकतर फासावर चढवले नाही किंवा न्यायालयाच्या चौकटीतील जी जास्तीतजास्त शिक्षा आहे, ती देखील दिली नाही. 2001 मध्ये अमेरिकेतील दोन टॉवर उध्वस्त झाले. पण त्यानंतर वर्ष-दीड वर्षातच तेथे या खटल्याचे निकाल लागले आणि संबंधितांना शिक्षाही झाली. तसेच तेथेही बॉम्ब स्फोट झाले, युरोप, पाश्चिमात्य देशातही गेल्या चार-पाच वर्षात बॉम्बस्फोट झाले. पण तेथील खटल्यांचे निकाल भराभर लागले आणि कोणतीही दयामाया न दाखवता आरोपींना शिक्षा झाली. मी येथे न्यायालयांवर, न्यायाधीशांवर शिंतोडे उडवत नाही, तो आपला अधिकारही नाही. येथे मर्यादांचे पालन झाले पाहिजे. पण मला हे कळत नाही की, न्यायालयाचे कामकाज संपल्यानंतर अबू सालेमला कोर्टरुम मध्ये बोलावून घेतले जाते आणि विचारले जाते की,"आप को कुछ तकलीफ.....

. . . .4 ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होती है ? आपको कुछ होता है ? आपको खाना-पिना मिलता है ? आणि काही-काही इंग्रजी मिडियावाले तर अबू सालेम सकाळी किती वाजता उठतो ? त्याला कोण-कोण भेटले ? त्याला त्याचे वडील किती वाजता भेटले ? भाऊ किती वाजता भेटले ? त्याने किती वाजता वामकुक्षी घेतली ? याचे सगळे वर्णन करतात. जसे काही एखाद्या क्रांतीकारकाचे वर्णन करीत आहेत. दुसरीकडे भगतसिंग, राजगुरु, सुखदेव, ज्यांनी देशासाठी बलिदान केले त्यांच्याबद्दल सुध्दा त्यांच्या जयंतीला, किंव पुण्यतिथीला या वर्तमानपत्रातून साध्या चार ओळीही लिहील्या नसतील परंतु अबु सालेमबद्दल सर्व वर्णन करतात. अबु सालेमला अशा प्रकारे बोलण्याचे धारिष्ट्य कसे होऊ शकते ? 13 वर्षे खटला चालला मी न्यायालयाच्या क्रेडिबिलीटीमध्ये, त्याच्या सक्षमतेमध्ये जात नाही. परंतु आम्ही आता असे ऐकत आहोत की, अबु सालेमला या खटल्यामध्ये फरारी म्हणून घोषित केले होते. पण आता तो मिळाल्यानंतर आरोपपत्रात काही बदल केले जाणार आहेत. सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब येथे उपस्थित नाहीत. पण आरोपपत्रात बदल करीत असताना पुन्हा हा खटला 10-12 वर्षे चालणार नाही ना ? याची आपल्याला कोणत्याही प्रकारची खात्री देता येत नाही. म्हणून याबाबतीत शासनाने अतिशय काळजीपूर्वक उत्तर दिले पाहिजे की, आपण पुन्हा न्यायालयासमोर कशा प्रकारे जाणार आहोत. हा खटला पुन्हा उभा राहणार आहे आणि तो 5-10 वर्षे चालणार, मग पुन्हा कोणी तरी असे डेअरींगमध्ये बोलू शकतो. तरन्नुमला पकडल्यानंतरही आपण विवक्षित दिवसात आरोपपत्र दाखल करु शकलो नाही. अफरोजच्या बाबतीत तसेच झाले. अनेक देशभक्तांना ज्यामध्ये कॉंग्रेसचे पुढारी होते, शिवसेनेचे पुढारी होते, भारतीय जनता पार्टीचे पुढारी होते, त्यांना मारण्याचा याने कट केला होता. पार्लमेंट उडविण्याच्या कटामध्येही त्याचा सहभाग होता. पण त्याच्यावर देखील योग्य वेळी आरोपपत्र दाखल केले नाही. त्यामुळे तो सुटला आणि निवडणुकीत फॉर्म भरण्यापर्यंत त्याची मजल गेली. तरन्नुमच्या बाबतीतही तेच झाले आहे. ती आता बाहेर मुलाखत देत आहे की, "तुरुंगात माझे दिवस चांगले गेले, मी निरपराध होते, यांना माझ्यावर आरोप ठेवता आले नाहीत, त्यांना साधे आरोपपत्रही ठेवता आले नाही. माझ्यासारख्या निष्पाप जिवाला इतके दिवस तुरुंगात रहावे लागले वगैरे. हे लांच्छनास्पद नाही का ? हे असे का झाले ? याबाबतीत असे सांगण्यात आले की, यातील काही लोक फरारी असल्यामुळे त्यांना पकडल्याशिवाय आरोपपत्र ठेवता येणार नाही. पण आपण तरन्नुमची एकटीची केस आयसोलेट केली असती, वेगळी केली असती आणि तिच्यावर वेगळे आरोप ठेवले असते.

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरु....

तर बोलायची हिम्मत नाही. म्हणून या दोन्ही गोष्टीचे उत्तर दिले पाहिजे.

दुसरी बाब मी मांडणार आहे. ती म्हणजे महसूल खात्याची बाब क्रमांक 54, 55,पान क्रमांक 33. जुलै महिन्यामध्ये जो महापूर झाला, त्यामध्ये पूरग्रस्तांना आपद्ग्रस्तांना मदत द्यायची आहे. मी येथे कोणाचे नाव घेत नाही. एका गावामध्ये भ्रष्टाचार झाला. आता योगायोगाने जे गाव आहे, ते पेण तालुक्यातील रावे नावाचे गाव आहे. श्री. रवि पाटील साहेबांचे गाव आहे. मी त्यांच्यावर आरोप करत नाही. त्यांच्या गावामध्ये 722 कुटुंबांना 35 लाख रुपयाची मदत दिली. फक्त त्या ठिकाणी अर्धा फूट पाणी गेलेले होते, त्यांना 722 घरांना 35 लाख रुपयाची मदत दिली. त्यानंतर अधिकारी खाजगीमध्ये सांगतात की, आमच्यावर मंत्र्यांचा दबाव होता, आमच्यावर शासनाचा दबाव होता. या भ्रष्टाचाराची आपण चौकशी करणार आहात की नाही ? "कॉंग्रेस के साथ, गरीबों को हात," "न्यायाच्या भूमिका, त्यागाच्या भूमिका" अशाप्रकारच्या जाहिराती केल्या जातात. निर्लज्जपणे काही लोकांनी मदत घेतली त्याची माहिती घेतलेली आहे. पहिल्या मजल्यावरील माणसे मदत वाटपाच्या रांगेमध्ये बेशरमपणे उभी राहिली. ज्यांचे संसार उध्वस्त झाले, ज्यांची मुले, नवरा, बायको, कुटुंबातील आधार गेले. त्यांना मदत अजूनही मिळाली नाही. 722 कुटुंबांना 35 लाख रुपयाची मदत वाटली गेली, याला कोण जबाबदार आहे ? हे आपण ठरविणार आहात की नाही ? त्याच्या शेजारी जीते गाव आहे. खाडीमुळे रेल्वे लाईनमुळे बाळगंगा नदीतील पाण्याचा लोंढा जीते गावाकडे अचानकपणे आला. त्यामुळे जीते गावातील बहुतांश घरांमध्ये पाणी शिरले आणि नासधुस झाली. त्याबाबत पंचनामेही झाले. परंतु कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी 63 कुटुंबांना मदत दिली आणि इतर 500 कुटुंबांना मदत दिली नाही. म्हणजे त्यांची इन्क्वायरी झाली, पंचनामे झाले त्यांचे किती नुकसान झाली त्याची नोंद झाली.. कोणाचे 2 हजार, कोणाचे 5 हजार, कोणाचे 10 हजाराचे नुकसान झाले त्यांना मदत दिली गेली नाही. हा कशाप्रकारे अन्याय चाललेला आहे? त्याची तुम्ही चौकशी करणार की नाही ? हे प्रकरण अतिशय गंभीर आहे, याची चौकशी करणे अत्यंत आवश्यक आहे. पेण तालुक्यातील दुसरा मुद्दा म्हणजे ही मदत शासनाकडून केली जात नसून ती कॉंग्रेस पक्षाकडून केली जात आहे, असे भासवून कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून मदतीचे वाटप होत होते. अशाप्रकारचे लेबल लावून मदत वाटली जात होती. मी राजकीय अभिनिवेशाने बोलत नाही. प्रेताच्या डोक्यावरील लोणी खायचे आणि राजकीय

फायदे लोकांच्या दारिद्र्य आणि संकटामध्ये घ्यायचे याच्यासारखी दुसरी लाजिरवाणी गोष्ट नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरु....

सगळयांनी मिळून संकटाला तोंड देणे आवश्यक आहे. माननीय श्री.अडवाणी साहेबांना जेव्हा चिपळूण येथे विचारले की, तुम्ही शासनाला दोष देणार आहात काय ? शासनाची कमतरता तुम्हाला वाटत नाही काय ? त्यावर ते म्हणाले की, दोषी कोण आहेत ते आपण नंतर ठरवू, अगोदर आपण महाराष्ट्र शासनाच्या मागे सगळयांनी उभे राहू, आपद्कालिन परिस्थितीमध्ये पूरग्रस्तांना मदत करु, आस्मानी संकट आलेले आहे. आपल्या नाकर्तेपणामुळे अदूरदृष्टीपणामुळे हे संकट आले. तरीसुध्दा टिकाटिप्पणी न करता आपण त्या ठिकाणी मदत केली पाहिजे. सभापती महोदय, तांबडशेत गावाला 5 लाख रुपयाची मदत आली. त्यापैकी 4 लाख 50 हजाराची मदत वाटली गेली. उरलेल्या 50 हजाराचा हिशोबच नाही. म्हणून याचीही चौकशी होणे आवश्यक आहे. त्यानंतर पात्र नसलेल्या कुटुंबांचे बोगस पंचनामे करुन मदतीचे वाटप केल्याचे वर्तमानपत्रात प्रसिध्द झाले. सगळयात मजेशीर बाब म्हणजे तक्रार केल्यानंतर आपल्यावर कारवाई होऊ नये, म्हणून त्या गावातील 15 लोकांनी माफी मागून सरकारने दिलेली मदत परत केली आणि लिहून दिले की, "अमुक प्रतिष्ठित व्यक्तींनी सांगितले की तुम्ही सुध्दा उभे रहा, म्हणून आम्ही उभे राहिलो. पण आता आमाच्यावर कारवाई होईल म्हणून तुमची मदत परत करीत आहोत." शेवटचे मी एका मिनिटात बोलतो की, एकंदरीत एकट्या पेण तालुक्यात अशी अनेक उदाहरणे आहेत की, ज्यांचे नुकसान झाले आहे त्याला मदत मिळाली नाही आणि ज्यांचे काहीही नुकसान झाले नाही त्याला मदत मिळाली. असे एकूण 7 कोटी रुपये हे ज्यांचे कवडीचेही नुकसान झाले नाही त्यांना वाटण्यात आले. हे कोणाचे पैसे आहेत ? शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी आपल्याकडे पैसे नाहीत, शहरामध्ये नागरी सुविधा देण्यासाठी पैसे नाहीत. शिक्षणासाठी पैसे नाहीत. कर्मचारी वाढवायचे असतील तर पैसे नाहीत. सरकारी कर्मचाऱ्यांना 12 महिने काम आणि 13 महिन्याचा पगार, हे कामगार विभागात सूत्र आहे त्यांच्यासाठी पैसे नाहीत. 7 कोटी रुपये सरकारचा पैसा आला त्याचे कोणाला वाटप केले, याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. शेवटी मी एकच मुद्दा सांगणार आहे की, शासनाने तात्पुरती मदत पूरग्रस्तांना दिली. परंतु ज्यांची घरे गेली, उध्वस्त झाली त्याबाबत शासनानेच निकष ठरविलेले आहेत की, सामान्य घर बांधण्यासाठी 30 हजार रुपये लागतात. त्यांना तुम्ही 4 हजार 800 रुपये दिलेले आहेत आणि ज्यांचे घरांचे नुकसान झालेले आहे त्यांना 2 हजार रुपये दिलेले आहेत. म्हणून मला असे म्हणावयाचे आहे की,

ही जी तरतूद केलेली आहे, ती चांगली गोष्ट आहे, पुनर्वसन करायला पाहिजे. पण या पुनर्वसनाच्याबाबतीत मदत वाटपाच्याबाबतीत .... (यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ..

कोटयावधी रुपयाचे जे घोटाळे झालेले आहेत त्याच्यवर कडक शासन करु मग तो सत्ताधरी पक्षातील असेल, विरोधी पक्षातील असेल, सरकारी अधिकारी असेल त्यांना कठोरातील कठोर शिक्षा देऊ असे या चर्चेच्या निमित्ताने मंत्रिमहोदयांनी सांगावे, अशी माझी त्यांना विनंती आहे. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय,विविध पुरवणी मागण्यांपैकी सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये पृष्ठ क्रमांक 165 बाब क्रमांक 209 यामध्ये मुफसल क्षेत्रातील दवाखाने आणि रुग्णालयाचा उल्लेख केलेला आहे. त्या बद्दल मी मंत्रमहोदयांचे स्वागत करते.माननीय आरोग्य मंत्री डॉ.विमल मुंदडा यांनी दोन वर्षापूर्वी मोखाडा तालुक्याला कुपोषणाच्या संदर्भात भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी वाशाळे आणि आसे या ठिकाणच्या आरोग्य उपकेंद्रांचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून निधी देऊ जेणेकरुन हा कुपोषणाचा प्रश्न हाताळता येईल असे अश्वासन नागरिकांना दिले होते. त्यासंदर्भात दैनिक लोकमतचे श्री. सोनकांबळे या मोखाडयाच्या पत्रकांराने सातत्याने पाठपुरावा केलेला आहे.तेव्हा वाशाळे आणि आसे गावच्या ग्रामस्थांच्या मागणीनुसार आरोग्य उपकेंद्राच्या संदर्भात निधीची उपलब्धता या पुरवणी मागण्यांमध्ये दिसत नाही. परंतु लवकरच मार्चच्या बजेटमध्ये याबद्दल निधीची उपलब्धता करावी अशी मी विनंती करते.

ग्रामविकास आणि जलसंधारण याच्यामध्ये सर्वसाधारणपणे मराठवाडा विभागातील वेगवेगळया जलसंधारण कार्यक्रमासाठी म्हणून बाब क्रमांक 174 आणि 175 नुसार शासनाने बरीचशी व्यवस्था केलेली आहे. पण अहमदनगर जिल्हयाकडे आपले थोडेसे दुर्लक्ष झालेले दिसते. नगर जिल्हयातील पाथर्डी आणि राहुरी तालुक्यातील गर्भगिरीडोंगर पायथ्यालगतचे वीस पाझर तलाव बांबोरीचारीवरुन भण्याच्या संदर्भात नागरिकांनी मागणी केली आहे.याबद्दल मुख्य पाईपलाईन मंजूर होऊन त्या संदर्भात कामाला सुरुवात झालेली आहे. पण तेथे छोटया साठवण टाकीची व्यवस्था झालेली नाही. म्हणून खोसपुरी, आव्हानवाडी,उदरमल, कोल्हार, डमळवाडी,गितेवाडी,डोंगरवाडी, धारवाडी, पवळवाडी, बाभळगाव, दगडवाडी, करंजी व राहुरी तालुक्यातील 4- पाझर तलाव याबद्दल आपण दखल घ्यावी अशी मला विनंती कराविशी वाटते. ग्रामविकास आणि जलसंधारणामध्येच बाब क्रमांक 178 यामध्ये ग्रामपंचायतींना दिव्याच्या संदर्भातील बिल माफीची पावले उचललेली आहेत, त्याचे मी स्वागत करते.ग्रामीण भागात ग्रामपंचायतीच्या अंतर्गत जे दिवे असतात त्या बहुतेक दिव्याचे कनेक्शन तीन-चार मुख्य ठिकाणी लावलेले असते. पण गावामधील जो पाणवठा आहे आणि मागासवर्गीयांची वस्ती आहे येथपर्यंत त्या दिव्यांचे कनेक्शन असतेच असे नाही. म्हणून या संदर्भात खास एक जी.आर. काढून ग्रामपंचायतीचे लक्ष

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

वेधले पाहिजे. ज्यावेळेला शासन हे बिल भरणार आहे त्यावेळेला पाणवठयाचा पुरवठा अर्थात वीज असेल तर लोडशेडिंग असेल आणि वीज नसेल तर ती गोष्टच वेगळी. पण पाणवठयाजवळ सुध्दा या दिव्यांची व्यवस्था असली पाहिजे.

गृह विभागाचे दोन्ही माननीय मंत्रिमहोदय सभागृहात नाहीत. पण कोठेवाडी येथील पोलीसस्टेशनचा मुद्दा वारंवार नगरजिल्हयामध्ये मांडला गेला होता. आणि या सदनामध्ये मी औचित्याच्या मुद्याद्वारे ज्यावेळेला हा मुद्दा उपस्थित केला होता त्यावेळी गृह राज्यमंत्र्यांनी श्री. डावखरेसाहेब आपण सभास्थानी असतांना त्याला मान्यता दिली होती. कोठेवाडी केसचा निकाल लागला आहे.त्या निकालामध्ये ॲडव्होकेट श्री. उज्वल निकम यांनी चांगले काम केले आहे.परंतु कोठेवाडी येथील पोलीस स्टेशनच्या संदर्भातील घोषणा होऊन सुध्दा माणिकदवंडीला पोलीस स्टेशन कां करत नाही ? अशी विचारणा होत आहे. माणिकदवंडीला ऑलरेडी पोलीस स्टेशन आहे. कोठेवाडीच्या ग्रामस्थांची जी मागणी आहे ती तेवढी योग्य नाही, असे स्थानिक पोलीस अधिकारी आम्हाला सातत्याने सांगत आहेत. त्याचा प्रस्तावही मधल्या तीन-चार वर्षात हरवलेला होता. परंतु अजूनही तेथे लोकांच्या मनामध्ये भिती आहे. म्हणून या कोठेवाडी पोलीस स्टेशनच्या संदर्भात मी मागणी करीत आहे. याच बरोबर चार वेगवेगळया संदर्भातील महत्वाचे काही अर्ज माझ्याकडे आहेत. मी त्या सगळया तपशीलामध्ये जात नाही. परंतु पुणे जिल्हयाचे खासदार श्री. शिवाजीराव आढळराव पाटील यांनी वारंवार गेल्या आठवडयामध्ये ए.पी.आय. कल्याण पवार यांनी डॉ.सीमा खिवसरा यांच्या दवाखान्यात जाऊन अर्वाच्च शब्दात शिविगाळ केली आहे.त्याच्यामध्ये काही निष्पाप, निरपराध लोकांना गोवलेले आहे.त्यासंदर्भात मंचर पोलीसस्टेशनच्या संदर्भात सातत्याने आंदोलन चालले आहे. पुणे जिल्हयाच्या एकूण सगळया पोलिसांबद्दल मला काही बोलावयाचे नाही. पण या मंचरला ए.पी.आय. कल्याण पवार यांच्या संदर्भात ताबडतोब कारवाई झाली पाहिजे. ते निरपराध नागरिकांना अडकवत आहेत. डॉ. सीमा खिवसरा यांच्या दवाखान्याचे मी उदघाटन केले होते. त्यांच्या दवाखान्यामध्ये जाऊन सुध्दा त्यांचा कोणताही गुन्हा नसतांना त्यांना बराचसा त्रास दिलेला आहे.

यानंतर श्री. खर्चे....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे .....

त्याचबरोबर वीट, ता. करनाळा, जि. सोलापूर येथील काशिनाथ कृष्णा राऊत व अन्य नागरिक उपोषणाला बसलेले आहेत. कारण त्या गावात एका 15 वर्षाच्या मुलीवर अत्याचार करुन तिचा खून करण्यात आला.अजूनही आरोपी सापडलेले नाहीत. याप्रकरणी जातीने लक्ष घालून योग्य ती कारवाई करण्याच्या सूचना देण्यात याव्यात. नागपूरमधील काटोल तालुक्यात ढाले नांवाची व्यक्ती सातत्याने अल्पवयीन मुलींना त्रास देते, तशा तक्रारी देखील अनेक वेळा केलेल्या आहेत, त्याला एक वेळा याच बाबतीत अटक झालेली आहे, याबाबत मंत्री महोदयांनी योग्य ती कारवाई करावी. त्याचप्रमाणे पुणे जिल्हयातील मुळशी तालुक्यात भांबरडे या ठिकाणी एका मुलावर लैंगिक अत्याचार झालेले आहेत, त्यासंदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी जातीने लक्ष द्यावे] अशी मी विनंती करते. महसूल व वन विभागाच्या संदर्भात मला बाब क्र. 53 व 54 च्या संदर्भात शासनाने आपत्ती निवारण आराखडा जिल्हयाच्या स्तरावर तयार करण्यासाठी निधीची मागणी केलेली आहे. पण प्रत्यक्षात ज्यावेळी आपत्ती येते त्यावेळी फारच थोडया जिल्हयांतील आपत्ती निवारण योजनेची अंमलबजावणी झालेली दिसून येते. म्हणून या आपत्ती निवारण सहाय्य निधीबाबत जिल्हावार आढावा घेऊन कोणकोणत्या त्रुटी त्यामध्ये आहेत त्याबाबतची कार्यवाही केली पाहिजे, तसेच संबंधित कर्मचारी जर दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई देखील केली पाहिजे. याबाबत जर शासनाने विचार केला नाही तर पैसे असून देखील अशा योजनेचा फायदा होणार नाही. त्यानंतर महिला व बालकल्याण विभागाच्या बाब क्र. 258 संदर्भात मला असे सुचवावयाचे आहे की, याच मागणीसाठी आम्ही मागील अधिवेशनात शासनाकडे प्रयत्न केला असता त्यावेळी शासनाकडून घोषणा करण्यात आली होती की, असंघटित क्षेत्रातील मुलींसाठी विमा योजना सुरु करणार. शेवटी त्याची पुर्तता होणे आवश्यक आहे. म्हणून कामगार विमा योजनेबाबत आपण मागील वेळी उल्लेख केला होता त्यासंबंधीचा यामध्ये उल्लेख दिसत नाही, त्याबाबत मंत्री महोदयांनी विचार करावा अशी मी विनंती करते. दुसरे महत्वाचे म्हणजे क्वालिटी इंस्टीटयुशनल केअर अँड आल्टरनेटीव्हज् डेव्हलपमेंट या विषयात काम करणारी कार्यकर्ती भवानी शास्त्री यांनी वेगवेगळया प्रकारचे अहवाल दिले आहेत. त्या भवानी शात्रींनी मुंबईतील पूर परिस्थितीच्या काळात अनेक लोकांना वाचविले व त्यामुळेच त्यांना लेप्टोस्पायरसिसची लागण झाली व त्यामध्ये त्यांचे निधन झालेले आहे. त्यांच्या संस्थेने राज्यातील जवळजवळ 200 आधार गृहांचा आढावा घेतला आणि त्यासंबंधीचा अहवाल शासनाकडे

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे .....

दिलेला आहे. त्या संस्थेचे नकुल काटे म्हणून कार्यकर्ते आहेत त्यांनी सातत्याने बालगृहासंबंधी शासनाला सूचना केलेल्या आहेत. त्यांची मागणी अशी आहे की, किती ठिकाणी बालगृहांची आवश्यकता आहे यासंबंधीचे ॲसेसमेंट करुन त्यांना ग्रांट दिली जावी. म्हणून माझी विनंती आहे की, भवानी शास्त्री ही अशी मुलगी होती की दुस-यांचा जीव वाचविण्यासाठी स्वत:चा जीव तिने समर्पित केला होता. त्यांच्या संस्थेने दिलेला रिपोर्ट अनिर्णित अवस्थेत शासनाकडेच पडलेला आहे. अशा प्रकारे त्यांना वाऱ्यावर सोडून न देता त्यांच्या क्वालिटी इंस्टीटयुशनल केअर अँड आल्टरनेटीव्ह केअर या संस्थेने जो अहवाल शासनाकडे दिलेला आहे त्याचा पाठपुरावा केला पाहिजे. दुसरी मुद्दा असा आहे की, मतिमंद मुलांच्या आश्रमशाळेत जो विषबाधेचा प्रकार झाला तसेच अनेक अशाच संस्थांमध्ये गैरव्यवहार झालेले आहेत, त्यांना आपण मोठया प्रमाणात अनुदाने दिलेली आहेत, त्याच्या अंमलबजावणीच्या संदर्भात आपण महिला सदस्यांची समिती करुन त्याबाबतची चौकशी केली व त्यावर आम्हा महिलांची नेमणूक केली तर आम्हाला आवडेल. त्यानंतर विश्वकोषाच्या बाबत फार मोठी कॉन्ट्राव्हर्सी आज आपल्या राज्यात आहे. विश्वकोषासाठी नियुक्ती शासनाने केलेली आहे आणि त्याचे अध्यक्षस्थान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि श्री.रेगे तसेच श्रीमती विजया वाड यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. श्रीमती विजया वाड बाल साहित्यकार आहेत, त्यांनी इतरही साहित्य केलेले आहे, त्याबद्दल वाद नाही परंतु विश्वकोषासंबंधीचा आढावा शासनाने घेतला पाहिजे. कारण विश्वकोषाच्या ग्रंथाच्या सर्व खंडही मिळत नाहीत,अशी अवस्था आहे. आता जी नियुक्ती केली आहे त्यामुळे साहित्यिकांमध्ये दोन तट पडल्याचेही दिसून येते. शासनाने या विश्वकोष समितीवर नियुक्ती करतांना अरुण टिकेकर आणि राम बापट यांच्यासारख्या थोर विचारवंतांनाही सदस्य म्हणून घेतले आहे, या नियुक्तीच्या बाबतीत कोणते निकष शासनाने लावले आहेत त्याचा रिव्हयू घेऊन वेळ आली तर निकष लावूनही विचार करावा, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करते.

यानंतर श्री जुन्नरे

अशुद्धलिपि प्रत / शीघ्रलिपि नाही

श्री. रमेश निकोसे (नामनियुक्त) :सभापती महोदय, पुरवणी मागण्यावर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे. पुरवणी मागण्यातील बाब क्रमांक 245, पृष्ठ क्रमांक 233 वरील महिला व बाल कल्याण विभागावर मी प्रथम बोलणार आहे. महिला व बालकल्याण विभागामध्ये शहरी विभाग आणि ग्रामीण विभागामध्ये सकस आहार व पोषण आहार दिला जातो. यासंदर्भातील जी.आर. दिनांक 8.3.94, 29.5.99, 19.6.200, 30.12.2000, 24.5.2001, 12.12.2002, 29.4.2003, 13.6.2003, 19.5.2004, 24.8.2004, 17.1.2005 असे जवळ जवळ 13 वेळेला जी.आर. निघालेले आहेत. सकस पोषण आहाराच्या संदर्भात केंद्रसरकार महाराष्ट्र शासनाला मदत करीत असते. ग्रामीण विभागात अंगणवाडी केंद्राना 1.48 रुपये या दराने भाव दिला जातो परंतु 1997 पासून शहरी विभागात म्हणजे मुंबई, कोल्हापूर, नागपूर, अमरावती या सगळया विभागातील लोकांना 1.48 रुपये या दराने भाव द्यावयास पाहिजे होता तो देण्यात आलेला नाही. सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला की, हे काम महिला संस्थानाच देण्यात यावे. त्यामुळे महिला संस्थांना ब्रेड बनविण्याचे काम, खिचडी बनविण्याचे काम नवीन जी.आर.प्रमाणे शहरी विभागात देण्यात आलेले आहे. यासंदर्भात मी आपले लक्ष वेधू इच्छितो की, विदर्भातील पोषण आहार निर्माण करणा-या महिला संस्थांनी दर वाढवून देण्याच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांना, बालविकास मंत्र्यांना, कमिशनरांना पत्र व्यवहार केला परंतु त्यामध्ये त्यांना यश आले नाही. शेवटी या महिला संघटनांनी नोटीस काढली की, आम्ही 1 डिसेंबर पासून सकस पोषण आहार बनविण्याचे बंद करणार. मी या प्रश्नाच्या संदर्भात पाठपुरावा करीत असतांना 2003 मध्ये त्यावेळचे मंत्रीमहोदय श्री. जयंतराव आवळे यांना पत्र लिहिले त्यावेळेस त्यांनी कळविले होते की, "नागरी प्रकल्पातील आहार पुरवठयाच्या कार्यपध्दतीत सुधार करण्यात येऊन 29.4.2004 च्या शासन निर्णया प्रमाणे आम्ही तुम्हाला 1.48 रुपये भाव देऊ". परंतु तो दर अजून पर्यंत लागू करण्यात आलेला नाही ही दुर्दैवाची बाब आहे. सभापती महोदय, 1997 मध्ये ब्रेड बनविण्यासाठी जो मैदा लागत होता त्यावेळी मैद्याचा भाव 5.00 रुपये किलो होता तो भाव आता 10.00 रुपयांवर गेलेला आहे. अगोदरच्या दरामध्ये आणि आताच्या दरामध्ये फार मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. आता लाकूड, तेल, तूप यांचे दर वाढल्यामुळे यासंदर्भातील दर वाढवून दिले जातील असे माननीय मंत्रीमहोदयांनी जाहीर करावे. यासंदर्भात मला एक शेर आठवतो तो असा आहे की,

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे.....

समझ समझ को समझ से समझो
समझ ही समझ एक समझ है
मेरी समझ को तुम न समझे
तो क्या मेरी ही समझ में नासमझ है.

उप सभापति : उसमें एक लाईन और जोड़ दो. " जो न समझे, वह अनाड़ी है "

श्री. रमेश निकासे : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्याच्या बाब क्रमांक 205 पृष्ठ क्रमांक 161 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय उत्तर नागपूरमध्ये निर्माण झाले, त्या ठिकाणी वास्तु बांधण्यात आली व त्या ठिकाणी एक डॉक्टर, एक कम्पाऊंडर आणि एक नर्स ठेवण्यात आलेली आहे परंतु या ठिकाणी खाटांची व्यवस्था नाही तसेच दुसरी कशाचीही व्यवस्था नाही. त्यामुळे यासंदर्भात शासनाने लक्ष देण्याची गरज आहे. आणि कशाचीही व्यवस्था करण्यात आली नाही

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे...

उत्तर नागपूरमध्ये मेडिकल कॉलेज आहे. तेथे टी.बी.रुग्णांसाठी कक्षाची किंवा हॉस्पिटलची स्थापन केली पाहिजे, अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे. तसेच, मेयो हॉस्पिटलमधी इंदिरा गांधी मेडिकल कॉलेजची जी वास्तू आहे ती पुन्हा बांधण्याची आवश्यकता आहे.

यानंतर मी वन विभागाच्या पान क्रमांक 37 वरील बाब क्रमांक 61 माझे विचार मांडणार आहे. वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागातर्फे झाडें व बांबू लावले जातात. झाडे लावल्यामुळे वनसंपदामध्ये वाढ होते. केंद्र शासनाने बांबू यास क्राफ्टमध्ये समाविष्ट केले आहे. 3-4 वर्षात बांबूचे पीक येते. ते कापल्यानंतर पुन्हा रोप लावले की ते वाढते. चायनाने बांबू इंडस्ट्रीमध्ये प्रगती केली आहे. तो आपल्या इथेसुध्दा येत आहे. बांबू हा वनात येत असल्यामुळे त्याची कटाई करण्यात येत नाही.

यानंतर मी बाब क्र.183 व 184 संबंधी माझे विचार व्यक्त करणार आहे. कला व नाटयगृहासाठी शासनाने मदत दिलेली आहे, त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करतो. उत्तर नागपूरमध्ये कामगार कल्याण विभागातर्फे नाटयगृह बांधण्याची योजना होती. त्यासाठी पैसे मंजूर होऊन नाटयगृहाच्या कामाला सुरूवात देखील झाली होती. पण आज नाटयगृहाचे काम अर्धवट अवस्थेत आहे. दलित साहित्यिक श्री.शेंडे यांच्या नावाने सांस्कृतिक मंदिर बांधण्यात येणार आहे. अखिल भारतीय नाटय परिषदेमध्ये 'गांधी-आंबेडकर-रमाई' यावर एकपात्री कार्यक्रम सादर करणार आहे. तेव्हा आपण नाटयगृह बांधण्यासाठी जास्तीत जास्त मदत करावी अशी मी आपणास विनंती करतो. धन्यवाद.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्र.21, 22 व 23 वर बोलण्यासाठी मी उभा आहे. मध्यंतरीच्या काळात गडचिरोलीचे एस.पी.यांची मुलाखत मी पाहिली. त्यावेळी त्यांनी सांगितले की, भारनियमानामुळे नक्षलवादी कारवाया वाढत आहेत. त्यास पायबंद घालताना त्रास होतो. त्याच बरोबर या भागाचा विकास झाला तर सगळया गोष्टी सुटतील,असे देखील त्यांनी सांगितले. तेव्हा मी गृहमंत्र्यांना विनंती करीन की कमीतकमी भारनियमानासाठी आपण विचार केला पाहिजे.

विजेच्या चोरीला आळा घालण्यासाठी कल्याण, ठाणे, नाशिक, जालना येथै पोलीस ठाणी निर्माण करण्यात येणार आहे. ठाण्यामध्ये गृहमंत्री आले असता नवीन पोलीस ठाणे सुरू करण्यात येईल असे सांगितले होते. आमचे कळवा पोलीस ठाणे हद्दीच्या बाहेर आहे. त्यामुळे लोकांना एक किलोमीटर जावे लागते. त्यामुळे कळवा पोलीस ठाणे हे कळवाच्या हद्दीत होणे आवश्यक आहे. तसेच, सायबर क्राईम इन्व्हेस्टिगेशन विंगचे उद्घाटन झाले आहे. नुकताच नागपूरमध्ये सायबर क्राईम घडलेला आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात सायबन क्राईम इन्व्हेस्टिगेशन विंग उघडण्यात आला पाहिजे.

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे.....

मध्यंतरीच्या काळामध्ये ठाणे येथील रेल्वे स्टेशनमध्ये पोलिसांनी एक आरोपी पकडला. त्याठिकाणी कस्टडी नसल्यामुळे त्याला तेथेच ठेवण्यात आले. त्या आरोपिने स्वत:ला जाळून घेतले की त्याला पेटवून दिले याबाबत प्रश्न निर्माण झाला होता. म्हणून त्याठिकाणी कस्टडी होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, दिनांक 19 रोजी मालवण येथे पोटनिवडणूक होती आणि दिनांक 18 रोजी राजापूर पोलीस स्टेशनमध्ये स्फोट झाला. तेथील स्लॅब उडाला. तो दहशत करण्याचा प्रयत्न होता का ? याबाबतची माहिती द्यावी.

सभापती महोदय, सागरी गस्ती नौका तीन महिन्यांपासून बंद आहे.

पुणे येथील कमिशनरांच्या कार्यालयात रमी बरोबर रम घेण्याचे प्रकार सुरु आहेत. पोलिसांच्या आशीर्वादाने भाईदंर येथे हातभट्टया सुरु आहेत. हे सर्व प्रकार बंद झाले पाहिजेत. मार्केटमध्ये बनावट नोटा येतात. आपण त्याच्या मुळाशी का जात नाही ? एखाद्याकडे अशी खोट नोट सापडली तर आपण त्याला विचारता ही नोट कोठून आणली ? पण ती बाजारातून आली असल्यामुळे कोणाकडून आली हे तो सांगू शकत नाही. तेव्हा आपण बनावट नोटा छापणाऱ्या टोळीच्या मुळाशी गेले पाहिजे. जे कोणी गुन्हेगार असतील त्यांचेवर योग्य ती कारवाई केली पाहिजे.

सभापती महोदय, लोकमत या वर्तमानपत्रात " पनवेल भागात असलेला राज्यातील सर्वात मोठा जुगाराचा अड्डा " अशी मोठी ठळक बातमी आली आहे. मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, वर्तमानपत्रात ही बातमी येते आणि तेथील कमिशनर किंवा एस.पीं.ना ही माहिती का असू नये ? हे जुगाराचे अड्डे आपण त्वरित बंद केले पाहिजेत.

सभापती महोदय, ठाणे येथील श्रीरंग सोसायटीतील एका 10 वर्षाचा मुलगा मृत्युमुखी पडला. यासंबंधी मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले. त्यांनी तातडीन कार्यवाही केली. परंतु त्या मुलाच्या मृत्युस जे कोणी कारणीभूत आहेत त्यांचेवर अजूनपर्यंत कारवाई झालेली नाही.

बाब क्रमांक 59, पृष्ठ क्रमांक 37 - वन विभाग - मी याठिक्राणी सांगू इच्छितो की, मी 1993-94 मध्ये ठाणे महानगरपालिकेचा महापौर होतो आणि श्री.स्वरुपसिंग नाईक हे वनमंत्री होते. त्यावेळी मी त्यांच्याशी चर्चा केली होती की ठाणे शहरातील 35 एकर जमिनीवर वन उद्यान

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे...

असावे. यासाठी मी दोन वर्षे प्रयत्न केला पण त्याला यश आले नाही. त्यावेळी श्री.गणेश नाईक इकडे होते. तेव्हा माझी वन मंत्री श्री.बबनराव पाचपुते यांना विनंती आहे की, ठाणे शहरातील लोकसंख्या पाहता त्याठिकाणी एखादे वनउद्यान निर्माण करावे.

ठाणे आणि जवळच्या परिसरातील खारफुटी आणि तिवराच्या झाडांची राजरोजपणे तोड होत आहे. याकडे मी लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत आहे.

यानंतर श्री.बोर्डे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे....

त्याच बरोबर ठाणे शहरामध्ये 30 ते 40 वर्षांपूर्वीच्या मोठमोठया कंपन्या आणि इंडस्ट्रीयल एरिया आहे. त्या ठिकाणची जमीन तशीच होती. त्यामुळे त्या जमिनीवर मोठमोठे वृक्ष आलेले आहे. परंतु आता त्या ठिकाणी जे बांधकाम होणार आहे त्यामुळे तेथील वृक्ष तोडले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे माननीय महोदयांनी तेथील वृक्षतोडीवर बंधन आणले पाहिजे अशी मी मागणी करतो.

यानंतर मी मत्स्यव्यवसाय विभागाच्या बाब क्र.64, पृष्ठ क्र.43 वर बोलू इच्छितो. महाराष्ट्र पशु मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ नागपूरला झाले आहे. परंतु या व्यवसायाशी संबंधित असलेले सर्व लोक सागरी किनारपट्टीवर राहतात. या व्यवसासायाशी संबंधित काम करणारे लोक 720 कि.मी. चा किनारा लाभलेल्या कोकण किनारपट्टीच्या ठिकाणी राहतात. आज नागपूर येथील पशु व मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठाची मान्यता रद्द होण्याच्या मार्गावर आलेली आहे. म्हणून या विद्यापीठासाठी लागणाऱ्या सोयी-सुविधा आपण पुरविणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यापीठाची जी मान्यता आहे ती रद्द होणार नाही या दृष्टिकोनातून माननीय मंत्री महोदयांनी तातडीने कार्यवाही करावी अशी माझी अपेक्षा आहे.

यानंतर मी वित्त विभागाच्या बाब क्र.91, पृष्ठ क्र.67 वर माझे विचार व्यक्त करु इच्छितो. राज्यात मूल्यवर्धित कर प्रणाली संदर्भातील कायदा 1 एप्रिल रोजी झाला आहे. शासनाने मत्स्यव्यवसाय करणाऱ्या सहकारी सोसायटयांना जे डिझेल मिळत होते त्यामध्ये सूट देण्याचे मान्य केले होते. परंतु त्यामध्ये प्रशासकीय अडचण निर्माण झालेली आहे. या सोसायटयांनी भरलेले पैसे त्यांना तीन-चार महिने परत मिळत नाहीत. त्यामुळे यामध्ये सुसूत्रता आणून त्या सहकारी सोसायटयांना लवकरात लवकर पैसे मिळण्याच्या दृष्टिकोनातून विचार करण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

महोदय, मी आता सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्र.207 वर बोलू इच्छितो. ही बाब सिटी स्कॅन यंत्र बसविण्याबाबतची आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आणि इतर लोकप्रतिनिधींनी अलिबागच्या रुग्णालयात सिटी स्कॅन मशिन देण्याबाबत मागणी केली होती. आपण त्या ठिकाणी सिटी स्कॅन मशिन जरी दिले असले तरी, ते मशिन अद्यापि सुरु झालेले नाही. ते मशिन चालविण्यासाठी स्टाफ नाही. त्यामुळे त्या ठिकाणी सर्व सोयी उपलब्ध करुन देऊन, माननीय मंत्री महोदय आपण त्याचे उद्घाटन करा अशी मी मागणी करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे....

यानंतर मी रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या बाब क्र.266, पान क्र.243 वर बोलू इच्छितो. रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या विद्यमाने ओळखपत्रे देण्यात आलेली आहेत. रोजगार व स्वयंरोजगारामध्ये कंत्राटीचा भाग मोठया प्रमाणावर वाढलेला आहे. काही ठिकाणी ओळखपत्रे देऊन स्वयंरोजगारांची कामे ठेकेदाराच्या माध्यमातून केली जात आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयाच्या ठिकाणी रोजगार मिळत नाही. परप्रांतातून आलेल्या मजूरांना आज ओळखपत्रे देण्यात येत आहेत. त्यामुळे या सर्व गोष्टींचा माननीय मंत्रिमहोदयांनी विचार करुन, उत्तरामध्ये याचा खुलासा करावा एवढेच या पुरवणी मागण्याच्या निमित्ताने सांगतो व मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानून, माझे भाषण संपवितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

प्रथम मी सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्र.195, पृष्ठ क्र.151 यावर माझे विचार व्यक्त करणार आहे. या पुरवणी मागणीद्वारे तांडा/वस्ती सुधार योजनेसाठी महाराष्ट्र सरकारने 10 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. वास्तविक पाहता आतापर्यंत या योजनेचा लाभ धनगर समाजाच्या एकाही वस्तीसाठी दिला गेला नाही. माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, कोकणामध्ये विशेषत: रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग तसेच कोल्हापूर जिल्हयातील काही भागांमध्ये धनगर वस्ती आहे. स्वातंत्र्य मिळून 55 वर्षांचा कालावधी उलटून सुध्दा त्या वस्त्यांना रस्ते, वीज, पाणी, शाळा अशा मुलभूत सुविधा आपण देऊ शकलेलो नाही. त्यामुळे माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, या विभागासाठी वेगळी तरतूद करुन, त्या भागाचा विकास करण्यात यावा.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाशबापू शेंडगे ..

बाब क्रमांक 190 पान नंबर 137 संबंधी मला बोलावयाचे आहे.नवीन आश्रमशाळा देण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे ही बाब स्वागतार्ह आहे.या निमित्ताने मला असे म्हणावयाचे आहे की या आश्रमशाळा आपण भटक्या व विमुक्त समाजाच्या संचालकांना द्याव्यात इतर समाजातील मंडळी या शाळा विकत घेण्याचे कुटील कारस्थान करीत असतात.या पूर्वीच्या आश्रमशाळांच्या बाबतीत काय घडलेले आहे या बाबतीत मी आपल्याला सांगण्याची आवश्यकता नाही. त्यासाठी ब-याच समित्या येतात आणि त्यावेळी ब-याच लोकांमध्ये अर्थव्यवहार सुध्दा झालेले आहेत.तेव्हा याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी दक्षता घ्यावी अशी मला त्यांना विंनती करावयाची आहे.बाब क्रमांक 191 पान नंबर 150 सबंधी मला बोलावयाचे आहे शिक्षण व परीक्षेच्या फीसाठी सव्वा कोटी रुपयांची जी तरतूद करण्यात आलेली आहे ती स्वागतार्ह आहे.परंतु ती तरतूद अत्यंत अपुरी आहे असे मलावाटते याबाबतीत मी एक महत्वाचा मुद्दा आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो 27 मे 2003 चा शालेय शिक्षण विभागाचा एक जी.आर असून भटक्या व विमुक्त विद्यार्थ्याचे शैक्षणिक शुल्क सामाजिक न्याय विभागाने देण्याच्या बाबतीत त्या जी.आर.मध्ये उल्लेख केलेला आहे परतु सदर निर्णयानुसार भटक्या व विमुक्त विद्यार्थ्याचे शैक्षणिक शुल्क हे सामाजिक न्याय विभागाने आतापर्यन्त अदा केलेले नाही.पर्यायाने या संस्था चालविणे संस्था चालकांना कठीण झालेले आहे तेव्हा या विद्यार्थ्याना ताबडतोब हे शुल्क द्यावे अशी मी विनंती करीत आहे. बाब क्रमांक 202 पान नंबर 153 सबंधी मला बोलावयाचे आहे. 21 टक्के जनसमुदायाला कर्ज देण्यासाठी व त्यांचा आर्थिक विकास करण्यासाठी वसतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आसून त्याकरता 5 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे या महमंडळाला 200 कोटी रुपये देण्यात यावेत अशी आम्ही वारंवार मागणी करीत आहोत. निवडणुकीच्या पूर्वी त्या बाबतीत घोषणाही करण्यात आली होती परतु आतापर्यन्त फक्त 5 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. उर्वरित 195 कोटी रुपये केव्हा देण्यात येणार आहेत या बाबतीत मंत्रिमहोकदयांनी खुलासा करावा. वसंतराव नाईक महामंडळाच्या बाबतीत सकाळी सांगण्यात आले होते की या महामंडळामध्ये एकाच समाजाचे डायरेक्टर असतात जो काही निधी येतो तो निधी या महामंडळाचा डायरेक्टर आपल्या भागात खर्च करीत असतो. महाराष्ट्रातील सगळया समाजातील लोकांना हा निधी वाटण्या ऐवजी एका पर्टिक्युलर समाजासाठी आणि एका

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे ...

विशिष्ट भागासाठी वापरला जातो. निवडणुकीच्या 2 महिने अगोदर शासन पैसे देते आणि हे पैसे खिरापतीप्रमाणे वाटले जातात. माझी अशी विनंती आहे की बिंदू नामावलीप्रमाणे सर्व भटक्या व विमुक्त समाजातील लोकांना म्हणजे अ,ब,क,ड या वर्गासाठी जी काही टक्केवारी ठरवून दिलेली आहे त्यानुसार हे पैसे वाटावे अशा प्रकारचे निदेश शासनाने महामंडळाला द्यावेत. यानंतर बाब क्रमांक 203 पान नंबर 154 संबंधी मला बोलावयाचे आहे. इतर मागासवर्ग वित्तीय महामंडळासाठी अपुरी तरतूद केली आहे ती वाढविण्यात आली पाहिजे. यानंतर मला मत्स्यव्यवसाय विभागाची बाब क्रमांक 78 पान नंबर 48 सबंधी बोलावयाचे आहे.मत्स्सव्यवसायासाठी डिझेलवरील विक्रीकराची रक्कम प्रकतिपूर्ती करण्यासाठी 116 कोटी रुपयांची पूरक मागणी केलेली आहे. हा निर्णय स्वागतार्ह. पशुसंवर्धन खात्याकडून नेहमीप्रमाणे धनगर लोकांच्या तोंडाला पाने पुसण्यात आलेली आहेत.धनगर समाजाच्या विकासासाठी अहिल्यादेवी शेळी मेंढी विकास महामंडळ स्थापन करण्यात आले होते.यासाठी अंदाजपत्रकात काहीही पैसे देण्यात आले नव्हते पुरवणी मागण्यांमध्ये सुध्दा पैसे देण्यात आलेले नाहीत.तेव्हा या महामंडळासाठी पुरेसा निधी देण्यात यावा किंवा हे महामंडळ बंद तरी करण्यात यावे. 100 कोटी रुपयांचे भाग भांडवल देण्याची आम्ही मागणी केली होती मागे शासनाने 10 कोटी रुपये दिले होते. त्यामध्ये भ्रष्टाचार झाला होता त्यासबंधी चौकशी करण्यासाठी .श्री.गोरख मेघ यांची जी समिती नेमण्यात आली होती त्याचा अहवाल आलेला आहे परतु या व्यवहारात जे दोषी आहेत त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही.ज्या लोकांनी जमिनी गहाण ठेवल्या होत्या त्यांना चेकने पैसे देण्याचा निर्णय दोन महिन्या पूर्वी झाला होता परंतु अजून महामंडळापर्यन्त हा निर्णय गेला नाही.मंत्रिमहोदय असे सांगतात की , ती फाईल सचिवांकडे आहे,मंत्र्यांकडे आहे .अशा प्रकारे निर्णय वेळीच महामंडळाकडे न गेल्यामुळे या समाजाचा विकास झाला नाही.मंत्रीमहोदय या ठिकाणी उपस्थित आहेत तेव्हा त्यांनी त्वरित निर्णय घेऊन उरलेल्या लोकांना चेकने पैसे द्यावेत अशी मी विनंती करतो.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीची नाही

श्री. शेंडगे ....

सभापती महोदय, या निमित्ताने माननीय वन मंत्री महोदयांना एक विनंती आहे की, शेळ्या-मेंढ्यांच्या चराऊ कुरणांचा प्रश्न हा गेली 30-40 वर्षांपासून प्रलंबित आहेत. जंगल अधिकाऱ्यांच्या जाचापासून या समाजाची मुक्तता करणे आवश्यक आहे. तेव्हा जंगल खात्यामध्ये जंगलातील जमिनींपैकी काही जमीन आपण मेंढरांसाठी चराऊ कुरण म्हणून ठेवली तर या समाजाच्या समस्येचे निराकरण होईल. प्रत्येक जिल्ह्यामध्ये दंगली सुरू आहेत, विशेषत: कोल्हापूर, धुळे, बुलढाणामध्ये दंगली झालेल्या आहेत आणि मेंढरे शेतामध्ये शिरल्यामुळे ही मोठी सामाजिक समस्या आहे. तेव्हा वनमंत्र्यांना विनंती आहे की, आपण खास चराऊ कुरणांची व्यवस्था करून आपण हा प्रश्न सोडवावा अशी विनंती मी करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

*****

..... 4एक्स 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पृष्ठ क्र.47, बाब क्रमांक 75 या कृषी, पशुसंवर्धन खात्याच्या बाबीसंबंधात मी प्रथम बोलणार आहे. गुरांच्या पाय म्हणजे खूर आणि मुखाच्या रोगांच्या नियंत्रणासाठी आपण यामध्ये निधी दिलेला आहे. मी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो की, आपल्याकडे कामठीमध्ये पशुवैद्यकीय दवाखाना आहे आणि तो गेल्या 35 वर्षांपासूनचा जुना दवाखाना आहे मात्र आज तो अत्यंत हलाखीच्या अवस्थेमध्ये आहे. या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या जागेमध्ये आता फुटबॉलचे मैदान झालेले आहे. तेथे डॉ.प्रभाकर भोयर नावाचे पशु वैद्यकीय डॉक्टर वैद्यकीय अधिकारी म्हणून आहेत पण ते जागेवरच नसतात. त्या ठिकाणी गुरांवर कोणत्याही प्रकारे उपचार होत नाहीत आणि ती जागा खेळाचे मैदान म्हणून सध्या वापरली जाते आहे. कामठीमध्ये हा एकमेव व जुना असा पशुवैद्यकीय दवाखाना आहे आणि म्हणून त्याचे पुनरूज्जीवन करावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

त्यानंतर बाब क्रमांक 184, पृष्ठ क्र.148 - नांदेड येथे होणाऱ्या मराठी नाट्य संमेलनासाठी हे पैसे आपण देत आहात. अतिशय चांगली अशीच ही गोष्ट आहे. त्या प्रमाणेच नांदेडला एक मोठे नाट्यसंकुल देखील उभे करण्याची आवश्यकता आहे, त्यासाठी देखील आपण तरतूद करावी अशी मी या निमित्ताने आपल्याला सूचना करतो. या ठिकाणी थोड्या वेळापूर्वी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मराठी विश्वकोषा संबंधात मुद्दा मांडला. हा मराठी विश्वकोष कोणी तयार करावा याबात अनेक मतप्रदर्शन वर्तमानपत्रांतून झालेले आहे व होत आहे. दुर्दैवाची बाब आहे की, या विश्वकोष मंडळावर डॉ. विजया वाड यांना अध्यक्ष म्हणून नेमल्यावर त्याबद्दल देखील मोठी कॉन्ट्रवर्सी व्हावी. वास्तविक पाहता डॉ. विजया वाड यांचा बालशिक्षणसाहित्य आणि बालसाहित्यामध्ये प्रमुख असा मोलाचा वाटा आहे. कै. डॉ. श्रीकांत जिचकार यांनी या विश्वकोष स्थापनेसाठी प्रयत्न केले होते आणि त्यांनी तो तयार करण्याचाही प्रयत्न केला. त्यांचे ते काम कोठल्याही प्रकारे अर्धवट राहू नये म्हणून या कॉंट्रव्हर्सीतून मंत्री महोदयांनी लवकरात लवकर मार्ग काढून तो एका चांगल्या सुस्थितीत घेऊन जावा. मग त्यावर डॉ. विजया वाड यांना नेमले तरी काही हरकत नाही. पण त्याबाबत वर्तमानपत्रातून जी कॉन्ट्रव्हर्सी चाललेली आहे त्याला एकदा विराम देणे आवश्यक आहे.

..... 4एक्स 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सावंत ...

सभापती महोदय, बाब क्रमांक 205, पृष्ठ क्रमांक 161 - सार्वजनिक आरोग्य विभाग - राज्यातील हॉस्पिटल्ससाठी औषधे आणि साधनसामग्री खरेदी करण्यासाठी ही बाब आहे. या सभागृहात अनेकदा अनेक प्रश्नांच्या माध्यमातून अनेक चौकशा लावलेल्या आहेत. मग त्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या लावल्या असतील, डीनच्या बाबतीत असतील, जे कोणी खरेदी करतात त्यांच्याबाबतीत लावल्या असतील. पण त्या एकाही चौकशीचे उत्तर आम्हाला मिळालेले नाही. नागपूरचे आरोग्य खात्याचे उपसंचालक यांच्यावर तीन वर्षापूर्वी, म्हणजे ज्यावेळेस सन्माननीय आरोग्य मंत्री म्हणून श्री.दिग्विजय खानविलकर होते त्यावेळी चौकशी लावली होती. तर त्या चौकशीचे काय झाले आणि अशा प्रकारच्या अनेक चौकशी अजूनही प्रलंबित आहेत. आम्ही जेव्हा येथे प्रश्न उपस्थित करतो त्यावेळी आपण चौकशा लावता पण त्याचे नंतर काय होते याचा फीडबॅक नंतर होणे आवश्यक आहे, तो झाला पाहिजे.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.206, येथे आपण म्हटले आहे की, राज्यातील 23 जिल्हा रूग्णालयांसाठी पदे निर्माण करणे. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपल्याकडे आज किती पदे रिक्त आहेत ? आपल्याकडे हेल्थ पर्सनेलचीच जवळपास दोन ते अडीच हजार पदे रिक्त आहेत अशी माझी माहिती आहे. मी आपल्याला थोडक्यात सांगतो की, महाराष्ट्र मेडिकल हेल्थ सर्विसेसमध्ये ग्रेड ए ची 498 पदे रिक्त आहेत., सेंट्रल स्टेट सर्विसेसची ग्रेड ए आणि बी ची 202 पदे रिक्त आहेत., तसेच महाराष्ट्र मेडिकल हेल्थ सर्विसेस ग्रेड 1 ज्युनिअरची 774 पदे रिक्त आहेत. हेल्थ असिस्टंटस् पुरूष यामध्ये लोकल आणि स्टेट सेक्टरमध्ये एकूण 1149 पदे आणि मल्टिपरपज हेल्थ वर्कर्स पुरूष यामध्ये 2340 पदे रिक्त आहेत. आणि चंद्रपूरमध्ये 38 डॉक्टरांची पदे रिक्त आहेत. तेव्हा याबाबतीत आपण कोणता निर्णय घेणार आहात वा काय करणार आहात ? हे या सभागृहाला सांगावे अशी मी विनंती करतो.

(यानंतर श्री. सरफरे ....4वाय 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

डॉ. दीपक सावंत...

सभापती महोदय, पृष्ठ क्र. 165 व बाब क्र. 208 वर मराठवाडा विभागातील उपकेंद्रांसाठी तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे प्रादेशिक विकास कार्यक्रमांतर्गत मराठवाडा विभागामध्ये 9 ट्रॉमा केअर युनिट व 13 मोबाईल हेल्थ युनिट स्थापन करण्यासाठी आपण तरतूद केली आहे. तरमग सिंधुदुर्ग मधील ट्रॉमा केअर युनिटचे पुढे काय झाले हे आम्हाला माहीत नाही? कारण त्यासाठी आवश्यक असलेली इमारत बांधून तयार आहे. परंतु ते केव्हा सुरु होणार आहे याबाबत आम्हाला समजले नाही. आपण याठिकाणी मोबाईल हेल्थ युनिट सुरु करीत आहात परंतु ते चालते की नाही हे कुणी पहात नाही. जर आपल्याला सुरु करायचे असेल तर सिंधुदुर्गमध्ये करावे आणि त्याचबरोबर नाशिक-शिर्डी रस्त्यावर अपघाताचे प्रमाण सर्वात जास्त आहे त्याठिकाणी सुरु केले पाहिजे. बाब क्र. 225 व पृष्ठ क्रमांक 181 मध्ये आदीम जमातींच्या विकासाकरिता तरतूद केली आहे. या निमित्ताने मी आपल्या निदर्शनास एक गोष्ट आणतो की, अमरावती जिल्हयामध्ये मंगरुळ-दस्तगीर नावाचे एक गाव आहे. त्याठिकाणी आज जात अस्तित्वात नाही. त्या गावामध्ये सर्व लोक अजात म्हणून वावरत आहेत. हा संपूर्ण संप्रदाय मध्यप्रदेश, छत्तीसगड, अमरावती व नागपूर जिल्हयामध्ये आहे. हे लोक स्वत:ची जात लावीत नाहीत, ते स्वत:ला धर्मनिरपेक्ष मानतात. त्यामुळे शाळा प्रवेश घेतांना अडचण निर्माण होते. त्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती मिळण्याची बाब असेल, त्यांची जात नसल्यामुळे व ते अजात असल्यामुळे शासनाच्या या योजनांचा त्यांना लाभ मिळत नाही. आर्थिक दृष्टया मागासलेले हे लोक आहेत. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, कोणतीही जात न मानणारे धर्मनिरपेक्ष समजणारे असे हे लोक आहेत त्यांना आर्थिकदृष्टया सबळ करणे गरजेचे आहे. त्याचा शासनाने विचार करावा. त्यासंबंधीची माहिती आपल्या सचिवांनी घेतली आहे. परंतु जी माहिती उपलब्ध असेल ती घेऊन आपण त्यांना न्याय द्यावा एवढी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, या सदनातील दोन्ही बाजूच्या जवळ जवळ 19 सन्माननीय सदस्यांनी या मागण्यांवर आपली प्रतिक्रिया व्यक्त करीत असतांना आपली मते नोंदवीत असतांना शासनाकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. मागील अधिवेशनामध्ये गृह विभागाच्या 153 कोटी रुपयांच्या मागण्यांना मंत्रिमंडळाने मान्यता दिली होती व दोन्ही सदनांनी सुध्दा त्यांना मान्यता दिली होती. आज गृह विभागाच्या एकूण 25 कोटी 47 लाख रुपयांच्या मागण्या मंजूर कराव्यात ही विनंती करण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, नक्षलवादी ॲक्टिव्हिटीज रोखण्यासाठी विविध उपाय योजना शासनाने हातामध्ये घेतल्या आहेत. त्यामध्ये सरेंडर पॉलीसीसाठी पैसे उपलब्ध व्हावेत. तसेच अन्य छोटया-मोठया किरकोळ कामांसाठी मार्चच्या अधिवेशनामध्ये ज्या गोष्टी ध्यानात आल्या नव्हत्या, ज्या गोष्टी नव्याने करण्याची आवश्यकता आहे असे गृह विभागाला वाटले म्हणून त्या मागण्या आज सादर करण्यात आल्या आहेत. पूर्वी एक सर्व्हेक्षण करण्यात आले. त्या सर्व्हेक्षणामध्ये राज्याच्या पोलीस दलातील लोकांना किती काम करावे लागते हे पहाण्यात आले. परंतु आपण हे सर्व्हेक्षण केले होते. मेकॅन्सी कंपनीने केलेल्या या सर्व्हेक्षणामध्ये राज्यभरातील पोलीस दलातील प्रत्येक कर्मचाऱ्याला सरासरी 14 तास काम करावे लागते. म्हणजे घरातून पोलीस स्टेशनवर यायचा वेळ सोडून प्रत्यक्ष डयुटीवर 14 तास काम करावे लागते. अनेक पोलीस स्टेशनमध्ये त्यांना 3-3 महिने सुटया उपलब्ध होत नाहीत. त्यांची डयुटी 10 तासावर आणायची झाली तर आणि आठवडयातून एक दिवस तरी सुटी द्यायचे ठरले तर आणखी 42 हजार जवानांची भरती पोलीस दलात करावी लागेल. सभापती महोदय, आपल्या राज्याची साधनसंपत्ती लक्षात घेता, विकासाची कामे व अन्य गरजा लक्षात घेता आपण एवढे मनुष्य बळ तातडीने उभे करु शकत नाही. परंतु तरीसुध्दा मागील पुरवणी मागण्यांच्या वेळी 11 हजार नवीन पदे भरण्यासाठी दोन्ही सदनांनी मान्यता दिली आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी कोठेवाडी पासून मतदारसंघातील पोलीस स्टेशनपर्यंत किंवा ठाणे जिल्हयातील मनुष्यबळापर्यंत अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

हया पोलीस स्टेशनबाबत वेळोवेळी विविध गृहमंत्र्यांनी आश्वासने दिली. पण त्याची पूर्तता झाली नाही. ही नवीन पोलीस स्टेशन कधी होणार ? कोस्टल सिक्युरिटी वाढविण्याच्या दृष्टीने काय करणार ? राज्यामध्ये डिटेक्शनचे प्रमाण वाढत असताना कन्व्हेन्शनचे प्रमाण कसे वाढविणार ? याबाबतीत नाव घेऊन उत्तर देण्यापेक्षा 11 हजार पदे भरण्याची प्रक्रिया महिन्याभराच्या कालावधीत राज्यभर सुरु करीत आहोत. त्यासाठी आवश्यक असलेले बजेट मंजूर झाले आहे. एकाच दिवशी राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये ही भरती सुरु होईल आणि प्रत्येक जिल्हयाला नवीन जी पदे मंजूर झाली आहेत, त्याचे वाटप करीत असताना साधारणत: त्या जिल्हयात वाढलेली लोकसंख्या, त्या जिल्हयातील क्राईमचा रेट, पोलीस स्टेशनची आवश्यकता आणि आज पोलीस स्टेशनच्यापासून असलेले अंतर, याबाबतीत 1961 मध्ये जे निकष ठरविण्यात आले होते त्याप्रमाणे 11 हजार पदांचे वाटप करण्यात येईल आणि जागोजागी पोलीस स्टेशन होतील आणि ज्या जिल्हयात मनुष्यबळ कमी आहे, तेथे ते वाढवून देण्याची भूमिका स्विकारली जाईल. याठिकाणी विशेषत: नक्षलवादाच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला गेला. ही गोष्ट खरी आहे की, महाराष्ट्रात मागच्या तुलनेत नक्षलवादी ॲक्टीव्हीटीज् किंचित प्रमाणात वाढलेल्या आहेत. आपण ज्यावेळी या वाढीकडे गांभीर्याने पाहतो, तेव्हा शेजारच्या राज्यातील नक्षलवादी चळवळ आणि आणि महाराष्ट्रातील नक्षलवादी चळवळ यामध्ये जे पोलीस दलाचे जवान गडचिरोली, गोंदिया, भंडारा येथे प्रामुख्याने काम करीत आहेत त्यांचे मनापासून कौतुक आणि अभिनंदन केले पाहिजे. शेजारच्या राज्यांनी नक्षलवाद्यांसमोर शस्त्रे खाली ठेवण्याची भूमिका स्विकारली असताना चालू वर्षी 23 अधिकारी आणि कर्मचारी शहीद होऊन सुध्दा, 23 जणांनी हौतात्म्य पत्करुन सुध्दा महाराष्ट्र पोलीस दलाचे नैतिक खच्चीकरण झालेले नाही. उलट मोठया जिद्दीने बदला घ्यावयाच्या तयारीने आज पोलीस दल त्या परिसरात सक्रीय झाले आहे आणि मला सांगण्यास आनंद वाटतो की, नक्षलवाद्यांना पकडण्यामध्ये महाराष्ट्र पोलीस दलाला जे यश मिळाले आहे, ते अन्य राज्यांना मिळालेले नाही. त्या परिसरात पोलीस योग्य पध्दतीने काम करीत आहेत. पण आज एकंदरीत नक्षलवादी चळवळीचा विचार करताना केवळ पोलिसांकडून ही चळवळ रोखली जाऊ शकते का ? तर याचे उत्तर नकारार्थी द्यावे लागेल. यामध्ये सोशो-इकॉनॉमिकचा प्रश्न गुंतलेला आहे. आज नक्षलवाद वाढत असताना सदनानेही याबाबतीत गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. राज्याचा दुर्गम भाग असेल आणि अन्य ठिकाणी

. . . .4 झेड-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

अगदी परदेशी स्टॅण्डर्डचे रस्ते झाले असले तरी आज शेकडो गावे रस्त्याशिवाय असतील, जगातील श्रीमंतांमध्ये काही भारतीयांची नावे असतील आणि त्यामध्येही महाराष्ट्र सर्वात अग्रेसर असेल पण त्याच राज्यात काही आदिवासी कुपोषणामुळे मरणार असतील आणि सुधारणेच्या कोणत्याच गोष्टी त्या पसिरात योग्य पध्दतीने पोहोचल्या नसतील तर नक्षलवादी चळवळीचा विकास केला जातो, या भागामध्ये नक्षलवाद्यांकडून तेथील लोकांना प्रोत्साहित केले जाते, त्यांचा गैरसमज करुन दिला जातो आणि अप्रत्यक्षपणे काही ठिकाणी त्यांना त्यांचाही पाठिंबा मिळत रहातो. खऱ्या अर्थाने नक्षलवाद रोखावयाचा असेल, ही चळवळ थांबवावयाची असेल तर पोलीस दल हे सक्षमपणे काम करीत आहे पण त्या भागातील विकासाकडेही एका वेगळया दृष्टीने पाहण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. तर मग तेथील गरीबी कमी केल्यानंतर आणि त्यांनाही विकास प्रक्रियेमध्ये समाविष्ट केले तर नक्षलवादी चळवळ आटोक्यात येऊ शकते. एक गोष्ट मी प्रांजळपणे कबूल करतो की, 8-10 वर्षापूर्वी नक्षलवादी चळवळ रोखण्याच्या दृष्टीने कृती आराखडा बनविण्यात आला.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढे चालू...

पण सोयिस्करपणे पुन्हा त्याचा विसर पडत गेला. तो दुर्गम भाग दुर्गमच राहिला. विकासापासून वंचित राहिला. थोडी अन्य राज्यामध्ये नक्षल चळवळ वाढल्यामुळे त्याचबरोबर नेपाळवरुन चालत असलेली चळवळ भारतात येऊन सक्रीय झाल्यामुळे आज त्यांचे वाढते प्रमाण दिसत असले तरी सभापती महोदय, मी सदनाला ग्वाही देऊ इच्छितो की, पोलीस दल तर सक्षमपणे काम करील, पण येणाऱ्या मार्चच्या बजेट अधिवेशनामध्ये या सगळया नक्षल अफेक्टेड एरियामध्ये निश्चितपणे एक स्कीम आणली जाईल, प्रत्यक्ष आपला विकास होतो आहे याची जाणीव जनतेला होईल आणि त्या परिसरातील जनतेचा शासनावरील विश्वास वाढेल आणि नक्षलवाद्यांवरील विश्वास कमी होईल, अशापध्दतीची योजना निश्चितपणे आणली जाईल. नक्षल चळवळ रोखण्याचा एक भाग म्हणून आत्म समर्पण योजना घोषित केलेली आहे. मला सदनाला आणि सदनामार्फत राज्यातील जनतेला सांगण्यास आनंद वाटतो की, गेल्या दोन महिन्यामध्ये 69 नक्षलवादी आत्म समर्पित झालेले आहेत, त्यांनी शस्त्रे खाली ठेवलेली आहेत. अन्य राज्यामध्ये ही चळवळ वाढत असतांना, महाराष्ट्रामध्ये मात्र पोलीस नक्षलवाद्यांना अटक करीत आहेत, प्रसंगी इनकाऊंटर करतात आणि नक्षलवादीसुध्दा आत्मसमर्पण योजनेचा फायदा घेत शरण येत आहेत, तसेच एका बाजूने त्या ठिकाणच्या डेव्हलपमेंटला जोर दिला आणि पोलीस या गतीनेच काम करीत राहिले तर ही चळवळ रोखली जाऊ शकते, असा मला पुरेपुर आत्मविश्वास आहे. काही पोलीस स्टेशनच्याबाबतीत सूचना तर काही तक्रार वजा सूर आहे. गृह खात्याच्या मागण्यांवर हे नेहमीच होत आलेले आहे. माझा असा दावा नाही की, सगळे अगदी बरोबर चाललेले आहे, पण बरोबर करण्याचा प्रयत्न मात्र सुरु आहे, असा माझा 100 टक्के दावा आहे. गावठी दारु बंद करण्याची भूमिका या सदनामध्ये घोषित केली होती. आज सांगायला मला आनंद वाटतो आहे की, काही वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई केल्यानंतर आज गावठी दारुवर काही प्रमाणात नियंत्रण आणण्यामध्ये पोलीस दलाला निश्चितपणे यश आलेले आहे. त्याचा इफेक्ट एक्साईजच्या उत्पन्नावर दिसतो आहे. सप्टेंबर अखेरपर्यन्त गेल्यावर्षीच्या तुलनेत दारुवर कोणताही कर न वाढविता, राज्याचे 340 कोटींनी उत्पन्न वाढलेले आहे. वर्षअखेरीला हा आकडा 500 कोटीपर्यन्त पोहोचेल. म्हणजे एक अवैध दारु बंद केली तर राज्य सरकारचे 500 कोटींचे उत्पन्न वाढते. थोडीशी आणखी आपण गती दिली, कायद्यामध्ये कडक तरतुदी केलेल्या आहेत. पूर्वी 100 रुपये दंड होत होता आणि सहा महिने शिक्षा होती. आता 50 हजार रुपये ते दीड लाखापर्यन्त दंड केलेला आहे आणि तीन वर्षापासून पाच वर्षापर्यन्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.आर.आर.पाटील (पुढे चालू....

शिक्षा केलेली आहे. त्यामुळे आता दारु काढण्याची, दारु विकण्याची, दुसऱ्या राज्यातून दारु आणण्याची हिंमत कोण करेल असे मला वाटत नाही. तसा कोणी प्रयत्न केला तर कमीत कमी तीन वर्षे आणि जास्तीत जास्त पाच वर्षे या शिक्षेची तरतूद झालेली आहे. मी केवळ राज्य सरकारचे उत्पन्न 340 कोटींनी वाढले म्हणून समाधान मानत नाही. पण दुसरीकडे सर्वेक्षण सुरु आहे, या राज्यातील सर्व्हेक्षण केल्यानंतर एक धक्कादायक आणि आनंददायक आकडेवारी पुढे आलेली आहे की, गावठी दारु बंद केल्यामुळे रात्रीचे महिलांच्याबाबतीत गुन्हे घडत होते, त्यामध्ये 42 टक्क्यांनी इतकी प्रचंड घट झाली. म्हणजे एका बाजूला सामाजिक अनुकूल परिणाम झालेल्या दिसतात. ही भूमिका भविष्यातध्येसुध्दा त्याच गतीने चालू ठेवू. आता गावठी आणि अवैध दारु महाराष्ट्रामध्ये मान वर काढणार नाही, याची मी सदनाला या निमित्ताने ग्वाही देईन. सभापती महोदय एकंदरीतच कोठे तरी होत असलेले गुन्ह्ये, तत्पर झालेली माध्यमे, आलेला इलेक्ट्रॉनिक मेडिया यामुळे राज्यामध्ये जणु गुन्हेच घडतात की काय,असाही कधीकधी समज होतो. जगभरामध्ये मान्य केलेले आहे की, जशी लोकसंख्या वाढत जाते, तसे सोशल प्रॉब्लेम वाढत रहातात, इकॉनॉमिकल प्रॉब्लेम वाढत रहातात. आर्थिक सामाजिक प्रश्न गुंतागुंतीचे बनत असतांना जर बेकारी वाढली लोकसंख्या वाढली तर त्या समाजव्यवस्थेवर काही प्रमाणात गुन्ह्याची वाढ ही स्वाभाविकपणे होते. साधरणत: प्रत्येक गुन्हयांच्या बाबतीत झालेली 10 टक्के वाढ ही नैसर्गिक वाढ मानली जाते. पण एखाद्या गुन्हयांच्याबाबतीत 10 टक्क्यापेक्षा जर अधिकची वाढ झाली तर ऑबनॉर्मल परिस्थिती निर्माण झाली, परिस्थिती हाताबाहेर गेली, परिस्थिती बिघडली असे मानले जाते.

यानंतर कु.थोरात...

अशुधारित प्रत / शिक्षणासाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

मी सगळयाच गुन्हयांच्या बाबतीत सांगून सदनाचा वेळ घेत नाही. पण जे गुन्हे प्रमुख गुन्हे मानले जातात त्यांची राज्यातील स्थिती बघितली तर राज्यामध्ये 2000 साली एकूण 2854 खुनाच्या घटना घडल्या होत्या आणि तेवढया गुन्हयांची नोंद झाली होती. 2001 साली 2828 , 2002 साली, 2763, 2003 साली 2745, 2004 साली, 2675 आणि चालू वर्षी 2191. तब्बल 500 ने खूनाच्या घटना या राज्यामध्ये घटलेल्या आहेत. सभापती महोदय, कोणत्याही रज्य सरकारचे जनतेच्या जीविताचे आणि मालमत्तेचे रक्षण करणे हे काम असते. 2000 च्या तुलनेमध्ये 2005 साली देशातील सगळया राज्यामध्ये या गुन्हयांचे प्रमाण काही टक्केवारीने वाढत असतांना महाराष्ट्रामध्ये मात्र 500 खून कमी होणे म्हणजे जीविताची हमी देण्यामध्ये राज्य सरकारला किंचितसे यशच आहे, असा अर्थ काढायला निश्चित वाव आहे.जीवितानंतर लोकांच्या मालमत्तेचे रक्षण करणे ही राज्य यंत्रणेची प्रमुख जबाबदारी असते. गत साली राज्यामध्ये 524 दारोडे 30 सप्टेंबरपर्यंत पडले होते. तीन ने कमी होऊन यामध्ये किंचीतशी घट आलेली आहे. पण दिवसा घरफोडी करण्याच्या बाबतीत या राज्यामध्ये ॲबनॉर्मल घट झालेली दिसते. 11931 वरुन 10200 पर्यंत हा आकडा पोहंचला आहे. चो-या 41000 वरुन 38000 वर आलेल्या आहेत. दंगे 28000 वरुन 23000 पर्यंत पोहंचलले आहेत.तब्बल 5000 ने यामध्ये घट आहे. समाजाधील सगळयात जे विक सेक्टर असतात त्यांची सेफ्टी, त्यांची सुरक्षितता ही अधिक महत्वाची मानली पाहिजे. या राज्यामध्ये जे दलित आहेत. 2003 साली दलितांवर अन्याय करणा-या घटना 647 घटना या राज्यामध्ये घडल्या होत्या. 2004 साली 689 घटना घडल्या होत्या आणि 2005 साली 601 घटना आतापर्यंत घडलेल्या आहेत. यातही जवळ जवळ 90 ने घट आहे.अनुसूचित जमातीच्या विरोधात जे गुन्हे या राज्यामध्ये नोंदवले गेले आहेत. गेल्या वर्षी 233 हा सगळयात कमी आकडा होता आणि या वार्षी 166 गुन्हे नोंदविलले आहेत. सभापती महोदय, समाजातील दुबळया सेक्टरला न्याय देतांना आणि त्यांचे संरक्षण करतांना लोकसंख्या वाढली,सामाजिक प्रश्न वाढले तरी सुध्दा महाराष्ट्रत त्यांच्या बाबतीत होणा-या गुन्हयांचे प्रमाण घटत आहे,ही एक खूप चांगली बाब आहे. यानंतर महिलांना सुरक्षित ठेवणे आणि त्यांना योग्य संरक्षण देणे हे आपण नेहमी महाराष्ट्राची संस्कृति आणि आपले कर्तव्य मानत आलेले आहोत. बलात्काराच्या बाबतीत 2000 साली 1310 बलात्काराच्या घटनांची

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

नोंद झाली होती.2001 साली 1302 घटनांची नोंद झाली होती. 2003 साली 1352, 2004 साली 1268 आणि यावर्षी 905. म्हणजे 2000 आणि 2004 च्या तुलनेमध्ये याही घटनेमध्ये आपल्याला घट झालेली दिसून येते. विनयभंगाच्या बाबतीत गेल्या वर्षीच्या तुलनेमध्ये 800 ने घट झालेली आहे. छेडछाडीच्या बाबतीत तब्बल 500 ने घट झालेली आहे. आणि जे 498 (अ) कलम आहे त्यामध्ये गेल्या वर्षी घडलेल्या घटना 5023 होत्या. तब्बल 1300 ने घट होऊन 3700 वर हा आकडा येऊन पोहचला आहे. हुंडाबळीची संख्या 266 वरुन 150 वर येऊन पोहचलेली आहे. (अडथळा) सभापती महोदय, गेल्या वर्षी पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी नोंदवून घेतल्या जात होत्या आणि या वर्षी घेतल्या जात नाहीत असे काही कुठे झालेले नाही. उलट रजिस्ट्रेशन वाढविण्याचा शासनाने नेहमीच प्रयत्न केलेला आहे. वेळोवेळी एस.पी.ंच्या मिटिंग घेऊन जर योग्य पध्दतीने गुन्हयांचे रजिस्ट्रेशन केले नाही तर लोकांना खाजगी दादांकडे न्याय मागायला जावे लागते. कधी कधी लोक कायदा हातात घेतात, आणि त्यातून गंभीर परिस्थिती निर्माण होते. म्हणून याबाबती सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत. आतापर्यंत असे गुन्हे न नोंदविणा-या अधिका-यावर कठोर कारवाई करण्याची कामगिरी सुध्दा पोलीस दलामध्ये केलेली आहे.

यानंतर श्री. खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .....

एखादया वेळी दराडयासारख्या गुन्हयांचे चो-यांमध्ये कन्हर्ट करणे अशा प्रकारे खालच्या कलमामाध्ये या गुन्हयाला टाकणे मी समजत शकतो परंतु खुनासारख्या घटनांची नोंद जर केली जात नाही अशा तक्रारी माझ्याकडे तरी अद्याप आलेल्या नाहीत. आकडेवारीमध्ये मी जाऊ इच्छित नाही पण आज गुन्हयांचे एकंदरित प्रमाण पाहिले तर ते घटत आहे ही गोष्ट खरी आहे. तसेच जर गुन्हे नोंदले जात नसतील, अशा प्रकारे अधिकारी करीत असतील तर आजच मी या सदनाच्या माध्यमातून राज्यातील पोलीस दलाला आदेश देतो की, गुन्हयांच्या घटनांची नोंद न करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल. एका बाजूने पोलीस दल हे आपले काम करीत असतांना एक गोष्ट आपल्याला जाणवत असेल की, देशाचे लक्ष वेधले जाईल अशी खूप मोठी गंभीर घटना आपल्या राज्यात गेल्या वर्षभरात घडलेली नाही. शासनाने काढलेले आदेश पोलीस खाते मानते आणि त्यानुसार कारवाई देखील केली जाते. विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात त्यासंदर्भात सदस्यांनी मागणी केली होती की, सावकारांवर कारवाई केली पाहिजे.

डॉ. नीलम गो-हे : माननीय मंत्री महोदयांनी अशा प्रकारे उलटी विधाने प्रचारासाठी करु नयेत अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आपणच आपली बदनामी करुन घेण्यात नेहमी धन्यता मानतो आणि स्वत:ला असुरक्षित मानतो परंतु बलात्काराची आकडेवारी बाजूला काढून फक्त आपल्याच लोकांना बदनाम करण्यात काय अर्थ आहे हे मला समजत नाही. आज न्युयार्क आणि लंडनपेक्षा बलात्काराच्या घटना आपल्या देशात कमी आहेत तरीही आपण जागतिक पातळीवर आपल्याला बदनाम करीत आहोत, याचाही विचार करणे आवश्यक आहे. म्हणून मी सदनाला या निमित्ताने सांगू इच्छितो की, कुठल्या गुन्हयाची नोंद केली नाही यासंदर्भात जर सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे माहिती दिली तर वरिष्ठांमार्फत त्याची चौकशी केली जाईल. आज राज्यामध्ये सावकार शेतकऱ्यांवर मोठया प्रमाणात अन्याय करीत आहेत, त्यांच्याकडून वारेमाप व्याज वसूल करीत आहेत. अशा गरीब शेतकऱ्यांना आत्महत्या करायला भाग पाडतात. त्या सावकारांच्या बाबतीत फक्त 15 दिवसांपूर्वीच शासनाने कारवाईला सुरुवात केली आहे. मला सभागृहाला सांगण्यास आनंद वाटतो की, राज्यातील 723 सावकारांना आजपर्यंत अटक करण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .....

आलेली आहे, काही जणांचा कोंबडा बनविण्यात आला होता तर काही खाजगीमध्ये तडजोड करुन लोकांचे व्याज माफ करुन असलेल्या वस्तू परत करण्यास तयार झालेले आहेत. तसेच लोकप्रतिनिधींनी जर आणखी सहकार्य केले, आणि लोक निर्भयपणे पुढे आले तर शेकडा 10 टक्के व्याज घेणारे सावकार भविष्यात राज्यात दिसणार नाहीत अशी भूमिका निश्चितपणे घेतली जाईल. शेवटी जनतेच्या जिविताचे आणि मालमत्तेचे रक्षण करणे हे पोलिसांचे काम योग्य प्रकारे चालू आहे. सन्माननीय सदस्यांनी आताच सांगितले की, नोंद घेण्यासारखी घटना जी मरिन लाईन्स येथे घडली त्यासंदर्भात मी असे सांगू इच्छितो की, या घटनेची जितकी गांभीर्याने नोंद घ्यायला पाहिजे होती त्यात शासन कुठेच कमी पडले नाही. ज्या दिवशी ही घटना घडल्याचे मला समजले त्या दिवशी मी सांगलीला जाण्यासाठी कराडपर्यंत पोहचलो होतो, माझ्या कानावर ही घटना आल्यानंतर मी पाच मिनिटे सुध्दा गाडी पुढे नेली नाही, परत मागे आलो आणि घटनास्थळाला भेट दिली. घटनेच्या 311 व्या कलमाचा वापर करुन आरोपीविरुध्द लवकरात लवकर चार्जशिट कसे दाखल करता येईल अशी भूमिका घेतली. या घटनेतून बोध घेऊन अशा प्रकारे दारुच्या नशेमध्ये डयुटी करीत असतांना असा प्रसंग घडला असेल तर पोलीस दलात दारु तरी का प्यावी आणि डयुटी का करावी हा एक विचार पुढे आला आणि राज्यभरातील पोलीस दलाचे सवेक्षण घेण्याची भूमिका स्वीकारली. त्यातून 31 लोकांना कायमचे नोकरीतून बडतर्फ करण्यात आले. राज्याच्या इतिहासामध्ये अशी कडक कारवाई यापुर्वी कधीही आणि कोणत्याही वर्षामध्ये झाली नव्हती. तसेच 146 लोकांना सस्पेंड करण्यात आले व 150 लोकांविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे. येत्या तीन महिन्यात या विभागीय चौकशीचे काम पूर्ण होईल आणि जे व्यसनी वृत्तीच्या आड दडून बसले असतील त्यांच्यावर देखील कडक कारवाई केली जाईल, असे लोक सेवेत राहता कामा नये, अशी भूमिका शासनाने स्वीकारलेली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

मुंबईच्या एका घटनेचा बोध घेऊन पालिसांमध्ये अनेक चांगल्या ॲक्टीव्हीटीज सुरु केलेल्या आहेत. या खात्याचा प्रमुख म्हणून पालिसांच्या गैरसोयी दूर व्हाव्यात, त्यांचे पगार वाढावेत, त्यांना आरोग्याच्या चांगल्या सुविधा मिळाव्यात, त्यांना चांगली घरे मिळावीत या सगळया चांगल्या योजना आखीत असतांना पोलिसांमध्ये शिस्त सुध्दा आली पाहिजे यासंदर्भातील भूमिका आम्ही स्वीकारलेली आहे. फिजीकल फिटनेस जर चांगला राखला तर प्रोत्साहन भत्ता देण्याची भूमिका स्वीकारतांनाच या राज्यातील चांगल्यातल्या चांगल्या हॉस्पिटलमध्ये पोलीस कॉन्स्टेबल जाऊन सरकारी खर्चाने औषधोपचार करुन घेऊ शकेल अशी भूमिका राज्यसरकारने स्वीकारली आहे. आजपर्यंत एखादा नेता जस्लोक हॉस्पिटलमध्ये ॲडमीट असेल , बॉम्बे हॉस्पिटलमध्ये ॲडमीट असेल, तेव्हा आमचा कॉन्स्टेबल या हॉस्पिटलमध्ये संरक्षण म्हणून ड्यूटी बजावयास जावयाचा. पण स्वत: आजारी पडला तर त्याला नगरपालिकेचा दवाखाना शोधायला लागायचा. आज कॉन्स्टेबलपासून वरिष्ठ अधिका-यापर्यंत जर कोणी आजारी पडला तर या राज्यातील चांगल्यातल्या चांगल्या हॉस्पिटलमध्ये हे कर्मचारी जाऊन सेवा घेऊ शकतील, उपचार करुन घेऊ शकतील. या सर्व सेवा पोलिसांना देत असतांना कर्तव्याच्या बाबतीत त्यांनी आणखी कठोरपणाने भूमिका बजावल्या पाहिजेत अशा पध्दतीचे धोरण राज्यसरकारने स्वीकारले आहे. यातील तरतुदीचा सन्माननीय सदस्या श्रीमती रायकर यांनी अचूक उल्लेख केला की, एखाद्याने लाचलुचपतीच्या सापळयात आपली रक्कम गुंतवली तर या रकमा लवकर मिळत नाहीत. आपली रक्कम गुंतवायला जर एखाद्या कर्मचा-याने 25,000 रुपयांची लाच मागितली तर त्या केसचा निकाल लागल्याशिवाय, कोर्टातून त्या नोटा परत मिळाल्याशिवाय ते पैसे परत देता येत नव्हते. यामध्ये ज्याचे पैसे गुंतायचे त्याला पाच पाच वर्षे पैसे मिळत नव्हते. यासंदर्भात येणा-या बजेटमध्ये वेगळी तरतूद करुन कोर्टाचा निकाल लागेपर्यंत सरकार थांबेल, ज्याचे पैसे गुंतलेले आहेत त्याचे पैसे तातडीने परत केले जातील. हे पैसे कोर्टाकडून परत आल्यानंतर ते पैसे शासनाच्या तिजोरीत जमा केले जातील. आज ॲन्टी करप्शन ब्यूरो सक्षम करीत असतांना काही भूमिका आम्ही स्वीकारलेल्या आहेत. राज्यामध्ये चांगल्या प्रकारे घाधाडी टाकल्या जात आहेत, मुंबईमध्ये जकातीच्या बाबतीत ॲन्टी करप्शन ब्युरोने धाड टाकून 20 कर्मचा-यांवर कारवाई केली

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

त्यामुळे दिवसाला आज 7 टक्के जकातीमध्ये वाढ व्हायला लागली आहे. जर ही वाढ वर्षभर अशीच टिकली तर मुंबई महापालिकेच्या उत्पन्नामध्ये तब्बल 350 कोटी रुपयांची भर पडू शकेल. इतक्या मोठया जकातीची चोरी एका शहरात होत असेल तर एसीबी अजून सक्षम केले जाईल. सगळयाच महानगर पालिकेवर निगराणी ठेवली जाईल. चोर कोठेही असले तरी त्यांना शोधून काढले जाईल. एसीबी साठी जी काही तरतूद मागितली आहे ती योग्य आहे. गृह खात्यावर चर्चा होत असतांना तसेच मालवणच्या निवडणूकी नंतर पहिल्यांदा चर्चा होत असतांना मालवण या चर्चेत येणार नाही असे कधी होणारच नव्हते. मालवणची चर्चा ही अपेक्षीतच होती. या ठिकाणी अबूसालेम आणि तरन्नुमच्या बाबतीत येथे विचारले गेले. तरन्नुमवर चार्जशिट एवढयासाठी दाखल केले नाही कारण फॉरेन्सीक लॅबकडून यासंदर्भातील काही रिपोर्ट आले नाही. संगणकवारील काही नोंदी आपल्याला हैद्राबादच्या लॅबमधून तपासून घ्यावयाच्या आहेत. त्या जोडल्याशिवाय चार्जशिट तयार होऊ शकत नाही परंतु अशा लॅब देशामध्ये चारच असल्यामुळे, लॅबचे रिपोर्ट लवकर न आल्यामुळे चार्जशिट दाखल होऊ शकले नव्हते. पोलिसांना जो काही तपास करावयाचा होता तो तपास पोलिसांनी पूर्ण केलेला आहे. सालेमच्या बाबतीत विचारण्यात आले की, अशी माझ्याकडे माहिती नाही पण सालेमला तुरुंगा बाहेर राहून जर कोणी समर्थन देण्याची भूमिका बजावित असेल तर महाराष्ट्रामध्ये आम्ही ही गोष्ट कधीही सहन करणार नाही. याचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. मी बहुतेक प्रश्नाची उत्तरे दिलेली आहेत. मालवणमध्ये प्रचार करणारे आणि निवडणुकीला उभे राहणारेही जागे होते परंतु निवडणूक लागल्यापासून मी सतत जागा होतो.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

दोन्ही बाजूला माझे मित्र होते. रात्री कितीही वाजता मला फोन यायचे. तेव्हा तक्रारी या पोलीस दलावर केल्या जात असे. एक उदाहरण मी आपल्याला सांगातो. मी नाव घेत नाही. कारण आपल्या सर्वांना अडचणीचे होईल. पण एके दिवशी एका माजी मंत्र्याचा मला फोन आला. तो म्हणाला आमची गाडी पोलिसांनी पकडली आहे. मी विचारले का पकडली आहे ? आमच्यावर अन्याय केला आहे. पोलीस आम्हाला सोडत नाही. मी रात्री 1.00 वाजता डी.एस.पी.ला उठविले आणि विचारले. तेव्हा डी.एस.पी.ने सांगितले की, गाडीत दारू सापडली. मी विचारले की, किती दारू सापडली ? ते म्हणाले, गाडीतील कोकाकोलाच्या बाटलीत 400 मिली दारू होती म्हणून पकडण्यात आले. आमदाराची तक्रार होती की, बाटलीमध्ये दारू होती, तर गाडी का जप्त करतात ? कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की, दारूची अवैध वाहतूक करताना वाहन सापडले तर ते सुध्दा जप्त करायला पाहिजे. म्हणून सात लाखाची गाडी जप्त केली. गाडी जप्त केली म्हणून ज्यांची तक्रार होती, त्यांचे म्हणणे देखील बरोबर होते. 400 मि.ली.साठी 7 लाखाची गाडी जप्त करायची का ? अशा वेळी कधी कधी पोलिसांना आरोपिंच्या पिंजऱ्यामध्ये उभे रहावे लागते. दारूची बाटली जप्त करायची असेल तर ती कर पण आमची गाडी सोड असे सांगण्यात येते. तेव्हा कायदा आडवा येतो. कायद्याप्रमाणे काम करताना फक्त 400 मिलीसाठी आमची गाडी जप्त केली याचे बोल देखील खावे लागतात. आज एका बाजूने आपण टीका करीत आहात. खरचं आपण मला खाजगीत सांगा.... आपल्या पक्षातील सर्व नेते तिथे जाऊन प्रचार करून आलेत. सगळयांच्या सभा झाल्या. एकाचीही सभा उधळली नाही. कुणाला सभा घ्यायची होती, तिथे सभा घेऊ दिली नाही, असे कुठेही झाले नाही. एखाद्या दिवशी एकच ग्राऊंड दोन्ही पार्टीने मागितले तर कोणाला द्यायचे याचा अधिकार कलेक्टरला आहे. पहिली मागणी करणाऱ्याला ग्राऊंड अलॉट करण्यात येते. यात पोलिसांचा काही संबंध नाही. सगळया नेत्यांच्या व्यवस्थित सभा झाल्या.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येत आहे. 5 तारखेपासून 17 तारखेपर्यंत मालवण विधानसभा मतदार संघातील सर्व ग्राऊंडचे रिझर्व्हेशन केले होते. त्या ग्राऊंडचा वापरसुध्दा होत नव्हता. शेवटी, जिल्हाधिकाऱ्यांना सांगावे लागले की, विनाकारण ग्राऊंड आरक्षित करून ठेवली आहेत. सभा होऊ नये म्हणून उधळण्यापासून सर्व प्रकार झालेत. आपल्याला खाजगीत याच्यापलिकडचेसुध्दा सांगण्याची माझी तयारी आहे. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : अध्यक्ष महोदय, सगळी हॉटेल्स, ग्राऊंडस् बुक केली होती. असे करायला आपल्याला कोणी नको म्हटले होते. आपण बारकाव्यात मागे पडलात हे कबूल करायला पाहिजे. असे असताना आपण पोलिसांना दोष कशासाठी देत आहात. आपले अर्ज आधी आले असते आणि ग्राऊंडस् उपलब्ध करून दिले नसते तर मग पार्शिॲलिटी झाली असे म्हणू शकला असता. महोदय, पचन शक्ती आणि सहन शक्तीलासुध्दा मर्यादा असतात. दणकून पराभव झाल्यामुळे व्यथा आणि वेदना होणे स्वाभाविक आहे. काही गोष्टी मनाला खूप लावून घेऊ नयेत. काही गोष्टी विसरणे हे अतिशय चांगले असते. जेव्हा आपले कुठे तरी अडकले की कोणाला तरी दोष द्यायला पाहिजे हे मी बारकाईने पाहिलेले आहे. नेहमीच पोलीस खात्याला लोकांचा द्वेष स्वीकाराला लागतो.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या संदर्भामध्ये आम्ही तिथल्या तिथे तक्रार नोंदविली होती. खासदार श्री.रेंगे पाटील यांना मारहाण झाल्याचे मी पाहिलेले आहे. मी डोळयाने मारहाण पाहिलेली आहे. आम्ही सोडवायला गेलो होतो. श्री.रेंगे पाटील यांचा त्यादिवशी अंगरक्षक नसता तर त्यांना अजून मारहाण झाली असती. श्री.रेंगे पाटील यांच्यावर हल्ला करणारे आरोपी अद्यापि पकडलेले नाही. निवडणुकीच्या विजयाशी, पराभवाची संबंध आहे असे तुमचे म्हणणे असेल तर आपण सांगावे की, जो निवडून येतो, त्याल्या दुसऱ्या धोपटायचा अधिकार आहे, त्या पध्दतीने महाराष्ट्रात राजकारण करा. ही काही बोलण्याची पध्दत नाही.

यानंतर श्री.अजित..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, श्री.रेंगे-पाटील यांना अंगरक्षकाने वाचविले. ज्यांनी त्यांचेवर हल्ला केला त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. एकंदरीत आकडेवारी पाहिली तर मालवण येथील निवडणुकीत शिवसेना पक्षाच्या कार्यकर्त्यांवर जेवढ्या कारवाया केल्या त्याच्या पेक्षा जास्त कारवाया काँग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांवर केलेल्या आहेत. दुसऱ्या बाजुने अशी टीका केली जाते की, सरकार सत्तेत असून देखील त्याचा काही फायदा नाही. राज्य शासनाचा असा एकच विभाग असा आहे की, या विभागावर दोन्ही बाजुने टीका होते. मालवण येथे अतिशय शांतपणे निवडणुका पार पडलेल्या आहेत असे खात्याचे प्रमुख म्हणून माझे मत असू शकते. परंतु केंद्रीय निवडणूक आयोगाच्या प्रतिनिधींनी या गोष्टीवर शिक्कामोर्तब केलेले आहे. तेथे अतिशय शांततेच्या वातावरणात निवडणुका पार पडलेल्या आहेत. तेथील कायदा आणि सुव्यवस्था चांगली आहे. त्यांनी आपल्याला प्रशस्तीपत्रक दिलेले आहे. शेवटी लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचे लोक काय म्हणतात ? अल्पमताची बूज राखली पाहिजे. आपले जर असे म्हणणे असेल की, तेथील लोक पार्शलिटीनी वागले असतील तर कोकण विभागाच्या आय.जी.कडे चौकशी न देता दुसऱ्या विभागाच्या आय.जी.कडून चौकशी केली जाईल. त्यांनी इमपार्शलिटीनी वागले पाहिजे. आपण आमच्याकडे पुराव्यानिशी काही माहिती दिली तर दुसऱ्या विभागाच्या आय.जी.कडून चौकशी केली जाईल आणि जर कोणी दोषी असेल तर त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल. माझी सदनाला विनंती आहे की गृह विभागावरील पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, महसूल विभागाच्या संदर्भात ज्या सन्माननीय सदस्यांनी महत्वाच्या सूचना केल्या त्यांचे मी मनापासून आभार मानतो. या विभागावरील चर्चेच्या अनुषंगाने बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी मुरु ड तालुक्यातील वेडासे-वांद्र येथील जमिनीचा प्रश्न उपस्थित केला. तेथील शेतकरी अनेक वर्षापासून जमीन कसत असतानासुध्दा तहसिलदारांनी त्यांना अधिक्रमितधारक म्हणून त्यांना नोटीस पाठविल्या आहेत. या गोष्टीची ताबडतोब चौकशी करुन त्या जमिनी शेतकऱ्यांच्या असतील तर त्यांना त्या परत देण्याचा निर्णय शासन निश्चितपणे करील.

सन्माननीय सदस्य श्री.नतिकोद्दीन खतिब यांनी बाळापूर नगरपालिकेचे पुरामुळे नुकसान झाले. नगरपालिकेने शासनाकडे मदत मागूनही त्यांना मदत देण्यात आलेली नाही असे सांगितले. त्यांनी जो प्रस्ताव पाठविलेला आहे त्यावर विचार करुन योग्य ती कार्यवाही केली जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सांवत यांनी सोलापूर जिल्ह्यातील पात्र ठरलेल्या लोकांना मदत दिली गेली नाही असे सांगितले. याबाबत ताबडतोब तपासणी केली जाईल. जर पंचनामा झाला असेल आणि त्यांना मदत मिळाली नसेल तर त्याबाबत निश्चितपणे कारवाई केली जाईल.

सन्माननीय सदस्य डॉ.अझीज यांनी वक्फ बोर्डासंबधीचा प्रश्न उपस्थित केला. त्याबाबत ताबडतोब कार्यवाही करण्याच्या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न करु.

श्रीमती फौजिया खान यांनी परभरणी येथील क्रीडा संकुल उभारण्यासाठी जमीन उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमहोदयांकडे पाठविलेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.विलास अवचट)

डॉ.राजेंद्र शिंगणे....

जर कोणत्याही प्रकारच्या त्रुटी आणि अडचणी नसतील तर ताबडतोबीने दोन दिवसांच्या आतच त्या जमिनीला मान्यता देऊन क्रीडा विभागाकरिता क्रीडांगणासाठी उपयोग झाला पाहिजे म्हणून मान्यता दिली जाईल. तसेच अजून एक महत्वाची सूचना त्यांनी केली आहे. त्यांनी सांगितले की, पूर्ण कुटुंबासाठी एक कास्ट सर्टिफिकेट असले पाहिजे आणि त्याची नोंद रेशन कार्डमध्ये झाली पाहिजे. सन्माननीय राणेसाहेब या खात्याचे मंत्री असताना त्यांनी अशाप्रकारची भूमिका घेतली होती असेही त्या म्हणाल्या. सुर्दैवाने ते आज पुन्हा या महसूल खात्याचे मंत्री असल्यामुळे जर खरोखरच पूर्वी अशाप्रकारची भूमिका घेतली गेली असेल तर त्यासंदर्भात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टिकोनातून पावले उचलली जातील. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी पेण तालुक्यातील रावेगांव, जितेगांव या गावांचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, त्या ठिकाणी अनेक कुटुंबाना जास्तीचे पैसे दिलेले आहेत. काही कुटुंबाना मदत केली गेली आहे, परंतु काही कुटुंबांना मदत दिली गेलेली नाही. मी आपल्याला सांगू इच्छितो की, अशा प्रकारच्या तक्रारी मागील काळामध्ये शासनाला प्राप्त झाल्या होत्या. शासनाकडून मदत देत असताना कोणत्याही प्रकारचा भेदभाव करावयाचा नाही अशाप्रकारचे धोरण आम्ही स्वीकारले होते. परंतु तरी सुध्दा काही कुटुंबाना मदत मिळाली नसेल तर, त्यासंदर्भात चौकशी केली जाईल आणि ज्यांना मदत मिळाली नाही त्या सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल. याशिवाय इतरही अनेक सन्माननीय सदस्यांनी महसूल आणि पुनर्वसन विभागाच्या मागण्यांवर आपले विचार व्यक्त केलेले आहेत. त्या सर्व सदस्यांच्या सूचनांचा आणि मतांचा विचार करुन, योग्य ती कार्यवाही करण्याचा प्रयत्न महसूल व पुनर्वसन विभागाच्या माध्यमातून केला जाईल एवढेच या पुरवणी मागण्याच्या निमित्ताने सांगू इच्छितो. त्यामुळे मी या ठिकाणी अधिक न बोलता महसूल व पुनर्वसन विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, ग्रामविकास विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्या प्रा.फौजीया खान व डॉ.नीलम गोऱ्हे या दोन सदस्यांची आपले विचार व्यक्त केलेले आहेत. सन्माननीय सदस्या प्रा.फौजीया खान यांनी महिला बचत गटांच्या माध्यमातून ज्या वस्तू तयार केल्या जातात त्या वस्तूंचे मार्केटींग एन.जी.ओ.च्या माध्यमातून करण्यास परवानगी आहे की नाही ? असा प्रश्न विचारलेले आहे. मी या सदनाच्या माध्यमातून त्यांना सांगू इच्छितो की, पुणे, ठाणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर या जिल्हा परिषदेमध्ये वेगवेगळया एन.जी.ओ.च्या माध्यमातून हे काम करीत आहोत. औरंगाबाद जिल्हयामध्ये एन.जी.ओ.च्या माध्यमातून मार्केटींगचे काम करावयाचे बाकी आहे. त्यामुळे जर औरंगाबाद जिल्हा परिषदेंतर्गत असलेल्या डीआरडीए च्या कव्हरींग बॉडीने मान्यता दिली तर आपण हे काम करु शकतो.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी स्ट्रीट लाईटच्या संदर्भात आपले विचार मांडले. केवळ मागास भागातच नव्हेतर इतरही भागात स्ट्रीट लाईटची आवश्यकता आहे. मागास भागात दलित वस्ती सुधार योजनेच्या माध्यमातून लाईटची व्यवस्था करीत असतो. तरी सुध्दा सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिलेल्या माहितीची नोंद करुन, प्राधान्याने त्या ठिकाणी स्ट्रीट लाईटची व्यवस्था करण्यासंदर्भात सर्व जिल्हा परिषदांना आदेश दिले जातील.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (पर्यटन राज्यमंत्री) सभापती महोदय,:पर्यटन विभागाच्या पूरक मागण्यांच्या चर्चेत सन्माननीय सदस्य प्रा.जागेन्द्र कवाडे यांनी भाग घेतला होता आणि त्यांनी जी सूचना केली आहे त्या संबंधी आम्ही योग्य ती कार्यवाही करु.

श्री.अनंत तरे :सन्माननीय मंत्रीमहोदय एकदा लोणावळा येथे आले होते. तेव्हा त्यांनी सर्व संबंधित लोकांची एक बैठक घेतली होती .त्या बैठकीत जे निर्णय घेण्यात आले होते त्याबाबतीत पुढे काय कार्यवाही करण्यात आली होती.?

श्री.सुरेश शेट्टी :याबाबत माननीय सदस्यांनी चर्चेच्या वेळी मुद्दा मांडलेला नाही तरी सुध्दा याबाबतीत माझ्या दालनात आल्यावर चर्चा करण्यात येईल. पर्यटन विभागाच्या पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) :सभापती महोदय, सहकार, वस्त्रोद्योग आणि पणन खात्याच्या पूरक मागण्यांवर तीन सन्माननीय सदस्य बोलले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी असे सांगितले की 2001 ते 2004 पर्यन्त मार्केटींग फेडरेशनला जी घट आली होती त्याची रक्कम शासनाने दिली नाही. तेव्हा ही बाब तपासून त्यावर कार्यवाही करण्यात येईल. सन्माननीय सदस्या प्रा..फौजिया खान यांनी असे सागितले की, 650 महिला कामगारांचा प्रॉव्हिडंड फंडाचा 1985 पूर्वीचा निधी दिला नाही.कॉटन फेडरेशन येण्यापूर्वी मार्केटीग फेडरेशनकडून कापसाची खरेदी केली जावयाची . याबाबतीत प्रॉव्हिडंड फंड कमिशनर आणि संबंधित खात्याकडे पाठपुरावा करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

सन्माननीय सदस्य प्रा.जागेन्द्र कवाडे यांनी या खात्याच्या पूरक मागण्यांच्या संदर्भात शासनाचे अभिनंदन केलेले आहे.तेव्हा सहकार,वस्त्रोद्योग आणि पणन विभागाच्या पूरक मागण्या मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मारावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, परिवहन, भटक्या व विमुक्त जाती कल्याण,महिला व बालकल्याण,सामाजिक न्याय व इतर मागासवर्ग या विभागाच्या पूरक मागण्यांवरील चर्चेत जवळजवळ 11 सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. तसेच त्यांनी काही माहितीसुध्दा मागितलेली आहे तेव्हा ही माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहे. सन्माननीय सदस्यांनी जी काही मागणी केलेली आहे त्या बाबतीत योग्य तो विचार आम्ही करणार आहोत.

श्री.अरविंद सावत : वसई भागात एस.टी. सेवा बंद करण्याचा घाट घातला जात आहे तो थांबविण्यात यावा. .

श्री.धर्मरावबाबा आत्राम : वसई भागात एस.टी.सुरु करण्यास सांगण्यात आलेले आहे सध्या सुरु आहे तशीच ती सेवा सुरु राहील . ती सेवा बंद होणार नाही. कास्ट सर्टिफिकेटच्या बाबतीत प्रा.फौजिया खान यांनी विचार मांडलेले आहेत त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, ते काम सुध्दा आपण करणार आहोत.सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी मानधनाच्या बाबतीत एक मुद्दा मांडला होता आपण 7 लाख 27 हजार रुपये मानधनासाठी देत आहोत.सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार येथे उपस्थित नाहीत. 100 कोटी रुपये का एस.टी.महामंडळाला कशासाठी देण्यात येत आहेत असा मुद्दा त्यांनी उपस्थित केला होता. सदनाच्या माहितीकरता मी सांगू इच्छितो की, शाळेतील विद्यार्थी बसमधून प्रवास करतात तसेच 65वर्ष वयावरील व्यक्ती सुध्दा प्रवास करतात ,स्वातंत्र्य सैनिक प्रवास करीत आसतात त्यांच्या प्रवासासाठी ही 100 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

श्री.अरविंद सावंत : पुस्तकाचा उल्लेख त्यात करण्यात आला होता.

श्री.धर्मरावबाबा आत्राम :पुस्तकासाठी तरतूद केलेली नाही.प्रवासाचा खर्चासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे.सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी इन्सिडन्सल स्कीमच्या बाबतीत सांगितलेले आहे. चार विभागाच्या पूरक मागण्यांना मंजुरी द्यावी अशी विनंती करतो.

श्री.रमेश निकोसे :माननीय मंत्रिमहोदयांनी माझ्या मुद्दा बाबत खुलासा केलेला नाही.

श्री.धर्मरावबाबा आत्राम :सर्वोच्च न्यायालयाने एक आदेश दिलेला आहे व त्याप्रमाणे महिला मंडळ आणि बचत गट यांच्या माध्यमातून आपण जो पोषण आहार पुरवठा करतो त्याबाबतीत जी.आर.काढलेला आहे.आमच्याकडे जसजसे महिला गट आणि बचत गटांकडून अर्ज येतील त्याप्रमाणे त्यांना पुरवठा करण्यास सांगू. 4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सामाजिक न्याय विभागाच्या मागण्यांवरील चर्चेत भाग घेत असतांना मी अशी मागणी केली होती की, मागासवर्ग विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती, निर्वाह भत्ता आणि फी चेकने देण्यात यावी.

श्री.धर्मरावबाबा आत्राम :स्कॉलरशीपची रक्कम आपण चेक व्दारे देतो त्या व्यतिरिक्त आपण जे शिक्षण शुल्क देतो ती रक्कम आपण शिक्षण संस्थेला देतो आणि त्यानंतर ते विद्यार्थ्यांना देतात.

नंतर श्री.सुंबरे`

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मी माझ्या भाषणातून मागणी केली होती सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भात की, ज्या भटक्या विमुक्त जाती समाजाच्या तांडे-वस्त्या आहेत त्यांचे बरोबर धनगरांचा देखील विकास व्हावा म्हणून, तर त्याबाबत आपण काही खुलासा केला नाही.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, याबाबतीत योग्य तो विचार करून राज्य सरकारने जी.आर. काढलेला आहे. त्यामध्ये आपल्याला बंजारा समाजामध्ये करण्यास सांगितले आहे. त्यासाठी दुरूस्ती करावी लागेल आणि त्यामध्ये नॉमेडिक ट्राईब्ज येतात त्यांना देखील न्याय मिळाला पाहिजे या दृष्टीने जरूर शासन विचार करील.

*****

..... 5आय 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील (कृषी, जलसंधारण व खार जमीन राज्यमंत्री) : सभापती महोदय, कृषी विभागाच्या पुरवणी मागण्यावर या ठिकाणी चर्चा करण्यात आली त्यामध्य एकंदर योजनांतर्गत आणि योजनेतर अशा 17 कोटी 38 लाख रूपयांच्या मागण्या करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने बदनापूर येथे मोसंबी संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी आपण पैसे मागितले आहेत. तसेच केळी संशोधन केंद्र नांदेड येथे स्थापन करण्यासाठी पैसे मागितले आहेत त्याचबरोबर कृषी महाविद्यालयांना सहाय्यक अनुदानासाठी म्हणून पैसे मागितले आहेत. यामध्ये मला आणखी असेही सांगावयाचे आहे की, कृषी विद्यापीठांकडे जवळ जवळ 6 हेक्टर जमीन अतिरिक्त उपलब्ध आहे आणि ही उपलब्धता बऱ्याच दिवसांपासून होती. आता आपण त्यांच्याकडून बऱ्याच दिवसांपासून अहवाल मागितला आहे की, या 6 हेक्टर जमिनीचा इन्क्यूबेटर सेंटर सुरू करावे आणि त्यातून पैसे मिळविण्याचा प्रयत्न करावा.

सभापती महोदय, त्यानंतर जलसंधारण विभागाच्या पुरवणी मागण्या आपल्यासमोर असून, ग्रामीण विकास कार्यक्रमामध्ये 27 कोटीची मागणी करण्यात आलेली आहे. 1997-98 वर्षामध्ये एकूण 82 कोटी 91 लाख अधिक खर्च करण्यात आला होता तो नियमित करण्यासाठी आपण ही पुरवणी मागणी करीत आहोत. त्यानंतर खार भूमि विकास खात्यामार्फत आम्ही ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये नवीन खार भूमि योजना घेत आहोत त्यासाठी 2 कोटी 44 लाख रूपये लागणार आहेत आणि तीही मागणी आम्ही येथे केलेली आहे. त्यानंतर जलसंधारणाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.सावंत यांनी उल्लेख केला की, कुंभवडे, जिल्हा सिंधुदुर्ग येथील कोल्हापूर टाईप बंधारा नादुरूस्त झालेला आहे. तेव्हा मी त्यांना सांगू इच्छितो की, सदर बंधाऱ्याच्या दुरूस्ती बाबत निश्चितपणे विचार करून कारवाई करण्यात येईल.

सभापती महोदय, त्यानंतर रोजगार आणि स्वयंरोजगार विभागाच्या पुरवणी मागणी केलेली आहे ही लाक्षणिक अशी मागणी करण्यात आलेली आहे. या विभागासंबंधात बोलताना सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सूचना केली होती की, एम्प्लॉयमेंट बोर्डामध्ये नोंदणी केलेली नावे आहेत त्यातूनच भरती करण्यात यावी. परंतु मी या संदर्भातील वस्तुस्थिती आपल्या निदर्शनास आणून देण्यासाठी सांगू इच्छितो की, मध्यंतरी सर्वोच्च न्यायालयाचा एक निकाल लागलेला आहे आणि त्यानुसार आपल्याला यासाठी जाहिराती देणे बंधनकारक आहे. न्यायालयाच्या त्या आदेशाचे

..... 5आय 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील ....

पालन करून शिवाय आपल्या एम्प्लॉयमेंट केंद्राकडूनही उमेदवारांची नावे आपण देतो. परंतु यासाठी आपल्याला जाहीरात देणे देखील बंधनकारक आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी म्हटले की, लोकांना कामे मिळत नाहीत. सेल्फ एम्प्लॉयमेंटच्या संदर्भात त्यांनी सांगितले होते की, बऱ्याच लोकांना काम मिळत नाही. मी आपल्याला सांगू इच्छितो की, या संदर्भात शासनाच्या वेगवेगळ्या विभागांचे सुमारे 30-32 जी.आर. आहेत की, सेवा सोसायट्यांना प्रामुख्याने कामे द्यावीत म्हणून आणि त्याच्या अमलबजावणीसाठी आता आपण काम करीत आहोत. त्याशिवाय स्वयंरोजगार संस्थांना कर्ज मिळण्यासाठीचे काम आपण हाती घेतले आहे. रोजगार व स्वयंरोजगाराच्या बाबतीत मला येथे आवर्जून सांगितले पाहिजे की, इ-चावडी योजनेतून ग्रामीण भागातील प्रत्येक 10 व्या गावामध्ये आपण व्हिलेज इंटरनेट किऑस उपलब्ध करून देत आहोत आणि त्याचा फायदा ग्रामीण भागातील जनतेला व्हावा, त्यांना या माध्यमातून कृषी विषयक माहिती मिळावी, गावापर्यंत ही माहिती पोहोचविण्याचा आपला मानस आहे. त्याचबरोबर शेतीमालाचे भाव, विक्री व खरेदी या सर्व गोष्टी करण्याचाही शासनाचा विचार आहे. सभापती महोदय, या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही बाबी नाहीत. तरी सभागृहाने माझ्या विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात ही विनंती.

****

(यानंतर श्री. सरफरे ....5जे 1

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ (पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय व औकाफ राज्यमंत्री) : सभापती महोदय, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाच्या पुरवणी मागण्यांवर बोलतांना माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील, जोगेंद्र कवाडे, अनंत तरे व प्रकाश शेंडगे या माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. याठिकाणी माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील उपस्थित नाहीत. त्यांनी आपल्या भाषणामध्ये अतिवृष्टीमुळे ओटे नस्ट झाल्याचे सांगितले. ते दुरुस्त करण्यासाठी 50 लाखाची मागणी केली आहे. त्यामध्ये लक्ष घातले जाईल व ते ओटे दुरुस्त करण्याबाबत शासन गंभीरपणे विचार करील. माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी नागपूर येथील पशू मत्स्य विज्ञान विद्यापीठामध्ये मागासवर्गीयांची पदे भरतांना अन्याय झाल्याची तक्रार केली. त्याबाबत आवश्यक ती चौकशी केली जाईल. माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी नागपूर च्या पशू मत्स्य विज्ञान विद्यापीठाची मान्यता रद्द होणार नाही यासाठी शासनाने प्रयत्न करावा अशी मागणी केली. नागपूरच्या पशू मत्स्य विज्ञान विद्यापीठाची मान्यता रद्द होणार नाही यासाठी शासनाकडून प्रयत्न केले जातील. व त्यांना सोयी-सुविधा देण्याचाही प्रयत्न केला जाईल. त्याचप्रमाणे शासन डिझेलच्या विक्रीकराची प्रतिपूर्ती लवकर करीत नाही त्यामुळे आमच्या मच्छिमार बांधवांना त्रास होतो असे त्यांनी सांगितले. सभापती महोदय, व्हॅट कर प्रणाली स्वीकारण्यापूर्वी हे डिझेल विक्रीकर मुक्त होते. व्हॅट अस्तित्वात आल्यानंतर त्यामध्ये अडचण निर्माण झाली. म्हणून त्याची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतला. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा व इतर सर्व विभागांना आपण अनेक सुविधा देतो. परंतु मच्छिमार बांधवांना डिझेलच्या विक्री करामध्ये सवलत देण्याशिवाय दुसरी कोणतीही सवलत देत नव्हतो.म्हणून या लोकशाही आघाडीने क्रांतिकारक निर्णय घेतला. व व्हॅट चा कायदा अस्तित्वात आल्यानंतर 34 टक्के डिझेलच्या कराची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी पुरवणी मागणी याठिकाणी सादर करण्यात आली. आणि कोणत्याही परिस्थितीत ही प्रतिपूर्ती करण्यासाठी सी.एफ. मधून ॲडव्हान्स काढावा लागला तरी चालेल परंतु त्यांना लवकरात लवकर पैसे देण्याचा प्रयत्न केला जाईल. सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी शेळी मेंढी विकास महामंडळातील भ्रष्टाचाराचा मुद्दा मांडला. त्यासंबंधीचा चौकशी अहवाल आला आहे व त्यावर लवकरात लवकर कारवाई करावी अशी सूचना केली आहे. त्याबाबत लवकरात लवकर कारवाई करण्यात येईल. तसेच, हे महामंडळ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ...

चालविण्यासाठी अधिक निधीची त्यांनी मागणी केली आहे. तो निधी देण्याबाबत विचार करण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, कामठीच्या पशुवैद्यकीय दवाखान्याची दुरावस्था झाली आहे. त्याविषयी आपल्या भाषणामध्ये उल्लेख झालेला नाही?

श्री. हसन मुश्रीफ : त्या विषयी आपल्याबरोबर निश्चितपणे चर्चा करु.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, शेळी-मेंढी विकास महामंडळाला निधी देण्याबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करावी...

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, त्याबाबत विचार करण्यात येईल. तेव्हा माझ्या विभागाच्या बाब क्र. 74 ते 79 पर्यंतच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या मागण्यांमध्ये अनेक माननीय सदस्यांनी भाग घेऊन चर्चा केली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी अलिबाग येथे सिटी स्कॅन असून त्या ठिकाणी रेडिऑलॉजिस्ट नेमण्याबाबत सूचना केली. त्यांना सांगू इच्छितो की, त्याठिकाणी ट्रेंड टेक्निशिअल असून तो सिटी स्कॅन चालवितो. अर्थसंकल्पामध्ये 9 पदे मंजूर करण्यात आली आहेत त्यामध्ये सिटी स्कॅन रेडिऑलॉजिस्टचे पद भरतांना अलिबागला प्राधान्य देण्यात येईल. माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी दोन-तीन प्रश्न उपस्थित केले. त्यामध्ये चतुर्थ श्रेणीची रिक्त असलेली पदे केव्हा भरणार असे त्यांनी विचारले. आज शासनाकडे जवळ जवळ 24 हजार पदे आहेत त्यामध्ये 20 हजार 500 पदे भरली आहेत व साडे तीन हजार पदे रिक्त आहेत. ती पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच, वारंवार एकाच कंपनीकडून औषधे खरेदी करण्यात येतात, एकाच कंपनीचे नाव समोर येते असे त्या म्हणाल्या.

(यांनतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे . . . .

पण मी सांगू इच्छितो की, आरोग्य विभाग जी खरेदी करते, ती रेट कॉन्ट्रॅक्टप्रमाणे करते आणि त्याचे दर आणि कोणकोणत्या कंपन्या रेट कॉन्ट्रॅक्टमध्ये बसतात ते वैद्यकीय शिक्षण विभाग ठरवते. आम्ही केवळ मागणी देतो आणि रेट कॉन्ट्रॅक्टप्रमाणे औषधे घेतो. सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केला होता की, सध्या आरोग्य विभागाकडे औषधांचा स्टॉक आहे का ? प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये स्टॉक आहे का ? तर सध्या रेबीज व्हॅक्सीन सोडून प्रत्येक औषधांचा साठा मोठया प्रमाणात आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी एक प्रश्न उपस्थित केला की, नवीन रुरल हेल्थ सेंटर्स् निर्माण होत आहेत. तर त्यांच्यासाठी पुरेसा स्टाफींग पॅटर्न आहे का ? याबाबतीत सांगावयाचे तर त्यांच्या रिक्रूटमेंटची प्रोसेस सुरु आहे.

श्रीमती संजीवनी रायकर(खाली बसून) : 98 पासून औषधे उपलब्ध नाहीत.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, औषधे उपलब्ध आहेत. आपण जे सांगत आहात, त्याबाबतीत मागे खरेदी केली होती, आता त्याचे पेमेंट करावयाचे आहे. सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे यांनी जो चौदावा जिल्हा कोणता असा प्रश्न उपस्थित केला होता. त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, यात प्रिटींगची चूक झाली आहे. यामध्ये सांगली जिल्हयाचे नाव आलेले नाही. तर चौदावा सांगली जिल्हा आहे. तसेच त्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, ज्या-ज्या ठिकाणी सिटी स्कॅन मशीन नाही, तेथे ते लवकरात लवकर उपलब्ध करुन दिले पाहिजे. यावर्षी नंदूरबार, गडचिरोली हे दोन जिल्हे प्रस्तावित आहेत. त्यानंतर वर्धा, गोंदिया, हिंगोली, वाशिम येथे सिटी स्कॅन मशीन देऊ. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी रिक्त पदे किती आहेत ? असा प्रश्न उपस्थित केला. सध्या वर्ग-1 व वर्ग-2 ची पदे रिक्त आहेत हे मी नाकारु शकत नाही. तसे पाहिले तर वर्ग-2 ची 250 रिक्त आहेत आणि 5040 पदे भरलेली आहेत. आपल्याला आणि मलाही माहिती आहे की, डॉक्टरांच्या अपॉईंटस्मेंट सुरु आहेत, पण तरीही डॉक्टर मिळत नाहीत. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा केली. याबाबतीत मेडिकल एज्युकेशन विभाग आणि हेल्थ विभाग प्रस्ताव तयार करीत आहेत की, ज्याच्यामुळे एम.बी.बी.एस.केल्यानंतर सध्या वन इयर एन्ट्रन्सशीप कम्पलसरी करावी लागते. तो नियम पुन्हा रिव्हयू करणार आहोत आणि तसे झाल्यावर आपल्याला वर्ग-2 च्या पदासाठी कन्टीन्यूअस फ्लो सुरु राहील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, यासंदर्भात माझी एक सूचना आहे. ज्यादिवशी

. . . .5के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

आपण संबंधितांना डेट ऑफ जॉईनिंगचे पत्र द्याल , त्याच दिवशी एक वर्षानंतरचे किंवा दोन वर्षा नंतरचे म्हणजे तुम्ही जो पिरिएड ठरवाल त्याप्रमाणे डेट ऑफ रिलीव्हचे पत्रही संबंधितांना देण्यात यावे. म्हणजे कोणाच्याही मनात संभ्रम रहाणार नाही. नाहीतर एकदा गडचिरोली, चंद्रपूर येथे गेल्यानंतर एक लाख, दोन लाख रुपये घेतल्याशिवाय तुमचे अधिकारी त्यांची बदली करीत नाहीत हे तुम्हालाही माहिती आहे आणि मलाही माहिती आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, असे बोलणे बरोबर नाही. ही वाक्ये प्रोसीडींगमधून काढून टाकण्यात यावीत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी बरोबर बोललो आहे. कारण ते सत्य आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आमच्याकडे स्पेसीफीक केस द्यावी. आम्ही संबंधितांवर ॲक्शन घेऊ.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, याबाबतीत एक केस दिली आहे. नागपूरच्या उप संचालकांच्या संदर्भातील केस आहे. त्यांची चौकशी केली पण पुढे त्याबाबतीत काही उत्तर देत नाही. त्यांच्या घरी एक कोटी रुपये मिळाले आहेत. त्यांचे काय झाले ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, संबंधितांना सस्पेंड केले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, त्यांच्याकडे ते पैसे कुठून आले ? कोणी दिले? याची माहिती सांगा.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, यासंबंधातील कारवाई पूर्ण झाल्यावर आपल्याला अहवाल देऊ. आपण जेव्हा-जेव्हा माहिती मागितली तेव्हा ती मोकळेपणाने दिलेली आहे. या विभागाच्या बाबतीत आम्हाला काही लपवून ठेवावयाचे नाही. आपल्या जे मनात आहे, तेच माझ्या मनात आहे की, आरोग्य व्यवस्था चांगली राहिली पाहिजे. तेव्हा याबाबतीत तुमच्या ज्या चांगल्या सूचना असतील, त्याचे आम्ही स्वागतच करु.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

श्री.रणजित कांबळे (पुढे सुरु....

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत साहेबांनी कोबाल्ट युनिट नासिक आणि सिंधूदूर्ग जिल्ह्यामध्ये निर्माण करण्याचाबाबत प्रस्तावित केलेले होते. या त्यांच्या प्रपोजचा समावेश पुढे करणार आहोत. तेव्हा सन्माननीय सभागृहाने आरोग्य विभागाच्या मागणी क्रमांक 205 ते 211 या मागण्या मंजूर कराव्यात, अशी मी विनंती करतो.

--

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते (वन मंत्री) : आदरणीय सभापती महोदय, वन खात्याच्या पूरक मागण्यांच्या संदर्भात एकूण चार मागण्यांवर चारच सन्माननीय सदस्य बोलेले आहेत. त्यामध्ये आदरणीय सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये हत्ती आलेले आहेत त्या विषयी चिंता व्यक्त केलेली आहे. महाराष्ट्रामध्ये अनेक प्राणी आहेत. विशेषत: टायगर हा प्राणी देशामध्ये कमी होत असतांना महाराष्ट्रामध्ये मात्र ते वाढलेले आहेत. गेल्यावेळच्या गणनेमध्ये टायगरांची संख्या 232 होती ती 268 झालेली आहे. पॅन्थर 2000 मध्ये 513 होते,ते आता 727 झालेले आहेत. याचा अर्थ बाकीचे काही प्राणी होते, परंतु हत्ती आपल्याकडे नव्हते. आता कर्नाटकमधून हत्तींनी देखील आपल्याकडे आगमन केलेले आहे. 2000 साली दोन हत्ती आले तेव्हा लोक त्यांच्याकडे आनंदाने पहात होते, त्यांना मजा वाटत होती. येताना दोन हत्ती आले आणि ते परत गेले. त्यांच्या संख्येमध्ये वाढ होऊन पुन्हा ते परत आले. आता सतत त्यांच्यामध्ये वाढ होत जाऊन ते दोडामार्गे कोल्हापूर जिल्हयामध्ये येतात. आता कोल्हापूर जिल्ह्यामध्ये साधरता: 11 हत्ती आहेत. तेल्हारी डॅम झाला. त्या परिसरामध्ये चार गावांचे पुनर्वसन केलेले आहे. त्या ठिकाणी हत्तींना पाहिजे तसे मुबलक पाणी मिळाले, मुबलक खायला मिळाले. विशेषत: ताडामाडाची झाडे मोठ्याप्रमाणात असल्यामुळे तेथे त्यांना खायला मिळते. त्यामुळे हत्ती परत जातात आणि पुन्हा परत येतात. त्यांना घालविण्याच्यादृष्टीने प्रयत्न केला. ते पुन्हा परत येऊ नये म्हणून उपाययोजना आखल्या. त्यामध्ये सोलर फिनिशिंग करण्याचा विचार आला. त्याचा अभ्यास केल्यानंतर ते अशक्य वाटते. त्यामुळे ते हत्ती कशाप्रकारे घालवायचे, की त्यांना सांभाळायचे, की रिस्ट्रीक्शन करायचे, यासंबंधीचा निर्णय घ्यावा लागेल. त्यामुळे हत्ती आल्यानंतर ते त्या परिसरात रहात नाहीत, ते आता लोकवस्तीमध्ये यायला लागलेले आहेत. मला वाटते की, सनमाननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकणी साहेबही दोर्डा मार्गावर गेलेले होते. हत्तीच्या हल्ल्यामध्ये दोन व्यक्ती मरण पावल्या आहेत. त्यांच्या कुटुंबियांना मदत करण्याची व्यवस्था करण्यात आली. नुकसानभरपाई नाही पण मदत केलेली आहे. आपण पूर्वी 1 लाख रुपयांची मदत देत होतो,त्यामध्ये वाढ करुन दोन लाख रुपये मदत केलेली आहे. ती मदत त्यांना दिलेली आहे. पण जमिनीतील भात पिकांचे नुकसान झाले. ताडामाडाच्या,सुपारीच्या झाडांचे नुकसान होत आहे. या नुकसानीचे पंचनामे केले, पण त्यांना पैसे द्यायला गेल्यानंतर ते शेतकरी मदत कमी आहे म्हणून पैसे घेत नाहीत. वन्य प्राण्यांनी हल्ला केल्यानंतर त्यांना नुकसानभरपाई द्यायची असते. त्या व्यक्तींवर हल्ला केला, त्यामध्ये ती व्यक्ती जखमी झाली, त्यामध्ये मुलगा, मुलगी जे कोणी असतील त्यांचे वय काय आहे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ RJW/

श्री.बबनराव पाचपुते (पुढे सुरु....

यावर मदत अवलंबून होती. या मदतीमध्ये आपण आता वाढ केलेली आहे. विशेषत: पिकांचे नुकसान झाल्यानंतर पैसे देत होतो, ते पैसे मात्र लोकांना कमी वाटत होते. सहाजिकच आहे की, यामध्ये मोठयाप्रमाणात हत्ती नुकसान करतात. ही नुकसानभरपाई द्यावी म्हणून कर्नाटक आणि बाहेरच्या राज्यामध्ये हत्ती आहेत, त्यांच्याकडून माहिती मिळविली, त्याचा अभ्यास केला. पूर्वीपेक्षा जास्त मदत देण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर आणलेला होता. कारण ऊसाचे, ताडाचे, फळबागांचे नुकसान होते. त्याबाबत भरपाई देण्यासंबधात निर्णय घेत असताना अडचणी निर्माण झाल्या. शेतकरी हे नुकसान घेत नाहीत. खरे तर तलावामध्ये जमीन गेल्यानंतर त्या जमिनीवर ताड,माड,आंब्याची झाडे असली तर त्याची नुकसानभरपाई देतो. पण वन्य प्राण्यांनी झाडांचे नुकसान केले तर मदत करतो. मदत आणि नुकसान यामध्ये फरक आहे. तेवढेच पैसे मिळाले पाहिजेत, असे करु शकत नाही. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, कोकणातील मंत्र्यांबरोबर बैठक बोलाविलेली आहे,त्या बैठकीमध्ये सन्माननीय सदस्यांनाही निमंत्रित केले जाईल.

यानंतर कु.थोरात....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते....

आता आपण ही मदत तीन पट केलेली आहे. यापेक्षा आणखी किती जास्त नुकसानभरपाई द्यायची यासंदर्भात चर्चा करण्यासाठी कोकणातील आमदारांनही बोलावू. आपणही चर्चेसाठी यावे. आपण मागणी केली नाही, काही बोलला नहीत म्हणून मी आपले नांव घेतले नाही.आपण बाकीच्या विषयावर खूप बीनतोड बोलला आहात. त्याची बीनतोड उत्तरे आपल्याला मिळालेली आहेत.आमचे खाते वनाचे आहे. "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" त्यामुळे याकडे तुमचे लक्ष कमीच आहे यामध्ये काही शंका नाही. सगळसया सदस्यांचे या विभागाकडे लक्ष कमी आहे तसेच या विभागाकडे पाहतांनाही प्रॉयॉरिटी आहे. या खात्याची प्रॉयॉरिटी सुध्दा कमी आहे. म्हणून या वन खात्यावर एकूण जे बजेट आहे ते जास्त देण्याची आवश्यकता आहे.आपण जागतिक बँकेकडून कर्ज घेत असतांना त्यांना शब्द दिलेला आहे की, 2012 साला पर्यंत वनाखाली येणारे क्षेत्र 33 टक्के करावयाचे आहे. आता ते 21 टक्के आहे.ते वाढवावे लागणर आहे. म्हणून वेगवेगळया कारणासाठी जर बाहेरुन मदत घ्यावयाची असेल तर ती मदत मिळविण्यासाठी आपल्याला जास्त पैसे मिळाले पाहिजेत. आपल्याला जास्त पैसे मिळाले नाहीत तर आपले राज्य पुढे जाण्याच्या संदर्भात अडचण होईल.कमी व्याजाचे कर्ज मिळवायचे असेल तर मग ते पाटबंधारे खात्याचे असेल इतर खात्याचे असेल,आरोग्याचे असेल, सामाजिक न्यायाच्या संदर्भात असेल, प्रत्येक ठिकाणी आपल्याला पैसा लागतो आणि तो पैसा घ्यावयाचा असेल आपल्याला त्यांच्या अटी मान्य कराव्या लागतात. सभापती महोदय, आपल्या खात्याला आणि या मागण्यांना न्याय मिळाला पहिजे अशा प्रकारची सूचना या ठिकाणी करण्यात आली. शासन तशा प्रध्दतीने प्रयत्न करील. श्री. रमेश निकोसे साहेबांनी बांबू तोडीच्या संदर्भात विचार मांडलेले आहेत.बांबू तोडीच्या संदर्भात कूप निर्माण करावयाचे आहेत. ते कूप निर्माण्या करण्यासाठी राज्य शासनाला आधी त्या पैशांची तरतूद करावी लागते. त्यानंतर ते पैसे आपण परत शासनाला देऊ शकतो. ही 23-23 कोटी रुपये तरतूद लवकर केल्यामुळे यामध्ये कूप तोड झाली तर साधरणत: 60 ते 65 कोटी रुपये उत्पन्न मिळू शकेल. पण त्यासाठी राज्य शासनाने तरतूद करावयाची असते त्यानंतर केंद्र शासनाकडून ते पैसे मिळतात. जोपर्यंत आपण तरतूद करीत नाही तापर्यंत ही कुपाची तोडण्याची परवानगी केंद्राकडून मिळायची असते. ही तरतूद केली नाही तर ती परवानगी मिळत नाही. मग आपले नुकसान होते. यासाठी ही तरतूद

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

केलेली आहे. हा पैसा लोकांना दिला असला तरी सुध्दा तो पैसा राज्य शासनाला केंद्र शासनाकडून परत मिळणार आहे, याबद्दल आमच्या मनात काही शंका नाही. श्री. अनंत तरे साहेबांनी अत्यंत अभ्यासू अशा प्रकारचे वन खात्याच्या संदर्भात विषय मांडलेले आहेत. विशेषत: ठाणे येथे उद्यान करण्याच्या संदर्भात आपण प्रश्न मांडलेला आहे. आपली सतत मागणी आहे. वनाच्या संदर्भात, या उद्यानाच्या संदर्भात आपण प्रश्न मांडलेला आहे त्यामुळे आपल्याला चर्चेसाठी बोलावण्यात येईल. कारण या उद्यानाच्या बाबतीत वनसंज्ञेची अडचण आहे.वन काढण्याची 1980 च्या कायद्याची अडचण आहे. त्या अडचणी सोडवून महापालिका आणि नगरपालिकेने एकत्र येऊन त्यासंबंधीचा प्रस्ताव दाखल करावयास पाहिजे.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय,1956 साली अशा प्रकारचा एक प्रस्ताव झाला. मी यासाठी दोन वर्षे प्रयत्न केले आहेत. परंतु तो प्रस्ताव मान्य होऊ शकलेला नाही.श्री. गणेश नाईक हे वन मंत्री होते तेव्हा वनखाते आणि ठाणे महानगरपालिका असा संयुक्त विद्यामाने 35 एकरमध्ये वन उद्यान करण्याचा प्रस्ताव मान्य झाला. त्याचा भुमी पूजनाचा कार्यक्रम झाला परंतु आज सुध्दा तो प्रस्ताव पूर्ण होऊ शकलेला नाही. 35 एकरमध्ये फारमोठे उद्यान त्या ठिकाणी होऊ शकते. म्हणून सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मंत्रिमहोदयांना विनंती करतो की, त्यांनी याकडे लक्ष द्यावे. निश्चित स्वरुपात त्या ठिकाणी तसे उद्यान होईल.

श्री. बबनराव पाचपुते :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जो प्रश्न मांडलेला आहे त्यासंदर्भात मी जरुर त्यांना त्यासंबंधीच्या बैठकीला बोलावेन. आपण एकत्र बैठक घेऊन हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने आपल्याला जेवढी मदत करता येईल तेवढी मदत करण्यात येईल. त्यानंतर आपण खारफुटीच्या संदर्भात सांगितले. खारफुटीचे रक्षण करण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात कोर्टाचा निर्णय झालेला आहे.म्हणून यासंदर्भात संपूर्ण अभ्यास करुन त्याचा सर्व्हे होत आहे. ती सगळी जमीन शासनाच्या ताब्यात मिळाल्यानंतर खारफुटीकडे पूर्ण लक्ष दिले जाईल आणि त्याचे चांगल्या प्रकारे संवर्धन होईल. त्यामध्ये काही अडचण येणार नाही. विशेषत: ठाणे जिल्हयात आणि परिसरात मोठे प्रॉजेक्ट होतात त्यावेळी झाडे तोडण्याचा कार्यक्रम होतो त्यावरसुध्दा वन खात्याचे पूर्ण लक्ष आहे. यासंदर्भात यापुढे निर्णय घ्यावा लागेल की, घर

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

बांधावयाचे असले तरी तेथे झाडे लावण्याची सक्ती करावी लागेल. कारखाना करावयाचा असला तरी सुध्दा त्यांना झाडे लावण्याची सक्ती करावी लागेल. सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी केल्या सर्व सूचनांचा जरुर विचार केला जाईल. श्री. प्रकाश शेंडगे साहेबांनी या ठिकाणी एक विषय मांडलेला आहे. ते मला भेटलेही होते. विशेषत: बुलढाणा आणि अकोला परिसरात मोठया प्रमाणात मेंढया आणि शेळया चारण्यासाठी जागा यापूर्वी देण्यात येत होती. आता ते काम एकदम थांबलेले आहे. परतु सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी तशा प्रकारची सूचना केल्या नंतर तशा प्रकारचा प्रस्ताव करण्यात आलेला आहे आणि त्या संदर्भात निर्णय घेतलेला आहे व डी.एफ.ओ. पर्यंत यासंबंधीचे अधिकार दिलेले आहेत. तुम्ही तेथे जा. तुम्ही ती जगा निश्चित करा आणि ती जागा त्या लोकांना सांगा. पास देऊन ती जागा त्या लोकांना चारण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. अशा प्रकारे छोटयातील छोटया माणसाला मदत करण्याचे काम शासन करीत आहे. वनद वाढले पाहिजे. महाराष्ट्रात सगळीकडे गॅस नाहीत, चुली आहेत. हे चुलीवर स्वंयपाक करण्याचे काम हे याच खात्याच्या वतीने वन उपजापासून आपल्याला करावे लागते. कधी तरी आपल्याला या खात्या विषयी विचार करावा लागेल. प्रॉयॉरिटी म्हणून विचार करावा लागेल आणि याबाबतीत मोठया प्रमाणात तरतूद करावी लागेल. मोठया प्रमाणात वन संवर्धन करण्याची आवश्यकता आहे. ती आवश्यकता पूर्ण करण्यासाठी सभागृहासमोर वन विभागाच्या ज्या मागण्या ठेवण्यात आलेल्या आहेत त्या सभगृहाने मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री. खर्चे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, वनसंज्ञेच्या नांवाखाली आमच्या सिंधुदुर्ग जिल्हयातील 42 हजार एकर जमीन घेतलेली आहे ती केव्हा मुक्त करण्यात येणार आहे, याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी कृपया करावा.

श्री. बबनराव पाचपुते : महोदय, परवाच यासंदर्भात मी उत्तर दिलेले आहे. त्या उत्तराने माननीय सदस्यांचे समाधान झाले असेल असे मला वाटले होते म्हणून मी त्या मुद्दयाचा पुन्हा उल्लेख केला नाही. ही 42 हजार एकर जमीन वनसंज्ञेखाली घेतली आहे. ती जमीन परत करता येईल, त्यासंबंधीचे ॲफिडेव्हीट सुप्रिम कोर्टात फाईल करावयाचे आहे व त्याबाबतचा ड्राफट सुध्दा तयार झालेला आहे. यासाठी आपल्यालाही बोलावण्यात येईल. आपण स्वत: एक चांगले वकील आहात, तिकडे वकीली चालली नाही तरी या ठिकाणी आपली जरुर मदत घेतली जाईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : महोदय, चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी खुलासा करु इच्छितो की, तेथे माझी वकीली चालली नाही म्हणून मी येथे आलो असे मंत्री महोदय म्हणतात पण ते तसे नसून जर या घाणेरडया राजकारणात 22 वर्षापूर्वी मी आलो नसतो तर आज मुंबई हायकोर्टाचा जज्ज राहिलो असतो.

उपसभापती : सन 2005-06 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. XXIV OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STATE BOARD OF TECHNICAL EDUCATION ACT, 1997)

श्री. सुरेश शेट्टी (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्र.24-महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, 1997 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : अनुमती देण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. LXXV OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PUBLIC TRUSTS ACT, 1950.)

श्री. हसन मुश्रीफ (विधि व न्याय मंत्री) : महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्र.75-मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्र.75-मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

महोदय, हे विधेयक मांडत असतांना मला सभागृहाच्या असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 याच्या कलम 79 (ड) मध्ये इतर गोष्टींबरोबरच अशी तरतूद आहे की, उक्त अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची "ब" चय स्तंभर एक व दोन मध्ये वर्णन केलेल्या दस्तऐवजांवर त्यातील स्तंभर तीन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किंमतीचे न्यायालय शुल्क मुद्रांक लावावे लागतील. तसेच 54 वर्षांच्या काळात आतापर्यंत सुधारणा करण्यात आली नव्हती. वेतन व भत्त्यांमध्ये झालेली वाढ तसेच इतर प्रशासकीय खर्चामध्ये झालेली वाढ, धर्मादाय संस्थेच्या आस्थापनेच्या खर्चातील वाढ या सर्व बाबींचा विचार करुन काही प्रमाणात तरी यातून वसुली होईल म्हणून हे बिल आणले आहे. ॲप्लिकेशन फॉर पब्लिक ट्रस्टचा जो फॉर्म भरावयाचा असतो त्याची किंमत जी अगोदर दोन रुपये होती ती आता 100 रुपये केली आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, विधानसभा विधेयक क्रमांक 75 या ठिकाणी मांडण्यात आलेले आहे. या विधेंयकाच्या संदर्भात मी एक सूचना करु इच्छितो की, धर्मादाय आयुक्तांचे जे अधिकार आहेत त्यामुळे त्यांच्या अधिकाराचा एकदा अभ्यास करा. त्यांना या कामामध्ये अडचणी येत असल्यामुळे ते लगेच न्याय देऊ शकत नाही. त्यामुळे धर्मादाय आयुक्तांच्या अधिकारात वाढ करण्याची नितांत गरज आहे. महाराष्ट्रात जें विविध धर्मादाय ट्रस्ट आहेत ते सर्व एका कायद्याखाली आणण्याचा प्रयत्न करावा. जसे शिर्डी आणि सिध्द विनायक ट्रस्ट शासनाच्या अंडर काम करते तसे महाराष्ट्रातील जे विविध ट्रस्ट आहेत त्या सर्वांना एका कायद्यामध्ये आणण्याचा प्रयत्न करावा एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5,(दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 75 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 75 संमत झाले आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. LXXXII OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY ENTERTAINMENT DUTY ACT, 1923.)

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) :अध्यक्ष महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 82-मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, 1993 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) :अध्यक्ष महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 82-मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, 1993 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, आपण असे म्हटले आहे की, मल्टीप्लेक्स थिएटरमध्ये कुटुंबांना जाता यावे म्हणून त्यांना वेगवेगळया करांद्वारे सवलती देण्यात आलेल्या आहेत. परंतु तसे काही सुध्दा नाही. मल्टीप्लेक्स थिएटरचे दर फार जास्त लावतात. उलट हे शासनाच्या सवलतीचा गैरफायदा घेऊन शासनाला फसवित आहेत त्यामुळे यासंदर्भात आपण काळजी घ्यावी तसेच आपण स्वत: मल्टीप्लेक्स थिएटरची पाहणी करावी एवढीच सूचना आहे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : दिलेल्या सूचनांची तपासणी करुन निर्णय घेतला जाईल.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1 संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 82 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 82 संमत झाले आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिकासभापती श्री.विलास अवचट)

पृ.शी.: शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. LXXIX

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EDUCATION AND EMPLOYMENT GUARANTEE (CESS), ACT, 1962.)

डॉ.राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, विधान सभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 79 महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, 1962 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

तालिका सभापती (श्री.विलास अवचट) : विधेयक मांडण्यात आले.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, विधान सभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 79 महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, 1962 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

महोदय, महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) यामध्ये जमिनी आणि इमारती यावर कर म्हणून शिक्षण, उपकर आणि रोजगार हमी उपकर बसवून कर जमा करीत आहोत. यामधून राज्य शासनाच्या इमारती तसेच महानगरपालिका, जिल्हा परिषदा इत्यादींच्या मालकीच्या इमारतींना सूट देत आहोत. व्हिएन्ना कन्व्हेन्शन ऑन कॉन्सुलर रिलेशन्स ॲग्रीमेंट,1963 हा वाणिजिक करार झाल्यानंतर संबंधित दूतावासांना अशाप्रकारचा कर माफ करावा अशी विनंती करण्यात आली होती. आपण प्रत्यक्षात जी सेवा देतो त्यावरील कोणताही कर माफ करीत नाही. उक्त करारात नमूद केल्याप्रमाणेच देशात इतर ठिकाणी जी कर माफी दिली आहे, त्याचप्रमाणे महाराष्ट्रात कर माफी द्यावी यासाठी हे विधेयक आपल्या अनुमतीने मांडले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या विधेयकाच्या उद्दिष्टांविषयी मंत्रिमहोदयांनी सदनाला माहिती दिली. त्याविषयी दुमत नाही. पान क्रमांक तीन वर आपण उद्देश व कारणे यासंबंधीचा स्वतंत्र परिच्छेद दिला आहे. तो अतिशय महत्त्वाचा आहे. यात आपण नमूद केले आहे की, "परराष्ट्र वाणिज्य दूतावासाच्या मालमत्तेवर बसविण्यात आलेला उपकर व रोजगार हमी उपकर हा पुरवलेल्या सेवेवरील कर नाही. त्यामुळे व्हिएन्ना करार विचारात घेता, परराष्ट्र वाणिज्य दूतावासाने धारण केलेल्या जमिनी आणि मालमत्ता यांना शिक्षण उपकर व रोजगार हमी उपकर बसविणे व त्यांचे प्रदान करणे यातून सूट देणे आवश्यक आहे" आपण आपल्या विवेचनामध्ये आणखी दोन मुद्दे मांडले आहेत, ते मला वादाचे वाटते नाहीत. येथे 'व्हिएन्ना कन्व्हेन्शन ऑन कॉन्सुलर रिलेशन्स ॲग्रीमेंटचा उल्लेख केला आहे. उद्या महाराष्ट्राची रशियामध्ये जी काही प्रॉपर्टी असेल त्यावरही आपल्याला सूट मिळेल. पण माझा मुद्दा वेगळा आहे. तो आपण कृपा करून आपण लक्षात घ्यावा. 1962 च्या कायद्यात नेमकी काय दुरस्ती केली आहे ते आपण पहा. यासाठी आपण पान क्र.2 पहावे. आपण असे म्हटले आहे, महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, 1962 याच्या कलम 7 मधील खंड (फ) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल.

"परस्पर देवाणघेवाणीच्या तत्त्वावर राज्यातील परराष्ट्र वाणिज्य दूतावासाच्या मालकीच्या जमिनी आणि इमारती"

मी ग्रंथालयामध्ये जाऊन मूळ कायदा आणला आहे. आपण म्हणता ते खरे आहे. पण गेली पाच वर्षे मी या सदनामध्ये सुपारी कराविषयी मागणी करीत आहे. या कायद्यामध्ये सुपारी कराविषयीचा उल्लेख आहे. जो मूळ कायदा आहे, त्यात काय म्हटले आहे ते समजून घ्या. मला ग्रंथालयातून इंग्रजी कायदा मिळाला आहे, तो मी वाचून दाखवितो. सेक्शन F (a) दुरुस्ती सुचवत आहात. तसेच सेक्शन 4 (b) चा देखील विचार करावा. सेक्शन 4(b) मध्ये असे म्हटले आहे की,

"4. Subject to the provisions of this Act, there shall be levied and collected,-

(b)with effect from the revenue year (commencing on the 1st day of August 1976 or on such other date as the State Government may, in relation to any area in the State, by notification in the Official Gazette appoint in this ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Dr. Ashok Modak.....

behalf,in addition to any land revenue payable on such land, a special assessment on all agricultural lands in the State on which commercial crops are raised, at the rates specified in Schedule B..." आता Schedule B मध्ये काय म्हटले आहे ते आपण पाहू.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक.....

शेडयुल बीमध्ये पान क्रमांक 6978 वर आपल्याला 16 पिकांची जंत्री वाचायला मिळेल. त्यामध्ये शुगरकेन, इरिगेटेड कॉटन, हायब्रीड कॉटन सीड,हायब्रीड जवार सीड आहे पण मला क्रमांक 15 वरील अरेकानेट म्हणजेच सुपारी या पिकामध्ये रस आहे. गेली पाच वर्षे कोकणातील सुपारी बागायतदार आंदोलन करीत आहेत. श्री.शिवाजीराव पाटील-निलंगेकर मंत्री होते तेव्हा मी त्यांना हा कायदा दाखविला होता आणि त्यांना विनंती केली होती की, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड या तीन जिल्ह्यातील सुपारी बागायतदार एकत्र येऊन त्यांनी धरणे धरलेली आहेत. ते कोर्टात गेलेले आहेत. ज्युडिशिअरी इज इंडेपेन्डंट ॲन्ड इमपार्शल. तो विषय स्वतंत्र होईल पण न्यायालयाने महाराष्ट्रातील आणि देशातील नागरिकांना बहुधा एक्झेक्युटिव्हच्या कचाट्यातून रिलिफ देण्याचे ठरविलेले दिसते. न्यायालयाने त्यावर स्टे आणला. म्हणून आता कर गोळा करणे तुलनेने तूर्त स्थगित आहे. बागायतदारांचे असे म्हणणे आहे की, सुपारीचे पीक सलग जागेवर लावले जात नाही. आपणास कपाशिची शेती दाखविता येते, ऊसाची शेती दाखविता येते, परंतु सुपारी हे आंतर पीक आहे. मला एका मामलेदाराला सांगावे लागले की, मामलेदार आपण अमूक अमूक माणसावर सुपारीचा कर लावला आहे, त्याच्याकडे किती एकर जमीन आहे हे आपण मला सांगाल काय ? यावर मामलेदार उत्तर देऊ शकला नाही. सुपारीसाठी अखंड असे क्षेत्रफळ नसते.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा असा की, सुपारीवर कोळे नावाचा रोग पडतो त्यामुळे बागायतदार फार संत्रस्त होतात. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ओरोस येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बागायतदार धरणे धरुन बसले होते. दोन-तीन वर्षापूर्वी नागपूर अधिवेशनाच्या वेळी मला त्यांचे फोन आले होते. त्या बागायतदारांनी मला सांगितले की, या कोळे रोगामुळे आम्ही संत्रस्त झालो आहोत. हातात किती सुपारी येणार हे परमेश्वर जाणे. त्यावेळी मी तो विषय सदनात मांडला होता.

तिसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे सुपारीची फार मोठ्या प्रमाणावर आयात होत आहे. आज सुपारीचे दर घसरलेले आहेत. एका बाजुला आपण सांगणार कोकणसाठी पॅकेज दिलेले आहे. श्री.गुरुनाथ कुलकर्णी आज सकाळी आपण तसा उल्लेख केला. त्या पॅकेजे विषयी मी उद्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक.....

विस्ताराने बोलणार आहे. "पॅकेज" शब्द तुमच्या मंडळीचा लाडका दिसतो. आता आपण विदर्भासाठीसुध्दा पॅकेज द्यायला निघाला आहात. मला दु:खाने असे म्हणण्याची वेळ आलेली आहे की, ही दिशाभूल आणि धूळफेक तर नाही ना ? एका बाजुला पॅकेज म्हणून सवलतींचा उल्लेख करावयाचा. दुसऱ्या बाजुला साध्या सुपारी वरील कर रद्द करा असा आम्ही कंठशोष करुन सांगत आहोत ते गाऱ्हाणे ऐकायला आपल्याला सवड नाही. रशियन कॉन्सिलेटच्या इमारतीच्या खालची जमीन आपण करापासून मुक्त करायला निघाला आहात. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे त्यावर वाद नाही. कारण आपण व्हिएन्ना कराराचा संदर्भ देत आहात. प्रश्न असा आहे की, त्याठिकाणी देवाण घेवाणीचे तत्व आहे. कोकणातील शेतकरी सरकारला काहीच देऊ शकत नाही. त्याठिकाणी देवाणघेवाण नाही म्हणून तर तुम्ही कोकणातील सुपारीवर अन्याय करीत नाही ना ? आपल्याला माहीत असेलच की, 23 जुलै, 2005 रोजी हे आपणच बील मांडले होते. मी मुद्दाम त्या वेळच्या चर्चेचे प्रोसिडींग्ज बरोबर आणले आहे. जेव्हा एखादा माणूस लिव्ह ॲन्ड लायसेन्स बेसिसवर फ्लॅट दुसऱ्या माणसाकडे हस्तांतरण करतो. त्यावेळी एक जण असतो लीगल ऑथराईजड् ऑक्युपंट आणि दुसरा इललीगल अनऑथराईजड् ऑक्युपंट असतो. आज मुंबईतील माणूस त्या कारणामुळे संत्रस्त आहे. त्याला भिती अशी वाटते की, जो कोणी अनऑथराईजड् ऑक्युपंट आहे म्हणजेच अनधिकृत भोगवटादार. उद्या तोच जर घर बळकावून बसला तर ज्याप्रमाणे "कसेल त्याची जमीन आणि राहील त्याचे घर" या तत्वाच्या आधारावर तर माझ्या आयुष्याची कमाई उद्ध्वस्त होणार नाही ना ? ही भिती मी तेव्हाही व्यक्त केली होती. त्यावेळची सगळी चर्चा आता माझ्याकडे आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ.अशोक मोडक....

या ठिकाणी जे मुद्रांक शुल्क लावले होते त्या मुद्रांकाच्या बाबतीत आपण 5 हजारावरुन एकदम 25 हजार रुपयांपर्यंत गेलात. त्यावेळी याबाबत आपल्यासह माननीय अर्थमंत्री, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि माझी, माननीय सभापती महोदयांच्या दालनात चर्चा झाली होती. त्यावेळी आपण आमचे म्हणणे ऐकल्यामुळे माननीय अर्थमंत्र्यांबरोबरच मी आपल्याला सुध्दा धन्यवाद देतो. त्या चर्चेनंतर सभागृहात येऊन माननीय अर्थमंत्री श्री.जयंत पाटील यांनी या विषयावरील चर्चेच्या समारोपाच्या वेळी मार्मिक शब्दात सांगितले की, "सभापती महोदय, हे विधेयक मघाशीच मंजूर झाले आहे. परंतु त्यानंतर झालेल्या चर्चेमध्ये एक ॲडीशनलीटी करावी अशाप्रकारची सूचना करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, डॉ.अशोक मोडक आणि इतर सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे सध्या जे स्लॅब आहेत ते सभागृहाने मंजूर केले असून, त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी होईलच. परंतु त्यांनी सूचना केल्याप्रमाणे सरकारला स्वतंत्र दुरुस्ती आणावी लागेल, यासंदर्भात चर्चाही झाली असून त्याप्रमाणे स्वतंत्र व्यवस्था करण्यात येईल." काल मी पुन्हा याबाबत माननीय अर्थमंत्र्यांना सांगितले आणि माझ्याजवळ या विषयासंदर्भात असलेली कागदपत्रे त्यांना दिली. आता अधिवेशन संपण्यास केवळ दोन दिवसांचा अवधी राहिला आहे. त्यामुळे आपण दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी केव्हा करणार आहात ? कारण हे सभागृहातील आश्वासन आहे. आता हा कायदा आपण या ठिकाणी आणलेला आहे. माझी आपल्याला कळकळीची, आग्रहाची आणि विनम्रपणे विनंती आहे की, Please follow that precedent . एका अर्थाने त्या क्षणी आपल्याला दुरुस्ती करता आली नाही. परंतु ...Subsequently that amendment will be made ... अशाप्रकारचे आश्वासन किंवा अभिवचन आपण आणि अर्थमंत्री महोदयांनी दिलेले आहे. भले ते आपण अंमलात आणलेले नसेल. त्यामुळे आपण यासंदर्भातील दोन्हीही आश्वासन अंमलात आणावे अशी मी विनंती करीत आहे. आपण रशियन काऊन्सलेट इमारतीवरील करात सूट देणार आहात. मग कोकणच्या सुपारी उत्पादकांना वंचित का ठेवता ? त्यांना सवलत दिल्याने काही आभाळ कोसळणार नाही. रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड या तिन्ही जिल्हा न्यायालयाने या कर वसुलीला स्थगिती दिलेली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. आपण कर सवलत देण्याबाबत या ठिकाणी घोषित केले तर सुपारी उत्पादकांना फार मोठा रिलीफ दिल्यासारखे होईल. खऱ्या अर्थाने अतिवृष्टी, जलप्रलयाने संकटात सापडलेल्या कोकणवासियांना दिलासा देऊन, आपण पुण्य पदरी पाडा एवढीच या निमित्ताने मागणी करतो. हा विषय कसा गंभीर आहे हे आपल्या सर्वांच्याच लक्षात आले असे ग्राहय धरुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी सांगितले की, स्टँम्प डयुटीच्या संदर्भात माननीय अर्थमंत्र्यांनी मागील अधिवेशनात आश्वासन दिले होते. ज्यावेळी माननीय सभापतींच्या दालनात मी सुध्दा चर्चेच्या वेळी उपस्थित होतो आणि त्यासंदर्भात माननीय अर्थमंत्री महोदयांनी सभागृहात घोषणा केली होती हे मला मान्य आहे. मी या मुद्याबाबत अगोदरच चौकशी केली होती. स्लॅब वाढविण्यासंदर्भात नोटीफिकेशन काढण्यासंदर्भातील नस्ती वित्त विभागाकडे आलेली आहे. एक-दोन दिवसात नोटीफिकेशन काढले जाईल. अधिवेशन संपण्यापूर्वी नोटिफिकेशन काढले जाईल एवढेच या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या इतर सूचना केल्या त्या सूचनांच्या संदर्भात या विधेयकाच्या माध्यमातून आपल्याला काही करता येईल असे वाटत नाही. त्यामुळे आपण यासंदर्भात स्वतंत्र सूचना दिली तर बरे होईल. रशियन किंवा परकीय दूतावासाचा कर माफ करण्यासंदर्भातील हे विधेयक आहे. त्यामुळे या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी ज्या सूचना आणि मुद्दे मांडले ते मी गांभीर्याने घेतलेले आहेत. त्या मुद्यांसंदर्भात विचार झाला पाहिजे याबद्दल माझे दुमत नाही. परंतु या विधेयकाला जोडून त्यासंदर्भात काही करता येईल असे मला वाटत नाही. त्यामुळे त्यांनी यासंदर्भात स्वतंत्रपणे चर्चा करावी, जेणेकरुन त्या दृष्टिकोनातून निर्णय घेणे शक्य होईल.

नंतर श्री.गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक : सुपारीवरील कायद्याचा संबंध याच कायद्याशी आहे आणि त्याबाबतीत मी आपल्याला मघाशी एक उदाहरण दिलेले आहे.या कायद्यातील तरतूदच मी आपल्याला वाचून दाखवली होती.. विशिष्ट कलमांचा विचार केला तर त्यातील "एफ" या कलमानंतर पुढे" "ए" जोडला आहे आणि त्यातूनच आपण रशियन कॉन्सुलेटला एक्झम्शन दिलेले आहे.या बाबतीत मला आपल्याला एक विनंती करावयाची आहे. Please apply same model and logic to Section 4. ही तरतूद याच कायद्याशी सबंधित आहे ना ? या सुधारलेल्या कायद्याच्या बाबतीत जेव्हा आपण सदनाकडून पाठिंबा मागता तेव्हा सदनातील एक सदस्य म्हणून मी आपल्याला साकडे घालतो की, जेव्हा आपण या कलमाचा विचार करावयास आम्हाला सांगत आहात तेव्हा त्याही कलमांचा आपण विचार करावा असे मी आपल्याला सांगत आहे.. आत्ता त्याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांना दुरुस्ती आणता येणार नाही हे मला मान्य आहे परतु नंतर दुरुस्ती करण्यासाठी विधेयक आणू असे तरी माननीय मंत्रिमहोदयांनी म्हणावयास पाहिजे.त्याबाबतीत "विचार करु "असे म्हणू नका तर " व्यवहार करु " असे म्हणा.

डॉ.राजेन्द्र शिंगणे :सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी सागितल्याप्रमाणे आता ती दुरुस्ती आणता येणार नाही परंतु त्यासंबंधी निश्चित विचार करु असे मी आपणाला स्पष्टपणे सांगत आहे.

डॉ.अशोक मोडक :सुपारीवरील कर उठवला जाईल असे म्हटले पाहिजे. फक्त "विचार करु असे" म्हणण्यामध्ये मला भय वाटते.

डॉ..राजेन्द्र शिंगणे: माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी सागितले की हे प्रकरण उच्च कोर्टात गेलेले आहे.तेव्हा याबाबतीत आता निर्णय घेणे मला उचित वाटत नाही.

डॉ.अशोक मोडक :हे प्रकरण उच्च न्यायालयात गेलेले नाही तर जिल्हा न्यायालयात गेलेले आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी जी भूमिका मांडलेली आहे ती मलाही मान्य आहे. कोकणातील सुपारीवर जो कर बसविण्यात आलेला आहे तो अनावश्यक आहे. आता जे विधेयक मांडण्यात आलेले आहे त्या विधेयकाच्या निमित्ताने कोकणातील सुपारीवरील कर माफ करावयाचा हे आश्वासन मंत्रीमहोदय या विधेयकावरील चर्चेच्या वेळी देऊ शकत नाही.सध्या जे विधेयक मांडण्यात आलेले आहे त्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी..

विधेयकाच्या बाबतीत जर माननीय सदस्यांची काही हरकत असेल तर ती हरकत ते मांडू शकतात परतु या विधेयकाच्या निमित्ताने सुपारीवरील कर माफ करण्याच्या बाबतीत त्यांना आश्वासन मिळवता येणार नाही.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, या विधेयकाचा सबंध 1962 च्या कायद्याशी आहे 1962 च्या कायाद्याशी सुपारीचे लग्न लागलेले आहे. You cannot separate them. You cannot discriminate between these two.

डॉ.राजेन्द्र शिंगणे :माननीय सदस्यांच्या भावनांशी मी सहमत आहे परंतु आजचे विधेयक हे वेगळया अर्थाचे आहे आणि माननीय सदस्य जी भूमिका मांडत आहे ती वेगळया अर्थाची आहे.एखाद्या वस्तूवरील कर माफ करण्यासंबंधीचा उल्लेख या विधेयकामध्ये कोठेही नाही.त्याचा या विधेयकाची काहीही सबंध येत नसल्यामुळे त्याबाबतीत मला आताच सांगता येणार नाही.त्याचा निर्णय आता घेण्यात येऊ नये त्याकरता वेगळे विधेयक आणावे. या ठिकाणी मांडण्यात आलेले विधेयक मंजूर करावे अशी मी सदनाला विनती करतो.

डॉ.अशोक मोडक : हा बॉल पुन्हा आमच्या कोर्टात टाकू नका. याबाबतीत आम्ही यापूर्वी पुरेसे कष्ट घेतलेले आहेत. तुमच्याकडे येऊन अनेकदा तुमचे उंबरठे झिजवले आहेत. तेव्हा याबाबतीत विधेयक आम्ही आणू असे माननीय मंत्रिमहोदयांनी म्हणावे.सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना मी सांगतो की, या विधेयकाला आपण अनाथ करु नका.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : आपल्या मागणीसाठी मी सुध्दा आपल्या बरोबरच राहीन.

डॉ.राजेन्द्र शिंगणे : या संदर्भात निश्चितपणे शासनाकडून बिल आणले जाईल.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

तालिका सभापती (श्रविलास अवचट) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो .शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2,खंड 1 (दोन्ही सम्मिलित) ,संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एकामागून एक या प्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही)

तालिका सभापती (श्री.विलास अवचट): ज्या अर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्या अर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशी सह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

पृ.शी. : मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, 2005.

L.A. BILL NO. LXXX OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY MOTOR VEHICLES TAX ACT, 1958.)

श्री. धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 80 - मुंबई मोटार वाहन कर अधिनियम 1958 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री. अनंत तरे (रायगड,रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या ठिकाणी भाषण न करता केवळ एक सूचना करण्यासाठी मी उभा आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये हजारो रिक्षा बिगर परमिटने चालत असल्याबद्दल या सभागृहामध्ये सातत्याने लक्षवेधी सूचना, तारांकित प्रश्न आलेले आहेत, पण त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही, झालेली नाही. यामुळे आपला कर महसूल मोठ्या प्रमाणात बुडतो आहे हे आपण लक्षात घ्यावे. अर्थात हे विधेयक त्या संदर्भातील नाही, जेसीबी साठी परवाने देण्याबाबतचे हे विधेयक आहे, आणि जेसीबीसाठी आपण परवाने देणार आहात ही एक चांगली गोष्ट आहे. तरीही या निमित्ताने मी मागणी करतो, सूचना करतो की, आपण रिक्षा चालविण्यासाठी म्हणून जे बॅज वा परमिट देतो त्यासाठी 15 वर्षांच्या महाराष्ट्रातील वास्तव्याची अट आहे. त्याशिवाय परवाना वा बॅज मिळत नाही. परंतु असे असतानाही ठाणे शहरामध्ये हजारो रिक्षा आज विनापरमिट, विनाबॅज चालत आहेत आणि त्यांच्यावर कोणत्याही प्रकारे कारवाई होत नाही. तरी त्यांचेवर कारवाई करण्यात यावी एवढीच माझी सूचना आहे.

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मला देखील केवळ एकाच गोष्टीचा खुलासा विचारावयाचा आहे. आता आपण ज्यांच्यावर कर लावण्याचा विचार चालविला आहे त्या बाबतीत आपल्या शेजारच्या राज्यांमध्ये काय परिस्थिती आहे वा तेथे याबाबत काय तरतूद आहे ?

..... 5टी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, आता या क्षणी बाहेरच्या राज्यांमध्ये या संबंधात काय तरतूद आहे याची माहिती माझ्याकडे नाही. पण मी ती नंतर पटलावर ठेवतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती (श्री.विलास अवचट) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. कोणा सदस्यांना शिफारशी करावयाच्या असल्यास, त्यांनी त्या मांडाव्यात.

(खंड 2, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

तालिका सभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

****

<u>सभागृहाच्या दिनांक 15 डिसेंबर 2005 रोजीच्या कामकाजाबाबत.</u>

तालिका सभापती : उद्या, गुरूवार, दिनांक 15 डिसेंबर 2005 रोजीच्या सभागृहाच्या कामकाजाचा क्रम खालीलप्रमाणे राहील.

गुरूवार, दिनांक 15 डिसेंबर 2005 रोजी सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10.15 ते 12.45 वाजेपर्यंत अल्पकालीन चर्चा - अतिवृष्टी संबंधात घेण्यात येईल. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता भरेल.

सभागृहापुढील दिवसाचे कामकाज संपले आहे. आता सभागृहाची बैठक स्थगित होऊन, उद्या, गुरूवार, दिनांक 15 डिसेंबर 2005 रोजी सकाळी 10.15 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 9 वाजून 27 मिनिटांनी, गुरूवार, दिनांक 15 डिसेंबर, 2005 रोजीच्या सकाळी 10 वाजून 15 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही